म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

हालय क्रमांक
२३

पुस्तकाचें नांव

[ हा ग्रंथ "मराठी ग्रन्थोत्तेजक मंडळी" नें पसंत केला आहे. ]

# सार्थ

# आश्वलायनगृह्यसूत्र.

हा ग्रंथ

ऋग्वेदी ब्राह्मण व शोधक देशबांधव यांचे

उपयोगाकरितां मंत्रांचे टिप्पणासहित

**लोकहितवादी**

यांणीं केला.

तो

**मुंबईमध्यें**

"नेटिव ओपिनिअन" छापखान्यांत छापिला.

---

चैत्रमास, शके १८०२.

---

मे, इ. सन १८८०.

---

**किम्मत १॥ रुपया.**

हें पुस्तक ग्रंथोत्तेजक मंडळीचे वर्गणीदारांस मात्र १। रुपयास मिळेल.

## शान्ति, प्रार्थना, स्तुति, विनय, बोध.

ॐ सह नाववतु, सहनौ भुनक्तु, सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधी-तमस्तु, माविद्विषावहै । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥ १ ॥— तैत्तिरीयोपनिषद्, ब्रह्मानन्दवल्लि, १ अनुवाक.

मधुवाता ऋतायते मधुंक्षरन्तिसिन्धवः ॥ माध्वीर्नःसन्त्वोषधीः मधुनक्त मुतोषसोमधुमत्पार्थिवङ्‌रजः ॥ मधुद्यौरस्तुनःपिता ॥ मधुमान्नोवन स्पतिर्मधुमाङ्‌अस्तुसूर्यः॥ माध्वीर्गावो भवन्तुनः॥—नारायणोपनि०

विश्वानिदेवसवितर्दुरितानिपरासुव ॥ यद्भद्रंतन्नआसुव ॥——किता.

शतं जीव शरदो वर्धमानः शतं हेमन्ताञ्छतमु वसन्तान् ॥ शत-मिन्द्राग्नी सविता बृहस्पतिः शतायुषा हविषेमं पुनर्दुः ॥ ४ ॥— ऋ. ८, ८, १९.

मानस्तोके तनये मान आयौ मानो गोषु मानो अश्वेषुरीरिषः ॥ वीरान्मानो रुद्रभामितो वधीर्हविष्मन्तःसदमित्वा हवामहे॥८॥१,८,६.

विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतो बाहुरुत विश्वतःस्पात् ॥ संबा-हुभ्यां धमति संपतत्रै र्द्यावा भूमी जनयन् देव एकः॥—यजु० १७, १९.

प्रजापते नत्वदेतान्यन्यो विश्वा जातानि परिता बभूव ॥ यत्कामास्ते जुहुमस्तन्नो अस्तुवयं स्याम पतयो रयीणाम् ॥१०॥—ऋ. ८,७,४.

हिरण्यगर्भः समवर्त्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ॥ सदाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १ ॥—ऋ. ८, ७, ३.

इन्द्रं मित्रं वरुण मग्निमाहुरथो दिव्यः ससुपर्णो गरुत्मान् ॥ एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः॥४६॥ ऋ. २,३,२२.

ऋचो अक्षरे परमे व्योमन्यस्मिन्देवा अधि विश्वे निषेदुः ॥ यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासते ॥ ३९ ॥—ऋ. २, ३, २१.

# आश्वलायनगृह्यसूत्र.

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५ | ५ | १७ इंद्रपुरुषाय० | १७ इन्द्रपुरुषेभ्यः |
| ,, | २५ | २० वरुणाय० | २१ वरुणपुरुषेभ्यः० |
| | | २१ वरुणपुरुषेभ्यः | २० वरुणाय० |
| ९ | ३ | होष्यनत्स्या— | होष्यन्त्स्या— |
| ,, | २० | सत्याभ्यां | सत्याभ्यां त्वा |
| ३२ | ९ | वपा व श्रपणी | वपाश्रपणी |
| ४९ | ९ | सर्वेवा सर्वे षां | सर्वे वा सर्वेषां |
| ६२ | ११ | स्तिाथय ॥ | स्थिताय ॥ |
| ७८ | २ | रन्वष्टभ्यं | रन्वष्टक्यं |
| १२२ | २१ | तत्नीं | पत्नीं |
| १२६ | ११ | लौहायस व कौलाल | लौहायसकौलाल |
| ,, | १९ | अग्नयेस्वाहा | अग्नयेस्वाहा |
| ,, | २१ | पञ्त्तमीमुरसि | पञ्चमीमुरसि |
| १३८ | २५ | एकोद्दिष्टे | एकोद्दिष्टे |
| १४१ | ६ | संम्नभूवुर्या | सम्नभूवुर्या |

# आश्वलायनगृह्यसूत्र.

## अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रस्तावना .... .... | १–५६ |
| शुद्धिपत्र | |
| पाकयज्ञ .... .... .... | १ |
| वैश्वदेव .... .... .... | ३ |
| बलिहरण .... .... | ,, |
| होम.... .... .... .... | ६ |
| चौल वगैरे संस्कार .... | ८ |
| उपनयन .... .... .... | ,, |
| विवाह .... .... .... | ९ |
| कुलपरीक्षा .... .... | ११ |
| अष्टविवाह .... .... | १३ |
| देशाचार.... .... .... | १४ |
| सप्तपदी .... .... .... | १९ |
| गृह्याग्नि .... .... .... | २४ |
| दर्शपौर्णमास .... .... | २६ |
| पशुकल्प .... .. .... | ३० |
| बलि .... .... .... | ३४ |
| धन्वन्तरीयज्ञ .... .... | ,, |
| पुंसवन .... .... .... | ३५ |
| अनवलोभन .... .... | ,, |
| गर्भालम्भन .... .... | ,, |
| सीमन्तोन्नयन .... .... | ३७ |
| जातकर्म .... .... .... | ३८ |
| नामकर्म .... .... .... | ४० |
| अन्नप्राशन .... .... | ४१ |
| शेंडी राखणें .... .. . | ४५ |
| गोदान .... .... .... | ४६ |
| मुंज.... .... .... .... | ४७ |
| ब्रह्मचर्य .... .... .... | ५३ |
| मेधाजनन .... .... | ५६ |
| मधुपर्क ... .... .... | ६२ |
| श्रवणाकर्म .... .... | ६६ |
| अश्वयुजी .... .... | ७० |
| प्रत्यवरोहण .... .... | ७२ |
| अष्टका .... .... .... | ७४ |
| अन्वष्टका .... .... | ७८ |
| पिंडपितृयज्ञ .... .... | ,, |
| रथारोहण .... .... | ८० |
| वास्तु .... .... .... | ८२ |
| पंचयज्ञ .... .... .... | ९१ |
| स्वाध्याय .... .... .... | ९२ |
| तर्पण .... .... ... | ९५ |
| श्रावणी ( उपाकर्म ).... | ९७ |
| उत्सर्जन .... .... .... | १०० |
| काम्ययज्ञ .... .... | १०१ |
| सन्ध्या .... .... .... | १०५ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| समावर्त्तन .... .... | १०६ |
| स्नातकव्रत .... .... | ११० |
| युद्धसाधन .... .... | ११५ |
| अन्त्येष्टी .... .... .... | ११८ |
| अनुस्तरणी .... .... | १२१ |
| पत्नीउत्थापन .... .... | १२३ |
| पात्रस्थापन .... .... | ,, |
| अग्निस्पर्श .... .... | १२७ |
| तिलांजली .... .... | १२९ |
| सूतक .... .... ... | १३० |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| अस्थिसंचयन .... .... | १३२ |
| शान्ति .... .... .... | १३४ |
| अंजनविधि .... .... | १३७ |
| वृषोत्सर्ग .... .... .... | १३८ |
| श्राद्धे .... .... ..... | ,, |
| शूलगव .... .... .... | १४४ |
| शूलगवाचें फल .... | १५० |
| वेदमन्त्र | |
| याज्ञिक शब्दांचा कोश | |

# आश्वलायनगृह्यसूत्राची
## खण्डानुक्रमणिका.

---

### अध्याय १ ला.


खण्ड १ ले.—गृह्यकर्मकथनप्रतिज्ञा—पाकयज्ञाचे तीन भेद—यज्ञप्रशंसा.

खण्ड २ रें.—वैश्वदेव—बलिहरण.

खण्ड ३ रें.—स्थण्डिलकरण वगैरे होमपरिभाषा.

खण्ड ४ थें.—चौल, मौंजी, गोदान व विवाह यांचा काल व त्यासंबंधीं होम.

खण्ड ५ वें.—कुलपरीक्षा—कन्येची परीक्षा.

खण्ड ६ वें.—विवाहाचे अष्ट प्रकार.

खण्ड ७ वें.—विवाहप्रयोग—अवदानधर्म.

खण्ड ८ वें.—परगांवीं लग्न करून येतांना वधूला वहनांत बसविण्याचा मंत्र—नावेंत बसविण्याचा मंत्र—उतरण्याचा मंत्र—वधू रडूं लागली तर ह्मणावयाचा मंत्र—वधूवरांच्या पुढें अग्नि नेणें—चवाठ्याच्या वगैरे ठिकाणीं ह्मणावयाचा मंत्र—दरमुक्कामीं पाहण्यास आलेल्या लोकांकडे पाहण्याचा मंत्र—गृहप्रवेशप्रयोग.

खण्ड ९ वें.—नित्य अग्निसेवा—प्रादुष्करणकाल—होमद्रव्य व मंत्र.

खण्ड १० वें.—स्थालीपाकप्रयोग—पाकयज्ञ स्थालीपाकतंत्रानें करावे.

खण्ड ११ वें.—पशुप्रयोग.

खण्ड १२ वें.—चैत्ययज्ञ व धन्वन्तरियज्ञ.

खण्ड १३ वें.—गर्भालंभन—पुंसवनकाल व प्रयोग—अनवलोभनप्रयोग.

खण्ड १४ वें.—सीमन्तोन्नयनकाल व प्रयोग.
खण्ड १५ वें.—जातकर्म व नामकर्म.
खण्ड १६ वें.— अन्नप्राशन.
खण्ड १७ वें.—चौल.
खण्ड १८ वें.—गोदान.
खण्ड १९ वें.—मौंजीचा काल व साहित्य.
खण्ड २० व २१ वें.—मौंजीप्रयोग.
खण्ड २२ वें.—ब्रह्मचर्योपदेश—अनुप्रवचनीय होम—व्रतादेशन प्रायश्चित्तार्थ मौंजीप्रयोग व काल.
खण्ड २३ वें.—ऋत्विग्वरण व ऋत्विक्परीक्षा—निषिद्ध उपाद्धिक.
खण्ड २४ वें.—ऋत्विजादिकांस मधुपर्कदान—प्रयोग.

---

## अध्याय २ रा.

खण्ड १ लें.—श्रवणाकर्म—सर्पबलि.
खण्ड २ रें.—अश्वयुजीकर्म.
खण्ड ३ रें.—प्रत्यवरोहण.
खण्ड ४ थें.—अष्टकाप्रयोग.
खण्ड ५ वें.—अन्वष्टका—माध्यावर्ष व वृद्धिश्राद्धादि निर्णय.
खण्ड ६ वें.—रथारोहण—शकटारोहण—नौकारोहण.
खण्ड ७ वें.—वास्तुपरीक्षा.
खण्ड ८ वें.—भूपरीक्षा.
खण्ड ९ वें.—खांबावर वेळू ठेवणें व वास्तुशान्ति.
खण्ड १० वें.—गृहप्रवेश—गाईचें अनुमन्त्रण व वत्सोपस्थान.

---

## अध्याय ३ रा.

खण्ड १ लें.—पंचमहायज्ञ.
खण्ड २ रें.—स्वाध्यायविधि.

खण्ड ३ रें.—ऋग्वेदादींचा आरंभ.
खण्ड ४ थें.—देवतांचें तर्पण.
खण्ड ५ वें.—उपाकरण व उत्सर्जन.
खण्ड ६ वें.—काम्यपाकयज्ञ—दुःस्वप्नादिकांची शान्ति—अगम्यगमनादिकांचें प्रायश्चित्त.
खण्ड ७ वें.—व्याधि नसून वाईट कृत्यांनीं श्रमल्यामुळें दिवसां निद्रा घेईल तर प्रायश्चित्त—संध्या व गायत्री जपादि—घरावर कपोत बसला असतां प्रायश्चित्त—द्रव्यप्राप्ति, प्रवासार्थ गमन, नष्ट वस्तु व ज्ञान यांची प्राप्ति होणें इत्यादिकांस उपाय.
खण्ड ८ व ९ वें.—समावर्त्तन—साहित्य व प्रयोग—स्नातकाचे धर्म.
खण्ड १० वें.—पक्ष्यांचा क्रूर शब्द, हरिणांचा वाईट शब्द व ज्या दिशेपासून भय होतें इत्यादि विषयीं प्रयोग.
खण्ड ११ वें.—दिशांपासून भय प्राप्त झालें असतां प्रयोग.
खण्ड १२ वें.—युद्धप्रसंगीं राजाचे तयारीचा प्रयोग.

---

## अध्याय ४ था.

खण्ड १, २, ३, ४ व ५ वें.—अन्त्येष्टिप्रयोग.
खण्ड ६ वें.—अमावास्येस शान्तिकर्म व नीलोद्वाह.
खण्ड ७ वें ८ वें.—सामान्यतः पार्वणश्राद्धादिकांचा प्रयोग.
खण्ड ९ वें.—शूलगव.

# प्रस्तावना.

या महाराष्ट्रदेशांत, आश्वलायन किंवा ऋग्वेदी आणि वाजसनीय किंवा यजुर्वेदी अशा ब्राह्मणांच्या दोन शाखा आहेत. आश्वलायन ह्मणावयाचें कारण, ते ब्राह्मण आश्वलायनसूत्राचे अधिकारी असून त्यांणीं आश्वलायनार्यांनीं जो प्रयोग ह्मणजे सूत्र बांधिलें आहे-तेंच आपल्या सर्व कर्मांस आधारभूत आहे असें समजून तदनुरूप चालावयाचें; आणि ह्याकरितां तें सूत्र जाणणें आवश्य आहे. ह्याप्रमाणें तें सूत्र त्या शाखेंतील वैदिक व याज्ञिक हे मुखपाठ ठेवून त्यांस इतर प्रयोगग्रंथांत कांहीं वचनें आढळलीं तर तीं सूत्राशीं मिळतात किंवा नाहींत हें पाहतात. सूत्राशीं मिळणारीं सर्व वचनें त्यांस मान्य असून सूत्रें हीं वेदतुल्य होत अशी तत्कालीयांची [illegible] आहे
तरच तें [illegible]
परंतु [illegible] किंवा [illegible]
संबंधानें नसून त्यांमध्यें विकल्प आहे. अस्तु. तर अशा आश्वलायनसूत्रांत काय आहे याचा अर्थ कळणें आवश्य असल्यामुळें आह्मीं प्रस्तुत पुस्तक तयार केलें आहे. या सूत्रांत प्राचीन काळच्या रीती भाती व आचार विचार यांचें चांगलें दिग्दर्शन होऊन त्या काळच्या व हल्लींच्या स्थितिरीतींत किती अंतर पडलें आहे हेंही समजण्यास प्रस्तुत ग्रंथ बराच उपयोगी होईल असें वाटतें.

आश्वलायनाचार्य हे ऋषि शौनकांचे शिष्य होते. शौनक यांणीं सर्वानुक्रम, ऋग्विधान वगैरे वेदांचे परिशिष्टग्रंथ केले. शौनकांच्या आश्वलायनाचार्य या शिष्यांनींही एक सोळा अध्यायांचें सूत्र केलें असून त्यांपैकीं बारा अध्यायांस श्रौतसूत्र ह्मणतात

व चार अध्यायांस **गृह्यसूत्र** किंवा **स्मार्त्तसूत्र** असें ह्मणतात. या षोडशाध्यायात्मक एकंदर सूत्रास **कल्पसूत्र** असेंही ह्मणतात. पैकीं **श्रौत** सूत्रांत, अग्निहोत्रापासून पुढील जे याग वेदांत सांगितले आहेत त्यांची पद्धति दाखविली आहे. व **गृह्य**सूत्रांत जन्मापासून मरणपर्यंत गृहस्थानें कोणकोणतीं कर्मं (संस्कार) करावयाचीं त्याचे प्रयोग बांधले आहेत. यावरून श्रौत व गृह्य हीं दोन्हीं सूत्रें अगदीं पृथक् असून **श्रौत** या नांवावरूनच त्या सूत्रास वेदाचा आधार आहे असें सिद्ध होतें; परंतु **गृह्यास** वेदाधार नाहीं ह्मणून तें **श्रौता**पासून वेगळें केलें आहे असें दिसतें.

सूत्र हें, वेदाचीं जीं शिक्षा, व्याकरण, छंद, ज्योतिष, निरुक्त आणि सूत्र अशीं सहा अंगें आहेत त्यांतील असल्यामुळें ह्याचा मान मोठा आहे. सूत्रास साधारण **कल्प** असें ह्मणण्याचाही पाठ आहे. कल्पांत श्रौत, धर्म आणि गृह्य असे तीन विभाग असतात. परंतु **आश्वलायन**सूत्रांत श्रौत आणि गृह्य असे दोनच भाग आहेत. **आश्वलायनस्मृति** ह्मणून एक धर्मशास्त्राचा ग्रंथ आहे, परंतु तें धर्मसूत्र ह्मणून कोठें आढळत नाहीं. **आश्वलायनसूत्र** हें ऋग्वेदाची जी **आश्वलायन**शाखा आहे तत्संबंधी असावें अशी कल्पना आहे. वेदाच्या बहुत शाखा नष्ट झाल्यामुळें **शाकल** शाखांतर्गत ऋग्वेदी ब्राह्मण हेंच सूत्र घेतात. गुजराथेंत **ऋग्वेद**संबंधी **सांख्यायन**शाखा आहे तिकडे सांख्यायन नांवाचें सूत्र घेतात. **सांख्यायन**सूत्राचेंही सहा अध्यायांचें स्मार्तसूत्र आहे. ह्याप्रमाणें एका ऋग्वेदांत **आश्वलायन** व **सांख्यायन** असे दोन शाखाभेद मात्र उपलब्ध आहेत व या दोन सूत्रांशिवाय ऋग्वेदावर तिसरें सूत्र आढळांत नाहीं. पूर्वीं **ऋग्वेदाच्या** शाकल, बाष्कल, सांख्यायन, आश्वलायन, मांडुकेय व ऐतरेय अशा सहा शाखा होत्या असें **चरणव्यूह** ग्रंथांत ह्मटलें आहे. प्रत्येक शाखेस संहिता ब्राह्मण व सूत्र अशीं असतात. त्याप्रमाणें प्रस्तुत शाखेचें **ऐतरेय** व शाकलसंबंधी **कौशीतकी** अशीं दोन ब्राह्मणें उपलब्ध असून त्याचप्रमाणें

ऐतरेय व कौशीतकी अशीं दोन उपनिषदें आहेत. ह्याप्रमाणें एकाचें मूळ, एकाचा मध्य व एकाचा शेवट असे घेऊन शाखा बांधून ब्राह्मण राहिलेले दिसतात. ह्मणजे, शाकलशाखीय ब्राह्मण हे आपल्यास ऐतरेयब्राह्मण व वर लिहिल्याप्रमाणें आश्वलायन-सूत्र घेतात. आणि सांख्यायनशाखी ब्राह्मण हे कौशीतकीब्राह्मण व सांख्यायनसूत्र घेतात. संहितांचीही हीच स्थिति असून शाकल व सांख्यायन हे दोन संहितापाठ मात्र राहिले व बाकीचे बुडाले.

वेदाचे मंत्रांचा विनियोग प्रथमतः श्रौतकर्मार्थ ब्राह्मणग्रंथांत लिहिला आहे. परंतु ते ग्रंथ फार विस्तीर्ण असल्यामुळें व प्रयोगाची पद्धति थोडक्यांत कळावी या हेतूनें सूत्रें रचिलीं असावीं. धर्मसंबंधांत श्रुति व स्मृति यांचे आधार घेण्याची जी वहिवाट आहे तीवरून पाहिलें असतां श्रुति ह्मणजे वेदाज्ञा पढवीत आले ती; व स्मृति ह्मणजे पूर्वींच्या स्मरणानें जो आचार चालत आला किंवा जी [illegible]

सूत्र रचिलें असावे [illegible]

चाल पुष्कळ पडली असून ह्या कल्पसूत्राप्रमाणेच प्रातिशाख्य, सूत्रें, निदानसूत्रें, षड्दर्शनसूत्रें, प्रतिज्ञासूत्रें, व व्याकरणसूत्रें वगैरे लिहिण्याची चाल पडली असावी असा तर्क होतो.

**आश्वलायनाचार्यास** '**भगवान्**' ही ह्मणण्याची चाल आहे. पूर्वी जे मोठाले वैदिकमार्गप्रवर्तक आचार्य झाले त्यांस 'भगवान्' असें श्रेष्ठत्वदर्शक विशेषण देण्याची चाल आहे '**भगवान् बादरायणः**' '**भगवता शंकरेण,**' '**भगवान् आश्वलायनः**' इत्यादि वाक्यें आढळतात. **आश्वलायनाचे** सूत्रावर **नारायणवृत्ति** ह्मणून एक टीकाग्रंथ असून **जयंत** व **देवत्रात** यांचींही भाष्यें आहेत. आणि याशिवाय **कुमारिलभट्टाच्या** कारिका* ही आहेत.

---

* फुटकळ वाक्याचे श्लोक केले ह्मणजे त्यांस कारिका ह्मणतात. व श्लोकांचीं फुटकळ वाक्यें केलीं असतां त्यांस चूर्णिका ह्मणतात.

या कुमारिलभट्टाचार्यांनेच जैनमतप्रतिपादक बौद्धाचार्यां-विरुद्ध वेदोक्त धर्माचें * प्रतिपादन केलें होतें. परंतु त्यावेळेस ब्राह्मणधर्मांत हिंसाश्रित याग फार असल्यामुळें बौद्धाचार्यांच्या दयाधर्माचेंच वजन जास्त पडत जाऊन वैदिक धर्म हा लोकविद्वेषणाला कारण होऊं लागला. तेव्हां हा प्रसंग लक्षांत आणून कुमारिलांनीं दूरदर्शित्वानें आपल्या कारिकेंत सूत्रोक्त हिंसा अगदींच गाळून टाकिली. आणि कुमारिलापुढें ही जे प्रयोगकार झाले त्यांणींही त्या धोरणानेंच अहिंसायुक्त प्रयोग लिहिले. यामुळें हल्लीं गृहस्थाचे ( गृह्य ) कर्मांत श्रौतकर्माशिवाय † हिंसा ह्मणून राहिली नाहीं. परंतु मूळचें जें सूत्र आहे तें तसेंच फेर बदल न करितां दाखल्यासाठीं ब्राह्मणांनीं स्वाध्यायांत मात्र रक्षून ठेविलें आहे. कुमारिलभट्ट हे शंकराचार्यांपूर्वीं सुमारें १०० वर्षें ह्मणजे शालिवाहन शके सुमारें ५०० मध्यें झाले असावे असा अजमास आहे.

सूत्राची एक गृह्यपरिशिष्ट ह्मणून लहानशी पुरवणी आहे. परंतु ती आलीकडेच कोणीं तरी रचिली असावी असें पुष्कळांचें मत आहे. याचप्रमाणें दुसरीं एक बव्हृच व दुसरें सांखायन अशीं दोन परिशिष्टें आहेत.

---

* कुमारिलापूर्वीं जैमिनीनें पूर्वमीमांसा ( वाक्यार्थमीमांसा किंवा कर्ममिमांसा ) सूत्रें करून त्यांत वेद हे ईश्वरोक्त आहेत असें ठरविलें होतें. त्या पूर्वमिमांसेवरच कुमारिलाचार्यांच्या व्याख्या असून शाबरस्वामीच्याही व्याख्या आहेत.

† वैष्णवांनी तर श्रौतकर्मांतही हिंसेचा त्याग करून पिष्ट-पशुकल्प ठरविला आहे. परंतु स्मार्त्त मात्र त्या कर्मांत प्रत्यक्ष पशूचा हवि देतात. तरी ज्या प्रांतीं हिंसाद्वेषी जैनांचें प्राबल्य विशेष आहे अशा मेवाडी, गुजराथी व मारवाडी यांचे देशांत यज्ञांस मुळींच रजा दिली आहे !

या देशांत पूर्वापर एक वैदीक धर्म व दुसरा दयाधर्म अशा दोन परंपरा *चालत आल्या आहेत. पैकीं दयाधर्माचें मंडन बौद्धावतारींच विशेषत: झालें आणि त्याचे आधारानेंच पुढें वैष्णव-दर्शनें व साधुसंतांचे मार्ग हीं निर्माण झालीं. परंतु, एकाची उन्नति तेव्हां दुसऱ्याचा कमीपणा हीं असावयाचींच; त्याप्रमाणें अहिंसेला धरून चालणाऱ्या मार्गांची जेव्हां उन्नति होत चालली तेव्हां वैदिक मार्गाचा बहुधा उच्छेद होत चालला. तरी ब्राह्मणांनीं त्याचा सर्वांशानें नाश न होऊं देतां लोकानिंदेला व लोकविद्वेषणाला कारण अशीं जीं कित्येक प्रकरणें सांपडलीं तीं त्यांणीं टाळवतील तितकीं टाळून वैदिक धर्माचा बीमोड होऊं दिला नाहीं हें फार चांगलें केलें. वारा येईल तशी पाठ करणें हें दूरदर्शी लोकांस श्लाघ्य आहे. काळ हा सर्वदा एकसारखाच असतो असा नियम नसल्यामुळें लोकविद्वेषणाचा काळ निघून जाऊन शांतता झाली ह्मणजे सूज्ञ लोक दोन्ही प्रकारांचा विचार करतात. व अशा प्रसंगीं मूळ कृतांत झालेले फेरफार विचारवंतांच्या नजरेस तेव्हांच येतात. ह्यामुळें झाली ही गोष्ट बरीच झाली असें ह्मणावें लागतें. "यद्यपिशुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयम्" इत्यादि वचनेंही सदरील 'वाऱ्याप्रमाणें पाठ करण्या' सारखींच आहेत. ह्याप्रमाणें विरुद्ध वाटणारीं कर्में तितकीं कित्येक कलिवर्ज्यांत

---

* एकाचें मूळ मंत्रांत आहे व दुसऱ्याचें मूळ उपनिषदांत आहे; एकांत कर्म हा विषय व दुसऱ्यांत ज्ञान हा विषय; एकाचे अनुयायी ब्राह्मण व दुसऱ्याचे अनुयायी जैन. त्यानंतर वैष्णवांनीं उपासना-मार्ग काढून त्यांत ईश्वरास सविग्रहत्व व सगुणत्व मानिलें व त्याचें पूजन करावें असें ठरविलें. त्याचप्रमाणें लिंगाईतांनीं शैवोपासना काढली व ब्राह्मणांनीं शक्तीची उपासना व स्मार्त्त धर्म काढला अशीं अनेक रूपांतरें झालीं.

टाकिलीं, कित्येकांचे *अर्थ बदलले, व कित्येक सत्व रज तम या सदरांत टाकून कित्येक युगभेदाप्रमाणें व मनुष्यभेदाप्रमाणें— ह्मणजे पूर्वींचे ऋषी सामर्थ्यवान् होते तसे हल्लीं नाहींत अशा समजुतीनें किंवा वर्णभेदानें— त्यांची वांटणी केली अशी राहाटी दिसते. वास्तविक ह्मटलें असतां वैदिक व जैन हे उभय धर्म व त्यांचीं तत्वें परस्परांपासून अगदीं विरुद्ध स्थितींत आहेत. श्रौतयागांत तर हिंसेवांचून बोलणें नाहीं. व गृह्यकर्मांतही आश्वलायनांनीं हिंसा विहिली आहे. यावरून गाय, बैल, बकरीं, पक्षी इत्यादि प्राणी यज्ञशेषद्वारानें भक्षणार्ह झालीं होतीं व ह्याविषयीं कोणत्याही प्रकारचा निषेध किंवा शंका पूर्वीं सूत्रकर्त्यांच्या मनांत आली असेल असें ह्मणवत नाहीं.† याजवरून ज्या काळीं दयाधर्माचें अगदीं नांव नव्हतें त्याकाळीं हें सूत्र रचिलें असावें असें दिसतें. आतां हें सूत्र वेदास अगदीं सन्निध आहे इतकेंच नव्हे, तर तें अगदीं वेदतुल्य आहे असें सर्व ब्राह्मण ह्मणतात. शिवाय, त्याचा कर्त्ता ऋषि असून तो अदृष्टार्थ द्रष्टा होता अशी त्याची प्रसिद्धि असल्यामुळें त्याचे प्रतिपादनांत कोठेंही भ्रांति नाहीं असें समजलें जातें; हें खरें. तथापि कालप्रमाणें त्याचेंही वाक्य एकीकडे ठेवून गृहस्थाचे घरीं मांसावांचून व हिंसेवांचून ह्मणजे व्रीहिपिंडानें किंवा उत्सर्गपक्षानेंच मधुपर्क, अनुस्तरणी व शूलगव इत्यादि कर्में होतात व अन्नप्राशनही निर्मांसच होतें; आणि ह्यास कुमारिलाचार्यांचीही सनद आहे.

छंदोबद्ध स्मृती झाल्या तत्पूर्वीं सूत्रें हीं झालीं असावीं असें अनु-

---

* कित्येक ठिकाणीं आलंभन शब्दाचा खरा अर्थ 'मारणें' असा असतां नवीन सुधारणेंत नुस्ता 'स्पर्श करणें' असा धरिला आहे. हें बहुश्रुत वाचकांस अवगत असेलच.

† आपस्तंबधर्मसूत्रांत भक्ष्याभक्ष्याध्यायांत पुढील वचन आहे:—धेन्वनडुहोर्भक्ष्यं॥ ३०. मेध्यमानडुहमिति वाजसनेयकम् ॥ ३१ ॥—१ प्रश्न, ५ पटल.

मान आहे, आणि याच सूत्रांतील धर्मसूत्रांच्या छंदोबद्ध स्मृती झाल्या. याचप्रमाणें वेदमंत्रांचे विनियोग व त्यांविषयींच्या दंतकथा व आख्यायिका ज्या चालत होत्या त्या प्रथम ब्राह्मणग्रंथांत लिहिल्या गेल्या आणि नंतर त्याजवर पुराणें झालीं; आणि वेदसूक्तें प्रगट झाल्यावर कांहीं काळानें त्यांस मंत्र व आले आणि त्यानंतर ब्राह्मण ग्रंथ झाले असावे अशी परंपरा लागते. कारण, ब्राह्मणांत सूक्तांस मंत्र ह्मणून मानिलें आहे व त्याचप्रमाणें सूत्रांतही वेदसूक्तांस मंत्र ह्मटलें आहे. त्रिसुपर्ण, ब्रह्ममंत्र, प्रत्यंगिरा, शस्त्रें, वगैरे हीं सर्व पारिभाषिक नांवें ब्राह्मणांत आढळतात; परंतु त्यामध्यें गृह्यकर्में कोठेंही आढळत नाहींत. यावरून तीं केवळ गृह्यसूत्ररचनाकाळच्या रीतीभातींचीं दर्शक आहेत असें ह्मणावें लागतें. तरी गृह्यांचा आरंभ आरण्यकें ह्मणून जे ब्राह्मणांचे भाग आहेत त्यांत कांहीं कांहीं दिसतो. ब्राह्मणें हीं वेदाचीं कर्मोपनिषदें व आरण्यकें हीं वेदाचीं ब्रह्मोपनिषदें आहेत असें ह्मण---

तैत्तिरीयारण्यकाचे दुसऱ्या प्रपाठकांतील दहाव्या अनुव.
जीं पंचमहायज्ञ व पितृमेधाध्यायाचे ६ वे प्रपाठकांत
कर्में लिहिलीं आहेत तीं **आश्वलायनांनीं** घेतलीं .. ते
दोन्ही ग्रंथ ताडून पाहिले असतां आढळून ये .. माणें,
**गृह्यपरिशिष्टानें** संध्येकडे **नारायणोपनिषदांतील** .. ओढले
आहेत ते मूळ सूत्रांत नाहींत असें आढळून येतें .. य हेंह
ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, सूत्रोक्त आचार्य .. आचार्यां-
शिवाय **गार्गी सुलभा वडवा** इत्यादि स्त्रि .. ऊ केल्या
आहेत; यावरून सूत्रोत्पत्तीपूर्वी ते आचा.. .. आचार्या
झाल्या होत्या असें दिसतें.

हें सूत्र रचिलें त्याकाळीं या देशांत वेदादिकांची मोठी चर्चा चालली होती असें दिसतें. परंतु पुढें वेदाचे उच्चारांत गडबड होऊं लागून वेदाची भाषा समजेनाशी झाल्यामुळें प्राकृत भाषा वाढूं लागल्या. तेव्हां शिक्षा व प्रातिशाख्यें होऊन वेदपाठसंरक्ष-

णार्थ यत्न चालू झाले. तसेंच वेदाचें अक्षर बदलूं नये ह्मणून पदपाठ, क्रमपाठ, घन जटापाठ इत्यादि करण्याची रीति पडली आणि नवीं वाक्यें शिरूं नयेत ह्मणून अनुक्रमणिका पढवूं लागले; असा क्रम दिसतो.

सूत्रामध्यें प्रयोग लिहून कर्मकाळीं जे मंत्र ह्मणावयाचे त्याच्या आदी मात्र दिल्या आहेत व त्याप्रमाणें ते मंत्र ह्मणण्याचा प्रस्तुत परिपाठ आहे. त्याचप्रमाणें सूत्रांत जितक्या मंत्रांचा विनियोग आहे ते सर्व मंत्र एकत्र करून ठेवतात त्यास मंत्रसंहिता ह्मणतात. ही मंत्रसंहिता मूळ संहितेचा तिसरा अंश होईल. आश्वलायनाचार्य हे आपले सूत्रांत मुंजीचे समयीं यज्ञोपवीत (जानवें) धारण मुळींच लिहीत नाहींत. यावरून तें यज्ञसमयीं मात्र धारण करण्याची वहिवाट असावी असें दिसतें व तसें असेल तर यज्ञोपवीतही अन्वर्थ होतें. बहिर्दिशेचे वेळीं कानावर यज्ञोपवीत ठेवण्याची चाल अद्यापि आहे, याजवरूनही तें नित्य नव्हतें असें दिसतें. आतां कदाचित् अन्यशाखांतून तें नित्य घालण्याची वहिवाट असेल; परंतु आश्वलायनशाखेंत ती चाल नव्हती हें स्पष्ट दिसतें. याचप्रमाणें लग्न मुंजीचे वेळीं देवदेवक वगैरे कर्मे अलीकडील प्रयोगांत लिहिलेलीं आढळतात, तींही सूत्रांत कोठें दाखल नाहींत. सूत्रांत श्राद्धादि कर्मेंही थोडक्यांत लिहिलीं असून अलीकडील प्रयोगकारांनींच तीं फार वाढविलेलीं आहेत ह्मणून सूत्रोक्त कर्मांचा लोकांस संक्षेप दिसतो. परंतु वस्तुतः सूत्रोक्तविधीच मूलभूत होत. अलीकडील प्रयोग ह्मणजे लांबलचक व पौराणिक वाक्यें घेऊन विस्तृत केलेले आहेत. याशिवाय असेंही दिसून येईल कीं, सूत्रोक्त कर्मे हीं अगदीं अल्प खर्चानीं होणारीं असून, आपल्यामध्यें अतिशय खर्चाचीं ह्मणून ठरलेलीं जीं लग्न मुंजीचीं कार्यें तीं तर दोन चार रुपयांत होतील असें दिसतें! परंतु अलीकडे त्या कर्मांत अनेक लोकरीती शिरून तीं कार्यें अतिशय अवाढव्य खर्चाचीं झालीं आहेत, व सूत्रोक्तरीती एकीकडे राहून त्या परस्परांत महदंतर

पडलेलें दिसतें. आठवे वर्षी उपनयन आणि त्यापुढें बारा वर्षे पर्यंत ब्रह्मचर्यपालन असा सूत्रोक्त ठराव आहे. परंतु सांप्रत लोकांनीं दांडगाईनें तो ठराव बगलेंत गुंडाळून यथेच्छ आचरण चालविलें आहे हें बरें नाहीं. धर्मशास्त्राचे मूळ ग्रंथ जें सूत्र त्याची अशी पायमल्ली होणें हें अगदीं अयोग्य व अहितकर होय. ब्रह्मचर्यास अगदींच हुसकून दिल्यामुळें लोक अशक्त, अल्पायु, अविद्वान् व भीरु होत जाऊन अल्पवयांतील लग्नरूढीनें विधवांची संख्याही फार वाढत चालली आहे हेंच आपल्या ऋषिवर्यांची आज्ञा उल्लंघन केल्याचें प्रत्यक्ष प्रायश्चित्त व शिक्षा आपणास भोगावी लागत आहे! तरी आपले डोळे अजून उघडत नाहींत हें आश्चर्य नव्हे काय? यावरून धर्म हा कल्याणकारक आणि अधर्म हा दुःखप्रद होय हें स्पष्ट दिसतें.

प्रस्तुत भा[illegible] केलेलें सूत्र हें आश्वलायनाचें अध्यायचतुष्[illegible] त्मक गृह्यसू[illegible] आहे. त्याजवर[illegible] केली आहे त्यांत होमानें किंवा नमस्का[illegible] म्हटलें आहे. पूजेंतही नमस्कार हा मुख्य धरिला आ[illegible] उपचारांची पूजा, षोडशोपचारपूजा, दशोपचारपूजा, पंचोपचार पूजा वगैरे पूजांचे प्रकार आहेत त्यांत एकोपचारपूजा म्हणून धरिली आहे; म्हणजे फक्त नमस्कारानें सर्व पूजा होते असें म्हटलें आहे. अस्तु. प्रस्तुत सूत्रकारांनीं पाशुक, हवि व पाक असे ३

---

* नारायणवृत्तीचा कर्त्ता यास गार्ग्य नारायण असें अभिधान आहे. हा कृष्णजित नामक ब्राह्मणाचा पुत्र व श्रीपति याचा पौत्र असून तो अलीकडे सुमारें ३०० वर्षांतच झाला असावा असें म्हणतात. तरी याचे नामाचा निर्देश कुमारिल कारिकेंत येतो यावरून हा कुमारिलभट्टापूर्वी झाला असें दिसतें.

प्रकारचे यज्ञ वर्णिले आहेत. त्यांपैकीं गृह्यसूत्रांत गृहस्थास योग्य असा पाकयज्ञ प्रथम घेऊन तो वैश्वदेवरूपानें सांगितला आहे आणि नंतर विवाहकर्म सांगितलें आहे. विवाहकर्मांत मुलाच्या किंवा मुलीच्या वयाची इयत्ता मुळींच लिहिली नसून वर्षांतील कोणत्याही काळीं लग्न केलें तरी चालतें असेंही मत दर्शविलें आहे. त्याचप्रमाणें देशाचार ह्मणजे लोकांनीं किंवा राजांनीं मान्य केलेली चाल विवाहकाळीं मान्य करून नंतर स्थालीपाक, पशुप्रयोग, गर्भाधान, पुंसवन, अन्वलोभन, सीमंतोन्नयन, जातकर्म, अन्नप्राशन, चौल, मुंज, व मधुपर्क हीं गृहस्थास प्राप्त होणाऱ्या वैभवाप्रमाणें अनुक्रमें सांगितलीं आहेत. हे प्रथमाध्यायांतील विषय झाले. द्वितीय व तृतीय अध्यायांत नित्य करण्याचे पंचमहायज्ञ, वर्षांत दोन वेळ करण्याची श्रावणी, दुःस्वप्नादिकांची शांति, संध्या, समावर्त्तन व अनेक भयनाशक शांती हीं कर्मे सांगितलीं आहेत. आणि पुढें चतुर्थाध्यायीं गार्हस्थ्याच्या परिणामाचे जे और्ध्वदेहिक विधी व शूलगवात्मक यज्ञ ते सांगून गृह्यसूत्राची परिसमाप्ति केली आहे.

या गृह्यरचनेवरून असें स्पष्ट दिसतें कीं, श्रौतावेरीज इतक्या त्यावेळेस स्मृतींत किंवा आचारांत होत्या. त्याचप्रमाणें अंत्येष्टीमध्यें सर्व और्ध्वदेहिक अग्निहोत्र्याचें करावें याप्रमाणें लिहिलें आहे यावरून त्या काळीं सर्व ब्राह्मण अग्निहोत्री असत असेंही दिसतें. आतां आश्वलायनांनीं अन्त्येष्टिकर्म मात्र घेऊन त्याशिवाय ब्रह्ममेध ह्मणून वेगळा प्रकार घेतलेला दिसत नाहीं; परंतु तैत्तिरीयारण्यकांत व हिरण्यकेशीसूत्रांत पितृमेध व ब्रह्ममेध हे पृथक् सांगितले आहेत. त्यांतील पितृमेध हा कर्मकांडी लोकांकरितां असून ब्रह्ममेध हा चित्तिप्रयोगानुरोधें ज्ञानकांडी लोकांकरितां आहे असें सायनाचार्य ह्मणतात.

ब्रह्ममेधे तु कृत्स्नोऽपि प्रपाठको विनियुक्तः आहिताऽग्रेर्यो दहनादि संस्कारः सोऽयं पितृमेधः आहिताग्नित्वेसति यो ब्रह्मतत्वं जानाति तस्य दहनसंस्कारो ब्रह्ममेध इत्युच्यते। त-

स्मिन् ब्रह्ममेधऽस्य प्रपाठकस्य विनियोगं भरद्वाज आह इ०—
चित्युपनिषद्भाष्यं; तै० आ०, ३ प्रपा०, ९१ अनुवाक.

पूर्वी गृहस्थाच्या स्मार्ताग्नीवर पाशुकयज्ञ करीत होते असें दिसतें. पाशुकयज्ञ ह्मणजे पशूच्या मांसानें होम करणें. त्याचा व त्याचप्रमाणें अन्नप्राशनांत पशुपक्ष्यांचें मांस घेण्याची आणि त्याचीं विशेष फळें मानण्याची चाल होती असें वाटतें. पुढें मधुपर्कांतही मांसभोजन असलेंच पाहिजे, त्याशिवाय मधुपर्क होणार नाहीं असें लिहिलें आहे. मधुपर्क ह्मणजे आतिथ्यविधि होय. आप्त, शिष्ट व श्रेष्ठ असे लोक घरीं आले असतां त्यांचे आतिथ्यार्थ मधुपर्क करावा लागतो. अशा मानकरी लोकांस सूत्रकारांनीं अर्घ्य ह्मटलें आहे. या संबंधानें पाहिलें असतां गांवच्या हिशेबीं 'भेट बकरा' हें सदर आढळांत येतें. ह्मणजे, तसा कोणी राज्याधिकारी गांवांत आला असतां त्याचे सन्मानार्थ होणाऱ्या खर्चाचे रकमेस

[illegible] 'भे[illegible]

[illegible] ...त्र

दिसतें; परंतु संस्कारकौस्तुभांत,—

गोप्रतिनिधित्वेन छाग आलभ्यते—पृष्ठ २१७, पंक्ति ३.

असें ह्मटलें आहे; यावरून गाईचें प्रयोजन उडवून तेथें बकऱ्याची योजना केलेली दिसते. आपण साधारण देवपूजेस वगैरे जो नेहमीं सात्विक अर्घ देतों तो मधुपर्काचाच कल्प होय. अन्नप्राशनविधींत आज ह्मणजे बोकडाचें मांस लिहिलें आहे. परंतु मधुपर्कांत गव्य ह्मणजे गोमांस धरिलें आहे व त्यांत आलंभनच * मुख्य

* कलिवर्ज्यप्रकरणसंबंधानें 'अग्निहोत्रं गवालंभं' हें वाक्य प्रसिद्धच आहे. त्याशिवाय 'महोक्षं वा महाजं वा श्रोत्रियायोपकल्पते' असें एक स्मृतिवचन आहे.

असून उत्सर्जन हें गौणपक्षी आहे. याचप्रमाणें **अष्टकाश्राद्धांत** हा मांस लिहिलें असून पशुकल्पांत तर पशूंची हिंसा करण्याची रीति लिहिली आहे. याप्रमाणें तृतीयाध्यायांतील गोष्टी आहेत. यानंतर चौथ्या व शेवटच्या अध्यायांत गृह्यसंबंधी शेवटचें कर्म जें अंत्येष्टि ती लिहिली आहे व ही अन्त्येष्टि अग्निहोत्र्याची आहे यावरून त्या काळचे सर्व गृहस्थ अग्निहोत्री असावे असें अनुमान असल्याविषयीं वर निर्देश केलाच आहे. अन्त्येष्टींत शवाबरोबर गाय मारून जाळण्याचा विधि आहे. प्रथमतः स्मशानांत शव नेते समयींच त्याजबरोबर जाळावयाच्या गायीचे गळ्यांत एक दोरी अडकवून तीच दोरी शवाचे दंडास बांधून अशा थाटानें स्मशानांत नेण्याचा विधि लिहिला आहे. परंतु हा प्रकार प्रस्तुत गतरूढ झाला असल्यामुळें ह्या धर्मशास्त्राज्ञेप्रमाणें वागल्यास त्या मनुष्याला सर्व लोक नांवें ठेवून त्याची सर्वत्र छी थू होईल. तरी प्राचीन काळीं ही गोष्ट धर्मसंबंधाची ह्मणून सर्व लोक करीत होते व त्यावेळीं त्यांस दोष देण्याचेंही कारण नव्हतें. यावरून लोकरूढीचा जबरदस्त प्रयोग सर्वांच्या आचार विचारांवर कसा दृढतर झाला आहे हें सहज दिसून येईल. याच प्रमाणें पूर्व काळचें आणखी एक उदाहरण असें आहे कीं, स्त्रीनें प्रजोत्पत्त्यर्थ पतीच्या आज्ञेनें अथवा त्याचे पश्चात् इतर आप्तांच्या आज्ञेनें उपपति करावा अशी पूर्वी रूढी व शास्त्र असे. परंतु अशी गोष्ट आतां काढली तर त्यास लोक बाहेर तोंड काढूं देणार नाहींत! सारांश, धर्मशास्त्रास आणि रूढीस बहुत अंतर पडून रूढी ह्याच धर्मशास्त्रें होऊन बसल्या आहेत. अस्तु. प्रस्तुत अन्त्येष्टीसंबंधीं गोदहनास **अनुस्तरणीकर्म** ह्मणतात. ही अनुस्तरणी तैत्तिरीय आरण्यकांत, ऋग्वेदांत, शुक्लयजुर्वेदाचे ३९ वे अध्यायांत व इतर अनेक सूत्रांत आहे. त्या गाईच्या मांसाचे पिंड देण्याविषयीं व तिची वपा काढून तिणें प्रेताचें मुख व सर्व शरीर आच्छादून नंतर त्यास अग्नि देण्याविषयीं ह्या अन्त्येष्टिकर्मांत लिहिलें

आहे. गाय नसली तर तिचे ठिकाणीं काळ्या बकरीचा कल्प लिहिला आहे. आतां,—

**अग्नेर्वर्मपरिगोभिर्व्ययस्व—ऋ० ७-६-२१.**

हाच मंत्र तैत्तिरीयारण्यक, ६ प्रपाठक १ ला अनुवाक यांत असून आश्वलायनांनींही तोच मंत्र प्रस्तुत कर्मांत घेतला आहे. परंतु तैत्तिरीयारण्यकाचे पितृमेधाध्यायांत १२ व्या अनुवाकावर **माधवांनीं** भाष्य लिहितांना असें ह्मटलें आहे कीं,—

**राजगव्या हननमुत्सर्गश्चेति द्वौपक्षौ, तत्र हनन पक्षे मन्त्राः पूर्वमेवोक्ताः। अथोत्सर्गपक्षे मन्त्रा उच्यन्ते ॥**

असें लिहून त्यापुढें,—

**माता रुद्राणां० मा गामनागामदितिंवधिष्ठ॥** ऋ०६—७—८;
तै० आ० ६ प्रपा० १२ अनु०

हा मंत्र लिहिला आहे. या मंत्रांत याज्ञिकांस असा उपदेश आहे कीं, 'तुह्मी गरीब गाईचा जीव घेऊं नका.' हल्लीं प्रयो-गांत तरी हाच मंत्र ह्मणून उत्सर्जन करतात. या गाईस राजग-वी, **अनुस्तरणी** व उपावरी असें ह्मणतात. या गाईचें वर्णन **भारद्वाजकल्पांत** असें लिहिलें आहे:—

**जरठां मुख्यां तज्जघन्यां कृष्णां कृष्णाक्षीं**
**कृष्णवालां कृष्णखुरामपि वा अजां।**

ह्मणजे, अनुस्तरणीची गाय वृद्ध असावी, नाहीं तर काळी किंवा काळ्या खुरांचीही असावी अथवा तशी शेळी असावी. आतां हा गाय योजण्याचा विधि येवढ्याकरितां आहे ह्मणून ह्मणतात कीं, मृतास पितृलोकीं दूध मिळावें. तसेंच पितृलोकांच्या वाटेवर चार डोळ्यांचीं कुत्रीं आहेत त्यांस कांहीं भक्ष्य टाकावें ह्मणून जीवाबरोबर सामग्री द्यावी असें ह्मणतात व यास पुढील मंत्रावरूनही प्रमाण मिळतें:—

**अतिद्रव सारमेयौ श्वानौचतुरक्षौ शबलौ साधुना पथा ॥**—
ऋ०—६—६—१९, व तै. आ. ६ प्रपा. ३ अनु.

तसेंच,—

मैवं मा ँ स्तानप्रिये ऽहं देवी सती पितृलोकं यदेषि । विश्ववारा नभसा संव्ययन्त्युभौ नौ लोकौ पयसाऽभ्यावृत्स्व॥

—तै. आ., ६ प्रपा. १ अनु.

यानंतर शूलगव ह्मणजे बैलाचा यज्ञ करण्याविषयीं लिहिलें असून तोही घरच्या खोंडानेंच रुद्रप्रीत्यर्थ करावा असें लिहिलें आहे. आतां हीं सर्व कर्में गृहस्थांनीं करावयाचीं असून त्या काळीं तीं अप्रतिबद्ध चालत असावीं असें सूत्रोक्त प्रतिपादनावरून सहज अनुमान होतें. मधुपर्क हा प्रतिसहामासीं व राजा, ऋषि, सासरा, जांवई, मामा व गुरु इत्यादि श्रेष्ठ पाहुणे घरीं आले असतां त्यांच्या पाहुणचारार्थ करावा असें लिहिलें आहे. याचप्रमाणें शूलगवाचा कालही प्रतिवर्षीं एकदां आर्द्रा नक्षत्रावर ठरविला आहे. या सर्व गोष्टींवरून त्या काळीं गुराढोरांचा काला सुकाळ होता असें दिसतें. तसेंच हीं कर्में करण्याविषयीं श्रुतींची आज्ञा असल्यामुळें त्याचें उल्लंघन न करितां तीं पुण्यप्रद समजून सर्व लोक आदरानें व निःशंकपणें करीत असत. कलियुगांत हिंसादि कर्में वर्ज्य ठरविल्यामुळें तद्विरुद्ध आचरण करणाऱ्यांकडे पाहून लोकांस त्यांचा फार तिरस्कार उत्पन्न होतो व "आतां कलियुगांत लोक असेच धर्मभ्रष्ट होत जावयाचे व त्यांजकडून हिंसादि कर्में व्हावयाचीं" असा ते कलिसंबंधी निराशेचा कोलाहल करितात. परंतु आमच्या प्रकृत विषयाचे कालाकडे नजर दिली ह्मणजे प्रस्तुतचा काळ हिंसादि क्रूर कर्मांपासून पुष्कळ दूर आहे किंवा याहीपेक्षां पूर्वींचीं हिंसाकर्में जास्त होतीं याचा विचार सहज होईल. हल्लींच्या कालदेशवर्तमानाकडे पाहिलें असतां पूर्वकालीं हिंसेची गोष्ट कोणाच्या मनांतच येत नव्हती असें स्पष्ट दिसतें. यावरून कलीच्या नांवानें व्यर्थ गवगवा करण्यांत अर्थ नाहीं; असें पूर्वरीतीकडे पाहिलें असतां आढळून येईल.

निर्वाह होऊं लागला व शूलगव जाऊन वृषोत्सर्ग आला; परंतु वेद, आरण्यकें व सूत्रें यांत जे त्या काळीं प्रवृत्तींत असलेले विधी लिहिले आहेत त्यांवरून सूत्रें हीं बौद्धावतारापूर्वीं अतएव फार प्राचीनकाळीं झालेलीं आहेत असें आम्हीं वर एके ठिकाणीं निर्देश केल्याप्रमाणें सिद्ध होतें.

अन्त्येष्टींत प्रेतांस गाड्यांवर किंवा स्कंदांवर न्यावें असें **आश्वलायन** लिहितात. व हेंच मत तैत्तिरीयारण्यकांतही आहे. वृद्ध सेवक म्हणजे शूद्र हे वाहकाचे कामांत लावण्याविषयीं व पत्नीचें उत्थापन करण्याविषयीं प्रशस्त होत असें लिहिलें आहे. तसेंच गाड्यांस बैल जोडण्याचे वगैरे मंत्र आहेत. त्यांजवरून हल्लीं प्रमाणें शूद्रांनीं प्रेतास स्पर्श करूं नये व स्कंदांवर मात्र प्रेत वाहून न्यावें इत्यादि आग्रही रूढी वैदिककालीं चालत नसून सदरील आचार विचारांवरून त्या काळच्या रूढी फार सुखसोयकर होत्या असें दिसतें. परंतु त्या प्रस्तुतकाळीं नष्ट झाल्या हें चांगलें झालें नाहीं. मग ह्या नवीन प्रचाराचें काय कारण झालें असेल तें असो. अन्त्येष्टीच्या संबंधानें वैदिक कालाचा विचार करितां असें मृताशौचाची जी हल्लीं रीति चालत आहे ती व दानकल्प हीं

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू).

**बुद्धरूपं समास्थाय सर्वरूपपरायणः ॥**
**मोहयन् सर्वभूतानि तस्मै मोहाऽऽत्मने नमः॥**

परंतु बुद्धाचे द्वेष्टे जे वैदिक होते त्यांणीं बुद्धमंदिरांत कदापि न जाण्याविषयीं फार कडक वचनें लिहिलीं आहेत:—

**हस्तिना ताड्यमानोऽपि न गच्छेज्जैनमंदिरम् !**

व त्याप्रमाणें अद्यापि जैनमंदिरांत किंवा त्यांच्या विहारांत व चैत्यांत जाण्याविषयीं लोक धजत नाहींत ! बौद्ध व जैनमतांचा विचार आमच्या '**स्वाध्याय**' पुस्तकांत पहा,—( परिशिष्ट १०, पृष्ठ २१३ ).

आलीकडे पुराणांनीं उपस्थित केलीं आहेत असें दिसतें. परंतु तीं **आश्वलायनास** सर्व प्रकारें अश्रुत होतीं. मरणोत्तर, पितरांच्या नांवानें येथें ब्राह्मणास शय्या दिली तर ती परलोकीं त्यांस मिळते, जलकुंभ दिला असतां पितरांची तृषा शांत होते, जोडा दिला तर मृतांस कांटे लागत नाहींत, छत्री दिली ह्मणजे ऊन लागत नाहीं इत्यादि प्रकार विशेषेंकरून **गरुड** किंवा **वैनतेय** पुराणांतर्गत प्रेतकल्पांत मोठ्या विस्तारानें दिले आहेत. ते ग्रंथ मृताचे घरीं त्याच्या आप्तांकडून दानप्रवृत्त्यर्थ वाचून दाखवावे असा विधि आहे. परंतु हे ग्रंथ मृतोत्तरकार्योपजीवी असे स्मशानपुरोहित जे कारटे लोक त्यांच्या लाभार्थ कोणीं तरी रचिले असावे असा तर्क आहे. त्यांतील अनेक भयानक व अद्भुत कथानकें वाचून मृताचे आप्तांस भीति उत्पन्न करावी व मृताचें कांहीं तरी कल्याण होऊन त्यास सुख मिळावें अशा वाहण्यानें त्यांजकडून यथाशक्ति कांहीं तरी मिळवितात. परंतु त्या बिचाऱ्यांस यांतील सत्यासत्य प्रकार कांहीं उमजत नसून तत्संबंधाची विचारशक्तिही आलीकडे अज्ञान लोकांशींच नेहमीं संबंध असल्यामुळें नष्ट होऊन गेली आहे व केवळ गप्पा झोंकणाऱ्या असत्यालापींचा मात्र स्वार्थ साधला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

वैदिक परंपरेंत कर्म हें प्रधान असून त्या काळीं जाती होत्या व ते वेदच प्रमाण मानीत असत. परंतु पुढें बौद्धपरंपरेंत वेद, कर्म व जाती हीं तीनही त्यांच्या दयाधर्मास विरुद्ध वाटून त्यांणीं त्यांचा निःपात करण्याचा यत्न चालविला होता. वैदिक व बौद्ध या उभय परंपरेंत मुख्यत्वेंकरून हेच तीन प्रकार परस्पर विरुद्ध आहेत. या संबंधानें त्या काळीं मोठमोठे वादविवाद होऊन घोंटाळे झाले. **जैमिनी**सारखे वैदिक आर्य हे कर्मप्रतिपादक होते. व **बुद्ध, शाक्यसिंह, गौतम** यांजसारखे निवृत्तिमार्गी पुरुष तद्विरुद्ध दयाधर्म प्रतिपादन करीत होते. शेवटीं दयाधर्माचाच जय होऊन वैदिकांस नमावें लागलें. '**प्रमाणं परमं श्रुतिः**' इत्यादि

मताभिमानाचीं सूत्रें जाऊन त्या ठिकाणीं 'अस्वर्ग्यं लोकविद्विष्टं' इत्यादि वचनें लोकांमध्यें चालू झालीं. सारांश, लोकाचार व लोकांचा कल जसा असेल त्याप्रमाणें धर्मशास्त्रांत वगैरे फेरफार होतात. याचे स्पष्टीकरणार्थ एक दोन उदाहरणें घेतलीं असतां चांगला बोध होईल. सती जाणें हा प्रयोग वेदांस व स्मृतींस अगदीं अश्रुत असतांही लोकरुची व लोकाग्रह हीं पाहून त्याचें मंडन व प्रयोग होऊं लागले. वैद्यशास्त्रांत वाजीकरणादि लेख, कामशास्त्रावर वात्सायन भरतादिकांची प्रवृत्ति, ज्योतिषांत जयसाधन शकुन अमृतवेळा इत्यादि पाहणें, हीं सर्व प्रकरणें लोकरुचीला अनुसरूनच निर्माण झालेलीं दिसतात.

**आश्वलायनांनीं** जसे पंचमहायज्ञ लिहिले आहेत तसेच तैत्तिरीयारण्यक व शतपथब्राह्मण इत्यादिकांत ही सांगितले आहेत. त्यांत—

**पञ्चवा एते महायज्ञाः सतति प्रतायन्ते०**—तै० आ०, २ प्रपा० १० अनु.

असा या पंचमहायज्ञांचा आरंभ केला आहे. यांतील वर्णन असें आहे कीं, होम हीच देवपूजा; मनुष्यांशिवाय इतर जीवांस अन्न देणें याचें नांव भूतयज्ञ; वडिलांचे नांवानें अन्न देणें (श्राद्ध करणें) याचें नांव पितृयज्ञ; स्वतः शिकणें (स्वाध्याय करणें) याचें नांव ज्ञानपूजन किंवा ब्रह्मयज्ञ; आणि मनुष्यांस विद्या व अन्न देणें याचें नांव मनुष्यपूजन किंवा मनुष्ययज्ञ. मनुष्यपूजनांत ब्राह्मण किंवा संन्याशी असा कांहीं विशेष वर्ग न घेतां केवळ मनुष्यजाति मात्र घेतली आहे. पंचमहायज्ञाविषयीं **मनूही** असें ह्मणतो:—

**ऋषियज्ञं देवयज्ञं भूतयज्ञं च सर्वदा ॥**
**नृयज्ञं पितृयज्ञं च यथाशक्ति न हापयेत् ॥ २१ ॥**–४

पुढें पुराणान्तरीं हेंच प्रकरण घेऊन सदरील पांच ऋणें मनुष्यमात्रांस मानिलीं आहेत. याजवरून स्वतः ज्ञान संपादन करणें व मनुष्य आणि इतर जीव यांचें रक्षण करणें हीं वर्णश्रेष्ठ ब्राह्मणांचीं तर मुख्य कर्मं होत असें दिसतें. आणि त्यावरूनच पांथस्थांचा

सन्मान करून त्यांस अन्न देण्याची वहिवाट या देशांत ब्राह्मणांमध्यें प्राचीनकाळापासून चालत आली आहे. हल्लीं हा देश दारिद्र्य-ग्रस्त झाल्यामुळें पूर्वींची वहिवाट सर्वत्र सारखी चालत नाहीं, तरी जे श्रीमान् व संभावित गृहस्थ आहेत ते आपल्या ज्ञातीच्या लोकांचा तरी अन्नदानादि पूजाविधि करितात. तैत्तिरीयारण्यकांत स्वाध्यायसंबंधानें पुढील अनुवाकांत स्वतंत्र विवेचन केलें आहे.—

**ब्रह्मयज्ञेन यक्ष्यमाणः०**—तै० आ०, २ अध्याय, ११ अनु०.

हें वचन आदि धरून ब्रह्मयज्ञ ( स्वाध्याय ) संबंधीं एकांतवास, आसनाधिष्ठान व दृष्टिनिरोध करून अभ्यास करणें याविषयीं शिफारशी केल्या आहेत

आचार्यतर्पणांत **सुमंतूपासून आश्वलायना**पर्यंत असे ऋग्वेद पढविणारे चाळीस आचार्य लिहिले आहेत व त्यांत भारतकर्ते व भाष्यकर्तेही आले आहेत. याजवरून भारताची गाथा ही कांहीं अंशानें तरी त्यावेळीं असून नंतर त्या भारतावरून हल्लींचें विस्तृत भारत झालें असावें असें वाटतें. दुसरें, या आचार्यांत ऋषिकन्याही आल्या आहेत त्यावरून ऋषिकन्या ह्या वेदाध्ययन व वेदाध्यापन करीत होत्या असें दिसतें. **स्वाध्यायां**त जे ग्रंथ अध्ययन करण्यास सांगितले आहेत त्यांत चार वेदसंहिता, ब्राह्मण, कल्प, गाथा, नाराशंसी व प्राचीन इतिहास इतके आहेत. यावरून त्या काळीं इतकेही ग्रंथ उपलब्ध असून ते सूत्रोत्पत्तीपूर्वीं झालेले होते असें म्हटलें पाहिजे. वेदाशिवाय कित्येक गाथाही अद्यापि आढळतात. व त्याचप्रमाणें इतिहास व चरित्रें हीं कांहीं तरी त्यावेळेस असावीं असें सिद्ध होतें. आतां, ब्राह्मणें हे ग्रंथ हल्लीं एकत्र केलेले दिसतात. परंतु त्यांत अनेक गोष्टी, वाद, तर्क, आख्यानें, उपाख्यानें, व्याख्यानें, अभिज्ञान व गाथा इत्यादींचा समावेश आहे. तसाच, गाथांचा जो मोठा संग्रह दिसतो त्याजवरून त्याचे पूर्वीं अनेक ग्रंथ चालत असून त्यांजवरून हा गाथासंग्रह झाला असावा असा तर्क होतो. मग ते अनेक ग्रंथ लेखी असोत किंवा तोंडानेंच परंपरया चालत

आलेले असोत, परंतु ते होते असें मानणें संभाव्य आहे. कोणी ही कांहीं ऐतिहासिक गोष्टी लिहिल्या ह्मणजे त्या लेखापूर्वी तद्विषयीं, कांहीं एक लिहिलेलें किंवा कोणी सांगत आलेलें नसेल असें ह्मणवत नाहीं. याचप्रमाणें इतर ग्रंथांचीही गोष्ट आहे. भारत हें ऐतिहासिक ग्रंथ ह्मणून प्रसिद्ध आहे. परंतु तत्पूर्वी तत्संबंधाचा कांहीं तरी लेख किंवा आख्या प्रसिद्ध असून त्यावरून हा महाभारत ग्रंथ उतरला असावा आणि त्याचप्रमाणें पुराणांच्या पूर्वींही कांहीं कथानकें प्रसिद्ध असतील त्यांवरून पुराणें हीं निर्मिलीं असावीं. प्रस्तुतच्या ब्रह्मयज्ञप्रयोगांत ज्याप्रमाणें सर्व ग्रंथांच्या आदी घेतात त्याचप्रमाणें इतिहासाची आदि '**नारायणं नमस्कृत्य**' अशी घेतात. परंतु पुराणाची आदी कोठेंही घेत नाहींत. यावरून पुराणें हीं सूत्रांचे कालीं किंवा तत्पूर्वी नसावीं असा सहज बोध होतो. आतां पुराणांत संहितापुराणें, शृंखलापुराणें, महापुराणें व उपपुराणें असे चार प्रकार असल्याविषयीं लेख आहेत; परंतु ते चार ही प्रकार आज उपलब्ध नाहींत. याचें कारण असें असावें कीं, चांगला ग्रंथ झाला ह्मणजे लोक त्याचा संग्रह करितात आणि त्याजपेक्षां कमी योग्यतेचे पूर्वींचे ग्रंथ असल्यास ते रद्द होतात असा साधारण नियम आहे. तदनुसार चांगलीं पुराणें तेवढीं जतन होऊन बाकीचीं बुडालीं असतील. सूत्रांस कल्प ह्मणतात असें वर एके ठिकाणीं ह्मटलेंच आहे; त्यावरून ते कल्पनेनें लिहिले आहेत असें ध्वनित होतें. आलीकडे कन्यादानकल्प, त्रिचाकल्प, श्राद्धकल्प, पुरश्चरणकल्प इत्यादि नवीन कल्प आढळतात. परंतु सूत्रें हीं ऋषिकल्प असून इतर कल्प हे पौरुष होत असें समजावयाचें.

आतां, कोणी ह्मणतात कीं, गाथा,*नाराशंसी व इतिहास हे ग्रंथ

---

* **गाथा, नाराशंसी** व **इतिहास** या तिहींचाही हेतु जरी पूर्ववृत्तकथनाचा आहे तरी त्यांतील सूक्ष्म भेद असा आहे: 'गाथा' ह्मणजे एकेका वंशाचा किंवा एकेका कृत्याचा इतिहास. यास मराठींत

ब्राह्मणांतच समाविष्ट आहेत व कोणी ह्मणतात कीं, ते पृथक् होते. परंतु ते पृथक् होते असें ह्मटलें तर ते ग्रंथ हल्लीं निखालस नष्ट झाले असावे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं; पण ते ग्रंथ ब्राह्मणग्रंथांत आहेत अशी कल्पना केली तर मात्र तत्संबंधाचे विषय त्यांत सांपडतील. आतां आरण्यकांत असें लिहिलें आहे कीं, त्या ग्रंथांचें जो स्वतः अध्ययन करील त्याचे पितरांचा उद्धार होईल. * हें ह्मणणें अर्थवादाचें ह्मणजे रोचक अतएव ग्रंथमहत्वदर्शक होय. तरी एका दृष्टीनें पाहिलें असतां तें ह्मणणेंही खरें आहे. ह्मणजे, पुत्र विद्वान् निघाले असतां वडिलांचें नांव राहतें हें सर्व प्रसिद्ध आहे व वडिलांचें नामरक्षण हाच पितरांचा उद्धार होय हेंही वेगळें सांगावयास नको. अस्तु. ब्रह्मयज्ञांत देवांची नांवें प्रथम लिहून नंतर वेदऋषींचीं—ह्मणजे प्रथम मंडलाचे **शतर्चिन**, दुसऱ्या मंडलाचे **माध्यम** याप्रमाणें दहा मंडलांच्या ऋषींचीं—

---

* यदृचोऽधीते पयस: कूल्या अस्य पितॄन् स्वधा अभिवहन्ति॰

तै. आ. प्र. २ अनु.

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

बखरी ह्मणतात. जसे 'मराठयांची बखर', 'पेशव्यांची बखर', 'पानपतच्या लढाईची बखर' इत्यादि एकेक गोष्टीचे इतिहास त्या गाथा होत; 'नाराशंसी' ह्मणजे व्यक्तिविशेषाचे इतिहास. जसें—'शिवाजीचरित्र' 'बाजीरावचरित्र' 'नाथचरित्र' इत्यादि; आणि 'इतिहास' ह्मणजे मोठाल्या राष्ट्रांचीं व तत्संबंधीय अनेक गोष्टींचीं संक्षिप्त किंवा विस्तृत वर्णनें. या तिन्ही वर्गांच्या इतिहासांत आपल्या इकडे गाथा व इतिहास यांची बरीच प्रवृत्ति आहे. परंतु 'नाराशंसी'—वर्गांत येणारीं व्यक्तिवैशेषिक चरित्रें किंवा इतिहास नसून त्याची आपल्या ग्रंथप्रसारांत फार जरूर आहे. तिची पूर्णता तर दूर राहिली, परंतु आपल्या महाराष्ट्र ग्रंथप्रसारांत तसें रूप तरी कधीं येईल तें येवो !

क्रमवार नांवें लिहिलीं आहेत. देवतर्पणाचे यादींत जितकीं नांवें घातलीं आहेत त्यां सर्वांस त्या काळीं देवत्व मानीत होते हें तर अर्थसिद्धच आहे. त्यांत प्रथमतः **प्रजापति** ह्मणजे सृष्टीचा कर्त्ता जो परमेश्वर त्याचा नामनिर्देश करून नंतर वेद, ओंकार, वषट्कार, पर्वत, नद्या, वृक्ष वगैरे देवता निर्देश केला आहे. वैदिककाळीं वेद, ओंकार व वषट्कार (यज्ञ) ह्या जशा पूज्य देवता होत्या त्याचप्रमाणें पर्वत, नद्या व वृक्ष यांच्या संबंधाच्याही देवता पूज्य मानिल्या आहेत. वर जीं दहा मंडलांच्या ऋषींचीं नांवें लिहिलीं ह्मणून ह्मटलें ते ऋषी फार प्राचीन असून त्यांस 'छंदऋषी' अशी संज्ञा आहे. त्यांचे कारकीर्दींतच प्रथम वेद प्रकट झाले व ह्मणून त्यांचीं नांवें मंत्रांचे ऋषी अशा संबंधानें संहिता बांधणारांनीं दाखल केलीं आहेत. आतां, त्या मंत्रद्रष्ट्या मंडळांत स्त्रिया, शूद्र व क्षत्रिय वगैरेही दाखल केले आहेत. **यमी, पौलोमी, इंद्राणी, लोपामुद्रा** या स्त्रिया मंत्रद्रष्ट्या होत्या; **कवषऐलूष** हा शूद्र मंत्रद्रष्टा होता; व **कक्षिवत, विश्वामित्र** वगैरे क्षात्रिय मंत्रद्रष्टे होते. याप्रमाणें छंदऋषी झाल्यानंतर आचार्य ह्मणजे पूर्वींच्या छंदऋषींचें ज्ञान पढविणारे यांचीं नांवें घेतलीं असून त्यांतही स्त्रीपुरुषांचा समावेश आहे.* वेदांत ज्या कथा व तत्संबंधानें जे देव आहेत

---

* 'आचार्यां'ची जी व्याख्या वर केली तदनुरूप त्यांचे पुढेंही पूर्वविद्याशिक्षक बहुत आचार्य झाले. चालू शतकांतही आपले प्रदेशांत पूर्वीं **हरी केशवजी सोमवंशी, सदाशिव काशीनाथ छत्रे, गोविंद नारायण, बाळगंगाधर शास्त्री जांभेकर** वगैरे, व त्यांचें पुढें **कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरोपंत नाना छत्रे, दादोबा पांडुरंग**—महाराष्ट्र भाषेचे **पाणिनी** !—वगैरे होऊन त्यांचे पुढें हल्लीं वरील **चिपळूणकरांचे** वंशस्थ **मालाकार, वेदार्थयत्नकार, षड्दर्शनचिंतनिकाकार** वगैरे हे महाराष्ट्रभाषेचे आचार्य झाले आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं !

ते वेदोत्पत्तीपूर्वी झाले असें मानण्यास जशी हरकत नाहीं त्या प्रमाणेंच प्रस्तुत सूत्रांत जे *आचार्य व ज्या आचार्या निर्दिष्ट केल्या आहेत त्या सर्व सूत्ररचनेपूर्वी झाल्या हें सिद्ध असून एतत्संबंधानें वर एक दोन ठिकाणीं उल्लेख केलाच आहे. अस्तु. यानंतर आपल्या पितृत्रयींचीं नांवें घेण्यास सांगितलीं आहेत. परंतु अलीकडे कर्म-वृद्धीच्या धोरणानें त्या त्रयीस इतर आप्तांचीं नांवें आणखी जोडण्याची वहिवाट पडली आहे. येणेंप्रमाणें ब्रह्मयज्ञसंबंधी तर्पणप्रयोग

---

* या आचार्यमालेमध्यें प्रस्तुतसूत्रप्रतिपादक खुद्द **आश्वलायनाचार्य** यांचेंही नांव आलें आहे. यावरून दोन तीन अनुमानें होतातः एक, **आश्वलायनां**नंतर या सूत्राचा कांहीं भाग वाढविला असावा; किंवा दुसरें, पूर्वकालीं जीवंताचेंही तर्पण करण्याची चाल असावी; अथवा तिसरें, प्रकृत सूत्र हें खुद्द **आश्वलायनां**नीं न करितां तद्वंशीयांनीं **आश्वलायनां**नंतर लौकरच केलें असून त्यांणीं आपल्या मूळ पुरुषाचें प्रख्यापन व गौरव होण्याकरितां त्यास तेंच नांव दिलें असावें. या तिन्ही अनुमानांपैकीं कोणतेंही अनुमान सत्य असें ठरलें तरी एकंदर सूत्ररचनेस कोणत्याही अंशानें बाध येत नसून त्याच्या उक्त प्राचीनत्वासही विरोध येईल अथवा त्यांत आमचें शेवटचें अनुमानही खरें झाल्यास आमच्या प्रतिपादित सूत्र-कालादिकास कमीपणा येईलसें वाटत नाहीं. शिवाय हेंही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, आपल्या ग्रंथास वजनदारी व महत्व येण्याकरितां तो दुसऱ्या कोणा सुप्रसिद्ध विद्वानाची कृति ह्मणून आपले ग्रंथ प्रसिद्ध करण्याची बहुत दिवसांची वहिवाट दिसते, तदनुरूप आह्मीं तिसरें अनुमान बांधलेलेंही संभाव्य आहे परंतु ह्मणून त्याचें महत्व कमी होत नाहीं. आज आपलेजवळ जी **मनुस्मृति** आहे तो ग्रंथ खुद्द **मनू**ची कृति नसून तो कोणी **भृगू**नें रचून **मनू**चे नांवावर प्रसिद्ध केल्याची आख्या आहे ! तरी त्या ग्रंथाचें महत्व व लोकमान्यता हीं यत्किंचितही कमी नाहींत हें सर्वांस विदित आहेच.

येथें संपतो. त्यानंतर पुढें, फावेल तसें ह्मणजे, चालतां बसतां व उठतां फिरतां सर्व काळीं अध्ययन करावें असें सांगितलें आहे आणि त्याप्रमाणें सर्वप्रकारें जरी नाहीं तरी वर सांगितलेल्या प्राचीन ग्रंथांच्या आदींचें पठन करण्याचा प्रस्तुत संप्रदाय आहेच. आतां ह्या संबंधानें सांगावयाचा भाग येथेंच आहे कीं, सूत्रोक्त रीती-प्रमाणें नांवाचा मात्र ब्रह्मयज्ञ हल्लीं चालू असून त्याविषयीं वास्तविक विचार कोणीही करीत नाहीं. हें फार वाईट आहे. वरील ब्रह्मयज्ञ-प्रतिपादनावरून तर असें सिद्ध होतें कीं, त्या काळीं जे ग्रंथ उप-लब्ध होते त्यांचा अभ्यास करण्याची लालसा तत्कालीन विद्वन्मंड-ळांत फार होती व 'स्वाध्याय' सदराखालीं प्रयोगकारांनीं त्या सर्व ग्रंथांच्या आदी घेऊन तो विधि नित्यकर्मांत घालण्याचें कारण तरी हेंच असावें. परंतु त्याची काळजी अथवा तद्विषयक विचार हल्लीं नष्ट झाला असून आपल्या पूर्वजांच्या ज्ञानाचें भांडार काय इकडे कोणीही लक्ष्य देत नाहीं. अलीकडे अनेक उलाढालीनें पूर्व-जांनीं प्रतिपादिलेल्या कर्मांचा सर्वांकडून त्याग होत जाऊन पूर्व-जांच्या रीतीभाती व आचारविचार यांजपासून सर्व लोक च्युत झाले असल्यामुळें प्रकृत विषयानुरूप आमच्या लोकांत ब्रह्मयज्ञ करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे, ही एक गोष्ट झाली. आणि त्यांतही जे कांहींबाहीं त्या रीतीला अनुस-रून आहेत त्यांस तर, वर लिहिल्याप्रमाणें तत्संबंधाचा तत्वविचार मुळींच नाहीं. एतावता सर्वच प्रकार खेदास्पद झाला आहे. ब्रह्मयज्ञ करणारे ब्रह्मयज्ञाचे वेळेस 'स्वाध्याय'° संबंधानें सांगित-लेल्या सर्व ग्रंथांच्या आदी आजन्मपर्यंत ह्मणतात, परंतु या आदी कशाच्या व ते ग्रंथ काय आहेत हा शोध लोकांतून मुळींच नाहींसा झाला. सूत्रांपासून पुढ उतरता काळ येऊन त्या का-ळांत उत्तरोत्तर भ्रम वाढत चालला व पाहिजे तशा अविचाराच्या गोष्टी प्रवृत्त झाल्या. आणि त्या अविचारजन्य आचारविचारांची सर्व लोकांवर आज बरेच दिवसांपासून पुढें बसत चालल्यामुळें त्यांत

लोक अगदीं मलीन झाले आहेत. पूर्वी सूत्रकालच्या एतद्देशीय लोकांचें इतर देशस्थ लोकांच्या तत्कालीन आचारविचारांशीं साम्य केलें असतां परदेशीयांच्या अज्ञान व अविचारजन्य आचारविचारांची जशी घुरट घाण येत होती तशी प्रस्तुतकालीं इतर देशस्थ लोकांच्या अगाध ज्ञानजन्य आचारविचारांशीं आमच्या आचारविचारांचें साम्य केलें तर आह्माविषयीं त्या सुविचारसंपन्न लोकांत तिरस्कारबुद्धि उत्पन्न होईल! ह्याप्रमाणें कालचक्राचा महिमा अतर्क्य आहे!!

आतां कोणास अशी शंका येईल कीं, तर्पण करण्यांत काय अर्थ आहे? तर याचें उत्तर असें आहे: वेदांत मंत्र, विधि व अर्थवाद अशीं मुख्य तीन प्रकरणें आहेत. मंत्र ह्मणजे ईश्वरी प्रार्थना किंवा देवस्मरण; विधि ह्मणजे, औषधसेवनांत जसें अनुपान तशीं मंत्रसिद्ध्यर्थ कर्मे; आणि अर्थवाद ह्मणजे, ते विधी करण्याची लोकांस रुचि लागण्याकरितां फलश्रुती लिहिल्या असतात, ते. यावरून मंत्र हा मुख्य भाग असून तो नुस्ता लोकांस गोड लागणार नाहीं ह्मणून त्यास मंत्र जोडून तत्संबंधानें प्रस्तुत प्रष्टव्य जो तर्पणविधि तो सांगितला असावा असें दिसतें. आतां, मंत्रपठनाचा संप्रदाय सूत्राच्या पूर्वींपासून असल्याविषयींचा उल्लेख वर एके ठिकाणीं केलाच आहे व तो प्रत्यक्ष सूत्रावरूनही निर्बाध सिद्ध होतो. कारण, सर्व सूत्रांत जेथें जेथें मंत्रप्राप्ति झाली आहे तेथें तेथें त्या त्या मंत्रांच्या आदी दिल्या आहेत. यावरून आणखीही अशी एक गोष्ट सिद्ध होते कीं, पूर्वी मंत्र पाठ करण्याचा सर्वसाधारणसंप्रदाय होता व ह्याप्रमाणें सर्वांस मंत्र येतातच असें आचार्यांस पूर्णपणें वाटत होतें. तरी प्रस्तुत स्थितीकडे पाहिलें असतां आचार्यांच्या समजुतींत असत्यता येईल; परंतु ह्यास त्याचा नाइलाज आहे! अस्तु. येणेंप्रमाणें मंत्रभाग व त्याच्या व्याख्या ह्मणजे ब्राह्मणें हीं सर्व सूत्रांचे फार पूर्वींपासून तयार झालीं होतीं व त्यांतही सर्व वेदांचा एकच राशि होता. परंतु पुढें त्याच्या चार

संहिता झाल्या असें दिसतें. पूर्वोक्त विवेचनाप्रमाणें मूळ मंत्र ज्यांनीं प्रकट केले ते ऋषी आणि त्या वेदमंत्रांचीं अंगें, उपांगें व उपवेद हीं ज्यांनीं पढविलीं ते आचार्य होत. यावरून आचार्यांपेक्षां ऋषी हे प्राचीन होत व ह्मणूनच त्यांस तर्पणांत देवांच्या खालीं दुसऱ्या प्रतीवर ठेविलें असून आचार्यांस तिसऱ्या प्रतीवर घातलें आहे. सूत्रोत्पत्तीचे काळीं ऋषींची कारकीर्द बंद पडून आचार्यांचा अम्मलही ढिला पडला होता असें दिसतें. आचार्यांतीलच **आश्वलायनाचार्य** हे होते, व त्यांस कौतुकानें कोणी ऋषी ह्मणत असतील. बाकी वस्तुतः जे ऋषी होते ते त्यांचे पूर्वींच होऊन गेले असा तर्क आहे.

सर्वदा घरांत अग्नि राखून त्याजवर कर्में करणें यास अग्निमुख कर्में ह्मणतात. आतां हीं कर्में उत्पन्न होण्यास मूळ शीतल देश असला पाहिजे असा तर्क होतो. व त्याप्रमाणें आर्य हे मूळचे हिमालयाचे आसमंताद्भागीं थंड मुलखांत राहणारे असल्यामुळें त्यांजमध्यें अग्निमुखकर्में फार सुखानें चाललीं असावीं. पुढें उत्तरेकडील वस्ती सुटून दक्षिणेकडील उष्ण मुलखांत ह्मणजे श्री क्षेत्र **काशी** वगैरेकडे आर्यलोक उतरल्यावर त्यांच्या अग्निमुखकर्मांपासून त्यांस उपाधि प्राप्त होणें साहजिक होय व त्यामुळें तो मार्ग सोडून उष्ण प्रदेशांत सुखतोयकर असा उदकसंबंधी शीतलोपचारी कर्ममार्ग निघाला आणि **गंगादि** नद्यांची माहात्म्यें वाढलीं असावीं असें अनुमान असून पुढें संपत्ति वाढल्यावर मूर्तिपूजा निघाल्या असाव्या असा सुमार आहे. त्याचप्रमाणें बुद्धधर्मानुयायांकडून गुरुपादुकापूजन निघालें आणि जसजशी वैदिक धर्मास ग्लानि येत चालली तसतशीं भजन व दर्शन हीं वाढून प्राकृत मंदिरें स्थापन झालीं असें मत आहे. ह्याप्रमाणें मूर्तिपूजेचा नवीन क्रम

निघाला खरा; तरी त्यांत वैदिकांनीं मानलेल्या *इंद्र, सोम, अग्नि मरुत इत्यादि देवांच्या मूर्ती मुळींच न होतां **राम, कृष्ण, गणपति, हनुमान्, शिव** इत्यादि पुराणप्रसिद्ध देवांच्या मूर्ती मात्र झाल्या. यावरून जे मूर्तिपूजामार्गाला अर्वाचीनत्व ठरवितात त्यांस प्रमाण मिळतें.

वेदविद्या गुप्त ठेवण्याची रीति, ह्मणजे ज्या काळीं बौद्धमार्गांतील व इतर साधू हे धडधडीत वेदांतील प्रतिपादनाची निंदा करूं लागले व तेणेंकरून वेदांविषयीं सर्वत्र असन्मान उत्पन्न होऊं लागला तेव्हां वेदार्थ न जाणतां केवळ तो पाठ करून कायम ठेवण्याविषयींची रीति वैदिकधर्मानुयायींनीं ठरविली असावी. त्याचप्रमाणें वेदांतील अश्वमेधाचे वर्णनाचा प्रस्तुत चालू असलेल्या भाष्याप्रमाणें अर्थ केला असतां राणीनें याज्ञिक अश्वाजवळ निजावें व त्याची प्रार्थना करावी वगैरे **संवेशनप्रकार** पाहून यज्ञमंडपांतील प्रेक्षकांमध्यें किती उपहास व्हावयाचा व तें †अश्लील भाषण किती निंद्य होतें हेही प्रकार वेदार्थ गुप्त ठेवण्यास कारण झाले असावे; परंतु हेंच जर कारण असेल तर तेथें अर्थ करणाऱ्या भाष्यकारांची गैर समजूत झाली असावी असें प्रसिद्ध पंडित **दयानंद सरस्वती** यांणीं ऋग्वेद व यजुर्वेद या उभय वेदांवर भाष्य चालविलें आहे त्यांतील अर्थसरणीवरून वाटतें. परंतु असेंही कोणी ह्मणतील कीं, परंपरागत चालत आलेला शुद्धार्थ सोडून या नवीन भाष्यकारांचा अर्थ ग्राह्य करणें ह्यांत मोठेपणा नाहीं; परंतु असें

---

* पहा—शंन इन्द्राग्नीभवतामवोभिः०॥—ऋ. अ. ५ अ. ३ वर्ग २८.

त्याचप्रमाणें—

**ॐप्रातरग्निं प्रातरिंद्रं हवामहे प्रातर्मित्रावरुणा प्रातरश्विना प्रातर्भगं पूषणं ब्रह्मणस्पतिं प्रातः सोममुत रुद्रंहुवेम॥**—ऋ. अ. ५ अ. ४ वर्ग. ८.

† पहा—"यजुर्वेद माध्यंदिनशाखासंहिता," अध्याय २३, मंत्र २० याजवरील भाष्य.

ह्मणून उपयोग नाहीं. निर्दोष व विचाराला सयुक्तिक असा अर्थ होत असल्यास पूर्वीच्या अर्थांत गैर समज ह्मणून ग्रह्य करण्यास ग काहीं हरकत नाहीं असें वाटतें. भारतांतही वेदांतील विसंगत अर्थाविषयीं व लोकांच्या गैर समजुतीविषयीं असें ह्मटलें आहे:—

**सुरा मत्स्या मधू मांस—मासवं कृशरोदनम् ।**
**धूर्त्तैः प्रवर्त्तितं ह्येत-न्नैतद्वेदेषु कल्पितम् ॥**
**मानान्मोहाच्च लोभाच्च लौल्यमेतत्प्रकल्पितम् ॥**

मोक्षधर्म, अ. ९२.

परंतु आमचे सदसद्विचारानें व्यर्थाभिमान सुटतील तेव्हां खरें. असु. बौद्धाच्या भीतीनें वेदार्थ गुप्त ठेवण्याचें भाग पडलें व अहिंसाधर्माविषयीं बहुतेक त्यांची छाया पडली असें सर्व कबूल करतील. परंतु हें सत्य कारण एकीकडे ठेवून त्याविषयीं कल्पित कथा बहुत निघाल्या:—पूर्वींचे ऋषी हे यज्ञ वगैरे करून पशू मारीत परंतु त्यांस ते पशू पुनः संजीवन करण्याचें सामर्थ्य असून त्याप्रमाणें ते करीत; तें सामर्थ्य हल्लीं कोणांतही नाहीं ह्मणून पशुहिंसा वर्ज करणें भाग आहे. याचप्रमाणें, पशु मारला ह्मणचे तत्प्रीत्यर्थ मोठें अन्नदान करून शांति करीत व तेणेंकरून तत्संबंधाचें पातक लागत नसे; तसें संतर्पण हल्लीं कोणाकडून होत नाहीं ह्मणून पूर्वीचा यज्ञमार्ग व मधुपर्कादि पशुहिंसाश्रित कर्मै बंद करावीं लागलीं इत्यादि सबबी सांगतात. परंतु पशुसंजीवनादि प्रकार व पशुहिंसासंबंधी पातक वगैरेंचा पत्ता सूत्रांत व सूत्राचें मूळ जीं ब्राह्मणें त्यांत कोठेंच लागत नाहीं* त्यावरून त्या सबबी निर्मूळ होत. तर वर लिहिलेल्या

---

* **ऊवध्य गोहं पार्थिवं**०—ऐ. ब्रा. १ अध्या. १, २ पंचिका ६ खंड. यांत पशुहननानंतर त्याचें मांस वगैरे हव्य भाग घेऊन अस्थी वगैरे पृथ्वींत पुरून टाकाव्या असें स्पष्ट लिहिलें आहे. तेव्हां पशुसंजीवनाची गोष्ट असत्य ठरते. याचप्रमाणें **सामवेदांत** पशूचे हननसमयीं त्याचे मातापितर व इष्ट आप्त यांची समजूत याप्रमाणें घालतात:—

पैकींच कोणतीं तरी कारणें वेदाच्या गूढतेस योग्य असावीं असें वाटतें. याकरितां प्रस्तुत यज्ञ करून मुद्दाम जो पशू मारण्याचा क्रम कोठें कोठें चालू आहे तो तरी हट्टाचा दिसतो व तो बंद करून वैष्णवमतप्रतिपादित पिष्टपशुकल्प चालू केल्यास अ-गदींच शुद्ध व निर्दोष मार्ग होईल असें वाटतें. शिवाय ऐतरेया-रण्यकांत असें लिहिलें आहे:—

**पुरुषं वै देवाः पशुमालभन्त०**—२ पंचिका, ८ खंड.

ह्मणजे, पशूंतून मेध्य निघून तांदुळांत आलें आहे. ह्मणून पशूंनीं यज्ञ न करितां तांदुळांनीं करावे.—

**अमेध्याः पशवस्तस्मादेतेषां नाश्नीयात्०**—किंवा.

तैत्तिरीय शाखेंत प्रोक्षित मांस मात्र खाण्याचा विधि सांगितला असून तो **याज्ञवल्क्यां**नींही आपले स्मृतींत घेतला आहे. व तोच **भारता**तही आहे. प्रोक्षण ह्मणजे पशूस मार्जन करून पवित्र करणें. त्यास 'संज्ञपन', 'उपाकरण' व 'आलंभन' असेंही ह्मणतात. वेदानुज्ञित पशुमारणास हिंसा ह्मणूंनये असेंही कोणी ह्मणतात.—

**या वेदविहिता हिंसा न सा हिंसा प्रकीर्त्तिता ॥**

पशुमारणविधी हे मुळीं निराळे असून तत्संबंधानें जेव्हां वाटा-घांट सुरू झाली तेव्हां त्यास कांहीं प्रतिबंधांत आणिलें असावें असें वाटतें. याविषयीं **मनूचें** वचन असें आहे:—

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

**अनु त्वा माता मन्यता मनुपिताऽनुभ्राताऽनुसगर्भ्योऽनुसखा सयूथ्यः ॥ आत्तं देवेभ्यो हविः ॥ १०—मंत्रब्राह्मण.**

यावरूनही संजीवनकल्पना मिथ्या होय. संजीवनाची रीति होती तर त्या वध्यपशूचे मातापितरांची समजूत करण्याचें मुळींच कारण नव्हतें. तसेंच, यज्ञपशूला उत्तम गति प्राप्त होते असें ह्मटलें आहे; या अर्थीं त्याकाळीं संजीवनाची वार्त्ताही नव्हती हें उघड आहे.

**मधुपर्के च यज्ञे च पितृदैवतकर्मणि ।**
**अत्रैव पशवो हिंस्या नान्यत्र मनवेऽब्रवीत् ॥**

याजवरून पाहुणचार, यज्ञ व श्राद्ध इतक्यांत मात्र मांस राहून बाकी बंद झालें. आतां मांस न खाणारेही जनकासारखे निवृत्तिमार्गी पूर्वीं होते. निवृत्तिमार्ग ह्मणजे वैदिक कर्मावर अश्रद्धा होऊन दयाधर्माकडे चित्त देणें. गीतेंत ह्मटलें आहे कीं,—

**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।**
**तयोस्तुकर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २॥** अ. ५

भागवतांतही असें ह्मटलें आहे.—

**लोकेऽव्यवायाऽमिषमद्यसेवा०—**

या वचनावरून निवृत्ति इष्ट आहे असें ठरतें. आतां मनूनें जरी—

**प्राणस्यान्नमिदं सर्वं प्रजापतिरकल्पयत् ॥**
**स्थावरं जंगमं चैव सर्वं प्राणस्य भोजनम् ।** २८ अ० ५.

असें ह्मटलें आहे. तरी पुढें—

**न मांसभक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने ॥**
**एषः प्रवृत्तिको धर्मो निवृत्तिस्तु महाफला ॥** ५६–५.

असेंही ह्मटलें आहे. अस्तु.

सूत्रांत मधुपर्काचे खण्डांत '**सव्यं शूद्राय**' असें एक सूत्र आहे. त्याजवरून शूद्रासही मधुपर्क करण्याची चाल व अधिकार असून त्या काळीं शूद्र राजे किंवा सरदार असतील असेंही वाटतें. सूत्रांत दिवसां व रात्रीं पाणी घेऊन सूर्याचें ध्यान करावें इतकी मात्र संध्या लिहिली आहे. परंतु हल्लीं प्रयोगावरून त्याहून जास्त चालत आहे. आतां ही जास्त कशानें झाली याचा विचार केला तर अनेक ग्रंथांचे तीन साह्य मिळून तिचा एवढा विस्तार झाला असें दिसतें. ह्मणजे, भस्मोपनिषदांतील भस्माचा मंत्र, अग्निपुराणांतील चोवीस नांवें, योगशास्त्रांतील प्राणायाम, नारायणोपनिषदांतर्गत सप्तव्याहृतिपूर्वक सशिर व सप्रणव गायत्री, संध्येचें तांत्रिक ध्यान-मार्जन-मंत्राचमन, पुनर्मार्जन, अघमर्षण, तांत्रिक अर्घ्य—आसन-

विधि मुद्रा-न्यास व गायत्रीविधान, सूत्रोक्त जप, उपस्थान, दिशानमन, गोत्र शाखा-प्रवरोच्चार व भारतांतील श्लोक इतकीं प्रकरणें मिळून संध्येचा अर्वाचीन प्रयोग बनला आहे. याशिवाय पुराणांतील व तंत्रांतील पूजा, अभिषेक, स्तोत्रपाठ वगैरे जोडलीं आहेत व या वरून संध्येचा प्रवाह बराच मोठा झाला आहे. परंतु आली-कडील नवीन शिक्षणानें व विचारप्रसारानें हा सर्व प्रवाह जो हळूहळू ओसरून जात आहेसा भासतो तो संध्याप्रवाहच मुळीं कोरडा ठणठणीत होऊन न पडो म्हणजे झालें! सूत्रकाळीं होम आणि ध्यानयुक्त संध्या येवढीच काय ती संध्या होती. परंतु कर्मवृद्धीचें वारें जें आमच्या लोकांत शिरलें—आणि ही गोष्ट फार सुख व स्वस्थता असेल तेव्हांच घडते, दुष्काळ व अस्वास्थ्य असेल तेव्हां मुळींच तिचें नांवही निघणार नाहीं—त्यास पुराणें, तंत्रें व प्रस्थानिक उपासनेचे ग्रंथ यांचा फार मोठा आधार सांपडला. हा ग्रंथाधार सूत्राचे काळीं कोठें नव्हता असें, ज्या अर्थी या सूत्रांत त्या ग्रंथांचा उल्लेख कोठेंच येत नाहीं त्यावरून वाटतें. शिवरहस्य, देवीरहस्य, रुद्रयामल, डामरतंत्र या प्रकारचे ग्रंथ, तसेंच जोगी, कापालिक, पाशुपत, शैव वगैरे प्रस्थानें व अवैदिक पाखाण्ड मार्ग बौद्धमतानंतर धर्मसंबंधानें झालेल्या उलाढालींत उभे राहिले असावे असें दिसतें. आतां, त्यांणीं ठिकठिकाणीं वेदमंत्र घेतले आहेत परंतु त्यांचा पूजा-मार्ग, अनेक प्रकारच्या सामग्री व मंदिरें इत्यादि वैदिक काळांत असल्याचा श्रौत व स्मार्त्त या सूत्रांत कोठेंही दाखला आढळत नाहीं. कोणी ह्मणतात कीं, **बौधायनसूत्रांत** याचा दाखला आहे. परंतु **बौधायनसूत्र** हें पुराणांसारखेंच असून तें शैववैष्णवादि प्रस्थानें चालू झाल्यावर लिहिलें असावें. तशी गोष्ट **आश्वलायना**विषयीं नाहीं. **आश्वलायनसूत्र** हें फार प्राचीन असून, ज्या अर्थी, ज्या वेदाच्या आधारानें जें सूत्र लिहिलें जातें त्या वेदांत नसणारा विषय त्या सूत्रांत आढळला तर त्याचें प्राचीनत्व मिथ्या होतें तदनुरूप, **आश्वलायनसूत्रांत** तशा प्रकारचा कमी जास्तपणा नसल्यामुळें

त्याची मान्यता विशेष व योग्य आहे. ही गोष्ट **बौधायनाशीं** लावून पाहिली असतां त्याचें अर्वाचिनत्व अतएव तन्मान्यतेंत ईषन्न्यूनत्व सिद्ध होतें. प्रथम स्मार्त्तविषय थोडा, तो वाढतां वाढतां जेव्हां लोकांत उपासनाकांड चालू झालें तेव्हां **बौधायनांनीं** त्याचा संग्रह केला असावा व ह्मणून तें वैदिक कर्म आहे असें ह्मणवत नाहीं.

वेदोत्पत्तीविषयीं असा विचार आहे कीं, सर्व वेदमन्त्र हे एकदम प्रकट झाले असें नसून प्राचीन ऋषींस जसजसें स्फुरण झालें तसतसे ते प्रकट झाले असतील व हें काम कितीएक दिवसपर्यंत चाललें असेल. कारण, भाषेच्या संबंधानें पाहिलें असतां सर्व मन्त्र सारख्याच भाषेंत आढळत नसून कांहीं सूक्तें प्राचीन भाषेंत आहेत व **पुरुषसूक्ता**सारखीं कांहीं सूक्तें अर्वाचीन भाषेंत आहेत. त्याचप्रमाणें मंत्रांचा उपयोग प्रथम प्रार्थनेकडे होत होता. पुढें ते मन्त्र कर्मकाण्डाकडे लावण्याविषयीं ब्राह्मणें निर्माण झालीं. ब्राह्मणांतही कांहीं ब्राह्मणें प्राचीन असून कांहीं अर्वाचीन आहेत असीं दिसतात. **ऐतरेय ब्राह्मण** हें **दिवोदास** आणि इतरा यांचा पुत्र **ऐतरेय** * ह्मणून कोणी होता त्याणें पढविलें असे लेख आहेत. त्यांत स्मार्त्त विषय तर मुळींच नसून वेदाचे विनियोग व तत्संबंधी तत्काळीं प्रसिद्ध असणाऱ्या दंतकथा आणि त्याचीं फळें इतकीं मात्र लिहिलीं आहेत. हीं ब्राह्मणें बऱ्याच काळपर्यंत होत असून सूत्रांची टांकसाळ पुराणें निर्माण होईपर्यंत सारखी चालत आली होती असें

* 'ऐतरेय' हें नांव, वर त्याच्या मातापितरांचा जो उल्लेख केला आहे त्यावरून पाहिलें असतां आईच्या नांवावरून घडलें आहे असें दिसतें. परन्तु बापाचे नांवावरून पुत्रास अभिधान देण्याचा विशेष परिपाठ आहे: 'वासिष्ठ,' 'आत्रेय,' 'काश्यप,' 'भार्गव,' 'जामदग्न्य,' 'वासुदेव,' 'पांडव,' 'पारीक्षित' इत्यादि नांवें त्यांच्या बापांचे नांवांवरून दिलेलीं आहेत; तरी 'गांगेय,' 'कौन्तेय,' 'राधेय,' 'आंजनेय' इत्यादि नांवें त्यांच्या आयांचे नांवांवरून घडलीं आहेत व त्याचप्रमाणें प्रस्तुतचें ऐतरेय हें नांव त्याच्या मातृनामानें घटित झालें आहे.

दिसतें. व ह्मणूनच शेवटीं **वैशंपायना**सारखीं जीं सूत्रें झालीं त्यांत पुराणोक्त धर्मही आले आहेत हें कांहीं आश्चर्य नाहीं. कारण, लोकांचा स्वाभाविक धर्म असा आहे कीं, त्यांजपुढें एक नमुना असला ह्मणजे ते त्या नमुन्याचा आधार धरून दुसऱ्या जिनसा त्याप्रमाणें तयार करितात. प्रथम चार जाती होत्या त्या नमुन्यावर लोकांनीं चार हजार जाती तयार केल्या. प्रथम एक दोन ब्राह्मणें एक दोन शाखेच्या ब्राह्मणांनीं केलीं त्या कित्यावर सर्व शाखांवर निरनिराळीं ब्राह्मणें झालीं. आतां त्यांतील कांहीं ब्राह्मणें उपलब्ध आहेत व कांहीं बुडालीं. ह्मणजे, ज्या ज्या शाखांतून लोकांचा भरणा कमी होऊन पठनपाठनक्रम बंद पडत चालला तसतसे तत्तच्छाकीय ग्रंथही नाहींसे होत चालले. तरी सर्व ब्राह्मणांच्या शेवटचें **शतपथब्राह्मण** असावें असें दिसतें व तें सर्व अविच्छिन्न आहे. त्याचा कर्ता **याज्ञवल्क्ययोगीश्वर** आहे असें त्यांतच लिहिलें आहे.* **शतपथ**ब्राह्मणांत वैदिक कर्मांचा संग्रह असून वेदांतविषयाचाही संग्रह आहे व शब्दांच्या व्याख्याही पुष्कळ लिहिल्या आहेत. मुळींच ब्राह्मणांस व्याख्याग्रंथ ह्मणतात. असें ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांत वेदांच्या आदी घेऊन त्यांच्या व्याख्या लिहिल्या आहेत. यावरून वेदमन्त्र हे ब्राह्मणग्रंथांचे पूर्वीं झालेले आहेत हें सिद्ध आहे. व त्यांचें प्राचीनत्व इतर कोणत्याही ग्रंथास येत नाहीं हेंही स्पष्ट आहे. शतपथब्राह्मणाचे प्रथम कांडांत, **मनूचे** राज्यांत मोठा जलप्रलय होऊन जलमय पृथ्वी झाली तेव्हां मत्स्यरूप करून ईश्वरानें त्याचें रक्षण केलें अशी कथा लिहिली आहे.—

**मनवे ह वै प्रातः मत्स्य पाणी आपेदे इ०**

हीच गोष्ट सर्व पुराणिकांनीं आपले पुराणांत उतरली आहे. इतकेंच नाहीं तर अन्य देशच्या परधर्मीयांनींही ती गोष्ट आपले ग्रंथांत घेतली असल्यामुळें त्यांवरून तर या वैदिक ग्रंथांचें प्राचीनत्व स्पष्ट होतें.†

---

* 'इमान्यादित्यानि, शुक्लानि यजूंषि वाजसनेयेनाख्यायन्ते.

† बायबलांतील नोहाचा जलप्रलय तोच हा मनूचा

वेदमंत्र, सूत्रें किंवा ब्राह्मणें हीं [illegible]चक नांवें देऊन ग्रंथप्रसार [illegible]रून बराच काळपर्यंत त्यांची घडण चा[illegible] [illegible]शृंगार भरला आहे तें व तंत्रेंही एककाळींच सर्व घडलीं नसून त्या [illegible]ारतान्ते०' इत्यादि घटना असल्यामुळें तीं अजूनही घडत आहेत. [illegible]या पण्डितंमन्य व जसजशा लोकरुची झाल्या तसतशी उपसनाग्रंथ[illegible] [illegible]य करून देवताकल्पनांची भरती होत चालली हें लक्ष्यांत आणि[illegible] गोष्टी बौधायनसूत्रांत अनेक उपासना कां आल्या याचें दि[illegible]ंत जें वर एके ठिकाणीं केलें आहे त्यास दार्ढ्य येईल. याशिवाय ही एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, बहुत काळापासून वेदादिक प्राचीन ग्रंथ परिमित होऊन बसल्यामुळें त्यांत नवीन विषय शिरावयास जागा नाहीं. परंतु उपनिषदें व पुराणें हीं अपरिमित असल्यामुळें त्यांत प्रस्थानिक व उपासक लोकांनीं नवीन उपनिषदें व नवीन पुराणें करून घातलीं आहेत आणि पुढेंही घालतील. याचप्रमाणें सूत्रामध्यें एका **बौधायनसूत्राची** मात्र अशीच अपरिमितता असल्यामुळें त्यांत सूत्रांच्या रीतीपेक्षां बहुत फाजील प्रतिपादन जोडलेलें दिसतें. पुराणांत **स्कंदादि** कांहीं पुराणें अपरिमित असल्यामुळें त्यांत पाहिजे ते विषय मागाहून घुसवून दिले जातात. व्यवहारांत ज्याप्रमाणें कोणाचे गोत्राचा पत्ता नसल्यास त्यास **काश्यप** गोत्र लावण्याची चाल आहे; त्याचप्रमाणें कोणताही विषय निघाला तरी तो **स्कंद** पुराणांतर्गत आहे असा

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

जलप्रलय होय. नोहा हें मनूचें हिब्रू भाषेंतील अपभ्रष्टप्रयोगसाधित नांव झालेलें आहे; व कुराणांत अरबी भाषेमध्यें तें 'नुः' अशा शब्दानें त्याच जलप्रलयाचे कथानकाखालीं घातलेलें आहे !! यावरून सर्व धर्मपुस्तकांत येणाऱ्या फार प्राचीन इतिहासाचें हें अद्वितीय व आश्चर्य मानण्यासारखें ऐक्य आहे व येणेंकरून वैदिक धर्माची प्राथमिकताही सर्वांशानें व्यक्त होत असून त्याची छाया इतर धर्मीयांनीं उतरून घेतली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं !

...डतो. ह्याप्रमाणें जेथें पोकळपणा दिसतें. व ह्मणूनच शेवटीं ...व होणें साहाजिक आहे.

पुराणोक्त धर्मही आले ...ळ ऋषी होते ते महाभक्त असून त्यांची देवावर लोकांचा स्वाभाविक व हल्लीं जसे ब्राह्मणांत वखेडे चालू असतात तसे असला ह्मणतां नव्हते असें दिसतें. आतां, ते जरी साधे, एकान्तवासी, त्याप्रमाणें ...तानें व निर्भीडपणानें लोकांस उपदेश करणारे आणि लोकांवर पूर्ण विश्वास ठेवून चालणारे असे होते तरी, त्यांस पारलौकिक व ऐहिक सुखाचा लोभ असून तत्संबधानें ते शांति, सुबुद्धि, पराक्रम. अन्न-धन-पुत्र-पशु-प्राप्ति, दीर्घायुष्य इत्यादि ईश्वराजवळ प्रार्थीत असत. व याकारितां त्यांचे यत्नही चांगले व अनुकरणीय होते. ते प्रातः उठून स्नान वगैरे करून शांत व निर्मल होऊन नंतर पठनपाठनक्रम व व्यवहारधर्म यांस लागत. व त्याचेठायीं श्रद्धा, मेधा, बुद्धि, न्यायनैष्ठुर्य, तपस्विता, सत्यप्रियता, दीर्घोद्योगीपणा आणि सर्व वर्णांचे गुरुत्व असे. क्षत्रियादि पराक्रमशाली जातींचे ऋषी हेच गुरु होते व त्यावरून त्यांच्या शौर्यवीर्याचीही कल्पना होते. परंतु हा प्रकार आलीकडे बहुत दिवसांपासून हिंदुलोकांतील उच्च ब्राह्मणवर्गांतून नष्ट झाल्यासारखा वाटतो व हें फार वाईट आहे. पूर्वऋषींचा बहुसन्मान्य काळ नष्ट होऊन पुढें भटांचा, दासांचा व गोवांचा काळ आल्यामुळें सर्वत्र संकोचित व अयुक्त नियम, स्त्रियांच्या अधिकाराचा नाश व अद्भुत गप्पा चालू झाल्या. लोकांचा साधेपणा व गंभीरपणा जाऊन शृंगारिक व बालिश वर्तन लोकांमध्यें प्रचलित झालें व त्यांतच काय ती विद्वत्ता व स्वारस्य असें मानुन परंपरा बिघडत चालली. चांगल्या चांगल्या विषयांतही विनोदपर भाषण व शृंगारिक नामनिर्देश होऊं लागले. काव्यकार, चम्पूकार, नाटककार वगैरेंनीं आपला प्रस्ताव फार वाढवून त्यांतच आपणास विद्वान् ह्मणवून नटूं लागले. व्याकरण व इतर शास्त्रांवरील पुढील ग्रंथांस मनोरमा, कौमुदी, भूषण, कुचमर्दिनी, इत्यादि प्रौढरीतीचा व प्राचीन गांभी-

यांचा उच्छेद करून टाकणारीं स्त्रीवाचक नांवें देऊन ग्रंथप्रसार करूं लागले. मंगलाचरण ह्मणजे ज्यांत पूर्णशृंगार भरला आहे तें होऊन वेणीसंहारनाटकादींच्या आरंभीं 'उत्तिष्ठन्त्यारतान्ते०' इत्यादि पद्यांसारखीं पद्यें येऊं लागलीं. जयदेवासारख्या पण्डितंमन्य कविश्रेष्ठानें **गीतगोविन्द** नामक परम शृंगारपर काव्य करून शिमग्यासारखा अमगल कृष्णलीलाप्रभाव वर्णिला इत्यादि गोष्टी कित्येक प्रौढ व विचारी लोकांच्या मतानें निन्द्य ठरतात. परंतु ह्यास आतां निरुपाय आहे. एकंदरींत लोकरुचि विलक्षण होऊन तिची गति अगदीं विरुद्ध दिशेकडे झाली येवढें खरें. व त्यामुळें शौर्य, वीर्य, श्री, धैर्य, बुद्धि, गांभीर्य इत्यादि कीर्त्तिप्रसारक सद्गुणांचा र्‍हास होऊन चावटपण, कोष्या, श्लेष, अर्थांतरें, अनेकार्थी शब्दयोजना इत्यादि प्रकार निर्मल विद्यामन्दिरावर कलंकरूपानें छटा मारूं लागले; आणि तेणेंकरून, आर्यविद्यामंदिराची बाहेरून शोभा पाहणारांस त्याविषयीं अपूज्यता होऊं लागणें हेंही स्वाभाविकच आहे. **अष्टाध्यायीसूत्र, शब्दानुशासन, महाभाष्य** अशा मजबूत व साध्या चिऱ्यांसारखी चिरेबंदी सर्व विद्यामन्दिरास असती ह्मणजे त्याच्या प्राचीन व अर्वाचीन स्थितींत जो प्रस्तुत विपरीत भाव दिसतो तो दिसताना. वरील ग्रन्थांची साधारण व तत्वबोधाची जशी रचना आहे तशी आलीकडील ग्रन्थांची नसून त्यांत असत्यप्रतिपादन, अपलाप व जल्प हे फार वाढत चालले. * परंतु पूर्वीच्या ग्रंथांतील

---

* असत्य प्रतिपादन, अपलाप व जल्प या दोषांनीं ओतप्रोत भरलेल्या प्रतिपादनांचीं उदाहरणें अनेक व सर्वत्र आहेत. कश्यपाचा सूर्य, अत्रीचा चंद्र, सूर्याचा शनि, समुद्राची लक्ष्मी, हिमालयाची पार्वती इत्यादि कन्यापुत्रांची योजना होऊन त्यांचीं त्यांचीं स्वतंत्र कथानकें व तत्तद्विषयक भक्ती वर्णिल्या आहेत या सर्व असम्भाव्य कल्पना अतएव असत्य प्रतिपादन होय; अनेक दानें, उद्यानें, फलश्रुती, शाप, उश्शाप इत्यादि—ह्मणजे अमुक दान केलें

[ पुढें चालू. ]

सत्यपरीक्षासम्बन्धी पूर्वाचार्यांनीं प्रत्यक्ष, अनुमान, शब्द, उपमान इत्यादि ज्या कसोट्या लावून दिल्या होत्या त्या रद्द पडून हीनकस, खोटा व नकली माल सर्व बाजारांत पसरून खऱ्या व बहुमूल्य

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

असतां स्वर्गप्राप्ति होते व अमुक दान न केलें तर शाप मिळून नरकप्राप्ति होते वगैरेंचीं वर्णनें हे अपलाप; व नसता गुण, नसती योग्यता व नसती संभावना, म्हणजे वाग्भटाचे रसरत्नसमुच्चयांतील पारदप्रशंसा, चिदम्बरतन्त्रांतील भांगेचें वर्णन हीं सर्व प्रकरणें केवळ जल्पना होत:—

संक्रान्तिसमये दानं स्वशक्त्या न करोति यः।
स दरिद्री महापापी भवेज्जन्मनि जन्मनि ॥—दानमाहात्म्य.

शृणु देवी! प्रवक्ष्यामि विजयाविधिमुत्तमम्।
यस्य विज्ञानमात्रेण ब्रम्हज्ञानं प्रजायते ॥
अज्ञानविजयं तस्मात्—द्विजयेति प्रकीर्त्तिता।
सम्यक् ज्ञानं प्रदातीति सविन्नामेतिविश्रुतम् ॥
ये निन्दति महादेवी! सविद्भक्षणतत्परं।
ते रौरवं महाघोरे तिष्ठन्त्याचन्द्रतारकाः ॥
सविद्भक्षणमात्रेण गंगास्नानसहस्त्रकं।
सद्यःफलमवाप्नोति सत्यं सत्यं न संशयः ॥
बिल्वपत्रं यथा शम्भो-र्हरेःश्रीतुलसी यथा।
सवित्पत्रं तथा देवी! त्रिपुराय प्रियं करं ॥
तस्य सेवा सदा कार्या नरैर्मुक्तिफलेप्सुभिः।
न दूषणात्तथा कार्या तुलसीसदृशं हितम् ॥—चिदम्बरतन्त्रे,
विजया ( भांग ) कल्पः.

शताश्वमेधेन कृतेन पुण्यं गोकोटिभिःस्वर्णसहस्त्रदानात्!
नृणां भवेत्सूतकदर्शनेन यत्सर्वतीर्थेषु कृताऽभिषेकात् ॥
यस्तु निन्दति सूतेन्द्रं शम्भोस्तेजः परात्परम्।
स पुमान् नरके घोरे पतत्याकल्पकं ध्रुतम् ॥
रोगिभ्यो यो रसं दत्ते शुद्धिपाकसमन्वितम्।
तुलादानाऽश्वमेधानां फलं प्राप्नोति शाश्वतम् ॥—
रसरत्नसमुच्चये, पारदकल्पः.

रत्नांची पारख नाहींशी झाल्यामुळें त्यांची अगदीं राळ होऊन गेली. व करोस्या सांगणारे आचार्य तर कधींच झाले पण त्यांच्या एकंदर वर्गासही पूज्य पडत चाललें! अस्तु. याविषयीं विशेष विवेचन पाहणें असल्यास आमचा '**स्वाध्याय**' ग्रन्थ पाहावा.

**आश्वलायन** ऋषि हे, बुद्धिवान् वरास कन्या द्यावी असें लिहितात व **मनू**चेंही तेंच मत आहे.—

**काममारणात्तिष्ठे–द्गृहे कन्यर्तुमत्यपि ॥**

**न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥ ९ ॥–अ० ९.**

**हिरण्यकेशां**नींही चातुर्थिक कर्म ह्मणून लिहिलें आहे, त्यावरून ऋतुप्राप्त झालेली वधु असावी असें बोधित होतें. या सर्व गोष्टींवरून सूत्रोत्पत्तीचे काळीं हल्लीं सारख्या अडचणी नव्हत्या असें स्पष्ट असून तो काळ फार सुखावह व विचाराचा होता असें दिसतें. त्याचप्रमाणें स्त्रियांनीं लग्न केलेंच पाहिजे असें आवश्य नसून शिवाय हल्लींप्रमाणें अमुक वयावर कन्येचा विवाह जाऊं नये व अमुक नेमलेल्या मासांत मात्र लग्नें व्हावीं अशा अडचणीही पूर्वीं बिलकुल नव्हत्या. स्त्रीपुरुषांस पाहिजे तर लग्न करावें, नाहीं तर अविवाहित राहावें अशी मोकळीक असे, व तीच मोकळीक हल्लीं असावी असें विचारी लोकांस वाटूं लागलें आहे. परंतु लोकरूढीच्या जबरदस्त वजनाखालीं लोक अगदीं वांकून जाऊन त्यांस युक्तविचारपूर्वक रूढीविरुद्ध कोणतेंही कृत्य करण्यास वर डोकें करवत नाहीं ही मोठी वाईट गोष्ट आहे असें ह्मटल्याशिवाय राहवत नाहीं. पूर्वीं लग्न न करितां पुरुष ब्रह्मचारी राहत व स्त्रिया ब्रह्मचारिणी होत. अलीकडेही **मुक्ताबाई, ज्ञानेश्वर, रामदास** इत्यादि ब्रह्मवादी व ब्रह्मचारी होऊन गेले. परंतु हा प्रकार वर लिहिल्याप्रमाणें लोकाचारामुळें कोणास ग्राह्य करवत नाहीं.

**आश्वलायन**गृह्यसूत्रांत भजन पूजन कोणत्या प्रकारचें आहे व त्यांत देव कोणत्या प्रकारचे आहेत याविषयीं विचार केला तर भजनाची मुख्य रीति हवन आहे व देवही अनेक धरिले आहेत असें दिसतें.

हवनाविषयीं पाहिलें तर, प्रत्येक संस्कारांत हवन करण्याविषयीं लिहिलें असून कोठें तर्पण व कोठें जप लिहिले आहेत. देव व पितर या दोहोंसही हवन असून त्यांत देवसंबंधी हवनास स्वाहाकार ह्मणतात व पितरसंबंधी हवनात स्वधाकार ह्मणतात. प्रकृत सूत्रांत पुढें लिहिलेल्या देवांचा निर्देश ठिकाठिकाणीं केला आहे. अग्नि, अग्नीषोम, इन्द्र, इन्द्राग्नी, द्यावापृथिवी, धन्वन्तरी, विश्वेदेव, ब्राह्मण, औषधादिवनस्पती, गृहदेवता, वास्तुदेवता, यम, वरुण सोम, भूत, दिवाचारी, नक्तंचारी, पितर, रक्ष, प्रजापति, अर्यमात, पूषण, विष्णु, आदित्य, चन्द्रमा, रुद्र, हर, मृड, शर्व, शिव, भव, महादेव, उग्र, पशुपति, शंकर, ईश, सावित्री, श्रद्धा, मेधा, प्रज्ञा, धारणा, सदसस्पति, अनुमती इत्यादि. आतां, तर्पणांत जीं देव वगैरेचीं नांवें येतात, त्यांचे वर्ग केले तर खालीं लिहिल्याप्रमाणें होऊन त्यांजमध्यें त्यांचे पुढें लिहिलेल्यांचा समावेश होतो :—

१ देववर्ग, यांत—१ प्रजापति, २ ब्रह्मा व ३ सावित्री.
२ मनुष्यवर्ग, ,,—१ विप्र व २ ऋषी.
३ अमानुषवर्ग, ,,—१ राक्षस, २ गन्धर्व, ३ अप्सरा, ४ भूत, ५ साध्य, ६ सांख्य, ७ यक्ष, व ८ वयांसी.
४ पशुवर्ग, ,,—१ गाय व २ नाग.
५ शब्दवर्ग, ,,—१ वेद, २ छन्द, ३ व्याहृती, ४ ओंकार व ५ वषट्कार.
६ खगोलभूगोलवर्ग, ,,—१ अन्तरिक्ष, २ द्यावापृथिवी, ३ नदी, ४ गिरी, ५ समुद्र व ६ वनस्पती.
७ कर्म, ,,—१ यज्ञ.

आतां वेदांत ईश्वराचें अनेक नांवांनीं स्तवन केलें आहे तरी तीं सर्व नांवें एकाच ईश्वराचीं असून तीं ईश्वराच्या प्रत्येक शक्तीप्रमाणें निरनिराळीं दिलीं आहेत.

इन्द्रं॑ मि॒त्रं वरु॑णम॒ग्निमा॑हु॒रथो॑ दि॒व्यः स सु॑प॒र्णो ग॒रुत्मा॑न्।

एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः—ऋ.

तदेवाग्निस्तद्वायुस्तत्सूर्यस्तदु चन्द्रमाः ।

तदेव शुक्रममृतं तद्ब्रह्म तदापः सप्रजापतिः ।

यतः प्रसूता जगतः प्रसूती तोयेन जीवान् व्यससर्ज भूम्यां ।

यदोषधीभिः पुरुषान् पशूंश्च विवेश भूतानि चराऽचराणि ।

येनावृतं खं च दिवं महीं च येनादित्यस्तपति तेजसा भ्राजसा च ॥

—नारायणोपनिषद्.

याप्रमाणें सर्व नांवें एकाच परमात्म्याचीं असून त्या त्या शक्तिदर्शक नांवामध्यें एकसारखाच पराक्रम आहे. ईश्वराच्या सर्व शक्ति हितकारकच असून त्यांचें निरनिराळ्या शब्दांनीं स्तवन केलें आहे इतकेंच. व्यासांनीं विष्णुसहस्रनाम केला आहे म्हणून जसे हजार विष्णु होत नाहींत त्याचप्रमाणें वेदांत जरी देवाचीं अशीं अनेक नांवें असलीं तरी तीं पूर्वोक्तप्रमाणें ईश्वराव्हान करण्यासाठीं अनेकांनीं अनेक प्रकारांनीं कल्पिलीं आहेत. वर लिहिलेल्या देवांतील कोणताही देव घेतला तरी प्रत्येकाचें, ईश्वराच्या ज्या सर्व शक्ति त्या तुजमध्यें आहेत, असेंच स्तवन केलें आहे. ज्या काळीं ऋषींनीं अनन्यभावेंकरून असें ईश्वरस्तवन केलें त्या काळीं त्यांस ईश्वराची प्रत्येक शक्ति अनन्य दिसली व तदनुरूप त्यांणीं त्या त्या शक्तीचें वर्णन केलें. त्यांणीं पर्जन्य, पहाट (उषा), दिवस, आकाश, सूर्य, वायु, या सर्वांकडे लक्ष देऊन त्यांचें स्तवन केलें आहे. तरी, त्याविषयीं उपनिषदें व षड्दर्शनें यांणींही वर लिहिल्या प्रमाणेंच एकेश्वरवाचक सारांश काढिला आहे व भाष्यकारही याचप्रमाणें लिहितात. पुढें कर्मवृद्धि होऊन जसे अनेक नांवांनीं देवाचे स्वाहाकार होऊं लागले तशी अनेक देव आहेत अशी लोकांची समजूत पडली. परंतु वस्तुतः नांवें जरी अनेक असलीं तरी वस्तुभेद नाहीं हें ज्ञाते लोक समजतात. शौनकांनीं सर्वानुक्रम

बांधिला तेव्हां तर त्यांणीं त्यांत, प्रत्येक वेदमंत्रांत जो विषय असेल त्यास देवता कल्पिली आहे. ह्मणजे लग्नसंबन्धी मन्त्र आले कीं त्याची दंपत्य देवता; गवताविषयीं वर्णन आलें तर त्याची तृण देवता; बेडकाविषयीं विवेचन आलें तर त्याची मण्डूक देवता; व पाण्याची गोष्ट आली तर त्याची आपोदेवता; अशाप्रकारें अनेक गोष्टींत अनेक देवताकल्प झाले. ह्मणून ते सर्व निरनिराळे देव असून त्यांची स्थितिरीति पार्थक्येंकरून मानणें ह्मणजे कोता विचार होय व तसें विचारी लोक कधीं मानीतही नाहींत. वेदांत शान्तिपाठ ह्मणण्याचे कांहीं मंत्र असून त्यांतही पंचमहाभूतें स्वस्थ असावीं अशी प्रार्थना केली आहे:—

**सूर्यो नो दिवस्पातु वातो अन्तरिक्षात्। अग्निर्नःपार्थिवेभ्यः—ऋ०**
**शान्ता पृथिवी शिवमन्तरिक्षं द्यौर्नो देव्यभयं नो अस्तु ।**
**शिवादिशः प्रदिश उद्दिशो न आपो विद्युतः परिपान्तु विश्वतः—**
**गृह्यपरिशिष्ट.**
**शं न इन्द्राग्नी भवतामवोभिः शं न इन्द्रावरुणा रातहव्या।—**
ऋ०,५–३–२८.

या शेवटचे स्तुतींत देवाचीं अनेक नांवें घेऊन तुह्मीं सर्वांनीं कल्याणकारक असावें अशी तीनवर्गपर्यंत प्रार्थना केली आहे. यावरून त्या सर्व देवता, या सृष्टींतील महाभूतें या नांवानें ईश्वर-शक्तीचें वर्णन अतएव प्रार्थनार्ह होत असें दिसतें. सूर्य, पाणी, नद्या, वायु, पर्जन्य व त्याचप्रमाणें इंद्र व तद्वाचक शतक्रतु, मघवान् इत्यादि अधिदेवता ह्मणजे जेथें जेथें ईश्वराचें बल व कर्तृत्व हीं प्रकाशित होतात ते ते पदार्थ लक्षून त्यांची स्तुति केली आहे. आणि याच-प्रमाणें धन्वन्तरी, नारदादि ऋषी व रामकृष्णादि अवतार ह्मणजे जेथें जेथें विशेष प्रभाव भासला तेथें तेथें ईश्वरांश समजून त्यांची स्तुति होऊं लागली हेंही अनुमानसिद्ध आहे.

प्राचीन काळीं सर्व देशांत यज्ञपूर्वक ईश्वराराधना करण्याची

चाल होती असें इतर देशांचे प्राचीन इतिहास पाहिले असता आढळून येतें. यावरून एकेकाळीं यज्ञ हा सर्व जनांचा धर्म होता व तोच आद्यधर्म होय असें सिद्ध होतें. पुढें आपल्या इकडे अवतारांच्या व गुरुपादुकापूजनाच्या वगैरे कल्पना व रीती निघाल्या व याचप्रमाणें सर्व देशांतून पूर्वधर्माचरणांत बरेच फेरफार झाले. हल्लीं हिंदुस्थानांत भक्तिमार्ग विशेष प्रचलित झाला असून प्रस्तुत पूर्वीच्या धर्मकर्माचे दाखले मात्र सांपडतात. महिम्निकार ह्मणतात :—

त्रयीं सांख्यं योगं पशुपतिमतं वैष्णवमिति
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।
रुचीनां वैचित्र्यं दृजुकुटिलनानापथजुषाम्
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णवइव ॥ ७ ॥

पुराणीकही याचप्रमाणें ह्मणतातः—

कृते तु ध्यायते विष्णु-स्त्रेतायां यजतो मखैः ।
द्वापरे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्त्तनात् ॥

ज्याप्रमाणें राज्यक्रांती व व्यवहारमार्ग कालानुरूप पालटतात, तसेच कालेंकरून धर्मही बदलतात असें अनेक प्रमाणांवरून सिद्ध आहे. असें असतांही या देशांत अद्यापि आद्यधर्मग्रंथ जो वेद त्याची मान्यता सर्वांशांनीं व याथार्थ्यानें जरी नाहीं तरी नुस्ती तोंडानें तरी असून आपला मूळ धर्म वेदांत आहे असें सर्व लोक समजतात.

यज्ञसंबंधी रीति प्रथमतः मनूनें चालू केली असें ऋग्वेदांत लिहिलें आहे व तेव्हांपासून याज्ञिक क्रिया सुरू झाल्या असें दिसतेंः—

श्रुष्टी वां यज्ञ उद्यतः सजोषा मनुष्वद्वृक्तबर्हिषो यजध्यै ।
आ य इन्द्रावरुणाविषे अद्य महे सुम्नाय मह आववर्तत् ॥ १ ॥

—५-१-११.

ईळेन्यं वो असुरं सुदक्षमन्तर्दूतं रोदसी सत्यवाचम् ।
मनुष्वदग्निं मनुना समिद्धं समध्वराय सदमिन्महेम ॥ ३ ॥

—५-२-१.

आतां, असा कोणी तर्क करील कीं, या धर्माची स्फूर्ति मनूस कशी झाली? तर त्याविषयीं असा विचार दिसतो कीं, प्रलयकाळाचे पूर्वीं जो धर्म चालू होता तोच धर्म मनूस स्मरला असावा. कीं ऐतरेयारण्यकांतही असें ह्मटलें आहे:—

**युगान्ते तर्हि तान् वेदान् सेतिहासान् महर्षयः ।**
**लेभिरे तपसा पूर्व–मनुज्ञाता स्वयम्भुवा ॥ ४ ॥**—४प्रपाठक.

प्रळयकाळीं ईश्वरानें **मनूचें** रक्षण केलें अशी आख्या सर्वप्रसिद्ध आहे. त्या अर्थीं **मनूस** याज्ञिकधर्माची स्वयंस्फूर्त्ति होण्यापेक्षां त्यास त्या पूर्वधर्माची स्मृति झाली हें ह्मणणें युक्त आहे. त्याचप्रमाणें प्रळयकाळांतून एकटाच **मनु** वांचला असें नसून त्याजबरोबर कांहीं ऋषीही त्या प्रलयांतून सुटून राहिले होते व त्यांस * तपस्सामर्थ्यानें वेद स्मरले असावे असें दिसतें.

यावरून स्वाध्यायबलही मोठें दिसतें व आज जे आपले वेद परंपरेनें अक्षरशः रक्षण झाले आहेत ते तरी स्वाध्यायक्रमानेंच झाले आहेत हें सिद्ध आहे. असें नसून हें वैदिक धर्मज्ञान केवळ पुस्तकांत लिहिलेलें असतें तर, आजपर्यंत जीं हजारों संकटें या पुण्यभूमीवर येऊन, वैदिक धर्माचा पूर्णपणें द्वेष करण्याविषयीं जणूं काय ज्यांस बाळकडूच घातलें होतें अशा शिखानष्ट म्लेच्छांनीं अलेक्झान्ड्रिया येथील † पुस्तकालयाप्रमाणेंच या बापड्या वैदिक पुस्तकांची व त्यानंतरच्या इतर शास्त्रीय ग्रंथांची जाळून राख रांगोळी करून टाकिली असती! परंतु सर्वांशानें या देशास पूर्ववैभवच्युत

---

* "तपोहि स्वाध्याय इति०" तै० आ०, १४ अध्या०, २ प्रपाठक.

† हा असंख्य पुस्तकांचा अपूर्व स्वाहाकार ख्रिस्ती शकाच्या सातवे शकाचे द्वितीय पादांत कट्टया महंमदी दीक्षितांनीं केला व तो अनिर्वाच्य नाश या जगास भोगावा लागला असें सर्व लोक ह्मणतात. या विलक्षण स्वाहाकाराचें कारण व तत्संबंधाचा पूर्ण इतिहास पाहणें असल्यास आमच्या 'हिंदुस्थानाच्या इतिहासा'चे प्रस्तावनेंत पहा (पृष्ठ ४५).

करण्याचा ईश्वरी संकल्प नसल्यामुळें त्या अनर्थांतून मुक्त करण्यास प्राचीन स्वाध्यायक्रम फार उपयोगीं पडला असें प्रांजळपणें कबूल करावें लागतें.

सूत्रांत मुंजीचे प्रयोगांत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रिवर्गांचें उपनयन लिहिलें आहे व सर्वांचा एकसारखाच विधि लिहिला आहे सा। त्या तिन्ही वर्णांस उपनयनाचा कालनियम मात्र निराळा राहिला आहे. परंतु याप्रमाणें त्या वर्णत्रयाचें विध्यैक्य असल्यामुळें ते तीनही वर्ण वेदाधिकारी होते हें अर्थसिद्ध आहे व त्याच प्रमाणें त्या त्रिवर्णाची अन्त्येष्टीची रीतिही एकत्रच लिहिली आहे:—

**सुवर्णङ्हस्ता दाददाना मृतस्यश्रियै ब्रह्मणे तेजसे बलाय—१**
**धनुर्हस्ता दाददाना मृतस्य श्रियै क्षत्रायौजसे बलाय—२**
**मणिङ्हस्ता दाददाना मृतस्य श्रियै विशे पुष्टयै बलाय—३**

याशिवाय,—

**ब्राह्मणःक्षत्रियो वैश्य—स्त्रयोवर्णा द्विजातयः ।**

इत्यादि वचनें व प्रमाणें हीं बहुत आहेत. परंतु या सर्वांवरून शूद्र चा पृथक् व संस्कारानर्ह होते असें स्पष्ट दिसतें. तरी भारतांत क्षत्रियविट्शूद्र ' या चतुर्वर्णाची उत्पत्ति व योजना कशी अना याविषयीं फारां दिवसांचा वाद आहे. गीतेंत ह्मटलें आहे कीं,

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः इ०**

आणि ही असेंच ह्मटलें आहे:—

**न विशेषोऽस्ति वर्णविभागोऽस्ति सर्वं ब्रह्ममयं जगत् ।**
**इत्यादिना पूर्वसृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतम् ॥**

वती वरील शास्त्रांचाही याचप्रमाणें सिद्धांत आहेसा दिसतो, मानलेल्या वर्णांचा विषय श्रौत किंवा गृह्य यांचा नसून तो विषय धर्मसूत्रांचा आहे. त्यावरून पाहिलें असतां आपस्तम्बधर्मसूत्रही वरील उक्तींसच दार्ढ्य देतें.

**धर्मचर्यया जघन्यो वर्णः पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ।१०।**
**अधर्मचर्यया पूर्वो वर्णो जघन्यं जघन्यं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ।११।**
**—२ प्र. ५ प. १२ खं.**

वर्णव्यवस्थेच्या संबंधानें विचार केला असतां मोठाले आक्षेप व प्रत्याक्षेप निघून तत्संबंधाचे वाद होतात, व द्वैताद्वैताचे जसे मोठाले वाद आहेत त्यांप्रमाणेंच हा वर्णविचाराचा वाद होऊन राहिला आहे. प्रस्तुत स्थलीं त्याविषयीं विशेष लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु आपणास पूर्वीच्या अनेक ऋषिवाक्यांवरून इतकें मात्र सहज दिसतें कीं, वर्णविचार हा कर्मानुरोधानें आहे. परंतु तीं मतें सुटून जन्मावर वर्णविचाराचें अवलम्बन झालें. बापाच्या वर्णाप्रमाणें पुत्राचा वर्ण धरितात; मग त्याचें कर्म कसेंही असो. यायोगानें काय काय अनवस्था झाली आहे ही सर्वांस विदित आहेच. व्यवहाराच्या दृष्टीनें जरी पाहिलें तरी ही वर्णव्यवस्थारीति अयोग्य आहे. बाप सुभेदार असला ह्मणजे त्याचा मुलगाही सुभेदारच व्हावा, किंवा बाप शास्त्री असला ह्मणजे मुलगाही शास्त्रीच असतो असा नियम नाहीं. बाप कसाही अधिकारी किंवा अनधिकारी व विद्वान् किंवा अविद्वान् असो, पुत्राच्या योग्यतेप्रमाणें पुत्रास मान सन्मान मिळतो. प्रत्येकानें आपल्या बापाचें नांवावर विकण्यापेक्षां स्वात्मविख्यात असणें ही उत्तम कोटि धरिली आहे.—

**उत्तमः स्वाऽऽत्मविख्यातः पितृख्यातस्तु मध्यमः ।**
**अधमो भ्रातृविख्यात—स्त्री विख्यातोऽधमाऽधमः ॥**

बरें, बापाप्रमाणें वर्णयोजना होते ह्मणावें तर तसाही प्रकार असल्याचें दिसत नाहीं. सर्व सृष्टि ब्रह्मदेवापासून निर्माण झाली व ब्रह्मदेव हा स्वतः ब्राह्मण आहे. तेव्हां त्याजपासून निर्माण झालेलीं सर्व मनुष्यें ब्राह्मण होत असें ठरतें. परंतु तसाही प्रकार सध्या दिसत नाहीं व 'गुणकर्मविभागें' करूनही वर्णयोजना होत नाहीं असा हा 'त्रितीयःपंथ' निघाला आहे. 'गुणकर्मविभागा'-नुरोधानें वर्णभेद होण्याचे दाखले फार पूर्वीपासून मिळतात. वेदांत

अशा गोष्टी बहुत प्रसिद्ध आहेत: ऐतरेयब्राह्मणांतील **कवषऐलू**-षाची कथा आमच्या विचक्षण वाचकांस माहित असेलच. तो मूळचा शूद्र असून ब्राह्मण झाला व पुढें ऋग्वेदाचे सातवे अष्टकांतील ७ वे अध्यायापैकीं ३०—३१ वगैरे सूक्तांचा तोच ऋषि झाला असे लेख आहेत. दुसरें, छांदोग्योपनिषदांतही **सत्यकामजाबाल** याची कथा आहे त्यावरून व **विश्वामित्र** वगैरे क्षत्रियांचे ब्राह्मण झाले इत्यादि दाखल्यांवरून '**गुणकर्मविभागा**'नुरूप वर्णभेदासच पुरावा मिळतो. *

पूर्वी शूद्रांस हल्लींइतके निषिद्ध समजत नव्हते असें दिसतें. **आपस्तम्बधर्मसूत्रांत** स्वयंपाक कोणीं करावा याविषयीं असें ह्मटलें आहे:—

**आर्याः प्रयता वैश्वदेवेऽन्नसंस्कारःस्युः।**

**आर्याऽधिष्ठिता वा शूद्राः संस्कर्त्तारःस्युः॥**—२ प्र०, २ पटल.

यावरून पाकसिद्धीला आर्य असावा किंवा शूद्र असावा असें सिद्ध असून त्याकाळीं शूद्र स्वयंपाकांत अप्रतिबद्ध होते असें दिसतें. अस्तु.

या सर्व गोष्टींवरून पूर्वींच्या व हल्लींच्या आचार विचारांत बहुत अंतर पडलें हें स्पष्ट आहे. असा फेरफार होण्याचीं कारणें अनेक आहेत. प्रस्तुत कलियुग चाललें आहे; त्यांत पूर्वींच्या अमुक गोष्टी करणें अनिष्ट आहे; इत्यादि कल्पना सूत्रकालीं कोणाच्या स्वप्नींही नव्हत्या. याप्रमाणेंच अवतारकल्पना, श्रीयन्त्र मंगलयन्त्र न्यास मुद्रा इत्यादि तांत्रिक प्रकार, तुलसी दूर्वा इत्यादि पूज्य वनस्पतिवर्ग, व्यतीपातादि कालवर्ग, चंडी धुमावती बगलामुखी काली तारा वहिरव वगैरे अर्वाचीन काळीं मानलेला जागृत प्रचंड व तांत्रिक दैवतावर्ग इत्यादि प्रकार सूत्रकाळीं अज्ञात होते. कलियुगकल्पना पूर्वकालीं नव्हती हें

* पहा—'स्वाध्याय', परिशिष्ट ६—'पतितपरावृत्तिनिर्णय', पृष्ठ १८७; व परिशिष्ट १४ वें 'भरतखण्डांतील वर्णभेद व जाती.'

वर ह्मटलेंच आहे. परंतु त्या असंबद्ध व अतर्क्य वेडाचें पीक आलीकडेच निघून पूर्वींच्या कित्येक आचारविचारांस बांध घातलेला दिसतो.

एतानि लोकगुप्त्यर्थं कलेरादौ महाऽऽत्मभिः ।
इमान् धर्मान् कलियुगे वर्ज्यानाहुर्मनीषिणाम् ॥ निर्णयसिन्धु.

इत्यादि वाक्यें लिहून कित्येक कर्मे व आचार धर्मरक्षणार्थ ह्मणून वर्ज्य केले आहेत. मग या संबंधानें मूळ कलिवर्ज्यादि ग्रंथकारांच्या समजुती काय असतील त्या असोत. परंतु इतकें मात्र सध्या दिसतें कीं, या त्यांच्या वर्ज्यावर्ज्य वर्गीकरणापासून फारसा फायदा झालासें वाटत नसून नवीन विद्वानांस तर प्राचीन रीतीभातींचें स्थैर्यच इष्ट वाटतें. व या त्यांच्या वाटण्यांत कांहीं तरी तत्व असून वर लिहिल्याप्रमाणें वर्णभेदादि विचार पूर्वरीतीस अनुसरून असते तर फायदा होता हेंही खरें आहे. तथापि,—

यत्र मातुलजोद्वाही यत्र वै वृषलीपतिः ।
श्राद्धं नगच्छेत्तद्विप्रः कृतं यच्च निरामिषम् ॥—निर्णयसिंधु.

इत्यादि पूर्व रीती जाऊन त्या ठिकाणीं

न दद्यादामिषं श्राद्धे नचाद्याद्धर्मतत्ववित् ।
मुन्यन्नैर्या परा प्रीति-स्तथा न पशुहिंसया ॥—भागवत.

असे प्रकार आले. व येणेंकरून दयाधर्माचा विस्तार होऊन लोकविद्वेषणीय हिंसा नाहींशी झाली हें बरें झालें. कलिधर्मास भागवतग्रंथ फार अनुकूल असल्यामुळें तो वैष्णवांस फार प्रशस्त वाटतो. हा कलिधर्मानुकूल प्रकार इतर पुराणांतून नाहीं.

पूर्वीं दयाधर्माचें वारें नसल्यामुळें पशुहिंसा ही साहजिक असून तिजविषयीं कोणास कांहीं वाटत नसे. दयाधर्माची कल्पना कोणाचेही मनांत नसल्यामुळें पूर्वीं हल्लींसारखे अशक्त, वृद्ध व रोगी जनावरांचे रक्षणार्थ पांजरापोळ वगैरेंसारखीं गृहें बांधलेलीं नसून त्या स्थितींतील प्राण्यांचा बिन हरकत संहार होत असे. त्याचप्रमाणें हल्लीं मानलेल्या अल्प अपराधांस जशी सौम्य शिक्षा

ऊन त्यांजकरितां तुरुंग वगैरे बांधतात तसे तुरुंग वगैरे किंवा भत्ता, र्च हे पूर्वी नसून अल्प किंवा महा अपराध्यांचे अवयवच्छेद होऊन किंवा डाग देऊन अथवा द्रव्यदंड घेऊन तत्काल निकाल करीत असत. परंतु तशा जबर शिक्षा व हाल किंवा यातना सोसण्यासारखीं शासनें देण्याची वहिवाट हल्लीं निर्दयतेंत निघून वर लिहिल्याप्रमाणें कारागृहें स्थापन केलीं. इत्यादि हिंसा व क्रौर्य बंद होण्यासारखीं दयाधर्माचीं अनेक कृत्यें निघून लाभ झाले हा कलिवर्ज्यादि प्रकारापासून एक प्रकारचा मोठा फेरबदल झाला व हा सर्वांस बरा वाटेल यांत संशय नाहीं. पूर्वी पांजरापोळ नव्हते हें वर दर्शविलेंच आहे. परंतु ह्मातारीं व अशक्त जनावरें झालीं ह्मणजे त्यांच्या पोषणाचा व रक्षणाचा व्यर्थ भार लोकांस संभाळणें कठिण वाटत असे व ह्मणून पूर्वीच्या धर्मशास्त्रकारांनीं त्यांची व्यवस्था लावण्याविषयीं असें लिहिलें आहे:—

**प्राणात्यये तथा श्राद्धे प्रोक्षितं द्विजकाम्यया॥**
**देवान् पितृन् समभ्यर्च्य खादन्मांसं न दोषभाक् ॥**

**याज्ञवल्क्य, व्यवहाराध्याय.**

व त्याप्रमाणें ह्मातारीं जनावरें झालीं ह्मणजे त्यांचा प्रोक्षणविधि होऊन ते पशू अनुस्तरणी, राजगवी किंवा भक्षण यांजकडे लावावे असा प्रचार सुरू होता. परंतु तो सर्व व्यवहार हल्लीं अगदीं बंद झाला व बंद होण्याचीं कारणें हीं वर अनेक स्थलीं दिलींच आहेत. गुजराथेंत ठिकाठिकाणीं देवीचीं स्थानें असून तेथें पशूंचे बळी आवश्य आहेत. परंतु दयाधर्मानुसारी लोकांच्या साहचर्येंकरून पशुहिंसा करण्याची बुद्धि व धैर्य हीं न राहिल्यामुळें, बलि देण्याचे सर्व पशू फक्त देवीस अर्पण करून त्यांस महाजनांच्या पांजरापोळांत नेऊन घालतात. अशा पद्धतीस उत्सर्जनपक्ष ह्मणतात व हा तरी अशा महाजनांच्या जोरानेंच उत्पन्न झाला असावा असें वाटतें.

आतां याप्रमाणें प्रस्तुत सूत्रांत आमिषभक्षणाचीं प्रतिपादनें व प्रसंग पुष्कळ आलेले आढळतात. परंतु कोठेंही मद्य आढळ-

स नाहीं. यावरून मंत्रकाळीं मद्यपानाचा निर्बंध झाला होता असें दिसतें किंवा ब्राह्मण हे सूत्रोक्त कर्मांत तरी मद्य घेत नव्हते असें वाटतें.

मागें ( पृष्ट ४१ पासून पुढें ) अनेक देवकल्पनेविषयीं लिहितांना देवांच्या बाहुल्याचे विचार व समज मिथ्या होत असें सांगून वस्तुतः अनेक देव नसून एकाच ईश्वराच्या अनेक शक्तींस तीं निरनिराळीं नांवें दिलीं आहेत असें सांगितलें. तरी नुस्ती देवकल्पना घेऊन त्याचे ठायीं अनेकत्व कल्पिल्यास मग ते देव ह्मणजे ईश्वर नसून त्यांची योजना दुसऱ्या रीतीनें केली असतां शोभेल असेंही कित्येक ह्मणतात. देव ह्मणजे विद्वान् किंवा जलप्रलयापूर्वीं जी उत्तरकुरुस्थ वसती होती ते लोक; व त्या वसतीस देवलोक ह्मणत असावे अशी कल्पना आहे. पुढें देवलोकाहून मनुष्यें खालीं हिंदुस्थानांत आलीं. स्वदेश सोडून येणारीं मनुष्यें गरीब व नादार असतात व तद्वत् त्यावेळींही त्या मनुष्यांची स्थिति असेलच; परंतु ते हिंदुस्थानांतील मूळचे लोकांपेक्षां बुद्धीनें व आचार विचारानें श्रेष्ठ असतील ह्मणून ते आपल्यास आर्य ह्मणवूं लागले. ते थोपत थोपत खालीं उतरले व मागील आपल्या पूर्व वसतीस स्वर्ग ह्मणजे सुखस्थान ह्मणूं लागले. आणि खरोखर त्यांच्या स्वर्गलोकीं सर्व सुखप्राप्ति असून ह्या दक्षिणेकडे त्यांस मोठे कष्ट, यातना व मूर्खसाहचर्य घडूं लागलें असेल अशी कल्पना सहज होते. पुढें इकडेसच वसती होऊन मागें स्वदेशीं जाणें अनेक कारणांनीं न झाल्यामुळें त्यांच्या पुढील संततीस आपल्या लोकीच्या कीर्त्तीची स्मृति मात्र राहिली असें दिसतें व त्या लोकीं जाण्याची त्यांस आवड असे ह्मणून स्वर्गकामार्थ ते लोक अनेक कर्मं करूं लागले असावे. ते स्वर्गासच पितृलोक समजत. कारण, तेथें आपले पूर्वज राहिले होते व तेथेंच आपणास जन्मास येऊन जावयाचें असा त्यांचा प्रीतिपूर्वक निश्चय असे. वर लिहिल्याप्रमाणें जरी देवांनीं खालीं येऊन वसती केली तरी वर आपल्या लोकीं जाऊन शा-

ह्याभ्यास वगैरे करण्याचा त्यांचा क्रम असेच. ह्या देवलोकाहून पुढें बहुत दिवसपर्यंत **नारदादि** नीतिधर्मज्ञ पुरुष इकडे येऊन अनेक सत्कृत्यें करून जात. परंतु पुढें तसे उद्योगी लोक कमी होऊन त्या वसतीचा व ह्या नवीन वसतीचा संबंध अगदींच तुटल्यासारखा झाला; आणि, पूर्वीं त्या लोकांचें व ह्या लोकांचें दळणवळण होतें, इतक्या दंतकथा मात्र राहिल्या असा कित्ये-कांचा तर्क आहे. अस्तु. ह्याप्रमाणें आर्य लोकांच्या आगमना-चा उपक्रम असून ते इकडे आल्यावर त्यांणीं इकडील अनार्यांस जिंकून व त्यांच्या या भूमीवर यज्ञयाग करून तिला पुण्यभूमीचें रूप दिलें. ह्या यज्ञभूमी अद्यापि येथें बहुत दाखवितात. अना-र्यांस दास ह्मणजे आर्यांची परिचर्या करणारे अशी संज्ञा आहे. या दासांचा व आर्यांचा उल्लेख वेदांत आहे तो हाः—

* * * *

**दासा च वृत्रा हतमार्याणि च सुदासमिन्द्रावरुणा वसावतम् ॥ १ ॥—ऋ० ५-६-६.**

ह्याप्रमाणें अनेक देवकल्पनेविषयीं कित्येकांचा अभिप्राय आहे. आतां कित्येक अवतारकल्पना असून त्यांतही भिन्न भिन्न प्रकार मानतात. **गर्गसंहिता** वगैरे कित्येक ग्रंथांत अवतारांच्या प्रती लाविल्या आहेत. ह्मणजे, कोणास अंश, कोणास अंशांश, को-णास विभूति, कोणास आवेश, व कोणास पूर्णावतार असें ह्मण-तात.* परंतु ह्या सर्व कल्पना सूत्रकार मुनींस मुळींच नव्हत्या असें वर एके ठिकाणीं ह्मटलेंच आहे. त्याचप्रमाणें सूत्रकाळीं तीर्थमाहात्म्यें, देवतामाहात्म्यें किंवा व्रतादि माहात्म्यें हीं मुळींच नसून, गुरूची शाळा व त्यांत अध्ययन करणारें विद्यार्थीमंडळ

---

* अंशांशस्तु मरीच्यादि रंशा ब्रह्मादयः स्मृताः ।
कलाःकपिलकूर्माद्या आवेशा भार्गवादयः ॥
पूर्णो नृसिंहो रामश्च श्वेतद्वीपाधिपो हरिः ।
वैकुण्ठोपि तथा यज्ञो नरनारायणावृषी ॥—गर्गसंहिता.

हेंच तीर्थ, यज्ञयागांतच सर्व देवता व सर्व कर्मे* आणि स्वाध्याय † हेंच व्रत व तप होय असें समजत होते. सूत्रकाळीं हल्लींच्या प्रमाणें गंगापुत्र, चोबे, बडवे, पुजारी, साधू, अतीत, गोसावी हा प्रतिष्ठित भिक्षुकवर्ग नसून वेदाची स्फूर्त्ति ज्यांस झाली ते छंद ऋषी व वेद व शास्त्रें पढविणारे ते आचार्य येवढे मात्र पूज्य ब्राह्मणवर्गीय होते असे दिसतें. यज्ञयागांतच सर्व व्रतें व देवता होत्या व तेंच काय तें कर्त्तव्य या समजुतीच्या आधारानेंच तदभावीं हल्लीं चालू असलेलीं सर्व व्रतें वैकल्यें प्रतिपादिलीं आहेत. गंगादि तीर्थांस जो जाईल त्यांस **पदेपदेऽश्वमेधपुण्यं**, रामरक्षादि स्तोत्र पठनांत **'अश्वमेधाऽयुतं पुण्यं संप्राप्नोति न संशयः'** इत्यादि पुण्यकर्माशीं यागजन्य महत्पुण्यकारक कृत्यांची तुलना केली आहे व यावरूनच मूळचें पुण्यकर्म याग हेंच मानिलें होतें असें सिद्ध आहे. आतां, मूळ सूत्रप्रतिपादित कर्मधर्मापेक्षां सूत्रप्रसिद्धीनन्तर अनेक प्रयोगकार होऊन त्यांणीं कर्मबाहुल्य केलें आहे व त्याचप्रमाणें त्याशिवाय पुराणें व तन्त्रें यांचें मिश्रण होऊन हल्लींचीं कर्मे चालत आहेत, तरी, मूळची कर्मवृद्धि व लोकांचे आचार विचार काय होते हें कळण्यास प्रस्तुत सूत्र हेंच ऐतिहासिक प्रत्यक्ष प्रमाण आहे असें मानण्यास चिंता नाहीं.

सूत्रांचे काळीं कांहीं वेडगळपणाचेही आचार चालू होते असें हल्लीं विचार करून पाहिलें असतां सहज दिसेल. विवाहसंबंधांत वधूची परीक्षा करण्यास मृत्पिंडाची योजना केली आहे; व त्यावरून वधूच्या भावी स्थितिरीतीचें अनुमान बांधण्याची जी रीति होती ती हल्लीं तर निखालस वेडेपणाची वाटेल. परंतु सूत्रकारांनीं ज्या अर्थीं विवाहसंबंधांत जनपदधर्म व ग्रामधर्म घेण्याविषयीं लिहिलें आहे त्या अर्थीं, मृत्पिंडांनीं वधूपरीक्षण करण्याची भोळेपणाची रीति त्याकाळीं चालू असेल व तीच सूत्रकारांनीं आपल्या

---

* यज्ञो वै श्रेष्ठतरं कर्म०—ऋग्वेद.

† यःस्वाध्यायमधीयीत स तपो तप्यते-स्वाध्याय एव तपः०—तै. आ.

सूत्रांत दाखल केली असावी. तरी त्याबद्दल सूत्रकार हे दोषी होत नाहींत. आतां हल्लीं जरी त्याप्रमाणें मृत्पिंडांनीं वधूची परीक्षा करीत नाहींत तरी त्याठिकाणीं वधूवरांचे घटित, गण, मैत्री खडाष्टक इत्यादि पाहण्याच्या वेडेपणाच्या रीती सुरू झाल्या आहेत. तेव्हां यावरून पूर्वींच्या रीतींसच नांवें ठेवण्यास मार्ग नसून, जावत्कालपर्यंत लोकांचें अज्ञान व भोळेपणा नष्ट होऊन ज्ञान व विचार प्राप्त झाला नाहीं तावत्कालपर्यंत असे हास्यास्पद प्रकार चालावयाचेच असें समजावें. आतां दिवसें दिवस लोक विचारी होत चालले आहेत तेव्हां वेड्यावांकड्या, निंद्य व हास्यास्पद रीतीभाती आणि आचार विचार काळेंकरून विलयास जाण्याचा सुमार दिसतो. यास या सूत्रांतीलच उदाहरण हल्लींच्या रीतींशीं व विचारांशीं लावून पाहिलें असतां समजेल. ह्मणजे, सूत्रोक्त रीतीनें मृताकरितां अग्नींत पिंड देऊन दुग्धप्राप्त्यर्थ अनुस्तरणी (गाईचें दहन) करण्याची पूर्वी रीति होती. त्याचप्रमाणें एकंदर श्राद्धांतही कव्यवाहन नामक अग्नीचे द्वारेंच मृताला पिण्ड देण्याची चाल होती. इत्यादि पूर्व रीती जाऊन अनुस्तरणीच्या बदला गोदान करून व कव्यवाहनअग्नि ब्राह्मणाचे दक्षिण हस्तांत आल्यामुळें ब्राह्मणांसच भोजन घालून लोक निर्वाह करूं लागले. इत्यादि कित्येक आचार विचार बदलत आहेत हेही वरेच आहेत. अस्तु.

येणेंप्रमाणें प्रस्तुत पुस्तकाचा प्रस्ताव व त्यावरील संक्षेपेंकरून विचार ह्यांचें विवेचन केलें. आतां कित्येक असें ह्मणतील कीं, हें प्राचीन सूत्र वैदिक ब्राह्मण पढतात व त्याप्रमाणें कांहीं कर्मे करून कांहीं वर्ज करितात; याप्रमाणें क्रम चालू असतां हें मूळ सूत्र सार्थ करून प्रसिद्ध करण्यांत काय हेतु होता? व अशी शंका येणें साहजिक आहे. परंतु त्याजविषयीं इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, अडीच हजार वर्षांचे किंवा त्यांचेही पूर्वीं आपले वडील काय बोलले किंवा त्यांच्या रीतीभाती व आचार विचार कसे होते

हें जाणण्याची इच्छा सर्वांस असणें स्वाभाविक आहे. आणि तद्विषयक स्वतंत्र ऐतिहासिक प्रमाण तर मिळण्याचा असंभव असल्यामुळें आपणास प्राचीन ग्रंथांवरून तरी निदान आपल्या पूर्वजांचे आचार विचार, भक्ष्य भोज्य, रीतिभाती, धर्मकर्म व भजन पूजन वगैरे कसें काय होतें हें समजण्यास बरेंच साधन होऊन अशा ग्रंथांनीं जरी मित्तीवार व अक्षरशः इतिहास मिळाला नाहीं तरी तेणेंकरून पूर्वजांच्या आवश्य गोष्टींची बरीच माहिती मिळते हा मोठा लाभ आहे व हा लाभ सर्वांस ज्ञात होणें अवश्य आहे. एतावता प्रकृत ग्रंथ हा ऐतिहासिक ठोकळ प्रमाणाला बराच साधनीभूत असून त्याच्या पूर्ण विचारानें, त्याचे पुढें कोण कोणते फेरबदल होत गेले याचा तर्क बांधण्यास मनुष्यास एक उत्तम साधन आहे असें ह्मटल्याशिवाय राहवत नाहीं. मनुष्य प्राण्यास ज्ञान संपादन व पूर्वजांचीं ऐतिहासिक वृत्तें कळणें हें फारच उन्नतिकारक व आनंदजनक आहे. मागील ऐतिहासिकप्रमाणें पाहून पुढील काळाचाही तर्क व विचार करितां येतो व मागील काळाविषयींही अज्ञानांधःकार नष्ट होऊन आपल्या स्थितिरीतींत कोणतें न्यूनाधिक्य आहे किंवा कोणतें न्यूनाधिक्य करणें आवश्य आहे याचाही विचार करण्यास हा ग्रंथ तुलनादर्शक होईल असें वाटतें; व ह्मणून आह्मीं तो देशबंधूंच्या अल्प सेवेकरितां तयार केला आहे. हा पसंत झाल्यास पुढें **आपस्तम्ब, हिरण्यकेशीय, कात्यायन, गोभिल** इत्यादि सूत्रेंही याचप्रमाणें सार्थ प्रसिद्ध करण्याचा हेतु आहे. आतां येथें असाही संतोष दाखविणें इष्ट आहे कीं, अशा प्राचीन ग्रंथांचीं मूळ शुद्ध पुस्तकें **कलकत्याच्या एशियाटिकसोसायटी**च्या परिश्रमानें टीकेसहित प्रसिद्ध झालीं असल्यामुळें जुन्या व हातांनीं लिहिलेल्या गलित प्रतींवरून असे कार्यभाग साधण्याचे जे मोठे श्रम पडावयाचे ते दूर झाले आहेत. परंतु संस्कृत ग्रंथांची रुचि स्वदेशीय लोकांत असावी तशी नसल्यामुळें फार वाईट वाटतें; तरी इंग्लंड, जर्मनी वगैरे युरोपियन राष्ट्रांतून या

संस्कृत ग्रंथांचे विचार फार चालू असल्यामुळें, त्या धोरणावर इकडे कांहीं लोकांच्या श्रमांनीं मूळ ग्रंथ तरी शुद्ध रीतीनें छापून त्यांची चांगली जोपासना होत आहे. यावरून द्वीपांतरीं आमच्या संस्कृत ग्रंथांचा विचार अस्खलित चालावा आणि आमच्या इकडील पंडितांनीं त्याविषयीं स्वस्थ बसावें हें आश्चर्यकारक कालमाहात्म्य आहे.

या मूळ ग्रंथाचें भाषान्तर श्रीक्षेत्र **जनस्थानस्थ यादवात्मज नानाशास्त्री टकले** यांजकडून तयार करविलें आहे. त्यांणीं **नारायणवृत्ति** व दुसरे ग्रंथ तपासून जितका शुद्ध अर्थ होईल तितका केला आहे. ह्या सूत्राचें परिशिष्ट व कारिका आहेत त्याही या पुस्तकांत घालाव्या असा विचार होता. परंतु थोड्या किमतींत ग्रंथ मिळावा असा कित्येकांचा अभिप्राय पडल्यामुळें ते सर्व मागें ठेविले आहेत. तरी तेही पुढें प्रसिद्ध करण्याचा हेतु आहे. आतां यांतील मूळग्रंथांत शुद्धाशुद्ध संबंधानें कित्येक स्थळीं प्रमाद दोषही घडण्याचा संभव आहे. परंतु तिकडे विशेष लक्ष्य न देतां पूर्व निर्दिष्ट उद्देशाप्रमाणें देशबांधवांनीं याचा उपयोग करून घ्यावा एवढेंच सांगणें आहे.

या पुस्तकांत प्रथमतः सूत्र त्यानंतर त्याचा अर्थ व त्यावर प्रसंग विशेषीं त्या अर्थाचा व कर्माचा बोध होण्याकरितां * अशी फुली करून खुलासेवार टिपा याप्रमाणें देण्याचा क्रम ठेवून ग्रंथ समजण्यास जितकें सौलभ्य येईल तितकें आणण्याचा प्रयत्न केला आहे. **आश्वलायनां**चें मुख्य सूत्र जाड अक्षरांनीं घालून त्यांत येणाऱ्या वेद ऋचांच्या आदी जेवढ्या दाखल आहेत तेवढ्या अमळ कमी जाड्या अक्षरांनीं घातल्या आहेत. प्रथमतः सूत्रांतील ह्या ऋचा सस्वर घालण्याचा विचार होता. परंतु सूत्र ह्मणतांना त्याच्या स्वरांची केवळ अडचण व ह्मणण्यास गैर सोय वाटल्यावरून पुढें तो क्रम सोडून फक्त वेदऋचांचा सूत्रांत बोध व्हावा ह्मणून पूर्वोक्त रीतीनें सूत्रांपेक्षां त्या लहान अक्षरांनीं दाखल

केल्या आहेत. शिवाय पुरोहितांस या ऋचा कर्मसमयीं सर्व ह्मणाव्या लागतात ह्मणून त्यांचा खंडवार अनुक्रम साद्यंत व ऋग्वेदांतील स्थल निर्देशपूर्वक शेवटीं दिला आहे. या ऋचा सार्थ देण्याचा विचार होता परंतु वर सांगितल्याप्रमाणें ग्रंथाचा विस्तार जास्त होऊन ग्राहकांस किम्मत जास्त पडेल ह्मणून तो हा उद्देश पुढें कधीं पूर्ण होण्याची उमेद बाळगून हा अल्प प्रयत्न आमच्या आर्य बंधूंस सादर केला आहे.

या ग्रंथांत कित्येक याज्ञिक व अपरिचित शब्द आले असून नवीन अभ्यासांस त्यांचा बोध व्हावा ह्मणून त्या शब्दांचा थोडक्यांत लहानसा वर्णानुक्रमानें कोश दिला आहे तोही या ग्रंथाचे वाचकांस बराच उपयोगी होईल असें वाटतें.

लोकहितवादी.

श्री

# अथ साश्वलायनसूत्रप्रारम्भः

## अध्याय १.

### खण्ड १.

**सूत्रम्—उक्तानि वैतानिकानि गृह्याणि वक्ष्यामः ॥ १ ॥**

अर्थ—श्रौतसूत्रांत अग्निहोत्रावर होणारीं यज्ञकर्मे सांगितलीं. आतां विवाहकालीं सिद्ध झालेल्या गृह्याग्नीवर होणारीं कर्मे सांगतों.

* श्रौतांत सांगितलेल्या परिभाषा येथें ( गृह्याग्निकर्मांत ) घ्याव्या.

**सू०—त्रयः पाकयज्ञाः ॥ २ ॥**

अ०—अल्प किंवा प्रशस्त असे तीन प्रकारचे यज्ञ आहेत.

* हीं अनुष्ठानें नित्य व अग्निहोत्रासारखीं आहेत.

**सू०—हुता अग्नौ हूयमाना अनग्नौ प्रहुता ब्राह्मणभोजने ब्रह्मणिहुताः ॥ ३ ॥**

अ०—अग्नींत आहुती देणें हे हुत नामक यज्ञ, अग्नीखेरीज भूमी वगैरे ठिकाणीं आहुती देणे ते प्रहुत नामक यज्ञ व ब्राह्मणांस भोजन घालणें ते ब्रह्मणिहुत नामक यज्ञ असे तीन प्रकारचे यज्ञ आहेत.

* जसें सर्वबलींत अवदानाला अभिघार करणें नको तसें हुतानें तंत्र प्रहुताकडे घेऊं नये; व असेंच परस्पर समजावें. याकरितां सदरील ह्या तीन संज्ञा केल्या आहेत.

सू०—अथाऽप्यृच उदाहरन्ति यः समिधाय आहुती यो वेदेनेति ॥ ४ ॥ समिधमेवाऽपि श्रद्दधान आदधन्मन्येत यजइदमिति नमस्तस्मै य आहुत्या यो वेदेनेति विद्ययैवाऽप्यस्ति प्रीतिस्तदेतत्पश्यन्नृषिरुवाच—अग्ने' स्वधाय गातिये' सुक्षायद्दस्मै वचः ॥ घृतात्स्वादीयो मधुनश्चवोचतेति वच एव म इदं घृताच्च मधुनश्च स्वादीयोऽस्ति प्रीतिः स्वादीयो ऽस्त्वित्येव तदाऽऽह ॥ आते' अग्नऋचाहविर्हृदा तष्टंभरामसि ॥ तेते' भवन्तूक्षण ऋषभासो' वशाउतेति एत एव म उक्षाणश्च ऋषभाश्च वशाश्च भवन्ति य इमं स्वाध्यायमधीयत इति यो नमसास्वध्वर इति नमस्कारेण वैखल्वपि न वै देवा नमस्कारमति यज्ञो वै नम इति हि ब्राह्मणं भवति ॥ ५ ॥

अ०—कोणी श्रद्धाबुद्धीनें जर एक समिध किंवा एक आहुती अथवा वेदाध्ययन हीं ईश्वरार्पण केलीं अथवा ईश्वराला नमस्कार केला, तर त्यानें यज्ञ केला असें होऊन तेणेंकरून त्याजवर ईश्वराची प्रीति होते. अशी यज्ञाची प्रशंसा ब्राह्मणांत, यः समिधा० अष्ट. ६, अ० १, वर्ग २९, याच्या २ ऱ्या ऋचेचे व्याख्यानकालीं केली आहे.

## खण्ड २.

**सूत्र—अथ सायंप्रातः सिद्धस्य हविष्यस्य जुहुयात् ॥ १ ॥ अग्निहोत्रदेवताभ्यः सोमाय वनस्पतये ऽग्नीषोमाभ्यामिन्द्राग्निभ्यां द्यावापृथिवीभ्यां धन्वन्तरय इन्द्राय विश्वेभ्यो देवेभ्यो ब्रम्हणे ॥ २ ॥**

अ०—सायंकालीं व प्रातःकालीं शिजलेल्या हविष्यान्नाचा होम, १ अग्नयेस्वाहा, २ प्रजापतयेस्वा०, ३ सूर्यायस्वा०, ४ प्रजापतयेस्वा०, ५ सोमायवनस्पतयेस्वा०, ६ अग्नीषोमाभ्यांस्वा०, ७ इंद्राग्निभ्यांस्वा०, ८ द्यावापृथिवीभ्यांस्वा०, ९ धन्वंतरयेस्वा०, १० इंद्रायस्वा०, ११ विश्वेभ्योदेवेभ्यःस्वा०, आणि १२ ब्रह्मणेस्वाहा, या बारा मंत्रांनीं करावा. परंतु सकाळीं होम करणें असेल तेव्हां पहिल्या दोन आहुती देऊं नयेत, व सायंकालीं करणें असेल तेव्हां ३ व ४ या आहुती देऊं नयेत.

**सू०—स्वाहेत्यथ बलिहरणं ॥ ३ ॥ एताभ्यश्चैव देवताभ्यो ऽद्भ्य ओषधिवनस्पतिभ्यो गृहाय गृहदेवताभ्यो वास्तुदेवताभ्यः ॥ ४ ॥**

अ०—नंतर बली द्यावे तेः—१ अग्नयेस्वाहा, २ प्रजापतयेस्वा०, ३ सूर्यायस्वा०, ४ प्रजापतयेस्वा०, ५ सोमायवनस्पतयेस्वा०, ६ अग्नीषोमाभ्यांस्वा०, ७ इंद्राऽग्निभ्यांस्वा०, ८ द्यावापृथिवीभ्यांस्वा०, ९ धन्वन्तरयेस्वा०, १० इंद्रायस्वा०, ११ विश्वेभ्योदेवेभ्यस्वा०, १२ ब्रह्मणेस्वा०, १३ अद्भ्यःस्वा०, १४ ओषधिवनस्पतिभ्यःस्वा०, १५ गृहायस्वा०, १६ गृहदेवताभ्यःस्वा०, आणि १७ वास्तुदेवताभ्यस्वा० या मंत्रांनीं द्यावे.

**सू०—इन्द्रायेन्द्रपुरुषेभ्यो, यमाय यमपुरुषेभ्यो, वरुणाय वरुणपुरुषेभ्यः, सोमाय सोमपुरुषेभ्य इति प्रतिदिशं ॥ ५ ॥**

अ०—१ इंद्रायस्वाहा, २ इंद्रपुरुषेभ्यःस्वा०, ३ यमायस्वा०, ४ यमपुरुषेभ्यःस्वा०, ५ वरुणायस्वा०, ६ वरुणपुरुषेभ्यःस्वा०, ७सोमायस्वा०, आणि ८सोमपुरुषेभ्यःस्वा०, अशा मंत्रांनीं आठ बली दोन दोन प्रमाणें चार दिशांस द्यावे.

**सू०-ब्रह्मणे ब्रह्मपुरुषेभ्य इति मध्ये ॥ ६ ॥ विश्वेभ्यो देवेभ्यः ॥ ७ ॥ सर्वेभ्यो भूतेभ्यो दिवाचारिभ्य इति दिवा ॥ ८ ॥ नक्तंचारिभ्य इति नक्तं ॥ ९ ॥**

अ०—१ ब्रह्मणेस्वाहा, २ ब्रह्मपुरुषेभ्यःस्वा०, ३ विश्वेभ्योदेवेभ्यःस्वा०, ४ सर्वेभ्योभूतेभ्यो दिवाचारिभ्यःस्वा०, आणि ५ सर्वेभ्यो भूतेभ्यो नक्तंचारिभ्यः स्वा०, हे पांच बली मध्यें द्यावे.

* अग्निहोत्र होमास सायंकालापासून प्रारंभ आहे तसा वैश्वदेवास नाहीं. वैश्वदेवास प्रारंभ प्रातःकालीं आहे.

**सू०-रक्षोभ्य इत्युत्तरतः ॥ १० ॥**

अ०—१ रक्षोंभ्यःस्वाहा हा बली उत्तरेस द्यावा.

**सू०-स्वधापितृभ्य इति प्राचीनावीती, शेषं दक्षिणानिनयेत् ॥ ११ ॥**

अ०—अपसव्य करून 'स्वधापितृभ्यः' हा मंत्र म्हणून उरलेल्या होमद्रव्याचा दक्षिण दिशेस बलि द्यावा. परंतु सकाळीं बलि देणें तेव्हां पहिले दोन वली व सर्वेभ्योभूतेभ्योनक्तंचारिभ्यःस्वा० हा

बलि देऊं नये, आणि सायंकालीं सूर्यायस्वाहा, प्रजापतयेस्वा० आणि सर्वेभ्योभूतेभ्योदिवाचारिभ्यःस्वा० हे तीन बली देऊं नयेत.

* सूत्रवृत्तीवरून बलिहरणाचा प्रकारः—

पूर्व.

१७ इंद्रपुरुषाय०    १६ इन्द्रायस्वाहा.

१५ वास्तुदेवता०
१४ गृहदेवता०
१३ गृहाय०
१२ ओषधिवनस्पति०
११ अद्भ्यः०
२७ सर्वेभ्यो भूतेभ्यो दिवाचारिभ्यः०
२६ विश्वेभ्योदेवेभ्यः०
२४ ब्रह्मणे०

उत्तर. — २८ रक्षोभ्यः०, २३ सोमपुरुषेभ्यः०, २२ सोमाय०, २५ ब्रह्मपुरुषेभ्यः०

दक्षिण. — १९ यमपुरुषेभ्यः०, १८ यमाय०, २९ स्वधापितृभ्यः०

१० ब्रह्मणे०
९ विश्वेभ्योदेवेभ्यः०
८ इन्द्राय०
७ धन्वन्तरये०
६ द्यावापृथिवीभ्यां०
५ इंद्राग्निभ्यां०
४ अग्नीषोमाभ्यां०
३ सोमाय०
२ प्रजापतये०
१ सूर्याय०

२० वरुणाय०    २१ वरुणपुरुषेभ्यः०


पश्चिम

———o———

## खण्ड ३.

**सूत्र—अथ खलु यत्र क्व च होष्यनत्स्यादिशुमात्रावरं सर्वतः स्थंडिलमुपलिप्योल्लिख्य षड्लेखाउदगायतां पश्चात् प्रागायते नानांतयोस्तिस्रो मध्ये तदभ्युक्ष्याऽग्निं प्रतिष्ठाप्यान्वाधाय परिसमुह्य परिस्तीर्य पुरस्ताद्दक्षिणतः पश्चादुत्तरत इत्युदक्संस्थं तूष्णीं पर्युक्षणं ॥ १ ॥**

अ०—येथून पुढें जेथें कोठें होम करण्यास सांगितला आहे तो होम करणें असेल तर चतुष्कोण व निदान दर बाजू अठरा अठरा अंगुळ प्रमाणाचें स्थंडिल करून तें सारवून बाजूच्या नकाशांत लिहिल्याप्रमाणें त्या स्थंडिलावर ६ रेघा काढाव्या. नंतर त्यावर प्रोक्षण करून व अग्निस्थापन करून दोन किंवा तीन समिधा अग्नीवर द्याव्या, आणि स्थंडिलाचे भोंवतीं 'परिसमूहन' करून 'परिस्तरणें' घालावीं. तीं अशीं कीं, प्रथम पूर्वेस, नंतर दक्षिणेस, मग पश्चिमेस आणि नंतर उत्तरेस. पुढें 'ऋत सत्याभ्यां पर्युक्षामि०' हा श्रौतांतील मंत्र न ह्मणतां 'पर्युक्षण' करावें.




* 'परिसमूहन' व 'पर्युक्षण' हें तीन वेळ करावें, आणि पर्युक्षण केल्यानंतर 'प्रणीताप्रणयन' करावें.

**सू०—पवित्राभ्यामाज्यस्योत्पवनं ॥ २ ॥**

अ०—दोन दर्भांनीं तुपाचें 'उत्पवन' करावें. हे दर्भ कसे असावे व 'उत्पवन' कसें करावें तें पुढील सूत्रांत सांगतात.

**सू०-अप्रच्छिन्नाग्रावनन्तर्गर्भौ प्रादेशमात्रौ कुशौ नानांतयोर्गृहीत्वांऽगुष्ठोपकनिष्ठिकाभ्यामुत्तानाभ्यां पाणिभ्यां सवितुष्ट्वाप्रसवउत्पुनाम्यच्छिद्रेण पवित्रेण वसोः सूर्यस्य रश्मिभिरिति प्रागुत्पुनाति सकृन्मंत्रेण द्विस्तूष्णीं ॥ ३ ॥**

अ०—ते दर्भ अग्र तोडलेले नसून एका दर्भांत दोन दर्भ असतात असेही नसावे व तसेच प्रादेशमात्र (टीचभर) असावे. पुढे ते दर्भ दोन्ही उताण्या हातांचे अंगुष्ठ व अनामिका यांनीं ह्मणजे—डाव्या हाताच्या अंगुष्ठअनामिकेनें दर्भाग्र व उजव्या हाताच्या अंगुष्ठअनामिकेनें दर्भांचें शेवट—असे वेगवेगळे धरून, 'सवितुष्ट्वा प्रसव उ० रश्मिभिः' हा मंत्र ह्मणून पूर्वेस 'उत्पवन' करावें. नंतर तो मंत्र मात्र न ह्मणतां पुन्हां दोन वेळ 'उत्पवन' करावें.

**सू०-कृताऽकृतमाज्यहोमेषु परिस्तरणं ॥४॥**

अ०—जेथें केवळ तुपाचाच होम आहे तेथें परिस्तरणें घालण्याचा विकल्प आहे.

**सू०-तथाऽऽज्यभागौ पाकयज्ञेषु ॥ ५ ॥**

अ०—पाकयज्ञांतही चक्षुषी (ह्मणजे गृ० १।१०।१३ यांत सांगितलेल्या) आहुती देण्याचा विकल्प आहे.

**सू०-ब्रह्मा च धन्वंतरियज्ञशूलगववर्जं ॥ ६ ॥**

अ०—धन्वंतरियज्ञ व शूलगव या दोन कर्मांखेरीज इतर कर्मांत ब्रह्मा 'कृताकृत' आहे.

**सू०-अमुष्मै स्वाहेति जुहुयात् ॥ ७ ॥**

अ०—जेथें अमुक देवतेचे उद्देशानें होम करावा असें सांगि-

तलें आहे परंतु होममंत्र सांगितला नाहीं तेथें त्या देवतेचें नांव चतुर्थ्यंत घेऊन 'स्वाहा' ह्मणून होम करावा.

**सू०-अग्निरिन्द्रः प्रजापतिर्विश्वेदेवा ब्रह्मेत्यनादेशे ॥ ८ ॥**

अ०---जेथें अमुक देवतेचे उद्देशानें होम करावा असें न सांगतां, केवळ होम करावा एवढेंच सांगून होममंत्र सांगितला नाहीं तेथें अग्नि, इंद्र, प्रजापति, विश्वेदेव व ब्रह्मा, या देवतांचे उद्देशानें होम करावा.

**सू०-एकबर्हिरिध्माऽऽज्यास्विष्टकृतः स्युस्तुल्यकालाः ॥ ९ ॥**

अ०---एककालीं अनेक पाकयज्ञ करणें प्राप्त झालें असतां सर्व पाकयज्ञ एक तंत्रांनींच होतात, ह्मणजे प्रत्येक पाकयज्ञाकरितां वेगवेगळाल्या बर्हि, इध्मा, आज्य व स्विष्टकृत आहुती हीं करणें नको.

**सू०-तदेषा ऽभियज्ञगाथा गीयते--**
**पाकयज्ञान्समासाद्यैकाऽऽज्यानेकबर्हिषः ॥**
**एकस्विष्टकृतःकुर्यान्नानापिसतिदैवतइति॥१०॥**

अ०---बर्हि, इध्मा वगैरे वेगवेगळीं करणें नको, या विषयीं यज्ञगाथा (यज्ञ संबंधी गाथाग्रंथ) ह्मणतात कीं, अनेक पाकयज्ञ एका कालीं प्राप्त झाले आणि प्रत्येक पाकयज्ञाच्या वेगवेगळ्या देवता असल्या तरी सर्व पाकयज्ञ एकतंत्रानेंच करावे.

---

### खण्ड ४.

**सू०-उदगयन आपूर्यमाणपक्षे कल्याणेनक्षत्रे चौलकर्मोपनयन गोदानविवाहाः ॥ १ ॥**

अ०---चौलकर्म (शेंडी ठेवणें), उपनयन (मुंज), गोदान (सोळाव्या वर्षी चौलाप्रमाणें करण्यास सांगितलेलें कर्म) आणि वि-

वाह ( लग्न ) हीं चार कर्मे उत्तरायणांत, शुक्लपक्षीं आणि शुभ नक्षत्रावर ( ज्योतिष शास्त्रांत सांगितलेल्या नक्षत्रावर ) करावीं.

* गोदान कर्मास काल सांगणें नको; त्याचा काल चौलप्रमाणेंच आहे हें वरील अर्थावरून ध्यानांत येईल. यास्तव येथें गोदान शब्दाचा अर्थ 'समावर्त्तन' ( सोडमुंज ) असा समजावा.

## सू०-सार्वकालमेके विवाहं ॥ २ ॥

अ०—उत्तरायणादि कालनियम न पाळितां पाहिजे त्यावेळेस विवाह करावा असें कोणी ऋषी ह्मणतात.

* विवाह न होतां कन्या रजस्वला झाली असतां बापाला दोष ( पातक ) लागतें असें स्मृतींत सांगितलें आहे; व लौकिकदोष ( व्यभिचार वगैरे ) ही होतात. यास्तव अशा प्रसंगीं ह्मणजे कन्या रजस्वला होण्याचे सुमारास अगर झाल्यास कालनियम न पाळितां विवाह करावा असा ऋषींचा अभिप्राय असावा.

## सू०-तेषां पुरस्ताच्चतस्र आज्याऽऽहुतीर्जुहुयात् ॥ ३ ॥ अग्न आयूंषि पवस इति तिसृभिः प्रजापते न त्वदेतान्यन्यइति च व्याहृतिभिर्वा ॥ ४ ॥

अ०—सदरील चार कर्मांत तुपाच्या चार आहुती—१ ओं अग्न आयूंषि पवस आसुवोर्जमिषंचनः ॥ आरेबाधस्वदुच्छुनां ॥ २ अग्निर्ऋषिः पवमानः पांचजन्यः पुरोहितः ॥ तमीमहेमहागयं ॥ ३ अग्ने पवस्व स्वपा अस्मेवर्चः सुवीर्यं ॥ दधद्रयिं मयि पोषं ॥ ४ प्रजापते नत्वदेता न्यन्योविश्वाजातानि परिता बभूव ॥ यत्कामास्ते जुहुमस्तंनो अस्तुवयं स्याम पतयो रयीणां ॥ या चार ऋचांनीं प्रति ऋचेस, अथवा १ भूः २ भुवः ३ स्वः आणि ४ भूर्भुवस्वः या चार मंत्रांनीं, प्रति मंत्रास एक एक प्रमाणें द्याव्या.

* या चार कर्मांत चक्षुषी—ह्मणजे गृ० १।१०।१३ यांत सांगितलेल्या आहुती देऊं नयेत व स्विष्टकृत् ह्मणजे गृ० १।१०।१० यांत सांगितलेली आहुती देण्यापूर्वी तुपाच्या सदरील चार आहुती द्याव्या आणि आघार ह्मणजे गृ० १।१०।१३ यांत सांगितलेले ते द्यावे. येथील स्थंडिलास परिस्तरणें घालण्याचा विकल्प आहे.

**सू०-समुच्चयमेके ॥ ५ ॥**

अ०—सदरील आठही मंत्रांनीं तुपाच्या आठ आहुती द्याव्या असेंही कोणी ऋषी ह्मणतात.

**सू०—नैकेकांचन ॥ ६ ॥**

अ०—या आठांपैकीं एकहि आहुती देणें नको असेंही कोणी ऋषी ह्मणतात.

* यापक्षीं अनादेशाहूती ( ह्मणजे गृ० १। ३। ८ यांत सांगितलेल्या ) द्याव्या.

**सू०-त्वमर्यमाभवसि यत्कनीनामिति विवाहेचतुर्थी॥७॥**

अ०—विवाहांत चौथी आहुती '**त्वमर्यमा भवसि यत्कनीनां नाम स्वधावन् गुह्यं बिभर्षि ॥ अंजंति मित्रं सुधितं नगोभिर्यद्दंपती समनसा कृणोषि**' या मंत्रानें द्यावी.

* ही आहुती चौथी देऊन पांचवी आहुती **प्रजापते न त्वदेतान्यन्यो०** या मंत्रानें द्यावी. व व्याहृतींनीं आहुती देण्याचे पक्षीं चौथीही देऊन पांचवी आहुती **भूर्भुवस्वः** ही द्यावी; तशाच आठ आहुती देण्याचे पक्षींही चौथी आहुतीच देऊन पुढें राहिलेल्या पांच आहुती द्याव्या आणि अनादेशाहुती देण्याचे पक्षींही चवथी देऊन पुढें राहिलेल्या दोन आहुती द्याव्या.

—o—

## खण्ड ५.

**सूत्र–कुलमग्रे परीक्षेत ये मातृतः पितृतश्चेति यथोक्तं पुरस्तात् ॥ १ ॥**

अ०—ज्या पुरुषाचे आईपासून व बापापासून पूर्वीचे दहा पुरुष विद्येनें ह्मणजे सार्थ सांगवेदाध्ययनानें, तपानें ह्मणजे श्रौतस्मार्त्तकर्मानुष्ठानानें व पुण्यकर्मानें ( ह्मणजे निषिद्ध व्यवहार सर्वथैव सोडण्यानें ) युक्त आणि अब्राह्मण्यगमन ( शूद्रजातीचे स्त्रीचे ठिकाणीं प्रजोत्पत्ति ) करीत नव्हते ते पुरुष कुलीन होत. या कुलपरिक्षेंत बापापासूनच पूर्वीचे दहा पुरुष पहावे; आईपासून पूर्वीचे दहा पुरुष पाहणें नको, असेंही कोणी ऋषी ह्मणतात. याप्रमाणें, श्री० उ० अ० ३ खं० ३। २० यांत कुलपरीक्षा सांगितली आहे त्याप्रमाणें विवाहांत प्रथम कुलपरीक्षा करावी.

* वधूवरांचें घटित ह्मणजे ज्योतिःशास्त्रांत प्रसिद्ध आहे तें पाहण्यापेक्षां कुलपरीक्षा करणें हें मुख्य आहे. ही कुलपरीक्षा उभयतां वधूवरांचीही करावी असें वाटतें.

वराचे गुण.—

**सू०–बुद्धिमते कन्यां प्रयच्छेत् ॥ २ ॥**

अ०—बुद्धिमान् ह्मणजे शास्त्राला अविरोधी अर्थज्ञानवान् अशा पुरुषाला कन्या द्यावी.

कन्येचे गुण—

**सू०–बुद्धिरूपशीललक्षणसंपन्नामरोगामुपयच्छेत ॥ ३ ॥**

अ०—बुद्धिमान्, रूपवती, सुस्वभाव, सुलक्षण ( ह्मणजे सामुद्रिक ग्रंथांत सांगितलेल्या लक्षणांनीं युक्त ) व निरोग अशा कन्येशीं विवाह करावा.

सू०-दुर्विज्ञेयानि लक्षणानीति ॥ ४ ॥ अष्टौ पिंडान् कृत्वा ऋतमग्रे प्रथमं जज्ञ ऋते सत्यं प्रतिष्ठितं यदियं कुमार्यभिजाता तदियमिह प्रतिपद्यतां यत्सत्यं तद्दृश्यतामिति पिंडानभिमंत्र्य कुमारीं ब्रूयादेषामेकं गृहाणेति ॥५॥ क्षेत्राच्चेदुभयतः सस्याद्गृण्हीयादन्नवत्यस्याः प्रजा भविष्यतीति विद्याद्गोष्ठात्पशुमती वेदिपुरीषाद्ब्रह्मवर्चस्विन्यविदासिनो ह्रदात्सर्वसंपन्ना देवनात्कितवी चतुष्पथाद्द्विप्रव्राजिनी रिणादधन्या श्मशानात्पतिघ्नी ॥ ६ ॥

अ०—कन्येचीं लक्षणें समजण्यास फार कठीण आहेत; यास्तव पुढें सांगितलेल्या आठ प्रकारच्या मृत्तिकेचे आठ पिंड करून 'ऋतमग्रे प्रथमं जज्ञ ऋते सत्यं प्रतिष्ठितं ॥ यदियं कुमार्यभिजाता तदियमिह प्रतिपद्यतां यत्सत्यं तद्दृश्यतां' ॥ या मंत्रानें त्या पिंडाचें अभिमंत्रण करून कन्येला सांगावें कीं, या आठ पिंडांपैकीं एक घे. याप्रमाणें सांगितल्यानंतर तिणें जर दोन वेळां, ज्या शेतांत धान्य पिकतें त्या शेतांतील मृत्तिकेचा पिंड घेतला तर तिला मुलें वगैरे होतील व तीं धान्यसंपन्न असतील असें समजावें; गाईचे गोठ्यांतील मृत्तिकेचा पिंड घेतला तर ती कन्या जनावरें बाळगणारी होईल; ज्या स्थानीं यज्ञ झाला त्या स्थानांतील मृत्तिकेचा पिंड घेतला तर ती ब्रह्मतेजानें युक्त होईल; कधींहि न आटणाऱ्या डोहांतील मृत्तिकेचा पिंड घेतला तर ती सर्वसंपत्तियुक्त होईल; द्यूत खेळण्याचे स्थानांतील मृत्तिकेचा पिंड घेतला तर ती व्यभिचारी होईल; जेथें बीज पेरलें असतां उगवत नाहीं अशा ठिकाणच्या मृत्तिकेचा पिंड घेतला तर ती दुर्भाग्या होईल; आणि

स्मशानांतील मृत्तिकेचा पिंड घेतला तर ती नवऱ्यास मारणारी ह्मणजे विधवा होईल असें समजावें.

---

खण्ड ६.

## आठ प्रकारचे विवाह.

सूत्र—अलंकृत्य कन्यामुदकपूर्वां दद्यादेष ब्राह्मो विवाहस्तस्यां जातो द्वादशा वरान् द्वादश परान् पुनात्युभयतः ॥ ऋत्विजे वितते कर्मणि दद्यादलंकृत्य स दैवो दशा वरान् दश परान् पुनात्युभयतः ॥ सहधर्मं चरतं इति प्राजापत्यो ऽष्टावरानष्टपरान् पुनात्युभयतः ॥ गोमिथुनं दत्वोपयच्छेत स आर्षः सप्तावरान् सप्त परान् पुनात्युभयतः ॥ मिथः समयं कृत्वोपयच्छेत स गांधर्वः ॥ धनेनोपतोष्योपयच्छेत स आसुरः ॥ सुप्तानां प्रमत्तानां वा ऽपहरेत्स पैशाचः॥ हृत्वा भित्वा च शीर्षाणि रुदती रुदद्भ्यो हरेत्स राक्षसः ॥ १ ॥

अ०—१ वराचे हातावर उदक देऊन सालंकृत कन्या द्यावी, या विवाहाचें नांव ब्राह्मविवाह. या कन्येपासून उत्पन्न झालेला पुत्र, आईपासून व बापापासून पूर्वींचे बारा पुरुष व पुढें उत्पन्न होणारे बारा पुरुष पवित्र करतो; २. यज्ञकर्मांत ऋत्विजाला कन्या अलंकृत करून देणें हा दैवविवाह. अशा स्त्रीस झालेला पुत्र वरीलप्रमाणें दहा पुरुष पवित्र करतो; ३. अनुष्ठान वगैरे जें करणें असेल तें या कन्येसहवर्त्तमान करावें असें वरास सांगून त्याचे स्वाधीन

कन्या करणें या विवाहाचें नांव **प्राजापत्य.** या कन्येच्या ठिकाणीं झालेला पुत्र वरीलप्रमाणेंच आठ पुरुष पवित्र करतो; ४. वरानें वधूचे बापाला गाय व बैल देऊन विवाह करणें याचें नांव **आर्षविवाह.** या कन्येपासून झालेला मुलगा वरीलप्रमाणें सात पिढ्या पवित्र करतो; ५. मी तुझी पत्नी होतें व मी तुझा पति होतों असा स्त्रीपुरुषांचा परस्पर संकेत होऊन लग्न होणें याचें नांव **गांधर्वविवाह;** ६. कन्येच्या बापाला द्रव्यादिकेंकरून संतुष्ट करून विवाह करणें याचें नांव **आसुरविवाह;** ७. कन्येकडील मंडळी निजली असतां किंवा असावध असतां कन्या नेऊन विवाह करणें याचें नांव **पैशाचविवाह;** आणि ८. कन्येकडील मंडळीशीं युद्ध करून कन्या घेऊन जाऊन विवाह करणें याचें नांव **राक्षसविवाह** आहे.

* या आठ विवाहांपैकीं पहिले दोन विवाह ब्राह्मणांखेरीज इतर वर्णांस करण्याचा अधिकार नाहीं. **गांधर्व** व **राक्षस** हे दोन विवाह क्षत्रियांनींच करावे; **आसुरविवाह** वैश्यांनीं मात्र करावा आणि **प्राजापत्य, आर्ष** व **पैशाच** हे तीन प्रकारचे विवाह सर्वही वर्णांस करण्याचा अधिकार आहे.

---

## खण्ड ७.

### सूत्र-अथ खलूच्चावचा जनपदधर्मा ग्रामधर्माश्च तान् विवाहे प्रतीयात् ॥ १ ॥

**अ०**—विवाहांत देशसांप्रदायाप्रमाणें व गांवचे चालीप्रमाणें जे लहान मोठे धर्म—उष्टीहळद, झाल वगैरे असतील ते करावे.

* कुलधर्म—गोंधळ वगैरे करावे असें अनुमान दिसतें.

### सू०-यत्तु समानं तद्वक्ष्यामः ॥ २ ॥

**अ०**—जें कर्म सर्व देशांत सारखेंच आहे तें आह्मी पुढें सांगतों.

* देशधर्माचा व ग्रामधर्माचा सूत्रोक्त धर्माशीं विरोध आल्यास सूत्रोक्त धर्मच करावा; देशधर्म व ग्रामधर्म करूं नये. जसें वैदेहदेशामध्यें लग्नाचे दिवशींच स्त्रीपुरुषांच्या संयोगाचा (रतिसुखोपभोगाचा) संप्रदाय आहे आणि सूत्रांत तर असें सांगितलें आहे कीं, लग्न झाल्यापासून निदान तीन दिवसपर्यंत ब्रह्मचर्य व्रतानें (रतिसुखविरहित) रहावें, अशास्थळीं सूत्रोक्त धर्मच करावें.

**सू०—पश्चादग्नेर्दृषदमश्मानं प्रतिष्ठाप्योत्तरपुरस्तादुदकुम्भं समन्वारब्धायां हुत्वा तिष्ठन् प्रत्यङ्मुखः प्राङ्मुख्या आसीनाया गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तमित्यंगुष्ठमेव गृण्हीयाद्यदिकामयीत पुमांस एव मे पुत्रा जायेरन्निति ॥ ३ ॥**

अ०—अग्नीच्या पश्चिम दिशेस अश्मा (दगड) ठेवावा व ईशान्य दिशेस पाणी भरून कुंभ (कळशी वगैरे भांडें) ठेवावें. नंतर वधूनें वराचे हातास हात लाविला असतां गृ० १ खं० ४ यांत सांगितलेला होम करून, वरानें जर आपल्यास पुत्र व्हावे अशी इच्छा असेल तर पश्चिमेस तोंड करून उभें रहावें व पूर्वेस तोंड करून बसलेल्या वधूच्या हाताचा अंगुष्ठमात्र—**गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया पत्या जरदष्टिर्यथा सः ॥ भगो अर्यमा सविता पुरंधिर्मह्यं त्वादुर्गार्हपत्याय देवाः** (८।३।२७) या मंत्रानें धरावा.

* त्या अश्म्याजवळ दुसरा एक लहान दगड ठेवावा. सर्व ठिकाणीं पत्नीनें नवऱ्याचे दक्षिणेस बसावें. येथून पुढें पत्नीला करण्यास सांगितलेलें कर्म तिणें उभें राहून करावें. पतीनें

हात धरणें तो उताण्या हातानें उताणा हात अथवा पालथ्या हातानें उताणा हात धरावा.

**सू०–अंगुलीरेव स्त्रीकामः ॥ ४ ॥**

अ०—जर कन्याच व्हाव्या अशी इच्छा असेल तर अंगुष्ठ न धरितां अंगुलीच ( बोटें मात्र ) धराव्या.

**सू०–रोमान्ते हस्तं सांगुष्ठमुभयकामः॥५॥**

अ०—जर कन्या व पुत्र हे दोन्ही व्हावे अशी इच्छा असेल तर मणगटाचे जवळच अंगुष्ठासुद्धां हात धरावा.

**सू०–प्रदक्षिणमग्निमुदकुम्भं च त्रिःपरिणयन् जपति** अमोहमस्मि सा त्वं सा त्वमस्यमोहं द्यौरहं पृथिवी-त्वं सामाहमृक्त्वं ताविह विवहावहै प्रजां प्रजनयावहै सम्प्रियौ रोचिष्णू सुमनस्यमानौ जीवेव शरदः शतमिति ॥ ६ ॥

अ०—पत्नीला बरोबर नेऊन उदकुंभासुद्धां अग्नीला तीन प्रदक्षिणा कराव्या व '**अमोहमस्मि सात्वं सा त्वमस्यमोहं द्यौरहं पृथिवीत्वं सामाहमृक्त्वं ताविह विवहावहै प्रजां प्रजनयावहै संप्रियौ रोचिष्णू सुमनस्यमानौ जीवेव शरदःशतं**' या मंत्राचा जप करावा.

* यज्ञपात्र अग्नीजवळून दूर ठेवून अथवा अश्मा मात्र दूर ठेवून प्रदक्षिणा घालाव्या अशीं दोन मतें आहेत. प्रति प्रदक्षिणेस जातांना 'अमोहमस्मि०' या मंत्राचा जप करावा.

**सू०–परिणीय परिणीयाऽश्मानमारोहयतीममश्मानमारोहाश्मेव त्वं स्थिराभव सहस्व पृतनायतोऽभितिष्ठ पृतन्यत इति ॥ ७ ॥**

अ०—प्रतिप्रदक्षिणेहून आल्यानंतर अश्म्यावर पत्नीला '**इममश्मानमारोहाश्मेव त्वं स्थिरा भव ॥ सहस्व पृतनायतोऽभितिष्ठपृतन्यत**' हा मंत्र ह्मणून चढवीत जावी.

सू०-वध्वंजला उपस्तीर्य भ्राता भ्रातृस्थानो वा द्विर्लाजानावपति ॥ ८ ॥

अ०—नंतर वधूच्या ओंजळीला उपस्तरण (तूप लावणें) करावें व त्या ओंजळींत तिचा भाऊ अगर भावासारख्यानें दोन वेळ लाह्या घालाव्या.

* भावासारखा ह्मणजे चुलतभाऊ व मामेभाऊ, असें समजावें.

सू०-त्रिर्जामदग्नयानां ॥ ९ ॥

अ०—नवरा मुलगा पंचप्रवरी असला तर तीन वेळ लाह्या घालाव्या.

सू०-प्रत्यभिघार्यंहविः ॥ १० ॥ अवत्तंच ॥ ११ ॥

अ०—पात्रांतील लाह्यांना व ओंजळींत घेतलेल्या अवदानाला प्रत्यभिघार (तूप शिंपडणें) करावा.

* हा प्रत्यभिघार नवऱ्यानें करावा.

सू०-एषोऽवदानधर्मः ॥ १२ ॥

अ०—जेथें जेथें अवदान घेणें आहे तेथें तेथें उपस्तरणापासून प्रत्यभिघारापर्यंत सांगितलेला जो प्रकार तोच समजावा; ह्मणजे ज्या पात्रांत अवदान घ्यावयाचें त्या पात्राला, तो जर द्विप्रवरी असेल तर दोन वेळ उपस्तरण करावें; आणि पंचप्रवरी असेल तर तीन वेळ अवदान घेऊन नंतर प्रत्यभिघार करावा.

सू०-अर्यमणं नु देवं कन्या अग्निमयक्षत ॥ स इमां देवो अर्यमा प्रेतो मुंचातुनामुतः स्वाहा ॥ वरुणं नु देवं कन्या अग्निमयक्षत ॥ स इमां देवो वरुणः प्रेतो मुंचातुनामुतः स्वाहा ॥

पूषणं नु देवं कन्या अग्निमयक्षत ॥ स इमां देवः पूषा प्रेतो मुंचातुनामुतः स्वाहेत्यविच्छिन्दत्यञ्जलिं स्रुचेव जुहुयात् ॥ १३ ॥

अ०—१ अर्यमणं नु देवं कन्या अग्निमयक्षत ॥ स इमां देवो अर्यमा प्रेतो मुञ्चातुनामुतः स्वाहा; २ वरुणं नु देवं कन्या अग्निमयक्षत ॥ स इमां देवो वरुणः प्रेतो मुञ्चातुनामुतः स्वाहा; आणि ३ पूषणं नु देवं कन्या अग्निमयक्षत ॥ स इमां देवः पूषा प्रेतो मुञ्चातुनामुतः स्वाहा; या तीन मंत्रांनीं, स्रुचीनें होम करतात त्याप्रमाणें ओंजळ न सोडतां प्रति मंत्रास लाह्यांची एकेक आहुती देत जावी.

* हे मंत्र वरानें ह्मणावे, आणि वधूनें होम करावा.

सू०—अपरिणीय शूर्पपुटेनाभ्यात्मं तूष्णीं चतुर्थं ॥ १४ ॥

अ०—( शेवटीं ) आपल्याकडे सूप पालथें करून सुपाचे कोपऱ्यानें चौथी आहुती द्यावी; परंतु चौथी प्रदक्षिणा करूं नये, व मंत्रही ह्मणूं नये.

* 'अमोहमस्मि'० हा मंत्र न ह्मणतां चौथी प्रदक्षिणा घालावी ह्मणजे समंत्र प्रदक्षिणा घालण्याचा निषेध केला आहे, असें कोणी ह्मणतात. कोणी असेंही ह्मणतात कीं, प्रथम प्रदक्षिणा घालून एक आहुती द्यावी, आणि याप्रमाणें तीन प्रदक्षिणा घालून तीन आहुती द्याव्या येवढें सुचविण्याकरितांच चौथी प्रदक्षिणा न घालतां चौथी आहुती द्यावी असें ऋषींनीं ह्मटलें आहे. लाह्यांची स्विष्टकृत् आहुती देणें नको.

सू०—ओप्योप्य हैके लाजान् परिणयन्ति तथोत्तमे आहुती न सन्निपततः ॥ १५ ॥

अ०—आहुती द्यावी आणि नंतर प्रदक्षिणा घालावी; असें केलें ह्मणजे दोन आहुतींचा संबंध होत नाहीं. अशा रीतीनेंच आहुती द्याव्या असें कांहीं ऋषींचें मत आहे व हें मत आश्वलायनऋषींसही मान्य आहे.

**सू०-अथास्यै शिखे विमुञ्चति यदि कृते भवतः ॥ १६ ॥ ऊर्णास्तुके केशपक्षयोर्बद्धे भवतः प्र त्वा मुञ्चामि वरुणस्य पाशादिति ॥ १७ ॥ उत्तरामुत्तरया ॥ १८ ॥**

अ०—जर वधूच्या केसांचे दोन भाग करून ते लोंकरीच्या तंतूंनीं बांधले असले तर 'प्रत्वामुंचामि०' ऋ० ८।३।२४ ही ऋचा ह्मणून केसांचा उजवा भाग सोडावा आणि 'प्रेतोमुञ्चामि०' ऋ० ८।३।२४ ही ऋचा ह्मणून डावा भाग सोडावा.

* हें कर्म, चाल असेल तर करावें. वधूनें वराचे केशभाग मंत्र न ह्मणतां सोडावे.

**सू०-अथैनामपराजितायां दिशि सप्तपदान्यभ्युत्क्रामयतीष एकपद्यूर्जे द्विपदी रायस्पोषाय त्रिपदी मायोभव्याय चतुष्पदी प्रजाभ्यः पंचपद्यृतुभ्यः षट्पदी सखा सप्तपदी भव सा मामनुव्रता भव पुत्रान् विन्दावहै बहूंस्ते सन्तु जरदष्टय इति ॥ १९ ॥**

अ०—नंतर १ इष एकपदी भव, सा मामनुव्रता भव, पुत्रान् विन्दावहै बहूंस्ते सन्तु जरदष्टयः ॥ २ ऊर्जे द्विपदी भव सा मामनुव्रताभव, पुत्रान्विन्दा० ॥ ३ रायस्पोषाय त्रिपदी भव सा मामनु०, पुत्रान् विन्दा०॥ ४ मायोभव्याय चतुष्पदी

भव सा माम०, पुत्रान् विन्दा०॥ ५ प्रजाभ्यः पञ्चपदी भव, सामा०, पुत्रान् विन्दा०॥ ६ ऋतुभ्यः षट्पदी भव सा मा०, पुत्रान् विन्दा०॥ ७ सखा सप्तपदी भव, सा मामनुव्र०, पुत्रान् विन्दा०॥ या सात मंत्रांनीं प्रतिमंत्रास एकेक पाऊल प्रमाणे, वायकोला सात पावलें ईशान्य दिशेस चालवावें.

## सू०-उभयोः सन्निधाय शिरसी उदकुम्भेनावसिच्य ॥ २० ॥

अ०—वधूवरांनीं डोक्याला डोकें लावून वरानें उदकुंभांतलें पाणी आपले उभयतांचे डोक्यावर शिंपडावें.

* सात पावलें संपलीं ह्मणजे उभयतांनीं तेथेंच उभें राहून कोणाकडून उदकुंभ आणवून सदरप्रमाणें मस्तकावर उदक शिंपडावें आणि नंतर तुपानें स्विष्टकृत् आहुती द्यावी.

## सू०-ब्राह्मण्याश्च वृद्धाया जीवपत्न्या जीवप्रजाया अगार एतां रात्रिं वसेत् ॥ २१ ॥

अ०—सौभाग्यवती, पुत्रवती आणि वृद्ध अशा ब्राह्मणस्त्रीच्या घरीं लग्नाचे रात्रीं राहावें.

* परगांवीं लग्न करून परत येतांना पहिल्या मुक्कामाला वर सांगितलेल्या घरीं राहावें. गांवांतच लग्न झालें असतां घरीं परत येतांना मध्यें राहणें नको.

## सू०-ध्रुवमरुन्धतीं सप्तऋषीनिति दृष्ट्वा वाचं विसृजेत जीवपत्नी प्रजां विंदेयेति ॥ २२ ॥

अ०—ध्रुव, अरुंधती, व सप्तऋषी हीं नक्षत्रें पाहून ' जीवपत्नी प्रजां विन्देय ' हा मंत्र ह्मणून मौन सोडावें.

* हें मौन वधूनें, होमाला आरंभ झाल्यापासून धरून होम संपल्यानंतर सोडावयाचें.

—o—

## खण्ड ८.

**सूत्र-प्रयाण उपपद्यमाने** पूषा त्वेतो नयतु हस्तगृह्येति **यानमारोहयेत् ॥ १ ॥**

अ०—परगांवीं लग्न करून आपले गांवीं परत येण्याकरितां बसावयास यान—रथ किंवा बुरख्याची गाडी—असल्यास, '**पूषात्वे तोनेयतुहस्तगृह्य**०' ही ऋचा ह्मणून वधूला यानांत बसवावें.

* पालखी वगैरेंत बसविणें तेव्हां ही ऋचा ह्मणणें नको.

**सू०-अश्मन्वतीरीयते संरभध्वमित्यर्धर्चेन नावमारोहयेत् ॥ २ ॥ उत्तरेणोत्क्रमयेत् ॥ ३ ॥**

अ०—नौकेंत बसण्याचा प्रसंग आल्यास तिला '**अश्मन्वतीरीयते संरभध्वं**'० ही अर्धी ऋचा ह्मणून बसवावी आणि उतरते वेळेस, '**अत्राजहाम**'० ही अर्धी ऋचा ह्मणून उतरवावी.

**सू०- जीवं रुदन्तीति रुदत्यां ॥ ४ ॥**

अ०—वधूस नेतांना ती मध्यें रडूं लागली तर, '**जीवं रुदन्तीं**'० ऋ० ७।८।१९ ही ऋचा ह्मणावी.

* गांवांत अथवा परगांवी लग्न झालें तरी हा विधि सारखाच आहे.

**सू०-विवाहाग्निमग्रतोऽजस्त्रं नयन्ति ॥५॥**

अ०—वधूवरांचे पुढें विवाहकालीं सिद्ध झालेला अग्नि '**अजस्त्र**' (ह्मणजे एखादे भांड्यांत घालून तें भांडें हातांत धरून) न्यावा.

* हा विधि गांवांत लग्न झालें तरी करावा. अग्नि नेणें तो खटपटी मंडळीनें न्यावा असें वाटतें. इतर प्रवासांत अग्नि नेणें तो मात्र समारोप करून न्यावा.

**सू०-कल्याणेषु देशवृक्षचतुष्पथेषु माविदन् परिपन्थिन इति जपेत् ॥ ६ ॥**

अ०---देश, झाडें व चव्हाट्याचे रस्ते हे जेथें सुशोभित असतील तेथें 'माविदन् परिपन्थिन्'० ही ऋचा जपावी.

**सू०-वासे वासे सुमंगलीरियं वधूरितीक्षकानीक्षेत ॥ ७ ॥**

अ०---दर मुक्कामीं वधूवरांना पाहण्याकरितां आलेले लोकांकडे 'सुमंगली'० ही ऋचा म्हणून वधूवरांनीं पाहावें.

**सू०-इह प्रियं प्रजया ते समृध्यतामिति गृहं प्रवेशयेत् ॥ ८ ॥**

अ०---'इहप्रियं'० (८।३।२९) ही ऋचा म्हणून वधूला आपले घरांत न्यावें.

* गृहप्रवेशादि विधी गांवांत लग्न झालें असलें तरी करावे.

**सू०-विवाहाग्निमुपसमाधाय पश्चादस्याऽऽनडुहं चर्मास्तीर्य प्राग्रीवमुत्तरलोमतस्मिन्नुपविष्टायां समन्वारब्धायाम् आ नः प्रजां जनयतु प्रजापतिरिति चतसृभिः प्रत्यृचं हुत्वा समंजन्तु विश्वेदेवा इति दध्नः प्राश्य प्रतिप्रयच्छेदाज्यशेषेण वानक्ति हृदये ॥ ९ ॥**

अ०--- विवाहाग्नींत समिधा टाकून प्रज्वलित करून अग्नीचे पश्चिमेस, पूर्वेस गळा आणि ऊर्ध्व केश असें बैलाचें कातडें अंथरून त्यावर वधूला बसवून--'आनः प्रजां'० या चार ऋचांनीं प्रति ऋचेस एकेक आहुती द्यावी; नंतर 'समंजन्तु'०,

ही ऋचा ह्मणून दहीं प्राशन करावें व त्यांतून उरलेलें दहीं वधूकडून प्राशन करवावें; अथवा होम करून उरलेलें तूप उभयतांचे हृदयांस लावावें.

* जेथें होमद्रव्य सांगितलें नाहीं तेथें तूप घ्यावें. जेथें प्रतिऋचेस होम सांगितला आहे तेथें ऋचेच्या अंतीं आहुती देऊन नंतर 'स्वाहा' ह्मणावें; व जेथें 'प्रत्यृच्' हा शब्द नाहीं तेथें 'स्वाहा' शब्दान्तीं अवदान द्यावें.

**सू०-अत ऊर्ध्वमक्षारालवणाशिनौ ब्रह्मचारिणावलंकुर्वाणावधःशायिनौ स्यातां॥ १०॥ त्रिरात्रं द्वादशरात्रं ॥ ११ ॥**

अ०—वरील होमानंतर क्षार ह्मणजे कोद्रु, उडीद वगैरे स्मृतींत सांगितलेले पदार्थ व मीठ हीं खाऊं नयेत, मैथुन करूं नये, अलंकार घालावे आणि भूमीवर निजावें अशा रीतीनें तीन दिवस अथवा बारा दिवस नवरा बायकोनें हे नियम पाळावे.

* हे नियम विवाह झाल्यापासून गृहप्रवेशनीय होम होईपर्यंतही पाळगावे.

**सू०-संवत्सरं वैक ऋषिर्जायत इति ॥ १२ ॥**

अ०—वरील नियम एकवर्ष पाळले असतां ऋषीप्रमाणें पुत्र होतो.

* बापाचें गोत्र सोडून नवऱ्याचें गोत्र बायकोला प्राप्त होतें असाही कोणी या सूत्राचा अर्थ करितात.

**सू०-चरितव्रतः सूर्याविदे वधूवस्त्रं दद्यात् ॥ १३ ॥**

अ०—वर सांगितलेलें व्रताचरण केल्यानंतर 'सत्येनोत्तभिता०' हें सूक्त सार्थ जाणणारास, लग्नाचे वेळेस जें वस्त्र वधू नेसली असेल तें वस्त्र द्यावें.

सू०-अन्नं ब्राह्मणेभ्यः ॥ १४ ॥

अ०——ब्राह्मणास अन्न द्यावें.

सू०-अथ स्वस्त्ययनं वाचयीत ॥ १५ ॥

अ०——नंतर ब्राह्मणाकडून कल्याण होवो असें ह्मणवावें.

———o———

खण्ड ९.

सूत्र-पाणिग्रहणादिगृह्यं परिचरेत्स्वयं पत्न्यपि वा पुत्रः कुमार्यन्तेवासी वा ॥ १ ॥

अ०——लग्न झाल्यापासून गृह्याग्नीची सेवा स्वतः करावी अथवा पत्नीकडून किंवा पुत्राकडून किंवा अविवाहित कन्येकडून अथवा शिष्याकडून करवावी.

* कन्येनें आणि पत्नीनें होम देऊं नये असें कोणी ह्मणतात व त्यांणीं समंत्रक होम करावा असेंही कोणी ह्मणतात. गृहप्रवेशनीय होम झाला नसला तरी अग्नि सेवा करण्यास आरंभ करावा.

सू०-नित्यानुगृहीतस्यात् ॥ २ ॥

अ०——ही अग्निसेवा नित्य करावी.

* अग्नि नष्ट झाला तर स्मृतींत सांगितल्याप्रमाणें प्रायश्चित करून अग्नि सिद्ध करून त्याची सेवा करावी. अग्नीजवळ नवऱ्यानें किंवा बायकोनें असलें पाहिजे. या सेवेला स्थंडिल संस्कार (ह्मणजे गृह्य. १।३ यांत सांगितलेला) करणें नको. अग्नि नष्ट झाला तर पुन्हा विवाहांत सांगिलेला सर्व होम करून अग्नि सिद्ध करावा. परंतु हें सर्व अग्नि नष्ट होऊन बारा दिवस झाले असतील तर करावें. असे या सूत्राचे पांच अर्थ केले आहेत.

**सू०-यदि तूपशाम्येत् पत्न्युपवसेदित्येके॥३॥**

अ०—जर अग्नि नष्ट झाला तर पत्नीनें उपोषण करावें असें कोणी ऋषी ह्मणतात.

* स्मृती वगैरेंमध्यें लिहिलेले नष्टाग्नीचे प्रायश्चित्त प्रकार येथें वृत्तिकारानें बहुत लिहिले आहेत.

**सू०-तस्याग्निहोत्रेण ॥ ४ ॥ प्रादुष्करणहोमकालौव्याख्यातौ ॥ ५ ॥ हौम्यं च मांसवर्जं ॥ ६ ॥**

अ०—गृह्याग्नीची प्रादुष्करण वेळा, होम करण्याची वेळा व मांसाखेरीज होमद्रव्यें हीं अग्निहोत्राप्रमाणेंच समजावीं.

* अग्निहोत्रांत मांसानें होम करावा असें सांगितलें नसून सूत्रकारांनींही मांसाचा निषेध केला आहे. यावरून स्मृतींत सांगितलेलीं होमद्रव्यें घ्यावीं. स्मृतींत मांस हें होमद्रव्य सांगितलें आहे.

**सू०-कामं तु व्रीहियवतिलैः ॥ ७ ॥**

अ०—पूर्वी सांगितलेलीं द्रव्यें न मिळतील तर साळींनीं, जवांनीं किंवा तिळांनीं होम करावा.

**सू०-अग्नये स्वाहेति सायं जुहुयात् सूर्याय स्वाहेति प्रातस्तूष्णीं द्वितीये उभयत्र ॥ ८ ॥**

अ०—‘अग्नयेस्वाहा’ हा मंत्र ह्मणून सायंकाळीं एक आहुती व ‘सूर्यायस्वाहा’ हा मंत्र ह्मणून प्रातःकाळीं एक आहुती आणि दोन्हीवेळां दुसरी ‘प्रजापतयेस्वाहा’ ही आहुती देत जावी.

## खण्ड १०

**सूत्र-अथ पार्वणस्थालीपाकः ॥ १ ॥**

अ०—पुढें अमावास्या पौर्णिमेला स्थालीपाक या नांवाचें या खंडांत सांगितलेलें कर्म करावें.

* विवाहानंतर पहिली जी पौर्णिमा येईल त्या पौर्णिमेपासून स्थालीपाक करण्यास आरंभ करावा.

**सू०-तस्य दर्शपूर्णमासाभ्यामुपवासः ॥२॥ इध्माबर्हिषोश्चसंनहनं ॥ ३ ॥ देवताश्चोपांशुयाजेन्द्र महेन्द्रवर्जं ॥ ४ ॥**

अ०—श्रौत सूत्रांत दर्शपौर्णिमासेष्टींत सांगितल्याप्रमाणें उपवास ( एक वेळ भोजन ) करावा व इध्मा व बर्हि बांधून ठेवून त्यांत सांगितलेल्या देवता घ्याव्या; परंतु 'उपांशुयाज' या नांवाच्या देवता, आणि इंद्र व महेंद्र या देवता खेरीजकरून घ्याव्या.

* 'अग्नि' व 'अग्नीषोमौ' या पौर्णिमेला आणि 'अग्नि' व 'इंद्राग्नी' या अमावास्येला देवता समजाव्या.

**सू०-काम्या इतराः ॥ ५ ॥**

अ०—त्याच इष्टींत कामनापरत्वें ज्या देवता सांगितल्या आहेत त्या कामनापरत्वें घ्याव्या.

**सू०-तस्यै तस्यै देवतायै चतुरश्चतुरो मुष्टीन्निर्वपति पवित्रे अन्तर्धायाऽमुष्मै त्वा जुष्टंनिर्वपामीति ॥ ६ ॥**

अ०—पात्रावर पवित्र धरून त्यावर प्रत्येक देवतेकरितां चार चार मुठी होमद्रव्य टाकावें आणि तें टाकतेवेळेस त्या त्या देवतेचें चतुर्थ्यंत नांव घेऊन, 'त्वाजुष्टंनिर्वपामि' असें ह्मणत जावें.

**सू०-अथैनान्प्रोक्षति यथानिरुप्तममुष्मैत्वा जुष्टं प्रोक्षामीति ॥ ७ ॥**

अ०--नंतर या मुष्टींचा जितके वेळ निर्वाप केला तितके वेळ त्या त्या देवतेचें चतुर्थ्यंत नांव घेऊन, 'त्वाजुष्टंप्रोक्षामि' असें ह्मणून त्या मुष्टींला प्रोक्षण करावें.

**सू०-अवहतां स्त्रिफलीकृतान् नाना श्रपयेत् ॥ ८ ॥**

अ०--या मुष्टी तीन वेळ कांडून व तीन वेळ पांखडून प्रत्येक देवतेच्या चार चार मुठी वेगवेगळाल्या भांड्यांत शिजवाव्या.

* हे तांदूळ कृष्णाजिनावर उखळ ठेवून पत्नीनें तीन वेळ कांडावे व तीन वेळ धुवावे.

**सू०-समोप्य वा ॥ ९ ॥**

अ०--अथवा सर्व देवतेच्या मुष्टी एकाच भांड्यांत शिजवाव्या.

**सू०-यदि नाना श्रपयेद्विभज्य तंडुलानभिमृशेदिदममुष्मा इदममुष्मा इति ॥ १० ॥**

अ०--जर वेगवेगळाल्या भांड्यांत श्रपण केलें तर तांदुळांच्या चार चार मुष्टींना 'इदं' असें ह्मणून त्या त्या देवतेचें चतुर्थ्यंत नांव घेऊन स्पर्श करावा.

**सू०-यद्यु वै समोप्य व्युद्धारं जुहुयात्॥११॥**

अ०--जर एकाच भांड्यांत सर्व मुष्टी श्रपण केल्या असतील तर चरु उकरून होम करावा.

* चरु उकरून वर सांगितल्याप्रमाणें स्पर्श करावा व हा चरु होम करण्याचे वेळेस उकरून घ्यावा.

सू०-शृतानि हवींष्यभिघार्येध्ममभिघार्या-यंतइध्म आत्मा जातवेदस्तेनेध्यस्व वर्धस्व चेद्ध वर्धय चास्मान् प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेनान्नाद्येन समेधय स्वाहेति ॥ १२ ॥

अ०—शिजलेल्या होमद्रव्यावर अभिघार करून नंतर होमद्रव्यें अग्नीवरून उत्तरेस उतरून ठेवून इध्म्यावर अभिघार करून इध्मा अग्नीवर 'अयंतइध्माआत्माजातवेदस्तेनेध्यस्ववर्धस्वचेद्धवर्धयचास्मान्प्रजयापशुभिर्ब्रह्मवर्चसेनान्नाद्येनसमेधयस्वाहा' हा मंत्र ह्मणून द्यावा.

सू०-तूष्णीमाघारावाघार्याज्यभागौ जुहुयादग्नये स्वाहा सोमाय स्वाहेति ॥ १३ ॥ उत्तरमाग्नेयं दक्षिणं सौम्यं ॥ १४ ॥

अ०—तूष्णीं आघार देऊन 'अग्नयेस्वाहा'० या मंत्रानें उत्तरेस एक आहुती व 'सोमायस्वाहा' या मंत्रानें दक्षिणेस एक आहुती द्यावी.

* आघार ह्मणजे वायव्य कोणापासून आग्नेय कोणापावेतों व निर्ऋति कोणापासून ईशान्य कोणापावेतों तुपाची धार देतात ते. यांत 'अग्नयेस्वाहा' व 'सोमायस्वाहा' या दोन आहुतींना आज्य भाग अशी संज्ञा आहे.

सू०-विज्ञायते चक्षुषी वा एते यज्ञस्य यदाज्यभागौ ॥ १५ ॥ तस्मात्पुरुषस्याहिप्रत्यङ्मुख स्यासीनस्य दक्षिण मक्ष्युत्तरंभवत्युत्तरं दक्षिणं ॥१६॥

अ०—अथवा आज्यभाग हे यज्ञ पुरुषाचे नेत्र आहेत असें ज्यापेक्षां ऐकतों, त्या अर्थी यज्ञपुरुष हा पश्चिमेस तोंड करून

बसलेला असल्यामुळें उजवा डोळा उत्तर बाजूकडे व डावा डोळा दक्षिणबाजूकडे येतो.

* ह्मणून हे आज्यभाग दक्षिणसंस्थ द्यावे.

**सू०-मध्ये हवींषि प्रत्यक्तरं वा प्राक्संस्थान्युदक्संस्थानि वोत्तरपुरस्तात्सौविष्टकृतं ॥ १७ ॥**

अ०—आहुती देणें त्या अग्नीच्या मध्यें अथवा पश्चिम बाजूस पूर्वसंस्थ अथवा उत्तरसंस्थ द्याव्या व ईशान्य कोणास स्विष्टकृत् आहुती द्यावी.

**सू०-मध्यात्पूर्वार्धाच्च हविषोऽवद्यति ॥१८॥**

अ०—होमद्रव्याचे मध्यभागांतून व पूर्वभागांतून अवदान घ्यावें.

* तें अवदान अंगुष्ठपर्व मात्र घ्यावें.

**सू०-मध्यात्पूर्वार्धात् पश्चार्धादिति पञ्चावत्तिनां ॥ १९ ॥**

अ०—पंचप्रवरी यानें अवदान घेणें तें मध्य भागांतून, पूर्व भागांतून व पश्चिम भागांतून घ्यावें.

**सू०-उत्तरार्धात्सौविष्टकृतं ॥ २० ॥**

अ०—उत्तर भागांतून एकवेळ स्विष्टकृत अवदान घ्यावें.

* पंचप्रवरी यानें दोन वेळ अवदान घ्यावें.

**सू०-नात्र हवींषि प्रत्यभिघारयति स्विष्टकृतं द्विरभिघारयति ॥ २१ ॥**

अ०—स्विष्टकृत अवदान घेतल्यानंतर पात्रांतील होमद्रव्याला अभिघार करूं नये. स्विष्टकृत् अवदानाला मात्र दोन वेळ अभिघार करावा.

सू०-यदस्य कर्मणोऽत्यरीरिचं यद्वा न्यूनमिहाकर ॥ अग्निष्टत्स्विष्टकृद्विद्वान् सर्वं स्विष्टं सुहुतंकरोतु मे ॥ अग्नये स्विष्टकृते सुहुतहुते सर्वप्रायश्चित्ताहुतीनां कामानां त्समर्धयित्रे सर्वान्नः कामान्त्समर्धय स्वाहेति ॥ २२ ॥

अ०—'यदस्य०स्वाहा' हा मंत्र म्हणून स्विष्टकृत् आहुती द्यावी.

सू०-बर्हिषि पूर्णपात्रं निनयेत् ॥ २३ ॥

अ०—बर्हीवर प्रणीता पात्र ओतावें.

सू०-एषोऽवभृथः ॥ २४ ॥

अ०—वरचे सूत्रांत सांगितलेलें कर्म अवभृथ (म्हणजे कर्म समाप्तीबद्दल स्नान) असें समजावें.

* सर्वप्रायश्चित्त वगैरे कर्म करावें असें वृत्तींत सांगितलें आहे.

सू०-पाकयज्ञानामेतत्तन्त्रं ॥ २५ ॥

अ०—हेंच पाकयज्ञाचें तंत्र समजावें.

सू०-हविरुच्छिष्टं दक्षिणा ॥ २६ ॥

अ०—उरलेलें होमद्रव्य दक्षिणा द्यावी.

* ही दक्षिणा होमकालीं ब्रह्मा असेल तर त्याला द्यावी आणि तो नसेल तर ब्राह्मणाला द्यावी.

---

## खण्ड ११.

सूत्र-अथपशुकल्पः ॥ १ ॥

अ०—पुढें पशूचें होमतंत्र सांगतों.

**सू०-उत्तरतोऽग्नेः शामित्रस्यायतनं कृत्वा पाययित्वा पशुमाप्लाव्य पुरस्तात् प्रत्यङ्मुखमवस्थाप्याऽग्निंदूतमिति द्वाभ्यां हुत्वा सपलाशयाऽऽर्द्रशाखया पश्चादुपस्पृशेदमुष्मै त्वा जुष्टमुपाकरोमीति ॥ २ ॥**

अ०—अग्नीचे उत्तरेस 'शामित्राग्नी'चें गृह करून, पशूला पाणी पाजून व स्नान घालून अग्नीचे पूर्वेस पश्चिमाभिमुख उभें करावें. नंतर अग्निंदूतं० १।१।२२ या दोन ऋचांनी होम करून पानासह ओल्या फांदीनें, 'अमुष्मै त्वा जुष्टमुपाकरोमि' हा मंत्र ह्मणून पशूच्या मागील भागास स्पर्श करावा आणि ज्या देवतेच्या उद्देशानें पशू असेल त्या देवतेचें नांव चतुर्थ्यंत 'अमुष्मै' या पदाचे ठिकाणीं ह्मणावें.

**सू०-व्रीहियवमतीभिरद्भिः पुरस्तात्प्रोक्षति-अमुष्मै त्वा जुष्टं प्रोक्षामीति ॥ ३ ॥**

अ०—पशूच्या पुढल्या भागावर साळी व जव घेतलल्या उदकानें 'अमुष्मै त्वा जुष्टंप्रोक्षामि' हा मंत्र ह्मणून प्रोक्षण करावें आणि 'अमुष्मै' येथें देवतेचें चतुर्थ्यंत नांव घ्यावें.

**सू०-तासां पाययित्वा दक्षिणमनुबाहु शेषं निनयेत् ॥ ४ ॥**

अ०—प्रोक्षणाचे उदकापैकीं कांहीं उदक पशूला पाजून उरलेलें पशूचे पुढील उजव्या पायावर ओतावें.

**सू०-आवृतैव पर्यग्निकृत्वोदंचं नयन्ति ॥५॥**

अ०—या पशूचे सभोंवतीं श्रौतांतील मंत्र न ह्मणतां अग्नि फिरवून त्याला उत्तरेस न्यावें.

* हें पर्यग्निकरण तीन वेळ करावें.

**सू०-तस्य पुरस्तादुल्मुकं हरन्ति ॥ ६ ॥**

अ०—खटपटी मंडळीनें पशूचेपुढें जळत लांकूड घेऊन जावें.

**सू०-शामित्र एष भवति ॥ ७ ॥**

अ०—हा अग्नि शामित्र होतो ह्मणून त्यास उत्तरेकडच्या अग्निशाळेंत स्थापन करावें.

**सू०-वपाश्रपणीभ्यां कर्त्ता पशुमन्वारभते ॥ ८ ॥**

अ०—वपा व श्रपणी यांच्या योगानें कर्त्यानें पशूला अन्वारब्ध व्हावें.

**सू०-कर्त्तारं यजमानः ॥ ९ ॥**

अ०—यजमानानें कर्त्याला अन्वारब्ध व्हावें.

**सू०-पश्चाच्छामित्रस्य प्राकूशिरसं प्रत्यक्शिरसं वोदकूपादं संज्ञप्य पुरा नाभेस्तृणमंतर्धाय वपामुत्खिद्य वपामवदाय वपाश्रपणीभ्यां परिगृह्याद्भिरभिषिच्य शामित्रे प्रताप्याग्रेणैनमग्निं हृत्वा दक्षिणत आसीनः श्रपयित्वा परीत्य जुहुयात् ॥ १० ॥**

अ०—शामित्राग्नीचे पश्चिम बाजूस, पूर्वेस किंवा पश्चिमेस पशूचें डोकें व उत्तरेस पाय याप्रमाणें करून पशूला मारावें; व नाभीचे दक्षिणेस एका दर्भानें आच्छादन करून वपा काढून तोडून वपाश्रपणीवर घ्यावी व उदकानें धुवावी. नंतर शामित्राग्नीवर ती तापवून गृह्याग्नीचे पूर्वेकडून न्यावी व गृह्याग्नीचे दक्षिणेस बसून ती अग्नीवर शिजवावी आणि शेवटीं दोन्ही अग्नीला प्रदक्षिणा घालून वपेचा होम करावा.

सू०—एतस्मिन्नेवाऽग्नौ स्थालीपाकं श्रपयन्ति ॥ ११ ॥

अ०——याच अग्नीवर ( गृह्याग्नीवर ) स्थालीपाक करावा; हा विधि परिकर्म्यानें करावा.

सू०—एकादशपशोरवदानानि सर्वांगेभ्योऽवदाय शामित्रे श्रपयित्वा हृदयं शूले प्रताप्य स्थालीपाकस्याग्रतो जुहुयात् ॥ १२ ॥

अ०——पशूचे सर्व अवयव ( हृदय, जिव्हा, वक्ष, इत्यादि ११) घेऊन शामित्राग्नीवर शिजवावे; परंतु त्याचें हृदय मात्र न शिजवितां तें शूलावर धरून तापवावें आणि शेवटीं स्थालीपाकहोमाचे पुढें त्या अका अंगांचीं अवदानें द्यावीं.

सू०—अवदानैर्वा सह ॥ १३ ॥

अ०——अथवा पशूच्या अंगांचे अवदानासह स्थालीपाकाचा होम करावा.

सू०—एकैकस्यावदानस्य द्विर्द्विरवद्यति ॥ १४ ॥

अ०——पशूच्या एकेक अंगाचें अवदान दोन दोन वेळ तोडून घ्यावें.

* पंचावत्तीनें तीन तीन वेळ तोडून घ्यावें.

सू०—आवृतैव हृदयशूलेन चरन्ति ॥ १५ ॥

अ०——हृदयशूलासंबंधी श्रौत्रांत सांगितलेलें कर्म ( श्रौ. सू. पू. ३।६ ) अमंत्रक करावें.

——०——

## खण्ड १२.

सूत्र-चैत्ययज्ञे प्राक्स्विष्टकृतश्चैत्याय बलिं हरेत् ॥ १ ॥

अ०—चैत्य ह्मणजे नवसलेला देव, तत्संबंधी यज्ञामध्यें स्विष्टकृत् आहुती देण्यापूर्वी, त्याला बलि द्यावा.

सू०-यद्यु वै विदेशस्थं पलाशदूतेन यत्र वेत्थ वनस्पत इत्येतयर्चा द्वौ पिंडौ कृत्वा वीवधेऽभ्याधाय दूताय प्रयच्छेदिमं तस्मै बलिं हरेति चैनं ब्रूयादयं तुभ्यमिति यो दूताय ॥२॥

अ०—जर चैत्य देव परगांवीं असेल तर पळसाचा दूत आणि कावड करून 'यत्र वेत्थ०' (३।८।११) ही ऋचा ह्मणावी व दोन बली करून ते त्या कावडींत ठेवून व त्या दुताजवळ ती कावड देऊन त्यास सांगावें कीं, हा बलि त्या देवाला दे, आणि हा बलि तूं घे.

सू०-प्रतिभयं चेदन्तरा शस्त्रमपि किंचित् ॥ ३ ॥ नाव्या चेत् नद्यन्तरा प्लवरूपमपि किंचिदनेन तरितव्यमिति ॥ ४ ॥

अ०—या दूताला मार्गांत भय होईल असें वाटलें तर एखादें लहान हत्यार त्या दूताजवळ द्यावें व मध्यंतरीं नदी वगैरे असेल तर एखादें लहानसें पोहून जाण्याचें साधन—नांव वगैरे—'अनेन तरितव्यं' असें ह्मणून त्या दूताजवळ द्यावें.

सू०-धन्वंतरियज्ञे ब्रह्माणमग्निं चांतरा पुरोहितायाग्रे बलिं हरेत् ॥ ५ ॥

अ०—चैत्य देव धन्वंतरि नांवाचा असतां त्या धन्वंतरि यज्ञांत ब्रह्मा आणि अग्नि या दोघांमध्यें पुरोहित देवतेला प्रथम बलि द्यावा.

* आणि नंतर धन्वंतरि देवतेला बलि द्यावा.

---

## खण्ड १३.

**सूत्र-उपनिषदि गर्भलम्भनं पुंसवनमनवलोभनं च ॥ १ ॥**

अ०—कोणा एका उपनिषदांत गर्भलंभन, पुंसवन व अनवलोभन, असे तीन संस्कार सांगितले आहेत.

**सू०-यदि नाधीयात्तृतीये गर्भमासे तिष्येणोपोषितायाः सरूपवत्साया गोर्दधनि द्वौ द्वौ माषौ यवंच दधि प्रसृतेन प्राशयेत् ॥ २ ॥**

अ०—जर तें उपनिषद अनुलब्ध असेल तर गर्भधारणा झाल्यापासून तिसऱ्या महिन्यांत पुनर्वसु नक्षत्राचे दिवशीं पत्नीनें उपोषण करावें; नंतर दुसरे दिवशीं पुष्य नक्षत्रावर आपल्या रूपाप्रमाणें वासरूं असणाऱ्या गायीचें दहीं गर्भिणीचे हातावर घालावें व त्या हातावरचे दह्यांत दोन उडीद आणि एक जव टाकून तिजकडून पिववावें.

**सू०-किं पिबसि किं पिबसीति पृष्ट्वा पुंसवनं पुंसवनमिति त्रिः प्रतिजानीयात् ॥ ३ ॥ एवं त्रीन् प्रसृतान् ॥ ४ ॥**

अ०—(व) 'काय पितेस?' असें तीन वेळ तिला विचारावें व तिणें 'पुंसवन पितें' असें तीनदां उत्तर द्यावें. अशा रीतीनें तीनदां करावें.

सू०-अथास्यै मंडलागारच्छायायां दक्षिणस्यां नासिकायामजीतामोषधीं नस्तःकरोति ॥ ५ ॥

अ०—नंतर तिला वाटोळ्या मखरांत बसवून तिचे उजव्या नाकपुडींत दूर्वांचा रस पिळावा.

सू०-प्रजावज्जीवपुत्राभ्यां हैके ॥ ६ ॥

अ०—आ ते गर्भो योनिमेतु पुमान् बाणइवेषुधिं
आ वीरो जायतां पुत्रस्ते दशमास्यः ॥
अग्निरेतु प्रथमो देवतानां
सोऽस्यै प्रजां मुंचतु मृत्युपाशात् ॥
तदयं राजा वरुणोऽनुमन्यतां
यथेयं स्त्रीपौत्रमघं न रोदादिति ॥

हीं दोन सूक्तें ह्मणून पिळावा असेंही कोणी ऋषी ह्मणतात व हें मत आश्वलायनऋषीला मान्य आहे.

सू०-प्राजापत्यस्य स्थालीपाकस्य हुत्वा हृदयदेशमस्या आलभेत यत्ते सुसीमे हृदये हितवन्तः प्रजापतौ ॥ मन्येऽहं मां तद्विद्वांसमाहं पौत्रमघन्नियामिति ॥ ७ ॥

अ०—प्रजापति देवतेचे उद्देशानें स्थालीपाक करून त्याचा होम करावा. नंतर बायकोच्या हृदयाला हात लावून 'यत्ते सुसीमे०'—हा मंत्र ह्मणावा.

———o———

## खण्ड १४.

**सूत्र–चतुर्थे गर्भमासे सीमन्तोन्नयनं ॥ १ ॥ आपूर्यमाणपक्षे यदा पुंसा नक्षत्रेण चन्द्रमा युक्तः स्यात् ॥ २ ॥**

अ०—चौथ्या महिन्यांत शुक्लपक्षीं पुन्नामक नक्षत्रावर ह्मणजे अभिजित्, पुष्य, श्रवण, पुनर्वसु, हस्त, मृग, मूळ, अनुराधा आणि अश्विनी, या नक्षत्रांवर 'सीमंतोन्नयनसंस्कार' करावा.

**सू०–अथाऽग्निमुपसमाधाय पश्चादस्याऽऽनडुहं चर्मास्तीर्य प्राग्ग्रीवमुत्तरलोम तस्मिन्नुपविष्टायां समन्वारब्धायां धाता ददातु दाशुष इति द्वाभ्यां राकामहमिति द्वाभ्यां नेजमेष प्रजापते न त्वदेतान्यन्य इतिच ॥ ३ ॥**

अ०—समिधा देऊन गृह्याग्नि प्रज्वलित करावा. अग्नीचे पश्चिमेस बैलाचें कातडें, पूर्वेस गळा आणि ऊर्ध्वकेश असें अंथरून त्यावर बायकोला बसवावें व तिणेंही नवऱ्याला लागून बसावें. नंतर धाताददातु० (श्रौत पू० ६।१४) या दोन मंत्रांनीं, राकामहं० (२।७।१५) या दोन ऋचांनीं, नेजमेष० (परि० ८।८।४३) या तीन ऋचांनीं आणि प्रजापते० (८।७।४) या एक ऋचेनें, एकूण ८ ऋचांनीं प्रतिऋचेस होम करावा.

**सू०–अथाऽस्यै युग्मेन शलाटुग्लप्सेनत्र्येण्या च शलल्या त्रिभिश्च कुशपिंजूलैरूर्ध्वं सीमन्तं व्यूहति भूर्भुवः स्वरोमिति त्रिः ॥ ४ ॥ चतुर्वा ॥ ५ ॥**

अ०---उंबराचा समसंख्याक असा कच्च्या फळांचा घोस, कोंवळे तीन दर्भ व तीन रंगांची सळई अशीं एकत्र करून त्यांनीं, बायका भांग करितात त्याप्रमाणें तीनदां अथवा चारदां भांग करावा, आणि भांग करते वेळेस भुर्भुवस्स्वरोम् हा मंत्र ह्मणत जावा.

**सू०-वीणागाथिनौ संशास्ति सोमं राजानं संगायेतामिति ॥ ६ ॥ सोमो नो राजाऽवतु मानुषीः प्रजा निविष्टचक्राऽसाविमां नदीमुपवसिथा भवन्ति ॥ ७ ॥**

अ०---वीणा वाजविणारे व गाथा ह्मणणारे यांस सांगावें कीं, सोमराजाचें गायन करा. नंतर त्या गाणारांनीं, **सोमो नो राजाऽवतु मानुषीः प्रजा निविष्टचक्राऽसौ०** ही गाथा ह्मणावी. आणि **असौ** या पदाचे ठिकाणीं ज्या नदीच्या कांठीं तीं वधूवरें राहतात त्या नदीचें नांव संबुध्यंत ह्मणावें.

**सू०-ब्राह्मण्यश्च वृद्धा जीवपत्यो जीवप्रजा यद्यदुपदिशेयुस्तत्तत्कुर्युः ॥ ८ ॥**

अ०---वृद्ध आणि सौभाग्यवती व ज्यांचीं मुलें जीवंत आहेत, अशा ब्राह्मणांच्या बायका जें जें सांगतील तें तें करावें.

**सू०-वृषभो दक्षिणा ॥ ९ ॥**

अ०---दक्षिणा देणें ती बैल द्यावा.

---

## खण्ड १५.

**सूत्र-कुमारं जातं पुराऽन्यैरालम्भात्सर्पिर्मधुनी हिरण्यनिकाषं हिरण्येन प्राशयेत् प्र**

ते ददामि मधुनो घृतस्य वेदं सवित्रा प्रसूतं मघोनां ॥ आयुष्मान् गुप्तो देवताभिः शतं जीव शरदो लोके अस्मिन्निति ॥ १ ॥

अ०—नायको बाळंत होऊन मुलगा झाला असतां त्या मुलाला दुसऱ्या कोणीं स्पर्श केला नाहीं तत्पूर्वीं तूप व मध यांत सोनें उगाळून तें,

प्र ते ददामि मधुनो घृतस्य वेदं सवित्रा प्रसूतं मघोनां ॥
आयुष्मान् गुप्तो देवताभिः शतं जीव शरदो लोके अस्मिन्

हा मंत्र ह्मणून मुलाला पाजावें.

सू०–कर्णयोरुपनिधाय मेधाजननं जपति। मेधान्ते देवः सविता मेधां देवी सरस्वती॥ मेधांते अश्विनौ देवावाधत्तां पुष्करस्रजौ इति ॥ २ ॥

अ०—मुलाच्या दोन्ही कानांवर सोनें ठेवून—

मेधान्ते देवः सविता मेधां देवी सरस्वती ॥
मेधांते अश्विनौ देवावाधत्तां पुष्करस्रजौ ॥

या बुद्धि देणाऱ्या मंत्राचा जप करावा.

* दोन वेळ मंत्र ह्मणावा व बालकाच्या मुखाजवळ आपलें मुख करून जप करावा असेंही कोणी ह्मणतात.

सू०–अंसावभिमृशति अश्मा भव परशुर्भव हिरण्यमस्तृतं भव ॥ वेदो वै पुत्रनामासि स जीव शरदः शतं इति । इंद्र श्रेष्ठानि द्रविणानि धेह्यस्मे प्रयंधि मघवन्नृजीषिन्निति च ॥ ३ ॥

अ०—मुलाच्या दोन्ही अंसांना ह्मणजे खांद्यांना, अश्माभव परशुर्भव हिरण्यमस्तृतं भव । वेदो वै पुत्रनामासि स जीव

शरद: शतं ॥ इंद्र श्रेष्ठानि० (२।६।२७) अस्मे प्रयंधि मघवन्नृजीषिन् (३।२।२०) ही ऋचा ह्मणून एकदम हात लावावे.

सू०-नाम चास्मै दद्युः

अ०—या मुलाचें नांव ठेवावें.

सू०-घोषवदाद्यन्तरन्तस्थमभिनिष्ठानान्तं द्व्यक्षरम् ॥ ५ ॥ चतुरक्षरं वा ॥ ६ ॥

अ०—घोष—ह य व र ल ञ म ङ ण न झ भ घ ढ ध ज ब ग ड द यांपैकीं वर्ण प्रथम, य र ल व यांपैकीं वर्णमध्यें आणि शेवटीं विसर्ग असे दोन अक्षरांचें अथवा चार अक्षरांचें नांव ठेवावें.

सू०-द्व्यक्षरं प्रतिष्ठाकामश्चतुरक्षरं ब्रह्मवर्चसकामः ॥ ७ ॥

अ०—मुलाची कीर्ति व्हावी अशी इच्छा असेल तर दोन अक्षरांचें नांव ठेवावें व ब्रह्मतेज असावें अशी इच्छा असेल तर चार-अक्षरांचें नांव ठेवावें.

सू०-युग्मानि त्वेव पुंसाम् ॥ ८ ॥ अयुजानिस्त्रीणां ॥ ९ ॥

अ०—पुरुषाचें नांव समाक्षरांनींच ठेवावें आणि कन्येचें नांव विषमाक्षरांनीं ठेवावें.

सू०-अभिवादनीयं च समीक्षेत तन्मातापितरौ विद्यातामोपनयनात् ॥ १० ॥

अ०—अमुक नांव घेऊन मुलानें नमस्कार करावा, असें मुलाचे आईबापांनीं दुसरें नांव ठेवावें व तें नांव मुलाची मुंज होईपर्यंत आईबापांनांच ठाऊक असावें.

* मुंजी नंतर मुलाला या नांवानें नमस्कार कर असें सांगावें.

सू०-प्रवासादेत्य पुत्रस्य शिरः परिगृह्यजपति अंगादंगात्संभवसि हृदयादधिजायसे ॥ आत्मा वै पुत्रनामाऽसि सजीवशरदःशतमिति मूर्धनि त्रिरवघ्राय ॥ ११ ॥

अ०— बाप प्रवास करून आला असतां त्याणें पुत्राचें मस्तक धरून त्याचा तीनवेळ वास घ्यावा व 'अंगादंगात्सं० शतं' हा मंत्र जपावा.

सू०-आवृतैव कुमार्यै ॥ १२ ॥

अ०—वरील अवघ्राण कन्येचें करणें तें अमंत्रक करावें.

* कन्येचें जातकर्महि अमंत्रकच करावें असाहि कोणी अर्थ करितात.

---

खण्ड १६.

सूत्र-षष्ठेमास्यन्नप्राशनं ॥ १ ॥

अ०—सहावे महिन्यांत अन्नप्राशन नांवाचा संस्कार करावा.

सू०-आजमन्नाद्यकामः ॥ २ ॥ तैत्तिरं ब्रह्मवर्चसकामः ॥ ३ ॥ घृतौदनं तेजस्कामः ॥४॥

अ०—अन्न वगैरे पदार्थ मिळावे अशी इच्छा असेल तर शेळीचें मांस, ब्रह्मतेजाची इच्छा असेल तर तित्तिरपक्षाचें मांस व तेजाची इच्छा असेल तर तूपभात हें मुलाला खाऊं घालावें.

सू०-दधिमधुघृतमिश्रमन्नं प्राशयेत् ॥
अन्नपतेऽन्नस्य नो देह्यनमीवस्य शुष्मिणः॥

प्रप्रदातारंतारिष ऊर्जन्नो धेहि द्विपदे चतु-
ष्पदइति ॥ ५ ॥

अ०—निष्काम असतां अन्नामध्यें दहीं, मध व तूप हीं मिश्र करून खावयाला घालावें; सदरील कोणतेही प्रकारें खावयाला घालते वेळेस 'अन्नपतेन्न० ष्पदे' हा मंत्र ह्मणावा.

सू०–आवृतैव कुमार्यै ॥ ६ ॥

अ०—कन्येला जो वरील संस्कार करणें तो अमंत्रक करावा.

---

खण्ड १७.

सूत्र–तृतीये वर्षे चौलं यथा कुलधर्मं वा॥१॥

अ०—तिसरे वर्षी अथवा ज्या वेळेस करण्याचा कुलाचार असेल त्या वेळेस चौलसंस्कार करावा.

सू०–उत्तरतोऽग्नेर्व्रीहियवमाषतिलानां पृथक्
पूर्णशरावाणि निदधाति ॥ २ ॥

अ०—अग्नीचे उत्तरेकडे साळी, जव, उडीद व तीळ यांनीं वेगळालीं परळें भरून ठेवावीं.

सू०–पश्चात्कारयिष्यमाणो मातुरुपस्थ आ-
नडुहं गोमयं नवे शरावे शमीपर्णानि चोपनि-
हितानि भवन्ति ॥ ३ ॥

अ०—ज्याचें चौल व्हावयाचें त्या मुलानें अग्नीचे पश्चिमेस आईचे मांडीवर बसावें; तसेंच, एका नव्या परळांत बैलाचें शेण ठेवावें व दुसऱ्या नव्या परळांत शमीचीं पानें ठेवावीं.

सू०–मातुः पिता दक्षिणत एकविंशतिकुशपिंजूलान्यादाय ॥ ४ ॥

अ०—मुलाच्या आईचे दक्षिणेकडे मुलाचे बापानें एकवीस कोंवळे दर्भ घेऊन बसावें.

सू०–ब्रह्मा वै तानि धारयेत् ॥ ५ ॥

अ०—अथवा ब्रह्मा असेल तर त्याणें एकवीस कोंवळे दर्भ घेऊन बसावें.

सू०–पश्चात्कारयिष्यमाणस्यावस्थाय शीतोष्णा अपःसमानीयोष्णेन वा य उदकेनेहीति ॥ ६ ॥

अ०—नंतर मुलाचे पश्चिमेस बापानें उभें राहून एका हातांत ऊन पाणी आणि एका हातांत गार पाणी घेऊन एकया भांड्यांत 'उष्णेनवायउदकेनेहि' हा मंत्र ह्मणून दोन्ही प्रकारचें पाणी ओतावें.

सू०–तासां गृहीत्वा नवनीतं दधिद्रप्सान् वा प्रदक्षिणं शिरस्त्रिरुन्दति अदितिः केशान्वपत्वाप उन्दन्तु वर्चस इति ॥ ७ ॥

अ०—तें पाणी थोडें घेऊन व लोणी अथवा दह्याचें सायटें घेऊन मुलाचें डोकें 'अदितिःकेशान्वपत्वाप उन्दन्तु वर्चसे'० हा मंत्र ह्मणून प्रदक्षिण असें तीन वेळ चोळावें.

सू०–दक्षिणे केशपक्षे त्रीणि त्रीणि कुशपिंजूलान्यभ्यात्माग्राणि निदधाति ओषधे त्रायस्वैनमिति ॥ ८ ॥

अ०—नंतर उजव्या केशसमूहावर तीन तीन कोंवळे दर्भ आपल्याकडे अग्र करून, 'ओषधे त्रायस्वैनं,' हा मंत्र ह्मणून ठेवावे.

**सू०-स्वधिते मैनं हिंसीरिति लौहेन क्षुरेण ॥ ९ ॥**

अ०—आणि 'स्वधितेमैनं हिंसीः' हा मंत्र ह्मणून तांब्याचा वस्तरा त्या दर्भावर धरावा.

* व्यवहारांत लोखंडी वस्तरे आहेत परंतु ह्या संस्काराकरितां तांब्याचा वस्तरा केलेला असतो तो घ्यावयाचा.

**सू०-प्रच्छिनत्ति येनावपत्सविता क्षुरेण सोमस्य राज्ञो वरुणस्य विद्वान् ॥ तेन ब्रह्माणो वपतेदमस्यायुष्मांजरदष्टिर्यथा सदिति ॥ १० ॥**

अ०—आणि नंतर 'येनावपत्सविता० सत्' हा मंत्र ह्मणून ते दर्भ तोडावे.

**सू०-प्रच्छिद्य प्रच्छिद्य प्रागग्रान्छमीपर्णैः सह मात्रे प्रयच्छति तानानडुहे गोमये निदधाति ॥ ११ ॥ येन धाता बृहस्पतेरग्नेरिन्द्रस्य चायुषेऽवपत् ॥ तेन त आयुषे वपामि सुश्लोक्याय स्वस्तय इति द्वितीयं ॥ येन भूयश्च रात्र्यां ज्योक् च पश्याति सूर्यं ॥ तेन त आयुषे वपामि सुश्लोक्याय स्वस्तय इति तृतीयं ॥ १२॥ सर्वैर्मंत्रैश्चतुर्थं ॥ १३ ॥**

अ०—ह्याप्रमाणें पूर्वेस अग्र करून ते तोडलेले दर्भ आणि

शमीचीं पानें मुलाचे आईस द्यावीं व तिणें तीं बैलाचे शेणावर टाकावीं. असें प्रथम झाल्यानंतर दुसऱ्यानें याप्रमाणेंच करावें. परंतु 'येनावपत्सवितां' ० हा मंत्र न ह्मणतां 'येनधाताबृहस्पते० स्वस्तये' हा मंत्र ह्मणावा. त्यानंतर असेंच तिसऱ्यानेंही करते वेळेस, येनभूयश्चरा० स्तये' हा मंत्र ह्मणावा व चवथ्यानें करते वेळेस, 'येनावप०' 'येनधाता०' व 'येनभूयश्च०' हे तीनही मंत्र ह्मणावे.

## सू०-एवमुत्तरतस्त्रिः ॥ १४ ॥

अ०—याप्रमाणें, उजव्या केशसमूहावर संस्कार केला तसाच डावेकडील केशसमूहावरही तीन वेळ संस्कार करावा.

## सू०-क्षुरतेजो निमृजेत् यत्क्षुरेण मर्चयता सुपेशसा वप्ता वपसि केशान् ॥ शुंधि शिरो मास्यायुः प्रमोषीरिति ॥ १५ ॥

अ०—नंतर वस्तऱ्याची धार, 'यत्क्षुरेणमर्च०षि' हा मंत्र ह्मणून शुद्ध करावी.

## सू०-नापितं शिष्याच्छीतोष्णाभिरद्भिरवर्थं कुर्वाणोऽक्षुण्वन् कुशली कुर्विति ॥ १६ ॥

अ०—व न्हाव्याला सांगावें कीं, याच्या डोक्याला ऊन व गार असें एकत्र केलेलें पाणी लावून, न कापतां हजामत कर.

## सू०-यथा कुलधर्मं केशवेशान् कारयेत् ॥ १७ ॥

अ०—नंतर कुलाचाराप्रमाणें शेंड्या ठेवाव्या.

## सू०-आवृतैव कुमार्यै ॥ १८ ॥

अ०—कन्येचें चौल अमंत्रक करावें.

———o———

## खण्ड १८.

**सूत्र-एतेन गोदानं ॥ १ ॥ षोडशेवर्षे ॥ २॥**

अ० —चौलप्रमाणेंच सोळाव्या वर्षी मुलाचा गोदानसंस्कार करावा.

**सू०-केशशब्दे तु श्मश्रुशब्दान् कारयेत् ॥३॥**

अ०—हा संस्कार करतांना 'केश' शब्दाचे ठिकाणीं 'श्मश्रु' शब्द ह्मणत जावा.

**सू०-श्मश्रूणीहोन्दति ॥ ४ ॥**

अ०—वरील खंडांत सातव्या मिऱ्यांत सांगितलेला संस्कार मुखावरचे केसांला ह्मणजे मिशांनांच करावा.

**सू०-शुन्धि; शिरो मुखं मास्यायुः प्रमोषी-रिति ॥ ५ ॥**

अ०—'शुंधि; शिरोमुखं मास्यायुः प्रमोषीः' हा मंत्र ह्मणून वस्तऱ्याची धार शुद्ध करावी.

**सू०-केशश्मश्रुलोमनखान्युदक् संस्थानि-कुर्विति सम्प्रेष्यति ॥ ६ ॥**

अ०—डोक्यावरचे केश, मुखावरचे केश, लव, व नखें उदक्-संस्थ काढ अशी न्हाव्याला आज्ञा करावी.

**सू०-आप्लुत्य वाग्यतः स्थित्वाऽहः शेषमा-चार्यसकाशे वाचं विसृजेत वरं ददामीति ॥ ७ ॥**

अ०—नंतर स्नान करून न बोलतां गुरूजवळ सूर्यास्तपावेतों उभें रहावें आणि संध्याकाळीं दक्षिणा देतों असें गुरूला सांगून मौन सोडावें.

सू०-गोमिथुनं दक्षिणा ॥ ८ ॥

अ०—ही दक्षिणा गाय आणि बैल अशी द्यावी.

सू०-संवत्सरमादिशेत् ॥ ९ ॥

अ०—असें गोदान करून नंतर एक वर्षपर्यंत केशधारणादिक ब्रह्मचर्यव्रत करण्यास गुरूनें सांगावें.

---

## खण्ड १९.

सूत्र-अष्टमे वर्षे ब्राह्मणमुपनयेत् ॥ १ ॥ गर्भा ऽष्टमे वा ॥ २ ॥ एकादशे क्षत्रियं ॥ ३ ॥ द्वादशे वैश्यं ॥ ४ ॥

अ०—जन्म झाल्यापासून अथवा गर्भधारणेपासून आठव्या वर्षी ब्राह्मणाची मुंज करावी. अकराव्या वर्षी क्षत्रियाची व बाराव्या वर्षी वैश्याची मुंज करावी.

सू०-आषोडशात् ब्राह्मणस्यानतीतः कालः ॥ ५ ॥ आद्वाविंशात् क्षत्रियस्य आचतुर्विंशात् वैश्यस्य अतऊर्ध्वं पतित सावित्रीका भवन्ति ॥ ६ ॥

अ०—सोळा वर्षेपर्यंत ब्राह्मणाची, बेविस वर्षेपर्यंत क्षत्रियाची व चोविस वर्षेपर्यंत वैश्याची मुंज करण्याचा काल आहे. हा काल गेल्यानंतर मात्र पतितसावित्रिक (वेद ह्मणण्याचे अनधिकारी) होतात.

* पतितसावित्रिकानें 'उद्दालक' व्रत करून मुंज करावी.

**सू०–नैनानुपनयेन्नाध्यापयेन्न याजयेन्नैभिर्व्यवहरेयुः ॥ ७ ॥**

अ०—पतितसावित्रिकाची मुंज करूं नये, त्यांनां पढवूं नये, त्यांचे उपाध्यिक करूं नये व त्यांच्यांशीं कोणतेही संसर्ग ठेवूं नयेत.

**सू०–अलंकृतं कुमारं कुशलीकृतशिरसमहतेन वाससा संवीतमैणेयेन वाऽजिनेन ब्राह्मणं रौरवेण क्षत्रियमाजेन वैश्यं ॥ ८ ॥**

अ०—अलंकार घातलेला, हजामत केलेला, नवें वस्त्र पांघरलेला अथवा हरणाचें कातडें पांघरलेला असा ब्राह्मणाचा मुलगा, रुरू (रोही) याचें कातडें पांघरलेला क्षत्रियाचा मुलगा, व बोकडाचें कातडें पांघरलेला वैश्याचा मुलगा अशा मुलांची मुंज लावावी.

**सू०–यदि वासांसि वसीरन् रक्तानि वसीरन् काषायं ब्राह्मणो मांजिष्ठं क्षत्रियो हारिद्रं वैश्यः॥९॥**

अ०—या मुलांनीं जीं वस्त्रें नेसावयाचीं तीं जर रंगविलेलीं नेसणें असेल तर काषायवस्त्र ह्मणजे गेरू वगैरेनीं रंगविलेलें तांबडें वस्त्र ब्राह्मणाचे मुलानें नेसावें, मांजिष्ट ह्मणजे खारें काळसर असें वस्त्र क्षत्रियाचे मुलानें नेसावें आणि पिंवळें वस्त्र वैश्याचे मुलानें नेसावें.

**सू०–तेषां मेखलाः ॥ १० ॥ मौंजी ब्राह्मणस्य, धनुर्ज्या क्षत्रियस्य, आवी वैश्यस्य ॥११॥**

अ०—ब्राह्मणाचे मुलास मोळाची, क्षत्रियाचे मुलास वेळूची व वैश्याचे मुलास लोकरीची मेखला करावी.

**सू०–तेषां दण्डाः ॥ १२ ॥ पालाशो ब्राह्मणस्य, औदुम्बरं क्षत्रियस्य, बैल्वो वैश्यस्य, के-**

शसंमितोब्राह्मणस्य, ललाटसंमितः क्षत्रियस्य प्राणसंमितो वैश्यस्य ॥ १३ ॥

अ०—ब्राह्मणाचे मुलास डोक्याइतका उंच पळसाचा दंड असावा, क्षत्रियाचे मुलास ललाटाइतका उंच उंबराचा दंड व वैश्याचे मुलास बेलाचा नासिके इतका उंच दंड असावा.

———o———

## खण्ड २०.

सूत्र०-सर्वेवा सर्वे षां ॥ १ ॥

अ०—अथवा वर सांगितलेले दंडांपैकीं पाहिजे तो दंड पाहिजे त्यानें घ्यावा.

सू०-समन्वारब्धे हुत्वोत्तरतोऽग्नेः प्राङ्मुख आचार्योऽवतिष्ठते ॥ २ ॥ पुरस्तात् प्रत्यङ्मुख इतरः ॥ ३ ॥

अ०—मुलांनीं आचार्याला लागून बसावें व गृ० १ खंड ४ यांत सांगितलेल्या आहुती द्याव्या. नंतर अग्नीचे उत्तर बाजूस पूर्वेकडे तोंड करून आचार्यांनीं बसावें, व मुलांनीं आचार्यांच्या समोर आचार्याकडे तोंड करून बसावें.

सू०-अपामंजली पूरयित्वा. तत्सवितुर्वृणीमह इति पूर्णेनास्य पूर्णमवक्षारयत्यासिच्य. देवस्य त्वा सवितुःप्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यां हस्तं गृण्हाम्यसाविति तस्य पाणिना पाणिं सांगुष्टंगृण्हीयात् ॥ ४ ॥

अ०—आचार्यांनीं दोघांच्या ओंजळी पाण्यानें भरून आपल्या ओंजळींतले पाणी मुलाचे ओंजळींत, 'तत्सवितुर्वृणिमहे' ( अष्ट.

४ अ. ४।२९) ही ऋचा ह्मणून ओतावें आणि नंतर त्याजकडूनही तें पाणी टाकवून 'देवस्यत्वा०' हा मंत्र ह्मणून अंगुष्ठासुद्धां मुलाचा हात आपल्या हातांनीं धरावा. व मंत्र ह्मणते वेळेस 'असौ' या पदाचे ठिकाणीं मुलाचें नांव संबुध्यंत ह्मणावें.

* आचार्याचे ओंजळींत पाणी घालणें तें दुसऱ्या मनुष्यांनीं घालावें.

**सू०-सविता ते हस्तमग्रभीदसाविति द्वितीयं ॥ अग्निराचार्यस्तवासाविति तृतीयं ॥५॥**

अ०—'सविता'० हा मंत्र ह्मणून गुरूनें पुन्हां मुलाचा हात धरावा. आणि नंतर पुनः 'अग्निराचार्यस्तवासौ०' हा मंत्र ह्मणून गुरूनें तिसऱ्यानें मुलाचा हात धरावा. येथेंही असौ या पदाचे ठिकाणीं मुलाचें संबुध्यंत नांव घ्यावें.

* हात धरते वेळेस ओंजळींत पाणी घेऊन तें टाकणें हें कर्म करीत जावें.

**सू०-आदित्यमीक्षयेत्. देव सवितरेष ते ब्रह्मचारी तं गोपाय स मामृतेत्याचार्यः ॥ ६॥**

अ०—'देव सवितरेष ते ब्रह्मचारी तं गोपाय समामृत' हा मंत्र ह्मणून आचार्यानें मुलाला सूर्य दाखवावा.

**सू०-कस्य ब्रह्मचार्यसि प्राणस्य ब्रह्मचार्यसि कस्त्वाकमुपनयते काय त्वा परिददामीति॥७॥**

अ०—तसाच 'कस्य ब्रह्मचा० ददामि' हा मंत्र आचार्यानें ह्मणावा.

* यावेळीं प्रजापति देवतेला या ब्रह्मचारी मुलाचें दान करावें; या दानाला परिदान असें ह्मणतात.

**सू०-युवा सुवासाः परिवीत आगादित्यर्धर्चेनैनं प्रदक्षिणमावर्त्तयेत् ॥ ८ ॥**

अ०—'युवा सुवासाः प०' ( अष्ट० ३ अध्या. १।३ ) ही अर्धी ऋचा ह्मणून मुलाला प्रदक्षिण ( उजव्या बाजूनें तोंड फिरविणें ) फिरविल्यावर पूर्वाभिमुख उभें करावें.

**सू०-तस्याध्यंसौ पाणी कृत्वा हृदयदेशमालभेतोत्तरेण ॥ ९ ॥**

अ०—मुलाचे दोन्ही खांद्यांवर हात ठेवून नंतर मुलाचे हृदयाला, 'तंधीरासः क० यंतः' (अष्ट० ३ अ. १।३) ही अर्धी ऋचा ह्मणून स्पर्श करावा.

**सू०-अग्निं परिसमूह्य ब्रह्मचारी तूष्णीं समिधमादध्यात् तूष्णीं वै प्राजापत्यं प्राजापत्यो ब्रह्मचारी भवतीति विज्ञायते ॥ १० ॥**

अ०—ब्रह्मचाऱ्यांनीं अग्नीला परिसमूहनकरून तूष्णीं ( अमंत्रक ) समिध द्यावी. कारण, प्रजापतिदेवतोद्देशानें जें कर्म करणें तें अमंत्रक करावें. ब्रह्मचारी हा प्रजापति देवतेला दिलेला आहे असें वेदांत सांगितलें आहे.

* टीप—वृत्तिकार असें ह्मणतात कीं, येथें जें अग्नीचें परिसमूहन करावें ह्मणून सांगितलें आहे तें नित्य होमाचे वेळेस करावें. याप्रसंगीं नुस्ती समिधच द्यावी.

———o———

## खण्ड २१.

**सूत्र-मंत्रेण हैकेऽग्नये समिधमाहार्षं बृहते जातवेदसे, तया त्वमग्ने वर्धस्व समिधा ब्रह्मणा वयं स्वाहेति ॥ १ ॥**

अ०—कोणी ऋषी ह्मणतात का, 'अग्नयेसमिधमाहार्षं० वयंस्वा०

हा' हा मंत्र ह्मणून समिध द्यावी. हें मत आश्वलायनऋषींनाही मान्य आहे.

**सू०-स समिधमाधायाग्निमुपस्पृश्य मुखं निमार्ष्टि त्रिस्तेजसा मा समनज्मीति ॥ २ ॥**

अ०—वर सांगितल्याप्रमाणें समिध द्यावी व अग्नीवर हात तापवून, 'तेजसामासमनज्मि' हा मंत्र ह्मणून तीन वेळ तोंडावरून हात फिरवावा.

* सायंकाळीं व प्रातःकाळीं समिध दिल्यानंतर हें कर्म करीत जावें.

**सू०-तेजसा ह्येवात्मानं समनक्तीति विज्ञायते ॥ ३ ॥**

अ०—वरील कर्म केलें असतां अग्नीचें तेजच आपल्या शरीराला लावल्यासारखें होतें असें वेदांत सांगितलें आहे.

**सू०-मयि मेधां मयि प्रजां मय्यग्निस्तेजो दधातु॥ मयि मेधां मयि प्रजां मयीन्द्र इन्द्रियं दधातु॥ मयि मेधां मयि प्रजां मयि सूर्यो भ्राजो दधातु॥ यत्ते अग्ने तेजस्तेनाऽहं तेजस्वी भूयासं॥ यत्ते अग्ने वर्चस्तेनाऽहं वर्चस्वी भूयासं ॥ यत्ते अग्ने हरस्तेनाऽहं हरस्वी भूयासं ॥ इत्युपस्थाय जान्वाच्योपसंगृह्य ब्रूयात् ॥ अधीहि भोः सावित्रीं भो अनुब्रूहीति ॥ ४ ॥**

अ०—'मयि मेधां मयि प्रजां०हरस्वी भूयासं' हा मंत्र ह्मणून उपस्थान (हात जोडून उभें राहून अग्नीची प्रार्थना) करावें. नंतर उजवा गुडघा भुईवर ठेवून उपसंग्रहण (गुरूला नमस्कार)

करावें. व गुरूला, 'आपण सावित्रीमंत्र ह्मणून मला सांगावा' या अर्थाचें वाक्य, 'अधीहि०ब्रूहि' असें ह्मणावें.

सू०-तस्य वाससा पाणिभ्यां च पाणी संगृह्य सावित्रीमन्वाहपच्छोऽर्धर्चशः सर्वां ॥ ५ ॥

अ०—मुलाचे हात त्याचेच नेसलेल्या वस्त्रानें गुंडाळून गुरूनें आपले दोन्ही हातांनीं त्याचे हात धरावे, नंतर आपण एकेक पाद सावित्री मंत्र ह्मणून तो शिष्याकडून ह्मणवावा याप्रमाणें एकेक अर्ध ऋचा आपण ह्मणून ती शिष्याकडून ह्मणवावी आणि नंतर सर्व मंत्र एकदम ह्मणून शिष्याकडूनही तो एकदम ह्मणवावा.

सू०-यथाशक्ति वाचयीत ॥ ६ ॥

अ०—अथवा शिष्याच्यानें जितकीं अक्षरें ह्मणवतील तितकींच त्याजकडून ह्मणवावीं.

सू०-हृदयेदेशेऽस्योर्ध्वांगुलिपाणिमुपदधाति. ममव्रते हृदयं ते दधामि मम चित्तमनुचित्तं ते अस्तु ॥ मम वाचमेकव्रतो जुषस्व बृहस्पतिष्ट्वा नियुनक्तुमह्यमिति ॥ ७ ॥

अ०—नंतर शिष्याच्या हृदयावर ऊर्ध्व अंगुली करून हात ठेवावा व 'ममव्रते० मह्यं' हा मंत्र ह्मणावा.

---

## खण्ड २२.

सूत्र-मेखलामबध्य दण्डं प्रदाय ब्रह्मचर्यमामादिशेत् ॥ १ ॥

अ०—(नंतर) मेखला बांधावी, दंड द्यावा आणि ब्रह्मचर्य करण्यास सांगावें.

सू०-ब्रह्मचार्यस्यपोऽशान कर्म कुरुदिवा मास्वाप्सीराचार्याधीनो वेदमधीष्वेति ॥ २ ॥ द्वादश वर्षाणि वेदब्रह्मचर्यं ॥ ३ ॥ ग्रहणांतं वा ॥ ४ ॥ सायंप्रातर्भिक्षेत ॥ ५ ॥ सायंप्रातः समिधमादध्यात् ॥ ६ ॥ अप्रत्याख्यायिनमग्रे भिक्षेत, अप्रत्याख्यायिनीं वा ॥ ७ ॥

अ०—तसेंच, तूं ब्रह्मचारी आहेस, शास्त्रांनीं सांगितलेलें आचमन करीत जा, शास्त्रांनीं सांगितलेलें कर्म करीत जा, दिवसां निजूं नकोस, गुरूचे ताब्यांत वाग, वेदाध्ययन कर, बारा वर्षें पर्यंत अथवा वेदाध्ययन संपे तों ब्रह्मचर्य पाळ, सायंकाळीं व प्रातःकाळीं भिक्षा मागत जा, आणि सायंकाळीं व प्रातःकाळीं अग्नीवर समिधा देत जा. परतून न लावणारा पाशीं अथवा लावणारिणी पाशीं प्रथम भिक्षा (मुंज झाल्याबरोबर जी भिक्षा ती) मागावी.

* जन्म झाल्यापासून सोळावे वर्षीं किंवा मुंज झाल्यापासून सोळावे वर्षीं गोदान संस्कार करावा असें वृत्तिग्रंथांत लिहिलें आहे.

सू०-भवान् भिक्षां ददात्विति, अनुप्रवचनीयमिति वा ॥ ८ ॥

अ०—'भवान् भिक्षां ददातु' हा मंत्र ह्मणावा अथवा या मंत्रांत भिक्षापदाचे ठिकाणीं 'अनुप्रवचनीयं' असें पद ह्मणावें.

* भिक्षा घालणारी स्त्री असेल तर 'भवान्' या पदाचे ठिकाणीं 'भवती' असें पद ह्मणावें.

सू०-तदाचार्याय वेदयीत. तिष्ठेदहःशेषं ॥ ९ ॥

अ०—भिक्षा मागून आणल्यावर ती गुरूला निवेदन करावी व सूर्यास्तापर्यंत उभें राहावें.

**सू०-अस्तमिते ब्रह्मौदनमनुप्रवचनीयं श्रपयित्वाऽऽचार्याय वेदयीत ॥ १० ॥**

अ०—सूर्यास्तानंतर, अनुप्रवचनीय (ब्राह्मणानें तृप्त होऊन) 'वेद समाप्ति असो' असा आशीर्वाद द्यावा याकरितां, भात शिजवून नंतर गुरूला 'शिजला' ह्मणून सांगावें.

**सू०-आचार्यः समन्वारब्धे जुहुयात् सदसस्पतिमद्भुतमिति ॥ ११ ॥**

अ०—शिष्य अन्वारब्ध झाला असतां होम करून 'सदसस्पतिमद्भुतं०' (अष्ट० १ अ० १ वर्ग ३९) या ऋचेनें आहुती द्यावी.

**सू०-सावित्र्या द्वितीयं ॥ १२ ॥**

अ०—'तत्सवितुर्वरेण्यं०' या मंत्रानें दुसरी आहुती द्यावी.

**सू०-यद्यत्किंचात ऊर्ध्वमनूक्तं स्यात् ॥ १३ ॥**

अ०—याप्रमाणें जेथें अनुप्रवचनीय होम आहे तेथें त्या देवतेच्या नाममंत्रानें दुसरी आहुती द्यावी.

**सू०-ऋषिभ्यस्तृतीयं ॥ १४ ॥ सौविष्टकृतं चतुर्थं ॥ १५ ॥**

अ०—'ऋषिभ्यःस्वाहा' ह्मणून तिसरी आहुती द्यावी आणि 'स्विष्टकृत्' ही आहुती चवथी द्यावी.

* येथें चक्षुषी होम करूं नये.

**सू०-ब्राह्मणान् भोजयित्वा वेदसमाप्तिं वाचयीत ॥ १६ ॥**

अ०—ब्राह्मणांस जेवायाला घालावें व त्यांजकडून 'वेदसमाप्ति होवो' असें ह्मणवावें.

**सू०-अत ऊर्ध्वमक्षारालवणाशी ब्रह्मचार्यधःशायी त्रिरात्रं द्वादशरात्रं संवत्सरं वा ॥१७॥**

अ०—यानंतर तीन दिवस अथवा बारा दिवस किंवा एक वर्ष पर्यंत ब्रह्मचाऱ्यानें क्षार पदार्थ व मीठ खाऊं नये.

**सू०-चरितव्रताय मेधाजननं करोति ॥१८॥**

अ०—असें व्रत केल्यानंतर मेधा जनन नांवाचें कर्म करावें

**सू०-अनिन्हितायां दिश्येकमूलं पलाशं कुशस्तम्बं वा पलाशापचारे प्रदक्षिणमुदकुम्भेन त्रिः परिषिचं तं वाचयति ॥ सुश्रवः सुश्रवा असि यथा त्वं सुश्रुवः सुश्रुवा अस्येवं मां सुश्रवः सौश्रवसं कुरु यथा त्वं देवानां यज्ञस्यं निधिपो स्येवमहं मनुष्याणां वेदस्य निधिपो भूयासमिति ॥ १९ ॥**

अ०—दक्षिणदिशेखेरीज तीन दिशांपैकीं कोणतेही दिशेला एक मूळाचा ( उत्पत्तीचे वेळेस ज्याला एकच फांदी येते असा ) पळस अथवा पळस नसेल तर दर्भाचा गुच्छ याच्या भोंवतालून ब्रह्मचाऱ्याकडून 'सुश्रवः सुश्रवा०' हा मंत्र ह्मणतांना उदकुंभानें तीन वेळ प्रदक्षिण पाणी फिरवावें.

**सू०-एतेन वापनादिपरिदानान्तं व्रतादेशनं व्याख्यातं ॥ २० ॥**

अ०—खंड १९ सूत्र ८ 'कुशलीकृत'० या पासून खंड

२० सू० ७ पावेतों सांगितलेलें कर्म याचें नांव व्रतादेशन (व्रताची आज्ञा) असें समजावें.

**सू०-इत्यनुपेत पूर्वस्य ॥ २१ ॥**

अ०—हें कर्म प्रथम मुंजीचे वेळेस करावें.

**सू०-अथोपेतपूर्वस्य ॥ २२ ॥**

अ०—पूर्वी मुंज होऊन पुन्हां प्रायश्चितार्थ मुंज करणें यातविषयीं विशेष सांगतात:—

**सू०-कृताकृतं केशवपनं मेधाजननं च ॥ २३ ॥**

अ०—हजामत व मेधाजनन करावें किंवा तें करूंही नये.

**सू०-अनिरुक्तं परिदानं ॥ २४ ॥**

अ०—'कस्यब्रह्मचा०' या मंत्रांनीं करण्याचें परिदान करूं नये.

**सू०-कालश्च ॥ २५ ॥**

अ०—व मुंजीच्या कालाचाही नियम पाळणें नको.

**सू०-तत्सवितुर्वृणीमह इति सावित्रीं ॥ २६ ॥**

अ०—पूर्वीच्या सावित्री मंत्राचे ठिकाणीं 'तत्सवितुर्वृणीमहे'० (४।४।२९) ही ऋचा ह्मणावी.

———o———

खण्ड २३.

**सूत्र-ऋत्विजो वृणीते न्यूनानतिरिक्तांगान् ये मातृतः पितृतश्चेति यथोक्तं पुरस्तात् ॥ १ ॥**

अ०—ह्यांत सांगितल्याप्रमाणें कुलपरीक्षा करून अधिक अवयवांचे नाहींत व कमी अवयवांचे नाहींत असे ऋत्विज (यज्ञांतील अमुक काम करावें असा अधिकार दिलेले मनुष्य) नेमावे.

**सू०-यून ऋत्विजो वृणीत इत्येके ॥ २ ॥**

अ०—कोणी ऋषी ह्मणतात कीं, तरुण ऋत्विज वरावे (नेमावे).

**सू०-ब्रह्माणमेव प्रथमं वृणीतेऽथ होतारमथाध्वर्युमथोद्गातारं ॥ ३ ॥**

अ०—प्रथम ब्रह्मा हा वरून नंतर होता, त्यानंतर अध्वर्यू आणि त्यानंतर उद्गाता असे अनुक्रमें वरावे.

**सू०-सर्वान् वा येऽहीनैकाहैर्याजयन्ति ॥ ४ ॥**

अ०—अथवा सर्व ऋत्विक् (१६ वें श्रौतसूत्र, अध्याय ४ खंड १ यांत सांगितलेले) वरावे.

**सू०-सदस्यं सप्तदशं कौषीतकिनः समामनन्ति ॥ स कर्मणामुपद्रष्टा भवतीति ॥ तदुक्तमृग्भ्यां यमृत्विजो बहुधा कल्पयन्त इति ॥ ५ ॥**

अ०—सत्रावा ऋत्विक् सदस्य हा वरावा. हा सदस्य कर्माचा उपद्रष्टा ह्मणजे अवलोकन करणारा होतो असें कौषितकी नांवाचे ऋषी ह्मणतात. हा अर्थ, 'यमृत्विजो०' (अ० ६ अ० ४ २९) या दोन ऋचांनीं सांगितला आहे.

**सू०-होतारमेव प्रथमं वृणीते ॥ ६ ॥**

अ०—होत्यालाच प्रथम ऋत्विक् नेमावें.

* ज्या वेळेस सोळा ऋत्विज वरावयाचे त्या वेळेस प्रथम होत्यालाच वरावें व ज्या वेळेस चौघांनांच वरावयाचें त्या वेळेस ब्रह्म्यालाच प्रथम वरावें.

**सू०-अग्निर्मे होता स मे होता होतारं त्वाऽमुं वृण इति होतारं ॥ ७ ॥**

अ०—'अग्निर्मे होता स० होतारं' हा मंत्र ह्मणून होत्याची नेमणूक करावी आणि त्यावेळीं 'अमुं' या पदाचे ठिकाणीं होत्याचें नांव द्वितीयांत घालावें.

**सू०-चंद्रमा मे ब्रह्मा स मे ब्रह्मा ब्रह्माणं त्वाऽमुं वृण इति ब्रह्माणं ॥ ८ ॥**

अ०—'चंद्रमा मे ब्रह्मा समे ब्रह्मा ब्रह्माणं त्वाऽमुं वृणे' हा मंत्र ह्मणून ब्रम्ह्याची नेमणूक करावी. येथेंही 'अमुं' या पदाचे ठिकाणीं ब्रम्ह्याचें नांव द्वितीयांत घालावें.

**सू०-आदित्यो मे ऽध्वर्युरित्यध्वर्युं ॥ पर्जन्यो म उद्गातेत्युद्गातारं ॥ आपो मे होत्राशंसिन इति होत्रकान् ॥ रश्मयो मे चमसाध्वर्यव इति चमसाध्वर्यून् ॥ आकाशो मे सदस्य इति सदस्यं ॥ स वृतो जपेत् । महन्मेऽवोचो भर्गो मेऽवोचो भगो मेऽवोचो यशो मेऽवोच स्तोमं मेऽवोचः क्लृप्तिं मेऽवोच स्तृप्तिं मेऽवोचो भुक्तिं मेऽवोचः सर्वं मेऽवोच इति ॥ ९ ॥**

अ०—'आदित्यो मे०ध्वर्युं' हा मंत्र ह्मणून अध्वर्यूची नेमणूक करावी, 'पर्जन्यो मे० द्गातारं' या मंत्रानें उद्गात्याची नेमणूक करावी, 'आपो मे होत्रा शंसिन' या मंत्रानें होत्रक ह्मणजे मुख्य चार ऋत्विजांखेरीज बारा ऋत्विज नेमावे, 'रश्मयोमे० ध्वर्यून्' या मंत्रानें चमसाध्वर्यू ह्मणजे अध्वर्यूचे साह्य करणारे वरावे, आणि 'आकाशो मे० सदस्या,' या मंत्रानें सदस्य वरावा

नंतर शेवटीं वरलेल्या ऋत्विजांनीं, 'महन्मेऽवोचो भर्गो मे॰ सर्वं मे वोचः' हा मंत्र ह्मणावा.

* ज्याचें वरण (नेमणुक) होईल त्यानीं लागलाच जप करावा.

सू॰-जपित्वाऽग्निष्टे होता स ते होता होतारं ते मानुष इति होता प्रतिजानीते ॥१०॥

अ॰—जप करून 'अग्निष्टेहोता॰ जानीते' हा मंत्र होत्यानें ह्मणून वरणस्वीकार (नेमणूक पतकरणें) करावा.

सू॰-चंद्रमास्ते ब्रह्मा स ते ब्रह्मा ॥ ११ ॥

अ॰—'चंद्रमास्ते ब्रह्मा स ते ब्रह्मा' हा मंत्र ह्मणून ब्रह्मत्वाचा स्वीकार करावा.

सू॰-एवमितरे यथादेशं तन्मामवतु तन्माविशतु तेन भुक्षिषीयेति च याजयिष्यन् ॥१२॥

अ॰—याप्रमाणेंच मंत्र जोडून ह्मणावे, आणि सोम यागांगभूत वरण असेल तर 'तन्मामवतु॰' हा मंत्र ह्मणावा; परंतु अग्न्याधानांग वरणांत हा मंत्र ह्मणूंनये.

सू॰-न्यस्तमार्त्विज्यमकार्यं ॥ १३ ॥

अ॰—विवाद्यांनीं टाकलेलें उपाध्यिक ऋत्विजांनी करूंनये.

सू॰-अहीनस्य नीचदक्षिणस्य ॥ १४ ॥ व्याधितस्यातुरस्य ॥ १५ ॥ यक्ष्मगृहीतस्य ॥ १६ ॥ अनुदेश्यभिशस्तस्य ॥ १७ ॥ क्षिप्रयोनेरितिचैतेषां ॥ १८ ॥

अ॰—बहुत दिवस लागणाऱ्या यज्ञांत थोडी दक्षिणा देणाराचें,

रोग्याचें, हातरूणावर पडलेल्याचें, क्षयरोग्याचें, एका देशांत राहणारानें हा दोषी आहे असें सांगितलें असल्यास त्या दोषी मनुष्याचें, ज्याची आई जारिणी असेल त्याचें किंवा अशाच प्रकारच्या इतर मनुष्यांचें पौरोहित्य (उपाध्रिक) करूंनये.

सू०-सोमप्रवाकं परिपृच्छेत् को यज्ञः क ऋत्विजः का दक्षिणेति ॥ १९ ॥

अ०—यज्ञाला जाण्यापूर्वी, कोणता यज्ञ आहे, तेथें ऋत्विज कोण आहेत आणि तेथें दक्षिणा काय आहे असें यज्ञानें आमंत्रण सांगणाराला विचारावें.

सू०-कल्याणैः सह संप्रयोगः ॥ २० ॥

अ०—वर सांगितलेले सर्व प्रकार उत्तम व अनुकूल असतील तर आमंत्रण घ्यावें.

सू०-न मांसमश्नीयुर्न स्त्रियमुपेयुराक्रतोरपवर्गात् ॥ २१ ॥

अ०—यज्ञाचें आमंत्रण घेतल्यापासून यज्ञ समाप्त होईपर्यंत मांस भक्षण करूंनये व स्त्रीगमन करूंनये.

सू०-एतेनाग्ने ब्रह्मणा वावृधस्वेति दक्षिणाग्नावाज्याहुतिं हुत्वा यथार्थं प्रव्रजेत् ॥ २२ ॥

अ०—ऋत्विज अग्निहोत्री असेल तर त्याणें यज्ञाचे शेवटीं 'एतेनाग्ने'० (अष्ट. १ अ० २ व० ३९) या ऋचेनें, आपल्या दक्षिणाग्नींत तुपाची आहुती देऊन आपआपले घरीं जावें.

* आहुती दिल्यानंतर वरचे नियम पाळूं नयेत.

सू०-एवमनाहिताग्निगृह्ये इमामग्ने शरणिं मीमृषो न इत्येतयर्चा ॥ २३ ॥

अ०—याप्रमाणेंच ऋत्विज अग्निहोत्री नसेल तर गृह्याग्नींत तुपाची आहुती, 'इमामग्ने शरणिं'० (अष्ट १ अ० २ व० ३५) या ऋचेनें द्यावी.

* ज्याचें लग्न झालें नाहीं त्यानेंही या ऋचेनेंच लौकिकाग्नींत तुपाची आहुती द्यावी.

---

## खण्ड २४.

**सूत्र-ऋत्विजो वृत्वा मधुपर्कमाहरेत् ॥ १ ॥**

अ०—ऋत्विग्वरण करून त्यांना मधुपर्कपूजा द्यावी.

**सू०-स्नातकायोपस्थिताय ॥ २ ॥ राज्ञेच ॥ ३ ॥ आचार्यश्वशुरपितृव्यमातुलानांच ॥४॥**

अ०—घरीं आलेला स्नातक, राजा, आचार्य, सासरा, चुलता किंवा मामा यांनां मधुपर्कपूजा द्यावी.

**सू०-दधनि मध्वानीय ॥ ५ ॥ सर्पिर्वाम-ध्वलाभे ॥ ६ ॥**

अ०—दह्यांत मध घालावा, मध नसेल तर तूप घालावें.

**सू०-विष्टरः पाद्यमर्घ्यमाचमनीयं मधुपर्को गौरित्येतेषां त्रिस्त्रिरेकैकं वेदयंते ॥ ७ ॥**

अ०—मधुपर्कांत आसन, पाद्य, अर्घ्य, आचमनीय, मधुपर्क आणि गाय हे उपचार आहेत. या उपचारांतील प्रत्येक उपचाराचें तीन तीन वेळ निवेदन करावें.

**सू०-अहं वर्ष्म सजातानां विद्युतामिवसूर्यः ॥ इदं तमधितिष्ठामि यो मा कश्चाभिदास-**

तीत्युदगग्रेविष्टर उपविशेत् आक्रम्य वा ॥ ८ ॥

अ०—'अहं वर्ष्म सजातानां० सति' हा मंत्र ह्मणून उत्तराग्र आसनावर बसावें किंवा आसन पायाखालीं घ्यावें.

सू०—पादौ प्रक्षालयीत दक्षिणमग्रे ब्राह्मणाय प्रयच्छेत् ॥ ९ ॥ सव्यं शूद्राय ॥ १० ॥

अ०—यजमानानें दोन्ही पाय धुवावे; ब्राह्मण यजमान हा पाय धुणारा असेल तर उजवा पाय प्रथम पुढें करावा आणि शूद्र यजमान पाय धुणारा असेल तर प्रथम डावा पाय पुढें करावा.

सू०—प्रक्षालितपादोऽर्घ्यमंजलिना प्रतिगृह्य ॥ ११ ॥

अ०—पाय धुतल्यानंतर ओंजळींत अर्घ्य घ्यावा.

सू०—अथाऽऽचमनीयेनान्वाचामति अमृतोपस्तरणमसीति ॥ १२ ॥

अ०—नंतर आचमनीय उदकानें 'अमृतोपस्तरणमसि' हा मंत्र ह्मणून आचमन करावें.

सू०—मधुपर्कमाह्रिमाणमीक्षेत मित्रस्यत्वा चक्षुषा प्रतीक्ष इति ॥ १३ ॥

अ०—मधुपर्क आणला असतां त्याकडे 'मित्रस्यत्वा चक्षुषा प्रतीक्षे०' हा मंत्र ह्मणून पहावें.

सू०—देवस्य त्वा सवितुःप्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यां प्रतिगृण्हामीति तदंजलिनाप्रतिगृह्य मधुवाता ऋतायत इति तृचेनावेक्ष्यानामिकया चांगुष्ठेन च त्रिः प्रदक्षिणमालोड्य, वसवस्त्वा

**गायत्रेण च्छंदसाभक्षयंत्विति पुरस्तान्निमार्ष्टि ॥ १४ ॥**

अ०—'देवस्यत्वा० हस्ताभ्यां' हा मंत्र ह्मणून ओंजळींत मधुपर्क घ्यावा व त्याजकडे मधुवाताऋतायते० (अष्ट० १ अ. ६ वर्ग १८) या तीन ऋचांनीं अवलोकन करून अनामिका व अंगुष्ठ यांनीं तीन वेळ प्रदक्षिण आलोडन करून 'वसवस्त्वा गायत्रेण छंदसा भक्षयंतु' हा मंत्र ह्मणून पूर्वेस निमार्जन करावें (शिंपडावें).

**सू०-रुद्रास्त्वा त्रैष्टुभेन च्छंदसा भक्षयंत्विति दक्षिणतः ॥ आदित्यास्त्वा जागतेन च्छंदसा भक्षयंत्विति पश्चात् ॥ विश्वे त्वा देवा आनुष्टुभेनच्छंदसा भक्षयंत्वित्युत्तरतः ॥ भूतेभ्यस्त्वेतिमध्यात् त्रिरुन्नृह्य ॥ १५ ॥**

अ०—'रुद्रास्त्वा त्रैष्टुभेन छंदसा भक्षयंतु' या मंत्रानें दक्षिणेस, 'आदित्यास्त्वा जागतेन च्छंदसा भक्षयंतु' या मंत्रानें पश्चिमेस आणि 'विश्वे त्वा देवा आनुष्टुभेन च्छंदसा भक्षयंतु' या मंत्रानें उत्तरेस, ह्याप्रमाणें निमार्जन करावें; आणि शेवटीं 'भूतेभ्यस्त्वा०' हा मंत्र ह्मणून मध्यांतून तीन वेळ घेऊन तीन वेळां ऊर्ध्व निमार्जन करावें.

* अथवा तो मधुपर्क 'भूतेभ्यस्त्वा०' हा मंत्र ह्मणून तीन भाग करून तीन भांड्यांत ठेवावा, असाही अर्थ कोणी करतात.

**सू०-विराजो दोहोऽसीति प्रथमं प्राश्नीयात् विराजो दोहमशीयेति द्वितीयं मयि दोह्रः पद्यायै विराज इति तृतीयं ॥ १६ ॥**

अ०—'विराजो दोहोऽसि' हा मंत्र ह्मणून पहिला भाग प्यावा; 'विराजो दोहमशीय' हा मंत्र ह्मणून दुसरा भाग प्यावा आणि 'मयिदोहः पद्यायै विराजः' या मंत्रानें तिसरा भाग प्यावा.

**सू०–न सर्वं ॥ १७ ॥**

अ०—परंतु सर्व मधुपर्क पिऊंनये.

**सू०–न तृप्तिं गच्छेत् ॥ १८ ॥**

अ०—कारण तो पिण्यापासून तृप्ति होऊं नये.

**सू०–ब्राह्मणायोदङ्ङुच्छिष्टं प्रयच्छेत्. अलाभेप्सु ॥ १९ ॥ सर्वं वा ॥ २० ॥**

अ०—नंतर उत्तरेकडे तोंड करून उच्छिष्ट मधुपर्क ब्राह्मणाला द्यावा; ब्राह्मण न मिळेल तर उदकांत टाकावा अथवा सर्वही आपणच प्यावा.

**सू०–अथाचमनीये नान्वाचामति; अमृताऽपिधानमसीति ॥ २१ ॥**

अ०—नंतर 'अमृतापिधानमसि' हा मंत्र ह्मणून शेवटलें आचमन करावें.

**सू०–सत्यं यशः श्रीर्मयि श्रीः श्रयतामिति द्वितीयं ॥ २२ ॥**

अ०—त्यावर पुन्हां 'सत्यं यशः श्रीर्मयि श्रीःश्रयतां' हा मंत्र ह्मणून दुसऱ्यानें आचमन करावें.

**सू०–आचांतोदकाय गां वेदयंते ॥ २३ ॥**

अ०—आचमन केलेल्याला गाय निवेदन करावी.

**सू०–हतो मे पाप्मा पाप्मा मे हत इति जपित्वोंऽकुरुतेति कारयिष्यन् ॥ २४ ॥**

अ०—प्रतिग्रहकर्त्याचे मनांत गाय मारण्याची असेल तर 'हतो मे पाप्मा पाप्मा मे हनः' हा मंत्र जपावा आणि 'ओंकुरुत' ह्मणून मारण्यास आज्ञा द्यावी.

**सू०—माता रुद्राणां दुहिता वसूनामिति जपित्वो-मुत्सृजतेत्युत्स्रक्ष्यन् ॥ २५ ॥**

अ०—अथवा गाईचा उत्सर्ग करण्याची इच्छा असेल तर 'माता रुद्राणां दुहिता० वधिष्ठ' (अष्ट० ६ अ. ७ वर्ग ८) या ऋचेचा जप करून, 'ओमुत्सृजत' असें ह्मणून उत्सर्ग करण्यास सांगावें.

**सू०—नामांसो मधुपर्को भवति भवति ॥ २६ ॥**

अ०—मांसाखेरीज मधुपर्क होत नाहीं.

* उत्सर्ग करण्याचे पक्षीं दुसऱ्या मांसानें तरी भोजन घालावें.

---

# अध्याय २.

## खण्ड १.

**सूत्र—श्रावण्यां पौर्णमास्यां श्रवणाकर्म ॥ १ ॥**

अ०—श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला 'श्रवणाकर्म' नांवाचें कर्म करावें.

* याच दिवशीं 'सर्पबलि' नांवाचें कर्म करावें.

**सू०—अक्षतसक्तूनां नवं कलशं पूरयित्वा दर्वीं च बलिहरणीं नवे शिक्ये निदधाति ॥ २ ॥ अक्षतधानाः कृत्वा सर्पिषाऽर्धा अनक्ति ॥ ३ ॥**

अ०——जवाच्या सातूनें नवा कलश (तांब्या वगैरे भांडें) भरून व बलि देण्याजोगी पळी अशीं दोन्हीं नव्या शिक्यावर ठेवावीं आणि जवाच्या लाह्या करून त्यांपैकीं अर्ध्या लाह्यांना तूप लावावें.

* दुसऱ्या भांड्यांत अर्ध्या लाह्या ठेवून दुसऱ्या अर्ध्या लाह्यांना अ-संस्कृत तूप लावावें. शिक्यावर ठेवणें वगैरे सर्व दिवसा करून ठेवावें.

**सू०-अस्तमिते स्थालीपाकं श्रपयित्वैकक-पालं च पुरोडाशं** अग्ने नय सुपथा राये अस्मानिति **च-तसृभिः प्रत्यृचं हुत्वा पाणिनैककपालं अच्यु-ताय भौमाय स्वाहेति ॥ ४ ॥ अविप्लुतः स्या-दाविः पृष्ठो वा ॥ ५ ॥**

अ०——सूर्यास्त झाला ह्मणजे स्थालीपाक व पुरोडाश द्रव्य श्रपण करून एका कपालावर (खापरीवर) पुरोडाश (घोड्याचे खुरा एवढा व कांसवासारखा तांदुळाचे पिठाचा गोळा) भाजून तुपांत सगळा किंवा पाठ उघडी राहील इतका बुडवून ठेवावा. नंतर **'अग्ने नय सुपथा राये अस्मा०'** (अष्ट २ अ० ९। १०) या चार ऋचांनीं प्रति ऋचेस होम करून त्या पुरोडाशाची **'अ-च्युताय भौमाय स्वाहा'** हा मंत्र ह्मणून हातांनीं आहुती द्यावी.

* पुरोडाश द्रव्यालाही स्थालीपाकाप्रमाणेंच निर्वापप्रोक्षण संस्कार करावा. सातू व लाह्या ह्या लौकिकाग्नीवर केलेल्या असाव्या. उपस्तरण व अभिघार डाव्या हातांनीं उजव्या हाताला करावें. त्या सगळ्या पुरोडाशाचा होम तो न तोडतां करावा. या योगानें अवदानधर्म ह्मणजे दोन वेळां किंवा पांच वेळां घेण्याचा नियम या पुरोडाशाला लागू होत नाहीं.

**सू०-**मा नो अग्नेऽव सृजो अघायेत्येन **माशयेना-भिजुहोति ॥ ६ ॥**

अ०—ज्या तुपांत पुरोडाश बुडवून ठेविला असेल त्या तुपाचा होम 'मानो अग्ने०' ( अष्ट. २ अ. ५ वर्ग १० ) या ऋचेनें त्या पुरोडाशावरच करावा.

* हा होम करणें तो स्रुच्यानें करावा.

**सू०—शं नो भवंतु वाजिनो हवेष्वित्यक्ता धाना अंजलिना ॥ ७ ॥**

अ०—'शंनो भवंतु'० ( अष्ट. ५ अ० ४ वर्ग ९ ) ही ऋचा ह्मणून तूप लावलेल्या लाह्यांचा ओंजळीनें होम करावा.

* उपस्तरण व प्रत्यभिघार हे इतर मनुष्यानें करावे व लाह्यांनीं ओंजळ भरणें तीही दुसऱ्याकडूनच भरावी.

**सू०—अमात्येभ्य इतरा दद्यात् ॥ ८ ॥**

अ०—तूप न लावलेल्या लाह्या पुत्रादिकांना द्याव्या.

* नंतर स्विष्टकृदाहुति देऊन प्रायश्चित होम समाप्त करावा.

**सू०—कलशात्सक्तूनां दर्वीं पूरयित्वा प्रागुपनिष्क्रम्य शुचौ देशेऽपोऽवनिनीय. सर्पदेवजनेभ्यः स्वाहेतिहुत्वा नमस्करोति ये सर्पाः पार्थिवा ये आंतरिक्ष्या ये दिव्या ये दिश्यास्तेभ्य इमं बलिमाहार्षं तेभ्य इमं बलि मुपाकरोमीति ॥ ९ ॥**

अ०—त्या कलशांतून सातूनें पळी भरून घेऊन घराबाहेर जवळच पूर्व दिशेकडे जाऊन शुद्ध जागेवर पाणी शिंपडावें व '**सर्पदेवजनेभ्यः स्वाहा**' हा मंत्र ह्मणून त्या जागेवर त्या सातूचा बली द्यावा. नंतर '**ये सर्पाः पार्थिवा० मुपाकरोमि**' हा मंत्र ह्मणून सर्पदेवतेला नमस्कार करावा.

सू०-प्रदक्षिणं परीत्य पश्चाद्बलेरुपविश्य; सर्पोऽसि सर्पतां सर्पाणामधिपतिरस्यन्नेन मनुष्यांस्त्रायसे ऽपूपेन सर्पान् यज्ञेन देवांस्त्वयिमा संतं त्वयि संतः सर्पा माहिंसिषुर्ध्रुवांते परिददामीति ॥ १० ॥

अ०—नंतर त्या बलीला प्रदक्षिणा घालून त्यांच्या पश्चिमेस बसावें आणि 'सर्पोऽसी सर्पतां० ददामि' हा मंत्र ह्मणावा.

* हा मंत्र ह्मणणें तो हळू ह्मणावा.

सू०-ध्रुवामुंते ध्रुवामुंत इत्यमात्याननुपूर्वं ॥ ११ ॥

अ०—'ध्रुवामुंते परिददामि' हा मंत्र ह्मणत जावा आणि पुत्रादिकांचें ज्येष्ठक्रमानें सर्पदेवतेला दान करावें. दान करतेवेळेस या मंत्रांतील 'अमुं' या पदाचे ठिकाणीं पुत्रादिकांचें द्वितीयांत नांव घेत जावें. जसें—'ध्रुवदेवदत्तं ते परिददामि'

सू०-ध्रुवमांते परिददामीत्यात्मानमंततः ॥ १२ ॥

अ०—'ध्रुवमांते परिददामि' हा मंत्र ह्मणून शेवटीं आपलें दान करावें.

सू०-नैनमंतराव्यवेयुरा परिदानात् ॥ १३ ॥

अ०—बलीच्या व आपल्या मधून कोणीं परिदान (वरील मंत्रांनीं आपलें दान) होईपर्यंत जाऊनये.

सू०-सर्पदेवजनेभ्यः स्वाहेति सायंप्रातर्वलिं हरेदाप्रत्यवरोहणात् ॥ १४ ॥

अ०—प्रत्यवरोहणापर्यंत, (गृह्य० अ० २ खंड ३ यांत सांगितलेलें कर्म ज्या दिवशीं करावयाचें त्या दिवसापर्यंत) दररोज सायंकाळीं आणि प्रातःकाळीं सातूचा बलि 'सर्पदेवजनेभ्यः स्वाहा' हा मंत्र ह्मणून देत जावा.

* गृह्य. अ. २ खंड १ यांत 'नमस्करोति' येथून ते 'आत्मानमंततः' येथपर्यंत सांगितलेलें कर्म दररोज करूंनये व दरवेळेस बलि देणें तो कलशांतून सातूनें पळी भरून घेऊन देत जावा.

## सू०-प्रसंख्याय हैके तावतो बलींस्तदहरेवोपहरन्ति ॥ १५ ॥

अ०—कोणी ऋषी असें ह्मणतात कीं, श्रावण वद्य प्रतिपदेपासून प्रत्यवरोहण दिवसापर्यंत किती सायंकाळ व प्रातःकाळ येतात ते मोजून तितके बली तेच दिवशीं द्यावे.

---o---

### खण्ड २.

## सूत्र-आश्वयुज्यामाश्वयुजी कर्म ॥ १ ॥

अ०—आश्विन शुद्ध १५ ला 'आश्वयुजी' या नांवाचें कर्म करावें.

## सू०-निवेशनमलंकृत्य स्नाताः शुचिवाससः पशुपतये स्थालीपाकं निरुप्य जुहुयुः पशुपतये शिवाय शंकराय पृषातकाय स्वाहेति ॥ २ ॥

अ०—घर सुशोभित करावें; स्नान करून पांढरीं वस्त्रें नेसावीं, आणि यजमानानें पशुपति देवतेला देण्याकरितां तांदूळ वैरून स्थालीपाक करावा; व 'पशुपतये शिवाय शंकराय पृषातकाय स्वाहा' या मंत्रानें त्याचा होम करावा.

* होम करतेवेळेस गृह्याग्निमान् पुत्रादिकांनीं अन्वारब्ध असावें व याखेरीज जेथें स्थालीपाक व मंत्र सांगितले असून देवतेचें नांव सांगितलें नाहीं तेथें निर्वाप व प्रोक्षण तूष्णीं करावें.

**सू०-पृषातकमंजलिनाजुहुयात् ऊनं मे पूर्यतां पूर्णं मे मोपसदत् पृषातकाय स्वाहेति ॥ ३ ॥**

अ०—पृषातक ह्मणजे तूप घातलेलें दूध याचा होम. ओंजळीनें '**ऊनं मे पूर्यतां पूर्णं मे मोपसदत् पृषातकाय स्वाहा**' हा मंत्र ह्मणून करावा.

**सू०-सजूर्ऋतुभिः सजूर्विधाभिः सजूरिंद्राग्निभ्यां स्वाहा; सजूर्ऋतुभिः सजूर्विधाभिः सजूर्विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा; सजूर्ऋतुभिः सजूर्विधाभिः सजूर्द्यावापृथिवीभ्यां स्वाहेत्याहिताग्नेराग्रयणः स्थालीपाकः ॥ ४ ॥**

अ०—(१) '**सजूर्ऋतुभिः स० रिंद्राग्निभ्यां स्वाहा,**' (२) '**सजूर्ऋ० विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा**' आणि (३) **सजूर्ऋतु० द्यावापृथिवीभ्यां स्वाहा**' या तीन मंत्रांनीं अग्निहोत्र्यानें दर मंत्रास नव्या तांदुळाच्या स्थालीपाकाचा होम करावा.

* अग्निहोत्र्यानें हा आग्रयणस्थालीपाकहोम आपत्कालीं मात्र करावा.

**सू०-अनाहिताग्नेरपिशालाग्नौ ॥ ५ ॥**

अ०—गृह्याग्निमान् पुरुषानेंही गृह्याग्नीवर आग्रयणस्थाली पाक करावा.

---o---

## खण्ड ३.

सूत्र-मार्गशीर्ष्यां प्रत्यवरोहणं चतुर्दश्यां ॥ १ ॥ पौर्णमास्यां वा ॥ २ ॥

अ०—मार्गशीर्ष शुद्ध १४ शीला किंवा १५ मेला प्रत्यवरोहण कर्म करावें.

सू०-निवेशनं पुनर्नवीकृत्य लेपनस्तरणोपस्तरणैरस्तमिते पायसस्य जुहुयुरपश्वेतपदा जहि पूर्वेण चापरेण च ॥ सप्त च वारुणीरिमाः सर्वाश्च राजबान्धवीः स्वाहा न वै श्वेतस्याभ्यागारेऽहिर्जघान किंचन ॥ श्वेताय वैदार्वाय नमः स्वाहेति ॥ ३ ॥

अ०—ह्या करितां, पुन्हां घर नव्यासारखें भिंती वगैरे लिंपून, छत देऊन, भुई नीट करून करावें. सूर्यास्त झाल्यानंतर 'अपश्वेतपदा० जहि नमस्वाहा' या दोन मंत्रांनीं प्रतिमंत्रास दुधांत शिजविलेल्या भाताच्या आहुती द्याव्या.

* होम करतांना गृह्याग्निमान् पुत्रादिकांनीं अन्वारब्ध असावें.

सू०-नात्र सौविष्टकृत् ॥ ४ ॥

अ०—या कर्मांत स्विष्टकृदाहुती देऊं नये.

सू०-अभयं नः प्राजापत्येभ्यो भूयादित्यग्निमीक्षमाणो जपति; शिवो नः सुमना भवेति हेमन्तं मनसा ध्यायात् ॥ ५ ॥

अ०—अग्नीकडे, 'अभयं नः प्राजापत्येभ्यो भूयात्' हा

मंत्र जपून पहावें व 'शिवो नः सुमना भव' हा मंत्र ह्मणावा; नंतर अंतःकरणपूर्वक 'हेमंत' या शब्दाचें ध्यान करावें.

**सू०-पश्चादग्नेःस्वस्तरः स्वास्तीर्णस्तस्मिन्नुपाविश्य; स्योनापृथिवि भवेति जपित्वा संविशेत्सामात्यः प्राक् शिरा उदङ्मुखः ॥ ६ ॥**

अ०—अग्नीचे पश्चिमेस आपला बिछाना आपण अंथरून त्यावर बसावें व 'स्योना पृथिवि भवा०' ( १।२।६ ) ही ऋचा जपून पुत्रादिकांसहित आपण पूर्वेस डोकें व उत्तरेस तोंड करून निजावें.

**सू०-यथावकाशमितरे ॥ ७ ॥ ज्यायान् ज्यायान्वा नंतरः ॥ ८ ॥**

अ०—पुत्रादिकांनीं अवकाशानुरूप निजावें अथवा जो जो ज्या ज्यापेक्षां वडील असेल त्यानें त्यानें कर्मकर्त्याचे जवळ निजावें.

**सू०-मंत्रविदो मंत्रान् जपेयुः ॥ ९ ॥**

अ०—मंत्रवेत्यांनीं ह्मणजे स्त्री बाल व्यतिरिक्त सर्वांनीं 'स्योना०' —या ऋचेपासून जे या खंडांत सांगितले ते सर्व मंत्र जपावे.

**सू०-संहाय; अतो देवा अवंतुन इतित्रिः ॥ १० ॥**

अ०—निजून उठून, 'अतो देवा०' ( १।२।७ ) ह्या * ऋचा तीन वेळ ह्मणाव्या.

* ही ऋचा ह्मणणें ती पूर्वेस तोंड करून ह्मणावी.

**सू०--एतां दक्षिणामुखाः प्रत्यङ्मुखा उदङ्मुखाश्चतुर्थं ॥ ११ ॥**

अ०—'अतो देवा अवं०' ( अष्ट० १ अ. २ वर्ग ७ ) या ऋचेचा पहिला पाद दक्षिणेस तोंड करून, दुसरा पाद पश्चिमेस

तोंड करून आणि तिसरा पाद उत्तरेस तोंड करून ह्मणावा.

* नंतर कर्म समाप्त करून दररोजच्या ठिकाणीं निजावें.

**सू०-संहाय सौर्याणि स्वस्त्ययनानि च जपित्वाऽन्नं संस्कृत्य ब्राह्मणान् भोजयित्वा स्वस्त्ययनं वाचयीत॥ २१ ॥**

अ०—दुसरे दिवशीं सकाळीं सगळ्यांनीं एका ठिकाणीं जमून सौर्य नांवाचे मंत्र व '**स्वस्ति**' हा शब्द ज्या मंत्रांत आहे ते मंत्र ह्मणून अन्न शिजवून ब्राह्मणाला जेवावयाला घालावें व त्यांजकडून स्वस्तिवाचन करावें.

* सौर्य व स्वस्त्ययन मंत्र—'**उदुत्यं जातवेदसं०**' ऋचा ९ अथवा १२ (१।४।७) '**चित्रंदेवाना**'० ऋचा ६, (१।८ ७), '**नमोमित्रस्यव**'० ऋचा १२ (७।८। १२), '**सूर्योनोदिवस्पातु०**' ऋचा ९ (८।८।१६), '**आनोभद्रा**'० ऋचा १० (१।६।१९), '**स्वस्तिनोमिमीता**'० ऋचा ९ (१।६।१६), **परावनोयेदिधिषंत**'० ऋचा १७, (८।२।३)

---

खण्ड ४.

**सूत्र-हेमंतशिशिरयोश्चतुर्णामपरपक्षाणामष्टमीष्वष्टकाः॥ १ ॥ एकस्यां वा ॥ २ ॥**

अ०—मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन यांच्या चारही वद्य पक्षांत दर अष्टमीस अष्टकाकर्म करावें, अथवा यांपैकीं एकाच अष्टमीला करावें.

**सू०-पूर्वेद्युः पितृभ्यो दद्यात् ॥ ३ ॥**

अ०—या कर्मप्रारंभाचे पूर्वदिवशीं (सप्तमीला) पितरांचे उद्देशानें श्राद्ध करावें.

* पितर शब्दानें पितृत्रयी घ्यावी व हें श्राद्ध पिंडपितृयज्ञाप्रमाणें करावें.

**सू०-ओदनं कृसरं पायसं ॥ ४ ॥ चतुःशरावस्य वाऽपूपान् ॥ ५ ॥**

अ०—तीळ मिश्र केलेला भात व दुधांत शिजविलेला भात अथवा अपूप हे तीन किंवा चार शेराचे करावे.

* हे भात गृह्याग्निवर शिजवावे आणि अपूप करणें ते लौकिकाग्निवर करावे.

**सू०-**उदीरतामवर उत्परास **इत्यष्टाभिर्हुत्वा यावतीभिर्वा कामयीत ॥ ६ ॥**

अ०—'उदीरतामवर०' (७।६।१७) या आठ ऋचांनीं होम करावा; अथवा इच्छा असेल तर चौदा ऋचांनीं होम करावा.

* आणि नंतर श्राद्ध समाप्त करावें.

**सू०-अथ श्वो भूतेऽष्टकाः पशुना स्थालीपाकेन च ॥ ७ ॥**

अ०—नंतर दुसरे दिवशीं अष्टमीला पशूनें अथवा स्थालीपाकानें अष्टकाकर्म करावें.

**सू०-अप्यनडुहो यवसमाहरेत् ॥ ८ ॥ अग्निना वा कक्षमुपोषेत् ॥ ९ ॥ एषा मेऽष्टकेति ॥ १० ॥**

अ०—वर सांगितल्याप्रमाणें अष्टकाकर्म न होईल तर बैलाला

गवत घालावें, अथवा अग्नींत गवत जाळावें; हें करतांना 'ही माझी अष्टका' असें मनांत आणावें.

**सू०—न त्वेवानष्टकस्यात् ॥ ११ ॥**

अ०—कोणत्याही पक्षानें अष्टकाकर्म केल्यावांचून राहूं नये.

**सू०—तां हैके वैश्वदेवीं ब्रुवत आग्नेयीमेके सौर्यामेके प्राजापत्यामेके रात्रिदेवतामेके नक्षत्रदेवतामेके ऋतुदेवतामेके पितृदेवतामेके पशुदेवतामेके ॥ १२ ॥**

अ०—अष्टकेची देवता विश्वेदेव आहे असें कोणी ऋषी ह्मणतात व तें आश्वलायनालाही मान्य आहे; कोणी ऋषी अग्नि ही देवता, कोणी सूर्य देवता, कोणी प्रजापति देवता, कोणी रात्रि देवता, कोणी नक्षत्र देवता, कोणी ऋतु देवता, कोणी पितृदेवता व कोणी पशुदेवता असें ह्मणतात.

**सू०—पशुकल्पेन पशुं संज्ञप्य प्रोक्षणोपाकरणवर्जं वपामुत्खिद्य जुहुयाद् वह वपां जातवेदः पितृभ्यो यत्रैनान्वेत्थ निहिताः पराके मेदसः कुल्या उपैनान् स्रवन्तु सत्या एता आशिषः सन्तु सर्वाः स्वाहेति ॥ १३ ॥**

अ०—गृह्यसू० अ. १ खंड ११ यांत सांगितलेल्या पशुविधीप्रमाणें प्रोक्षण व उपाकरण खेरीज करून पशूला मारून वपा काढून तिचा 'वह०' या मंत्रानें होम करावा.

**सू०—अथावदानानां स्थालीपाकस्य च** अग्ने नय सुपथा राये अस्मानिति **द्वे ॥ ग्रीष्मो हेमन्त ऋतवः शिवा नो वर्षाः शिवा अभया शरं**

नः ॥ संवत्सरोऽधिपातिः प्राणदोनोऽहोरात्रे कृणुतां दीर्घमायुः स्वाहा ॥ शान्ता पृथिवी शिवमन्तरिक्षं द्यौर्नो देव्यभयं नो अस्तु शिवा दिशः प्रदिश उद्दिशो न आपो विद्युतः परिपान्तु सर्वतः स्वाहा ॥ आपो मरीचीः प्रवहन्तु नो धियो धाता समुद्रो वहन्तु पापं, भूतं भविष्यदभयं विश्वमस्तु मे ब्रह्माधिगुप्तः स्वाराक्षराणिस्वाहा ॥ विश्वे आदित्या वसवश्च देवा रुद्रो गोप्तारो मरुतः सदन्तु। ऊर्जं प्रजाममृतं पिबमानः प्रजापतिर्मयि परमेष्ठी दधातुः स्वाहा ॥ प्रजापते न त्वदेतान्यन्यः ॥ १४ ॥

अ०—पश्वंगभूत स्थालीपाकाचा किंवा दुसऱ्या स्थालीपाकाचा होम, 'अग्ने नय सुपथा०' (अष्ट २ अ० ५ वर्ग १०) या दोन ऋचांनीं, (१) 'ग्रीष्मोहेमंत०', (२) 'शांतापृथ्वी०' (३) 'आपोमरीचीः प्र०' आणि (४) 'विश्वआदित्या०' या चार मंत्रांनीं व 'प्रजापतेन०' (अष्ट० ८ अ० ७ व ४) या ऋचेनें प्रतिमंत्रास करावा.

## सू०-सौविष्ट कृत्यष्टमी ॥ १५ ॥

अ०—आणि स्विष्टकृदाहुती आठवी द्यावी.

## सू०-ब्राह्मणान् भोजयेदित्युक्तं ॥ १६ ॥

अ०—ब्राह्मणांस भोजन घालावें असें जें, (गृह्य० अ. २ खंड ३।१२) यांत सांगितलें आहे त्याप्रमाणें करावें.

## खण्ड ५.

**सूत्र-अपरेद्युरन्वष्टक्यं ॥ १ ॥**

अ०—दुसऱ्या दिवशीं ( नवमीला ) अन्वष्टक्य नांवाचें कर्म करावें.

**सू०-तस्यैव मांसस्य प्रकल्प्य दक्षिणाप्रवणेऽग्निमुपसमाधाय परिश्रित्योत्तरतः परिश्रितस्यद्वारं कृत्वा समूलं बर्हिस्त्रिरपसलैरविधून्वन् परिस्तीर्य हवींष्यासादयेदोदनं कृसरं पायसं दधिमन्थान् मधुमन्थांश्च ॥ २ ॥**

अ०—त्या पशूचेंच ह्मणजे अष्टमीला मारलेल्या पशूचेंच मांस शिजवून दक्षिणेकडे उतरत्या अशा जागेवर अग्नीचें उपसमाधान करून त्याचे सभोंवतीं पडदा बांधावा व उत्तरेकडे द्वार करून समूळ दर्भमुष्टि घ्यावी; नंतर त्या समूळ दर्भांनीं अंगकांप न होतां तीनदां परिस्तरण घालून तीळमिश्रभात, दुधांत शिजविलेला भात व तसाच दह्यांत कालविलेला सातू आणि मधांत कालविलेला सातू हीं हविद्रव्यें ठेवावीं.

**सू०-पिण्डपितृयज्ञकल्पेन ॥ ३ ॥**

अ०—हें कर्म, श्रौतसूत्र अध्याय २ खंड ६ यांत सांगितलेल्या पिंडपितृयज्ञाप्रमाणें करावें.

**सू०-हुत्वा मधुमन्थवर्जं पितृभ्यो दद्यात् ॥ ४ ॥ स्त्रीभ्यश्च सुरा चाचाममित्यधिकं ॥ ५ ॥**

अ०—मधांत कालविलेल्या सातूखेरीज इतर द्रव्यानें होम

करून पितृत्रयीला पिंड द्यावे व मातृत्रयीला सुरा व भाताची पेज हीं द्रव्यें द्यावीं.

* स्त्रियांच्या पिंडदानांत मधुमंथ, सुरा व पेज हीं द्रव्यें द्यावीं. व पितृत्रयीचे पिंडांत मधुमंथ द्यावा.

**सू०-कर्षूष्वेके द्वयोः षट्सु वा ॥ ६ ॥**

अ०---कोणी ऋषी २ कर्षूंत (खांचांत) अथवा ६ कर्षूंत पिंड द्यावे असें ह्मणतात.

* दोन कर्षू लांबोळ्या कराव्या व ६ करावयाच्या त्या वाटोळ्या कराव्या.

**सू०-पूर्वासु पितृभ्यो दद्यात् ॥ ७ ॥ अपरासु स्त्रीभ्यः ॥ ८ ॥**

अ०---प्रथम केलेल्या कर्षूंत अथवा रेघेवर पितृत्रयीला पिंड द्यावे आणि दुसऱ्यांनीं केलेल्या कर्षूंत किंवा रेघेवर मातृत्रयीला पिंड द्यावे.

**सू०-एतेन माघ्यावर्षं प्रोष्ठपद्या अपरपक्षे ॥ ९ ॥**

अ०---याप्रमाणें तीन दिवस भाद्रपद कृष्ण पक्षांत ७, ८ व ९ त्यादिवशीं 'माघ्यावर्ष' नांवाचें कर्म करावें.

**सू०-मासि मासि चैवं पितृभ्यो युक्षु प्रतिष्ठापयेत् ॥ १० ॥**

अ०---दरमहिन्याचे शुक्ल व कृष्ण पक्षांत १, ३, ५, ७, ९, ११, १३, १५, व ३० या तिथींला पितृत्रयीच्या उद्देशानें अन्वष्टक्याप्रमाणें कर्म करावें.

**सू०-नवावरान् भोजयेत् ॥ ११ ॥ अयुजो वा ॥ १२ ॥**

अ०—अन्वष्टक्यांत निकृष्ट नऊ ब्राह्मणांनां अथवा विषमसंख्याक ब्राह्मणांनां भोजन घालावें.

**सू०-युग्मान् वृद्धिपूर्त्तेषु ॥ १३ ॥ अयुग्मानितरेषु ॥ १४ ॥**

अ०—मांगलिक श्राद्धांत (नांदी श्राद्धांत) व पूर्तश्राद्धांत ह्मणजे घाट वगैरेच्या उत्सर्ग निमित्तक श्राद्धांत समसंख्याक ब्राह्मणांना व इतर श्राद्धांत विषम संख्याक ब्राह्मणांनां भोजन घालावें.

**सू०-प्रदक्षिणमुपचारो यवैस्तिलार्थः ॥ १५**

अ०—नांदी श्राद्धांत सव्य करून सर्व कर्म करावें. व तिळाचे ठिकाणीं जव घ्यावे.

---

## खण्ड ६.

**सूत्र-रथ मारोक्ष्यं नानापाणिभ्यां चक्रे अभिमृशेत् अहं ते पूर्वं पादावालभेद्बृहद्रथन्तरे ते चक्रे ॥ १ ॥ वामदेव्यमक्ष इत्यक्षाधिष्ठाने ॥ २ ॥**

अ०—रथांत बसणें असेल तेव्हां एकदम दोन्ही हातांनीं दोन्ही चाकांनां 'अहं ते पूर्वं चक्रे'० या मंत्रानें स्पर्श करावा व चाकाच्या मधल्या वाटोळ्या भोंकाला (तुंब्याला) 'वामदेव्यमक्षे' हा मंत्र ह्मणून स्पर्श करावा.

**सू०-दक्षिणपूर्वाभ्यामारोहेत् वायोष्ट्वावीर्येणारोहामीन्द्रस्यौजसाधिपत्येनेति ॥ ३ ॥**

अ०—प्रथम उजव्या पायानें 'वायोष्ट्वा वीर्येणारोहामीन्द्रस्यौजसाधिपत्येन' हा मंत्र ह्मणून चढावें.

**सू०-रश्मीन् संमृशेदरश्मिकान् वा दण्डेन; ब्रह्मणोवस्तेजसा संगृण्हामि सव्येन वस्तेजसा संगृण्हामीति ॥ ४ ॥**

अ०—घोड्याच्या दोऱ्यांला 'ब्रह्मणोव०गृण्हामि' हा मंत्र जागून स्पर्श करावा, अथवा दोऱ्या नसतील तर घोड्यांना काठीनें 'ब्रह्मणो०' हा मंत्र ह्मणून स्पर्श करावा.

**सू०-अभिप्रवर्तमानेषु जपेत् सहस्रसानिं वाजमभिवर्त्तस्व रथदेव प्रवह वनस्पते वीडुंगो हि भूया इति ॥ ५ ॥**

अ०—आपल्याला ज्या दिशेस जावयाचें त्या दिशेस घोडे जाऊं लागले तर 'सहस्रसानं० प्रवह०वनस्पते'० (अष्ट. ४ अ० ७ वर्ग ३१) ही ऋचा ह्मणावी.

**सू०-एतयाऽन्यान्यपिवानस्पत्यानि ॥ ६ ॥**

अ०—रथाखेरीज लांकडी गाडी वगैरेंमध्यें बसणें असेल तेव्हां त्या गाडी वगैरेनांही स्पर्श वगैरे करणें तो वरील ऋचेनेंच करावा.

**सू०-स्थिरौ गावौ भवतां वीलु रक्ष इति रथांगमभिमृशेत् ॥ ७ ॥**

अ०—गाडी वगैरेंच्या बैलांनां, आंसाला, इषेला व जुवाला, 'स्थिरौ गावौ भवतां वीळु रक्ष'० (अ. ३ अ. ३ वर्ग २१) या ऋचेनें स्पर्श करावा.

**सू०-सुत्रामाणं पृथिवीं द्यामनेहसमिति नावं ॥ ८ ॥**

अ०—'सुत्रामाणं पृथ्वीं द्यामनेहसं०' (अ० ८ अ० २ व० ४) ही ऋचा ह्मणून नावेंत बसावें.

सू०-नवरथेन यशस्विनं वृक्षं ह्रदं वा विदासिनं प्रदक्षिणं कृत्वा फलवतीः शाखा आहरेत् ॥ ९ ॥ अन्यद्वा कौटुम्बं ॥ १० ॥ संसदमुपयायात् ॥ ११ ॥ अस्माकमुत्तमं कृधी त्यादित्यमीक्षमाणो जपित्वा वरोहेत् ॥ १२ ॥ ऋषभं मासमानानामित्यभिक्रामन् ॥ १३ ॥ वयमद्येन्द्रस्य प्रेष्ठा इत्यस्तं यात्यादित्ये ॥ १४ ॥ तद्वो दिवो दुहितरो विभातीरिति व्युष्टायां ॥ १५ ॥

अ०—नव्या रथान यशोंच्या वृक्षाला किंवा कधींही शुष्क न होणाऱ्या डोहाला प्रदक्षिणा करून फळ आलेल्या आंब्याच्या वगैरे फांद्या आणाव्या, अथवा दुसरे कांहीं कुटुंबाच्या उपयोगी पदार्थ आणावे आणि नंतर घरासमोर येऊन सूर्याकडे पहावें व 'अस्माकमुत्तमं०' (अष्ट. ३ अ० ६ व० २६) ही ऋचा जपून त्या नव्या रथांतून खालीं उतरावें. घरांत पोहोंचला ह्मणजे 'ऋषभं' (अष्ट. ८ अ० ८ व० २) हें सूक्त ह्मणावें व त्या दिवशीं सूर्यास्त होतेवेळेस 'वयमद्येंद्र०' (अष्ट. २ अ० ४ व० १) ही ऋचा ह्मणावी, आणि 'तद्वोदिवोदुहितरो०' (अ. ३ अ० ८ व० २) ही ऋचा सकाळीं ह्मणावी.

* नव्या रथांत बसणें असेल तर मात्र हा विधि करावा.

---

## खण्ड ७.

सूत्र-अथातो वास्तुपरीक्षा ॥ १ ॥

अ०—पुढें वास्तुपरीक्षा सांगतात.

सू०-अनूपरमविवादिष्णु भूम ॥ २ ॥

अ०—खारी जमीन नसावी व ज्या जागेविषयीं विवाद नाहीं अशी जागा असावी.

**सू०–ओषधिवनस्पतिवत् ॥ ३ ॥**

अ०—ती ओषधी व वनस्पती यांनीं युक्त असावी.

**सू०–यस्मिन् कुशवीरिणं प्रभूतं ॥ ४ ॥**

अ०—तसेंच, ज्या जागेवर कुश व वीरिण ह्मणजे काळा वाळा पुष्कळ आहे अशी जमीन असावी.

**सू०–कंटकिक्षीरिणस्तु समूलान् परिखायोद्वासयेदपामार्गः शाकस्तिल्वकः परिव्याध इति चैतानि ॥ ५ ॥**

अ०—ज्या वृक्षांनां कांटे आहेत असे वृक्ष व फार चीक ज्यांनां असतो ते वृक्ष आणि अघाडा, शाक, तिल्वक ( लोध्रवृक्ष ) व परिव्याध ( पांगारा अथवा जलवेत ) हे वृक्ष त्या जागेंतून समूळ खणून उपटून टाकावे.

**सू०–यत्र सर्वत आपो मध्यं समेत्य प्रदक्षिणं शयनीयं परीत्य प्राच्यः स्यंदेरन्नप्रवदत्यस्तत्सर्वं समृद्धं ॥ ६ ॥**

अ०—ज्या स्थलावर सर्व दिशांकडून मध्यें उदक येऊन निजण्याच्या जागेला प्रदक्षिणा घालून शब्द न होतां पूर्वेस जातें, अशा स्थळीं गृह केलें असतां तें धन धान्यादिकांनीं समृद्ध होतें.

* या सूत्रावरून असें दिसतें कीं, सर्व बाजूंनीं मध्यें उतरती व पूर्वेस उतरती अशी जमीन करून घर करावें; व त्यांत पूर्वेस निजण्याची जागा करून त्या जागेचे उत्तरेस उदक जाण्याकरितां मार्ग करावा.

सू०-समवस्त्रवे भक्तशरणं कारयेत् ॥ ७ ॥

अ०—पूर्वेस पाकगृह करावें.

* ह्मणजे निजण्याच्या जागेच्या उत्तरेस स्वयंपाकगृह करावें.

सू०-वह्वन्नं भवति ॥ ८ ॥

अ०—( तेणेंकरून ) हें घर संपन्न होतें.

सू०-दक्षिणाप्रवणे सभां मापयेत् साऽद्यूताह भवति ॥ ९ ॥

अ०—उत्तरेकडे बैठकीची ( सभेची ) जागा करावी. ही जागा द्यूतरहित होते. ही गोष्ट आश्वलायनऋषीला मान्य आहे.

सू०-युवानस्तस्यां कितवाः कलहिनः प्रमायुका भवन्ति ॥ १० ॥

अ०—या जागेवर सभा स्थापन केली तर तरुण पुरुष कपटी व तंटेखोर होतात व मरतात.

सू०-यत्र सर्वत आपः प्रस्यन्दरेन् सास्वस्त्ययन्यद्यूता च ॥ ११ ॥

अ०—यास्तव घराच्या मध्यभागीं बैठकीची ( सभेची ) जागा करावी; ती कल्याण करणारी व द्यूतरहित होते.

---

खण्ड ८.

सूत्र०-अथैतैर्वास्तुपरीक्षेत ॥ १ ॥

अ०—पुढें सांगितलेल्या प्रकारांनीं वास्तुपरीक्षा करावी.

सू०-जानुमात्रं गर्त्तं खात्वा तैरेव पांसुभिः

**प्रतिपूरयेत् ॥ २ ॥ अधिके प्रशस्तं समे वार्तं न्यूने गर्हितं ॥ ३ ॥**

अ०—गुडघ्याइतकी खांच खणावी आणि ती खांच त्या काढलेल्या मातीनेंच भरावी. खांच भरून माती उरली तर तें उत्तम घर व कमी माती आल्यास वाईट घर; आणि खांचेपुरतीच ती माती झाली तर निर्वाह करण्यापुरतें मात्र तें घर होतें असें समजावें.

**सू०—अस्तमिते पांसुपूर्णं परिवासयेत् ॥४॥**

अ०—( नंतर ) सायंकाळीं तीच खांच उदकानें भरून ठेवावी.

* व नंतर सकाळीं पहावी.

**सू०—सोदके प्रशस्तमार्द्रे वार्त्तं शुष्के गर्हितं श्वेतं मधुरास्वादं ॥ ५ ॥ सिकतोत्तरं ब्राह्मणस्य ॥ ६ ॥ लोहितं क्षत्रियस्य ॥ ७ ॥ पीतं वैश्यस्य ॥ ८ ॥**

अ०—खांचेंत उदक असेल तर तें उत्तम घर, नुसती ओली खांच असेल तर निर्वाह होण्याजोगें घर, आणि कोरडी खांच झाली तर तें निंद्य घर असें समजावें; ब्राह्मणास पांढरी, क्षत्रियास तांबडी व वैश्यास पिंवळी अशा रंगाची व मधुर वासाची आणि वालुकामय अशी जागा असावी.

**सू०—तत् सहस्त्रसीतं कृत्वा यथा दिक् समचतुरस्त्रं मापयेत् ॥ ९ ॥ आयतं चतुरस्त्रं वा ॥ १० ॥**

अ०—ती जमीन पुष्कळ वेळ नांगरून चहूं [illegible] समचतुष्कोण करावी अथवा लंबचतुष्कोण करावी.

**सू०-तच्छमीशाखयोदुम्बरशाखया वा शन्तातीयेनत्रिः परिव्रजन् प्रोक्षति ॥ ११ ॥**

अ०—ती जमीन शमीच्या डाहळ्यांनीं अथवा उंबराच्या डाहळ्यांनीं 'शंन्न इंद्राग्नी०' (अष्ट. ५ अ० ३ व० २८) हें सूक्त ह्मणून तीन वेळ प्रदक्षिण फिरून प्रोक्षण करावी.

* दर प्रदक्षिणेस 'शंन्न इंद्राग्नी०' हें सूक्त ह्मणावें व प्रथम सूक्त ह्मणून नंतर प्रदक्षिण फिरत जावें.

**सू०-अविच्छिन्नया चोदकधारया, आपोहिष्ठा मयोभुव इति तृचेन ॥ १२ ॥**

अ०—(त्याचप्रमाणें) सारखी उदकाची धार धरून 'आपोहिष्ठा'० (अष्ट. ७ अ० ६ व० ५) या तीन ऋचा ह्मणून तीनदां प्रदक्षिण फिरून प्रोक्षण करावी.

* प्रति प्रदक्षिणेस वरील तीनही ऋचा ह्मणत जाव्या.

**सू०-वंशान्तरेषु शरणानि कारयेत् ॥ १३ ॥**

अ०—देवघर व स्वयंपाकघर वगैरे खोल्या खांबांमध्यें भिंती घालून कराव्या.

**सू०-गर्त्तेष्ववकांशीपालमित्यवधापयेन्नास्याग्निर्दाहुको भवतीति विज्ञायते ॥ १४ ॥**

अ०—खांबाच्या खांचेमध्यें नीळ व शेवाळ घालावें. कारण, अशा घराला अग्नि जाळीत नाहीं असें श्रुतींत सांगितलें आहे.

**सू०-मध्यमस्थूणाया गर्त्तेऽवधाय प्रागग्रोदगग्रान् कुशानास्तीर्य व्रीहियवमतीरप आसेचयेत्; अच्युताय भौमाय स्वाहेति ॥ १५ ॥**

अ०—(तसेंच) मधल्या खांबाचे खांचेंत नीळ व शेवाळ घालून

पूर्वाग्र व उत्तराग्र दर्भ अंथरून साळी व जव घातलेलें उदक 'अच्युताय भौमाय स्वाहा' हा मंत्र ह्मणून शिंपडावें.

सू०-अथैनामुच्छ्रियमाणामनुमन्त्रयतेहैव तिष्ठ निमिता तिल्विलास्ताभिरावतीं मध्ये पोषस्व तिष्ठन्तीमा त्वा प्रापंनघायव आ त्वा कुमारस्तरुण आ वत्सो जायतां सह ॥ आ त्वा परिश्रितः कुंभ आ दध्नः कलशैरयन्निति ॥ १६ ॥

अ०—हा मधला खांब उभा करतांना 'इहैव तिष्ठ निमितानि० कलशैरयन्' या मंत्रानें अनुमंत्रण करावें.

---

## खण्ड ९.

सूत्र-वंशमाधीयमानं ॥ १ ॥ ऋतेन स्थूणामधिरोह वंश द्राघीय आयुः प्रतरं दधाना-इति ॥ २ ॥

अ०—खांबावर वेळु ठेवतेवेळेस 'ऋतेनस्थूणा० दधाना' हा मंत्र ह्मणावा.

* प्रत्येक वेळु ठेवतेवेळेस हा मंत्र ह्मणावा.

सू०-सदूर्वासु चतसृषु शिलासु मणिकं प्रतिष्ठापयेत् पृथिव्या अधि सम्भवेति ॥ ३ ॥ अरंगरो वावदीति त्रेधा बद्धो वरत्रया ॥ इरामु ह प्रशंसत्यनिरामपबाधतामिति वा ॥ ४ ॥

अ०—चार दगड ठेवून त्यावर दूर्वा ठेवाव्या व त्या दूर्वांवर मणिक (पाणी ठेवण्याजोगें भांडें) 'पृथिव्या अधि सम्भव' हा मंत्र अथवा 'अंगरेत्वावर्दैतिं०ताम्' हा मंत्र ह्मणून ठेवावा.

सू०-अथास्मिन्नप आसेचयेत् ऐतु राजा वरुणो रेवतीभिरस्मिन् स्थाने तिष्ठतु मोदमानः ॥ इरां वहन्तो घृतमुक्षमाणा मित्रेण साकं सह संविशन्त्विति ॥ ५ ॥

अ०—नंतर मणिकामध्यें 'ऐतु राजा वरुणोरेव० विशन्तु' हा मंत्र ह्मणून उदक घालावें.

सू०-अथैनं छन्नयति ॥ ६ ॥

अ०—नंतर वास्तुशांति करावी.

सू०-व्रीहियवमतीभिरद्भिर्हिरण्यमवधायशंतातीयेन त्रिः प्रदक्षिणं परिव्रजन् प्रोक्षति ॥७॥ अविच्छिन्नया चोदकधारया आपो हि ष्ठा मयोभुव इति तृचेन ॥ ८ ॥

अ०—जव, साळी व सोनें घातलेल्या पाण्यानें 'शंनं इंद्राग्नी०' (अष्ट० ५ अ. ३ व. २८) हें सूक्त ह्मणून तीन वेळ प्रदक्षिण फिरतांना प्रोक्षण करावें व सारखी उदकाची धार धरून, 'आपो हि ष्ठा०' (अष्ट० ७ अ. ६ व ५) या तीन ऋचा ह्मणून प्रोक्षण करावें.

सू०-मध्ये गारस्य स्थालीपाकं श्रपयित्वा वास्तोष्पते प्रतिजानीह्यस्मानिति चतसृभिः प्रत्यृचं हुत्वाऽन्नं संस्कृत्य ब्राह्मणान् भोजयित्वा शिवं वास्तु शिवं वास्त्विति वाचयीत ॥ ९ ॥

अ०—घरामध्यें स्थालीपाक करून 'वास्तोष्पते०' (अष्ट० ५ अ. ४ वर्ग २१) या चार ऋचांनीं प्रतिऋचेस होम करून अन्न शिजवून ब्राह्मणाला भोजन घालावें व त्यांजकडून 'शिवं-वास्तु' असें दोनदां ह्मणवावें.

---

## खण्ड १०.

### सूत्र-उक्तं गृहप्रपदनं ॥ १ ॥

अ०—श्रौत सूत्र अध्याय २ खंड ५ यांत सांगितल्याप्रमाणें गृहप्रवेश करावा. अथवा मणिकस्थापनापासून 'शिवंवास्तु' पर्यंत सांगितलेलें कर्म गृहप्रवेशसंज्ञक समजावें. या दुसऱ्या अर्थात असें सिद्ध होतें कीं, मणिकस्थापनाच्या पूर्वी घरांत धान्य ठेवून तुष्णीं प्रवेश करावा.

### सू०-व्रीहिमतो गृहान् प्रपद्येत ॥ २ ॥

अ०—धान्य ठेवलेल्या गृहांत प्रवेश करावा.

* हा अर्थ पूर्वसूत्रांत सांगितलाच आहे. परंतु ही द्विरुक्ति करण्याचें कारण, शाखांतरानें संस्कृत झालेल्या घरांत अथवा जीर्णोद्धार केलेल्या घरांत प्रवेश करणें असेल तेव्हांही याचप्रमाणें वास्तुशमन करावें. पुढें शेतीविषयीं सांगतात :—

### सू०-क्षेत्रं प्रकर्षयेदुत्तरैः प्रोष्ठपदैः फल्गुनी-भी रोहिण्या वा ॥ ३ ॥

अ०—उत्तरा भाद्रपदा, उत्तरा व रोहिणी या नक्षत्रांवर शेत नांगरावें.

### क्षेत्रस्यानुवाकं क्षेत्रस्य पतिना वय शिति प्रत्यृचं जुहुयाज्जपेद्वा ॥ ४ ॥

अ०—शेतांत अनुकूल वारा आहे अशा प्रदेशावर 'क्षेत्रस्य पतिना०' ( अ. ३ अष्टी ८ व ९ ) या सूक्तानें प्रति ऋचेस होम करावा अगर त्या सूक्ताचा जप करावा.

**सू०-गाः प्रतिष्ठमाना अनुमन्त्रयेत** मयोभूर्वातो अभि वा नूस्रा **इति द्वाभ्यां ॥ ५ ॥ आयतीः यासामुधश्चतुर्बिलं मधोः पूर्ण घृतस्य च ॥ ता नः सन्तु पयस्वतीर्बह्वीर्गोष्ठे घृताच्यः ॥ उप मैतु मयोभुव ऊर्जं चौजश्चबिभ्रतीः ॥ दुहाना अक्षितं पयो मयि गोष्ठे निविशध्वंयथा भवाम्युत्तमः** या देवेषुतन्वा (१) मैरयन्तेति **च सूक्तशेषं ॥ ६ ॥**

अ०—गाई रानांत चरावयाकरितां सोडते वेळेस गाईचें अनुमंत्रण 'मयोभूर्वातो अभिवा०' (अष्ट० ८ अ. ८ व २७) या दोन ऋचांनीं करावें; व गाई रानांतून येतांना, 'यासां० यथा भवामि.' या मंत्रानें व 'देवेषु०' (८।८।२७) या सूक्ताच्या शेषऋचांनीं अनुमंत्रण करावें.

**सू०-आगवीयमेके ॥ ७ ॥**

अ०—कोणी ऋषी ह्मणतात कीं, गाई येतांना त्यांचें अनुमंत्रण 'आगाग्वो०' ( ४।६।२९ ) या सूक्तानें करावें.

**सू०-गणानामासामुपतिष्ठेतागुरुगवीनांभूता स्थ प्रशस्ताः स्थ शोभनाः प्रियाः प्रियोवो भूयासं शं मयि जानीध्वं शं मयि जानीध्वं ॥८॥**

अ०—वासराच्या कळपाचें उपस्थान 'भूतास्थ०' या मंत्रानें करावें. परंतु 'शं मयि जानीध्वं' हें वाक्य मंत्रांत दोनदां ह्मणूं

नये. कारण, अध्याय समाप्तीच्या खुणे करितां मात्र सदर सूत्रांत याची द्विरुक्ति केली आहे व तसें ह्मणण्याचा पाठ आहे.

इति द्वितीयोऽध्यायः

---

# अध्याय ३.

## खण्ड १.

**सूत्र–अथातः पञ्चयज्ञाः ॥ १ ॥**

अ०—इथापासून महाकल्याणप्राप्ति होते ते पांच यज्ञ सांगतात.

**सू०–देवयज्ञो, भूतयज्ञः, पितृयज्ञो, ब्रम्हयज्ञो, मनुष्ययज्ञ इति ॥ २ ॥**

अ०—त्यांचीं नांवें:–(१) देवयज्ञ, (२) भूतयज्ञ, (३) पितृयज्ञ, (४) ब्रह्मयज्ञ, आणि (५) मनुष्ययज्ञ, असे पांच यज्ञ आहेत.

**सू०–तद्यदग्नौ जुहोति स देवयज्ञो, यद्बलिं करोति स भूतयज्ञो, यत् पितृभ्योददाति स पितृयज्ञो, यत् स्वाध्यायमधीते स ब्रह्मयज्ञो, यन्मनुष्येभ्यो ददाति स मनुष्ययज्ञ इति ॥३॥**

अ०—जो अग्नींत होम करणें तो देवयज्ञ; बळी देणें तो भूतयज्ञ; आणि पितरांनां देणें तो पितृयज्ञ; हे तीन यज्ञ वैश्वदेवांत आहेत. बाकी वेदाध्ययन करणें तो ब्रह्मयज्ञ आणि मनुष्यांनां भिक्षादिक देणें तो मनुष्ययज्ञ होय. अशीं पंचमहायज्ञांचीं कर्मे झालीं.

सूत्र-तानेतान्यज्ञानहरहः कुर्वीत॥ ४ ॥

अ०—हे पांच यज्ञ प्रति दिवशीं करावे.

---

खण्ड २.

सूत्र-अथस्वाध्यायविधिः ॥ १ ॥

अ०—पुढें वेदाध्ययनाचा विधि सांगतात.

सू०-प्राग्वोदग्वा ग्रामान्निष्क्रम्याप आप्लुत्य शुचौ देशे यज्ञोपवीत्याचम्याक्लिन्नवासा दर्भाणां महदुपस्तीर्य प्राक्कूलानान्तेषु प्राङ्मुख उपविश्योपस्थं कृत्वा दक्षिणोत्तरौ पाणी सन्धाय पवित्रवन्तौ विज्ञायते; अपां वा एष ओषधीनां रसो यद्दर्भाः सरसमेव तद्ब्रह्म करोति द्यावापृथिव्योः सन्धिमीक्षमाणः सम्मील्य वा यथा वा युक्तमात्मानं मन्येत तथा युक्तो धीयीत स्वाध्यायं ॥ २ ॥

अ०—गांवाबाहेर पूर्वेस किंवा उत्तरेस जाऊन स्नान करून चांगल्या जाग्यावर 'यज्ञोपवीती' ह्मणजे सव्य जानवें असतां कोरडें वस्त्र नेसून आचमन करावें. व पूर्वाग्र पुष्कळ दर्भ अंथरून त्या दर्भांवर पूर्वाभिमुख बसून दोन्ही हातांत पवित्रकें धारण करून मांडीवर मांडी घालावी. व उजवा हात वरती असे दोन्ही हात जोडावे. श्रुतींत दर्भप्रशंसा सांगितली आहे कीं, ज्यापेक्षां उदकाचा व औषधींचा रस दर्भ हे आहेत, त्यापेक्षां दर्भांवर बसून अध्ययन केलें असतां तें अध्ययन सरस होतें; ह्मणून दर्भ आवश्य पाहिजेत. अध्ययन करितांनां आकाश व पृथ्वी यांच्या संधीकडे पाहून अथवा

डोळे मिटून किंवा उघापासून अंतःकरण स्वस्थ राहील असें करून वेदाचें अध्ययन करावें.

* गांवांतून बाहेर जाणें तें चांगल्या दिशेस जावें. व जेथें गांवाबाहेर जाऊन हें कर्म होण्यासारखें नसेल तेथें तें गांवांतच करावें.

**सू०–ॐ पूर्वां व्याहृतीः ॥ ३ ॥ सावित्रीमन्वाहपच्छोऽर्धर्चशः सर्वामिति तृतीयं ॥ ४ ॥**

अ०—प्रथम ओंकार ह्मणून नंतर 'भूर्भुवस्वः' ह्मणावें, आणि पुढें पाद पाद, नंतर अर्धी अर्धी व शेवटीं सर्व अशी तीन वेळ गायत्री ह्मणावी.

---

## खण्ड ३.

**सूत्र–अथ स्वाध्यायमधीयीत ऋचो यजूंषि सामान्यथर्वाङ्गिरसो ब्राह्मणानि कल्पान् गाथा नाराशंसीरितिहासपुराणानीति ॥ १ ॥**

अ०—पुढें ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद आणि तशींच ब्राह्मणें, सूत्रें, कुंताप नामक उपग्रंथांतील 'यदिंद्रो०' ९ ऋचा, व 'इदंजना०' ३½ ऋचा, इतिहास ( भारत ) व पुराण हें अध्ययन करावें.

**सू०–यदृचोऽधीते पयआहुतिभिरेवतद्देवतांस्तर्पयति यद्यजूंषि घृताहुतिभिः यत्सामानि मध्वाहुतिभिः यदथर्वांगिरसः सोमाहुतिभिः यद्ब्राह्मणानि कल्पान् गाथा नाराशंसीरितिहासपुराणानीत्यमृताहुतिभिः ॥ २ ॥**

अ०—ऋग्वेदाचें अध्ययन केलें असतां त्या देवतेला दुधाचे आहुतीनें, यजुर्वेदाचें अध्ययन केलें असतां तुपाच्या आहुतीनें, सामाचें अध्ययन केलें असतां सोमवल्लीचे आहुतीनें व ब्राह्मणाचें, सूत्राचें, गाथ्याचें (यद्रींद्रो० इत्यादि ऋचांचें), नाराशंसीचें (इदं-जना० वगैरे ऋचांचें), इतिहासाचें (भारताचें) आणि पुराणांचें अध्ययन केलें असतां त्या देवतेला अमृताच्या आहुतीनें अध्ययन-कर्ता तृप्त करतो; असें श्रेय आहे.

* ही अध्ययनप्रशंसा सांगितली आहे.

**सू०-यदृचोऽधीते पयसः कुल्या अस्य पितॄन्त्स्वधा उपक्षरन्ति यद्यजूंषि घृतस्य कुल्या यत्सामानि मध्वः कुल्या यदथर्वाऽङ्गिरसः सोमस्य कुल्या यद्ब्राह्मणानि कल्पान् गाथा नाराशंसीरितिहासपुराणानीत्यमृतस्य कुल्याः ॥ ३ ॥**

अ०—ऋग्वेदाचें अध्ययन केलें असतां दुधाच्या नद्या, यजुर्वेदाचें अध्ययन केलें असतां तुपाच्या नद्या, सामाचें अध्ययन केलें असतां सोमवल्ली रसाच्या नद्या व ब्राह्मणें, सूत्रें, गाथा, नाराशंसी, इतिहास आणि पुराणें यांचें अध्ययन केलें असतां अमृताच्या नद्या ह्याप्रमाणें अध्ययनकर्त्याचे पितरांस प्राप्त होतात. (हीहि अध्ययन-प्रशंसा आहे.)

**सू०-स यावन्मन्येत तावदधीत्यैतया परिदधाति नमो ब्रह्मणे नमोऽस्त्वग्नये नमः पृथिव्यै नम ओषधीभ्यः नमो वाचे नमो वाचस्पतये नमो विष्णवे महते करोमीति ॥ ४ ॥**

अ.—जोंपर्यंत अंतःकरण स्वस्थ आहे तोंपर्यंत (सदरप्रमाणें)

वेदाध्ययन करावें आणि नंतर 'नमो०' हा मंत्र ह्मणून अध्ययन समाप्त करावें.

* हा मंत्र तीनदां ह्मणावा.

---

## खण्ड ४.

**सूत्र–देवतास्तर्पयति. प्रजापतिर्ब्रह्मा वेदा देवा ऋषयः सर्वाणि छन्दांस्योङ्कारो वषट्कारो व्याहृतयः सावित्री यज्ञा द्यावापृथिवी अन्तरिक्षमहोरात्राणि संख्याः सिद्धाः समुद्रा नद्यो गिरयः क्षेत्रौषधिवनस्पतिगंधर्वाप्सरसो नागा वयांसि गावः साध्या विप्रा यक्षा रक्षांसि भूतान्येवमन्तानि ॥ १ ॥**

अ०—**देवतातर्पण**—१ प्रजापतिस्तृप्यतु, २ ब्रह्मा०, ३ वेदाः०, ४ देवाः०, ५ ऋषयः०, ६ सर्वाणिछन्दांसि०, ७ ओंकारः०, ८ वषट्कारः०, ९ व्याहृतयः०, १० सावित्री०, ११ यज्ञाः०, १२ द्यावापृथिवी०, १३ अंतरिक्षं०, १४ अहोरात्राणि०, १५ संख्याः०, १६ सिद्धाः०, १७ समुद्राः०, १८ नद्यः०, १९ गिरयः०, २० क्षेत्रौषधि वनस्पति गन्धर्वाप्सरसः०, २१ नागाः०, २२ वयांसि०, २३ गावः, २४ साध्याः०, २५ विप्राः०, २६ यक्षाः० २७ रक्षांसि०, २८ भूतानि०, २९ एवमंतानि०, ह्या मंत्रांनीं करावें.

* ह्या तर्पणांत एकवचन, द्विवचन आणि बहुवचन यांप्रमाणें तृप्यतु, तृप्यतां आणि तृप्यन्तु हे प्रयोग लावावे.

**सू०–अथ ऋषयः शतर्चिनो माध्यमा गृत्समदो विश्वामित्रो वामदेवोऽत्रिर्भरद्वाजो**

वसिष्ठः प्रगाथाः पावमान्यः क्षुद्रसूक्ता महासूक्ताइति ॥ २ ॥०-

अ०—नंतर ऋषितर्पण— १ शतर्चिनः०, २ माध्यमाः ०, ३ गृत्समदः०, ४ विश्वामित्रः०, ५ वामदेवः०, ६ अत्रिः०, ७ भरद्वाजः०, ८ वसिष्ठः०, ९ प्रगाथाः०, १० पावमान्यः० ११ क्षुद्रसूक्ताः०, १२ महासूक्ताः०, या मंत्रांनीं करावें.

* हें तर्पण निवीती करून करावें व पूर्ववत् एकवचनादि प्रयोग लावावे.

सू०–प्राचीनावीती ॥ ३ ॥ सुमन्तु जैमिनि वैशम्पायन पैलसूत्र भाष्य भारत महाभारत धर्माचार्या जानन्ति वाहवि गार्ग्य गौतम शाकल्य बाभ्रव्य माण्डव्य माण्डूकेया गार्गीवाचक्नवी वडवाप्रातिथेयी सुलभामैत्रेयी कहोलं कौषीतकं महाकौषीतकं पैङ्ग्यं महापैङ्ग्यं सुयज्ञं सांख्यायन मैतरेयं महैतरेयं शाकलं बाष्कलं सुजातवक्त्रमौदवाहिं महौदवाहिं सौजामिं शौनकमाश्वलायनं येचान्ये आचार्यास्ते सर्वे तृप्यन्त्विति ॥ ४ ॥

अ०—अपसव्य करून, १ सुमंतु–जैमिनि–वैशम्पायन–पैल–सूत्र–भाष्य–भारत–महाभारत–धर्माचार्याः०, २ जानन्ति–वाहवि–गार्ग्य–गौतम–शाकल्य–बाभ्रव्य–माण्डव्य–माण्डूकेयाः०, ३ गार्गीवाचक्नवी०, ४ वडवाप्रातीथेयी०, ५ सुलभामैत्रेयी०, ६ कहोलं ०, ७ कौषीतकं०, ८ महाकौषीतकं०, ९ पैङ्ग्यं०, १० महापैङ्ग्यं०, ११ सुयज्ञं०, १२ सांख्यायनं०, १३ ऐतरेयं०, १४ महैतरेयं०, १५ शाकलं०, १६ बाष्कलं०, १७ सुजातवक्त्रं०, १८ औदवाहिं०,

१९ महोदवाहिं०, २० सौजामिं०, २१ शौनकं०, २२ आश्वलायनं०, २३ येचान्येआचार्यास्तेसर्वे० या मंत्रांनीं **आचार्यतर्पण** करावें.

* ६ 'कहोलं०' पासून २२ 'आश्वलायनं०' पर्यंत 'तर्पयामि' ह्मणत जावें व बाकीच्यांस पूर्ववत् एकवचनादि प्रयोग लावावे.

**सू०-प्रतिपुरुषं पितॄंस्तर्पयित्वा गृहानेत्य यद्ददाति सा दक्षिणा ॥ ५ ॥**

अ०—नंतर पितृत्रयींतील प्रतिपुरुषाचें द्वितीयांत नांव घेऊन 'तर्पयामि' असें ह्मणून तर्पण करावें. यावर घरीं येऊन भिक्षा वगैरे जी कांहीं देणें ती ब्रह्मयज्ञाची दक्षिणा समजावी.

**सू०-अथापि ज्ञायते स यदि तिष्ठन् व्रजन्नासीनः शयानोवा यं यं क्रतुमधीते तेन तेन हास्य क्रतुनेष्टम्भवतीति विज्ञायते ॥ ६ ॥**

अ०—जो उभ्यानें किंवा बसून किंवा चालतांनां किंवा निजला असतां ज्या ज्या यज्ञाचें अध्ययन करतो त्या त्या यज्ञानें अध्ययनकर्त्याचें इष्ट होतें, असें श्रुति सांगते. हें **आश्वलायनऋषी**लाही मान्य आहे.

**सू०-तस्य द्वावनध्यायौ यदात्माऽशुचिर्यद्देशः ॥ ७ ॥**

अ०—जेव्हां आत्मा अशुद्ध किंवा देश अपवित्र अशी स्थिति असेल तेव्हां ते दोन्ही, ब्रह्मयज्ञास अनाध्याय आहेत.

---

खण्ड ५.

**सू०-अथातोऽध्यायोपाकरणं ॥ १ ॥**

अ०—पुढें ब्रह्मयज्ञ नित्य* आहे ह्मणून तत्संबंधीं अध्ययनास ज्या कर्मांनीं आरंभ होतो तें उपाकर्म सांगतों.

**सू०-ओषधीनां प्रादुर्भावे श्रवणेन श्रावणस्य ॥ २ ॥ पञ्चम्यां हस्तेन वा ॥ ३ ॥**

अ०—तें उपाकर्म ओषधी उगवल्या असतां श्रावण महिन्यांतील श्रवण नक्षत्रावर किंवा पंचमीला हस्त नक्षत्रावर करावें.

* श्रावणांत ओषधी न उगवल्या तर भाद्रपदांत श्रवण नक्षत्रावर उपाकर्म करावें.

**सू०-आज्यभागौ हुत्वाऽऽज्याऽऽहुतीर्जुहुयात् सावित्र्यै ब्रह्मणे श्रद्धायै मेधायै प्रज्ञायै धारणायै सदसस्पतयेऽनुमतये छंदोभ्यऋषिभ्यश्चेति ॥ ४ ॥**

अ०—चक्षुशी आहुती देऊन 'सावित्र्यै०' इत्यादि ९ मंत्रांनीं प्रतिमंत्रास तुपाची आहुती देत जावी.

* प्रतिमंत्रास शेवटीं स्वाहा हा शब्द लावीत जावा.

**सू०-अथ दधिसक्तून् जुहोति ॥ ५ ॥** अग्निमीळे पुरोहित **मित्येका ॥ ६ ॥** कुषुम्भकस्तदब्रवीत् आवदंस्त्वं शकुने भद्रमावद. गृणाना जमदग्निना. धामन्ते विश्वं भुवनमधिश्रितं. गन्ता नो यज्ञं यज्ञियाः सुशमि.यो न स्वो अरणः. प्रतिचक्ष्व विचक्ष्वाग्ने याहि मरुत्सखा. यत्ते गात्रं सूनं हविरितिद्वे वाः **॥ ७ ॥** समानीव आकूति **रित्येका ॥ ८ ॥** तच्छंयो रावृणीमह **इत्येका ॥ ९ ॥**

अ०—दह्यांत कालविलेल्या सातूचा होम, 'अग्निमीळे०' (अष्ट. १ अ० १ व० १) या १ ऋचेनें 'कुषुम्भकस्तदब्रवीत्०'

(अष्ट. २ अ० ५ व० १६) या दोन ऋचांनीं, 'अवदंस्त्वंशकुने भद्रमावद०' (अष्ट. २ अ० ८ व० १२) या २ ऋचांनीं, 'गृणाना जमदग्निना०' (अष्ट. ३ अ० ४ व० ११) या २ ऋचांनीं 'धामन्ते विश्वम्भुवनमधिश्रितं०' (अष्ट. ३ अ० ८ व० ११) या २ ऋचांनीं, 'गन्तानो यज्ञं यज्ञियाःसुशमि०' (अष्ट. ४ अ० ४ व० ३४) या २ ऋचांनीं, 'येनस्तोअर्णः०' (अष्ट. ५ अ० १ व० २२) या २ ऋचांनीं, 'प्रतिचक्ष्व विचक्ष्व०' (अष्ट. ५ अ० ७ व० ९) या २ ऋचांनीं, 'आग्ने याहि मरुत्सखा०' (अष्ट. ६ अ० ७ व० १५) या २ ऋचांनीं, 'यत्ते०' (अष्ट. ७ अ० ५ व० २८) या २ ऋचांनीं, 'समानीव आकूतिः०' (अष्ट. ८ अ० ८ व० ४९) या १ ऋचेनें, आणि 'तच्छंयोरावृणीमहे०' (अष्ट. ८ अ० ८ व. ४९) या १ ऋचेनें ह्याप्रमाणें प्रतिऋचेस करावा.

* 'तच्छंयो०' ही ऋचा बाष्कलशाखेंत आहे तीं त्या शाखेचें अध्ययनकर्त्यांनें 'सम०' या ऋचेचें स्थानीं मानावी व शाकलशाखेचें अध्ययनकर्त्यांनीं 'तच्छंयो०' या स्थानीं 'समानी०' ही ऋचा मानावी; ह्मणजे 'तच्छंयो०' या ऋचेनें शाकलानें होम करूनये आणि बाष्कलानें 'समानीव०', या ऋचेनें होम करूनये.

**सू०—अध्येष्यमाणोऽध्याप्यैरन्वारब्ध एताभ्यो देवताभ्यो हुत्वा सौविष्टकृतं हुत्वा दधिसक्तून् प्राश्य ततो मार्जनम् ॥ १० ॥**

अ०—शिष्यांनीं अन्वारब्ध व अध्ययन करण्यास इच्छिणाऱ्या अशा गुरूनें वर सांगितलेला होम करून स्विष्टकृदाहुती देऊन दह्यांत कालविलेल्या सातूचें भक्षण करावें. नंतर श्रौ. अ. १ खंड ८ यांत सांगितल्याप्रमाणें मार्जन करावें.

* परिस्तरणाखालीं ओंजळ करून वर दुसऱ्यानें उदक शिंपडावें.

सू०-अपरेणाग्निं प्राक्कूलेषु दर्भेषूपविश्योद-पात्रे दर्भान् कृत्वा ब्रह्माञ्जलिकृतो जपेत्॥११॥

अ०—अग्नीचे पश्चिमेस प्रागग्र (पूर्वेकडे अग्र केलेल्या) दर्भांवर बसून उदक असलेल्या भांड्यांत दर्भ ठेवून ब्रह्मांजली करून जप करावा.

सू०-ॐ पूर्वा व्याहृतीः सावित्रीं च त्रिर-भ्यस्य वेदादि मारभेत् ॥ १२ ॥

अ०—'ओं भूर्भुवः स्वः' हा मंत्र व 'तत्सवितु०' (३।४।१०) हा मंत्र तीनदां ह्मणून वेदाचें आदि सूक्त किंवा अनुवाक ह्मणण्याला आरंभ करावा.

सू०-तथोत्सर्गे ॥ १३ ॥

अ०—याप्रमाणेंच उत्सर्जन कर्मांत वेदारंभ करावा.

सू०-षण्मासानधीयीत ॥ १४ ॥ समावृ-त्तो ब्रह्मचारिकल्पेन ॥ १५ ॥ यथान्यायमि-तरे ॥ १६ ॥

अ०—सोडमुंज झाल्यानंतरही ब्रह्मचाऱ्याचे नियम पाळून उपाकर्म केल्यापासून सहा महिनेपर्यंत अध्ययन करावें; व तेंही ब्रह्मचाऱ्यांनीं आपल्या विधीप्रमाणें करावें.

सू०-जायोपेयेत्येके ॥ १७ ॥ प्राजापत्यं तत् ॥ १८ ॥

अ०—गृहस्थाश्रम्यांनीं ब्रह्मचर्य नियम असतांही मैथुन करावें असें कोणी ऋषी ह्मणतात. व तें प्रजोत्पत्ति होण्याकरितां करावें.

सू०-वार्षिकमित्येतदाचक्षते ॥ १९ ॥

अ०—उपाकर्माला वार्षिक *असें ह्मणतात ह्मणून तें प्रतिवर्षीऋतूंत करावें.

**सू०-मध्यमाष्टकायामेताभ्यो देवताभ्यो ऽन्नेन हुत्वाऽपोऽभ्यववयन्ति ॥ २० ॥**

अ०—उपाकर्मांत सांगितलेला होम माघी पौर्णिमेला अन्नांनीं करून उदकांत स्नान करावें.

* सावित्र्यादिक नऊ आहुती तुपानेंच द्याव्या.

**सू०-एता एव तद्देवतास्तर्पयन्ति ॥ २१ ॥ आचार्यान् ऋषीन् पितॄँश्च ॥ २२ ॥**

अ०—(नंतर) होमदेवतेचें तर्पण करून गृ. अ. ३ खं. ४ यांत सांगितलेलें तर्पणही करावें.

* प्रत्येक देवतेचें द्वितीयांत नांव घेऊन 'तर्पयामी' असें ह्मणत जावें.

**सू०-एतदुत्सर्जनं ॥ २३ ॥**

अ०—गृ. अ. ३ खं ५ सूत्र २० पासून सांगितलेल्या कर्माला उत्सर्जन ह्मणतात.

---

## खण्ड ६.

**सूत्र-अथ काम्यानां स्थाने काम्याः ॥ १ ॥ चरवः ॥ २ ॥ तानेव कामानाप्नोति ॥ ३ ॥**

अ०—श्रौत सूत्रांतील काम्येष्टींच्या स्थानीं गृह्याग्नीवर काम्य पाकयज्ञ करावे. व (त्यावेळीं) चरू हें होमद्रव्य करावें. असें जो करील त्याच्या काम्येच्छा पूर्ण होतात.

* सोमस्थानीं सोम करूं नये. पुरोडाशाचे स्थानीं चरू करावा.

सू०-अथ व्याधितस्यातुरस्य यक्ष्मगृहीतस्य वा षडाहुतिश्चरुः ॥ ४ ॥

अ०--पुढें रोगी अंथरुणावर पडलेला किंवा क्षयरोगी असतां सहा आहुती देण्याजोगा चरु करावा.

सू०-मुञ्चामि त्वा हविषा जीवनायकमित्येतेन॥५॥

अ०—'मुञ्चामि०' (८।८।१९) या पांच ऋचांनीं पांच आहुती देऊन सहावी स्विष्टकृत् आहुती द्यावी.

सू०-स्वप्नममनोज्ञं दृष्ट्वा अद्यानो देव सवितरिति द्वाभ्यां; यच्च गोषु दुष्वप्न्यमिति पञ्चभिरादित्यमुपतिष्ठेत ॥ ६ ॥ यो मे राजन्युज्यो वा सखावेति वा ॥ ७ ॥

अ०—वाईट स्वप्न पडलें असतां 'अद्यानो०' (अष्ट. ४ अ० ४ व २९) या दोन ऋचांनीं व 'यच्चगो०' (अष्ट. ६ अ० ४ व. ९) या पांच ऋचांनीं अथवा 'यो मे राजन्०' (अष्ट. २ अ० ७ व १०) या एक ऋचेनेंच सूर्याचें उपस्थान करावें.

सू०-क्षुत्वा जृम्भित्वाऽमनोज्ञं दृष्ट्वा पापकं गन्धमाघ्रायाक्षिस्पन्दने कर्णध्वनने च सुचक्षा अहमक्षीभ्यां भूयासं सुवर्चा मुखेन सुश्रुत्कर्णाभ्यां भूयासमिति जपेत् ॥८॥

अ०— शिंक आली असतां, जांभई आली असतां, कांहीं वाईट पाहिलें असतां, वाईट वास आला असतां, नेत्रस्फुरण झालें असतां किंवा कानांत (घुणघुण) शब्द झाला असतां 'सुचक्षा०क्रतू' हा मंत्र जपावा.

सू०-अगमनीयांगत्वाऽयाज्यं याजयित्वाऽभोज्यं भुक्त्वाऽप्रतिग्राह्यं प्रतिगृह्य चैत्यं यूपं चोपहत्य, पुनर्मा मैत्विन्द्रियं पुनरायुः पुनर्भगः पुनर्द्रविणमैतु मां पुनर्ब्राह्मणमैतु मां स्वाहा। इमे ये धिष्ण्या सो अग्नयो यथा स्थानमिह कल्पतां। वैश्वानरो वावृधानो ऽन्तर्यच्छतु मे मनो हृद्यन्तरममृतस्यकेतुः स्वाहेत्याज्याहुती-र्जुहुयात् ॥९॥ समिधौवा ॥१०॥ जपेद्वा ॥११॥

अ०—मैथुन करण्यास निषिद्ध स्त्रियेशीं मैथुन केलें असतां, निषिद्ध उपाद्धिक केलें असतां, निषिद्ध भक्षण केलें असतां, अयोग्य दान घेतलें असतां किंवा चितेच्या ठिकाणचे यूपास स्पर्श केला असतां 'पुनर्मा० स्वाहा' या दोन मंत्रांनीं तुपाच्या दोन आहुती किंवा दोन समिधा द्याव्या अथवा जप करावा.

* जेव्हां जप करावयाचा असेल तेव्हां मंत्रांतील स्वाहा शब्द ह्मणूंनये.

---

## खण्ड ७.

सूत्र-अभ्याधितं चेत् स्वपन्तमादित्योऽभ्यस्तमियाद्वाग्यतोऽनुपविशन् रात्रिशेषं भूत्वा येन सूर्यज्योतिषा बाधसेतम इति पञ्चभिरादित्य मुपतिष्ठेत ॥ १ ॥

अ०—रोगी नसून निजला असतां सूर्यास्त झाला, तर मौन धरून सारी रात्र उभें रहावें आणि सकाळीं 'येनसूर्य०' (अष्ट. ७ अ० ८ व० १२) या पांच ऋचांनीं सूर्योपस्थान करावें.

**सू०-अभ्युदियात्‌ चेदं कर्म श्रान्तमनभिरूपेण कर्मणा वाग्यत इति समानमुत्तराभिश्चतसृभि रुपस्थानं ॥ २ ॥**

अ०—तरीच केवळ कर्म केल्यानें दमलेला नसून वाईट कृत्यांनीं दमलेला असा निजला असतां सूर्योदय झाला तर मौन धरून सारा दिवस उभें रहावें व 'यस्यते'० (अष्ट. ७ अ० ८ व० १३) या चार ऋचांनीं उपस्थान करावें.

* हें उपस्थान दुसरे दिवशीं सकाळीं करावें.

**सू०-यज्ञोपवीति नित्योदकः सन्ध्यामुपासीत वाग्यतः ॥ ३ ॥**

अ०—सव्य यज्ञोपवीत धारण करून व स्मृतींत सांगितलेलें मार्जनादिक करून मौन धरून संध्यादेवतेची उपासना करावी.

**सू०-सायमुत्तरापराभिमुखोऽन्वष्टमदेशं सावित्रीं जपेदर्धास्तमिते मण्डल आनक्षत्रदर्शनात्‌ ॥ ४ ॥**

अ०—सायंकाळीं वायव्य कोणाजवळ पश्चिम दिशेस तोंड करून सूर्यमंडल अर्धें अस्तास गेलें ह्मणजे तेव्हांपासून नक्षत्र दिसूं लागे पावेतों गायत्री मंत्राचा जप करावा.

**सू०-एवं प्रातः ॥ ५ ॥ प्राङ्मुख तिष्ठन्नामण्डलदर्शनात्‌ ॥ ६ ॥**

अ०—ह्याप्रमाणेंच प्रातःकाळीं पूर्वेस तोंड करून उभें राहून अर्ध्या नक्षत्रांचा अस्त झाला ह्मणजे तेव्हां पासून सूर्यमंडल दिसूं लागे पावेतों गायत्रीजप करावा.

सू०—कपोतश्चेदगारमुपहन्यादनुपतेद्वा, देवाः कपोत इति प्रत्यृचं जुहुयाज्जपेद्वा ॥ ७ ॥

अ०—जर घरावर कपोत पक्षी बसेल किंवा घरासमोरून जाईल तर 'देवाः'० ( अष्ट० ८ अ. ८ व. २३ या सूक्तानें प्रति ऋचेस होम किंवा जप करावा.

सू०—वय सु त्वा पथस्पते इत्यर्थचर्यांश्चरिष्यन् ॥ ८ ॥

अ०—द्रव्य मिळण्याकरितां प्रवासास जाणें असेल तर जाण्यापूर्वी 'वयमुत्वा'० ( ४ । ८ । १७ ) या सूक्तानें प्रति ऋचेस होम किंवा जप करावा.

सू०—सम्पूषन्विदुषा इति नष्टमधिजिगमिषन् मूल्हो वा ॥ ९ ॥

अ०—हरवलेली वस्तु सांपडावी अशी इच्छा असेल तर किंवा मूर्खास आपल्याला ज्ञान प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल तर 'संपू'० ( ४।८।१९) या सूक्तांनीं प्रति ऋचेस होम किंवा जप करावा.

सू०—सम्पूषन्नध्वन इति महान्तमध्वानमेष्यन् प्रतिभयं वा ॥ १० ॥

अ०—लांबच्या किंवा भयंकर मार्गांत जाण्याची इच्छा असेल तर 'संपू०'(१।३।२४) ह्या सूक्तानें प्रतिऋचेस होम किंवा जप करावा.

---

खण्ड ८.

सूत्र–अथैतान्युपकल्पयीत समावर्त्यमानो मणिं कुण्डले वस्त्रयुगं छत्रमुपानद्युगं दण्डं स्त्रजमुन्मर्दन मनुलेपन माञ्जन मुष्णीषमित्यात्मने चाचार्याय च ॥ १ ॥

अ०—पुढें ज्याचें समावर्त्तन व्हावयाचें त्यानें आपल्याकरितां व आचार्याकरितां मणी, कुंडल, दोन वस्त्रें, छत्री, चर्मीजोडा, वेळूचा दंड, माळा, उटणें (करंजाची बी), चंदनाची उटी, अंजन व पागोटें इतकीं मिळवून ठेवावीं.

सू०–यद्युभयोर्न विन्देताचार्यायैव ॥ २ ॥

अ०—जर दोघांकरितां न मिळतील तर आचार्याकरितांच मिळवावीं.

सू०–समिधं त्वाहरेदपराजितायान्दिशि यज्ञियस्य वृक्षस्य ॥ ३ ॥

अ०—यज्ञाला उपयोगी वृक्षाचे ईशान्य दिशेकडील समिध आणावी.

सू०–आर्द्रामन्नाद्यकामः पुष्टिकामस्तेजस्कामो वा ब्रह्मवर्चसकाम उपवातां ॥ ४ ॥ उभयी मुभयकामः ॥ ५ ॥

अ०—अन्नादिक मिळण्याची इच्छा असेल किंवा पुष्टीची इच्छा असेल अथवा कांतीची इच्छा असेल तर ती समिध ओली आणावी आणि ब्रह्मतेज पाहिजे असेल तर शुष्क समिध

आणावी; आणि वर सांगितलेल्या सर्व इच्छा असतील तर ओली-कोर्डी समिध आणावी.

## सू०-उपरि समिधं कृत्वा गामन्नं च ब्राह्मणेभ्यः प्रदाय गौदानिकं कर्म कुर्वीत ॥ ६ ॥

अ०—वर समिध ठेवावी आणि गाय व अन्न हीं ब्राह्मणाला देऊन गोदानांत सांगितलेलें कर्म करावें.

* आणलेली समिध जमिनीवर ठेवूं नये.

## सू०-आत्मनि मन्त्रान् त्संनमयेत् ॥ ७ ॥

अ०—या गोदानकर्मांतील मंत्रांत **अस्मत्** शब्दाचा प्रयोग करावा; ह्मणजे, एनं या ठिकाणीं **मां** ह्मणावें, **अस्य** या ठिकाणीं **मम** ह्मणावें, आणि ते या ठिकाणीं **मे** ह्मणावें.

## सू०-एकक्रीतकेन ॥ ८ ॥

अ०—ज्या करंजाचे फळांत एक बी असते त्या बीनें अंगाला मर्दन करावें.

## सू०-शीतोष्णाभिरद्भिः स्नात्वा, युवं वस्त्राणि पीवसा वसाथे इत्यहते वाससी आच्छाद्य अश्मनस्तेजोऽसि चक्षुर्मे पाहीति चक्षुषी आंजयीत ॥ ९ ॥

अ०—विसण घातलेल्या पाण्यानें स्नान करून '**युवं०**' (अष्ट. २ अ० २ व० २२) या ऋचेनें पूर्वसंपादित वस्त्रें नेसून व पांघरून '**अश्मनस्तेजोऽसिचक्षुर्मेपाहि**' या मंत्रानें डोळ्यांत अंजन घालावें.

* प्रथम उजव्या डोळ्यांत आणि नंतर डाव्या डोळ्यांत घालावें व दोनदां मंत्र ह्मणावा.

**सू०-अश्मनस्तेजोऽसि श्रोत्रं मे पाहि इति कुण्डले आबध्नीत ॥ १० ॥**

अ०—'अश्मनस्तेजोऽसि श्रोत्रं मे पाहि', या मंत्रानें कानांत कुंडलें बांधावीं.

* प्रथम उजव्या आणि नंतर डाव्या कानांत बांधावीं व प्रत्येक वेळेस मंत्र ह्मणावा.

**सू०-अनुलेपनेन पाणी प्रलिप्य मुखमग्रे ब्राह्मणोऽनुलिम्पेत्. बाहू राजन्यः उदरं वैश्यः उपस्थं स्त्री ऊरू सरणजीविनः ॥ ११ ॥**

अ०—अनुलेपनानें हात लिंपून ( दोन्ही हातांनीं उटी घेऊन ) तें अनुलेपन ब्राह्मणांनीं प्रथम मुखाला, क्षत्रियांनीं प्रथम बाहूला, वैश्यांनीं प्रथम पोटाला, स्त्रियांनीं प्रथम उपस्थाला आणि पायांनीं मजल मारणारांनीं प्रथम मांड्यांनां लावावें.

* आणि नंतर इतर अवयवांनां लावावें.

**सू०-अनार्त्तोऽस्यनार्त्तोऽहं भूयासम् इति स्रजमपि बन्धीत न मालेत्यां ॥ १२ ॥ मालेति चेद्ब्रूयुः स्रगित्यभिधापयीत ॥ १३ ॥**

अ०—'अनार्त्तोऽस्यनार्त्तोऽहं भूयासम्' या मंत्रानें स्रक् ( माला ) बांधावी परंतु माला हा शब्द ह्मणून बांधूं नये. माला असें ह्मटलें तर पुन्हां स्रक् असें ह्मणून बांधावी.

**सू०-देवानां प्रतिष्ठे स्थः सर्वतो मापातमित्युपानहावास्थाय दिवश्छदमसि इति छत्रमादत्ते ॥ १४ ॥**

अ०—'देवानां प्रतिष्ठे स्थः सर्वतो मापातं' हा मंत्र ह्मणून

चर्मी जोडा घालावा आणि 'दिवश्छद्मासि' हा मंत्र ह्मणून छत्री घ्यावी.

सू०-वेणुरसि वानस्पत्योऽसि सर्वतो मा पाहि. इति वैणवन्दण्डं ॥ १५ ॥

अ०—'वेणुरसि वानस्पत्योऽसि सर्वतो मा पाहि', हा मंत्र ह्मणून वेळूची काठी घ्यावी.

सू०-आयुष्यमिति सूक्तेन मणिं कण्ठे प्रतिमुच्योष्णीषं कृत्वा तिष्ठन् त्समिधोऽभ्यादध्यात् ॥ १६ ॥

अ०—'आयुष्यं वर्च०' (८।७।१७) हें सूक्त ह्मणून गळ्यांत मणी व डोकीस पागोटें घालून उभें राहून समिध द्यावी.

---

खण्ड ९.

सूत्र-स्मृतन्निंदा च विद्या च श्रद्धा प्रज्ञा च पंचमी।
इष्टन्दत्तमधीतञ्चकृतं सत्यं श्रुतं व्रतं।
यदग्ने सेन्द्रस्य सप्रजापतिकस्य सऋषिकस्य सऋषिराजन्यस्य सपितृकस्य सपितृराजन्यस्य समनुष्यस्य समनुष्यराजन्यस्य साकाशस्य सातीकाशस्य सानुकाशस्य सप्रतीकाशस्य सदेवमनुष्यस्य सगन्धर्वाप्सरस्कस्य सहारण्यैश्च पशुभिर्ग्राम्यैश्च यन्म आत्मन आत्मनि व्रतन्तन्मे सर्वव्रतमिदमहमग्ने सर्वतो भवामि स्वाहेति ॥ १ ॥

अ०—ती समिध देतांना 'स्मृतं० स्वाहा' हा मंत्र ह्मणावा.

* 'स्मृतंचमे,' 'अस्मृतंचमे,' 'तन्मे उभयव्रतं,' असेंच 'निंदाचमे,' 'अनिंदाचमे' 'तन्मउभयव्रतं' अशीं १२ पदाला बारा वाक्यें ह्मणून पुढें 'यदग्ने'० ह्मणून समिध द्यावी.

सू०-ममाग्नेवर्च इतिप्रत्यृचं समिधोऽभ्यादध्यात् ॥ २

अ०—'ममाग्ने'० (८।७।१९) या १० ऋचांनीं प्रतिऋचेस समिध द्यावी.

सू०-यत्रैनं पूजयिष्यन्तो भवन्ति तत्रैतां रात्रीं वसेत् ॥ ३ ॥

अ०—ज्या ठिकाणीं सोडमुंज्याची लोक पूजा करतील त्याठिकाणींच सोडमुंज झाल्यानंतर त्या रात्रीं रहावें.

सू०-विद्यान्ते गुरुमर्थेन निमन्त्रं कृत्वाऽनुज्ञातस्य वा स्नानम् ॥ ४ ॥

अ०—अरण्यकाध्ययन संपल्यानंतर गुरूला विचारावें कीं, तुह्माला काय दक्षिणा देऊं? नंतर गुरूनें मागितलेली दक्षिणा देऊन अथवा गुरूनें समावर्त्तन करण्यास आज्ञा दिली असतां समावर्त्तन करावें.

सू०-तस्यैतानि व्रतानि भवन्ति ॥ ५ ॥

अ०—त्या स्नातकास पुढें सांगितलेले नियम आहेत.

सू०-न नक्तं स्नायात् । न नग्नः स्नायात् । न नग्नः शयीत । न नग्नां स्त्रियमीक्षेतान्यत्र मैथुनात् । वर्षति न धावेत् ॥ ६ ॥

अ०—रात्रीं व नागव्यांनीं स्नान करूंनये, नागव्यांनीं निजूं नये, नागवीस्त्री मैथुनाशिवाय पाहूंनये, व पाऊस पडत असतां धावूंनये.

**सू०-न वृक्षमारोहेत् । न कूपमवरोहेत् । न बाहुभ्यां नदीं तरेत् । न संशय मभ्यापद्येत ॥ ७ ॥ महद्वै भूतं स्नातको भवतीति विज्ञायते ॥ ८ ॥**

अ०—झाडावर चढूंनये, आडांत उतरूंनये, नदींत हातांनीं पोहूंनये, व जें केलें असतां काय होईल असा संशय वाटेल तें करूं नये. स्नातक (सोडमुंज झालेला) हा महाश्रेष्ठ होतो असें ऐकतों.

---

## खण्ड १०

**सूत्र-गुरवे प्रस्त्रक्ष्यमाणो नाम प्रब्रुवीत॥१॥**

अ०—समावर्त्तन झाल्यानंतर गुरु हा शिष्याला आपले घरीं पाठविणार त्या वेळीं स्नातकानें गुरूचें नांव संनुध्यंत उच्चारावें.

**सू०-इदं वत्स्यामो भो इति ॥ २ ॥ उच्चैरूर्ध्वंनाम्नः ॥ ३ ॥**

अ०—'इदं वत्स्यामो भो' असें ह्मणावें; परंतु इदं या ठिकाणीं 'गृहस्थाश्रमं' असें द्वितीयान्त ह्मणावें व तें गुरूचे नांवापुढें मोठ्यानें ह्मणावें.

* गुरूचें नांव हळू ह्मणून 'इदं'० हें मोठ्यानें ह्मणावें.

**सू०-प्राणापानयोरुपांशु ॥ ४ ॥** आ मन्द्रैरिन्द्र हरिभि **रिति च ॥ ५ ॥**

अ०—'प्राणापानयोः परिददामि' (ग्र० अ० ३।१०।६) यांत सांगितलेला हा मंत्र हळू ह्मणावा, व आमंद्रै०' ( ३।३।९ ) हीही ऋचा हळू ह्मणावी.

**सू०-अतो वृद्धो जपति प्राणापानयोरुरुव्यचास्तया प्रपद्ये देवाय सवित्रे परिददामीत्यृचं च ॥ ६ ॥**

अ०—शिष्यांनीं वरील २ मंत्र ह्मटले ह्मणून गुरूंनींही ते मंत्र ह्मणावे.

**सू०-समाप्यों प्राक् स्वस्तीति जपित्वा महित्रीणामित्यनुमन्त्र्य ॥ ७ ॥**

अ०—गुरूनें आपलें ह्मणणें संपल्यावर, 'ओं प्राक् स्वस्ति' असा जप करून 'महिंत्रीणां' ( ८।८।४३ ) या सूक्तानें शिष्याला अनुमंत्रण करावें व 'गृहस्थाश्रम कर' अशी आज्ञा देऊन घरीं पाठवावें.

**सू०-एवं मतिसृष्टस्य न कुतश्चिद्भयं भवतीति विज्ञायते ॥ ८ ॥**

अ०—अशा रीतीनें पाठविलेल्या शिष्याला कोणापासूनही भय होत नाहीं असें ऐकतों.

**सू०-वयसाममनोज्ञा वाचः श्रुत्वा कनिक्रदज्जनुषं प्रब्रुवाण इतिसूक्ते जपेद्देवीं वाचमजनयन्त देवा इति च ॥ ९ ॥**

अ०—पक्ष्यांचा क्रूर शब्द ऐकिला तर 'कनिक्रद०' (२।८।११ ) या दोन सूक्तांचा व 'देवीं०' ( ६।७।५ ) या एक ऋचेचा जप करावा

सू०-स्तुहिश्रुतङ्गर्त्तसदं युवानमिति मृगस्य॥१०॥

अ०—हरिणांचा वाईट शब्द ऐकिला तर 'स्तुहि०' (२।७ १८) या ऋचेचा जप करावा.

सू०-यस्या दिशो बिभियाद्यस्माद्वा तांदिशमुल्मुकमुभयतः प्रदीप्तं प्रत्यस्येन्मन्थं वा प्रसव्यमालोड्याभयं मित्रावरुणामह्यमस्त्वर्चिषा शत्रून्दहन्तं प्रतीत्यमाज्ञातारं मा प्रतिष्ठां विन्दन्तु मिथो भिन्दाना उभयन्तु मृत्युमिति संसृष्टं धनमुभयं समाकृतमिति मन्थं नञ्चंकरोति ॥ ११ ॥

अ०—ज्या दिशेपासून किंवा ज्यापासून भय होतें त्या दिशेस दोन्ही बाजूंनीं पेटलेलें लांकूड 'अभयंमृत्युं०' हा मंत्र ह्मणून फेकावें किंवा मंथा (रवि) उलटा घुसळून त्या दिशेचे संमुख 'संसृष्टं०' (८।३।१९) ही ऋचा ह्मणून पालथा करावा.

---

खण्ड ११.

सूत्र-सर्वतो भयादनाज्ञातादष्टा वाज्याहुतीर्जुहुयात् पृथिवी वृता साग्निना वृता तया वृतया वत्र्या यस्माद्भयाद्बिभेमि तद्वारये स्वाहा। अन्तरिक्षं वृतं तद्वायुना वृतन्तेन वृतेन वत्रेण यस्माद्भयाद्बिभेमि तद्वारये स्वाहा। द्यौर्वृता सादित्येन वृता तया वृतया वत्र्या

यस्माद्भयाद्बिभेमि तद्वारये स्वाहा। दिशो वृतास्ताश्चन्द्रमसा वृतास्ताभिर्वृताभिर्वत्रीभिर्यस्माद्भयाद्बिभेमि तद्वारये स्वाहा। आपो वृतास्ता वरुणेन वृतास्ताभिर्वृताभिर्वत्रीभिर्यस्माद्भयाद्बिभेमि तद्वारये स्वाहा। प्रजावृतास्ताः प्राणेन वृतास्ताभिर्वृताभिर्वत्रीभिर्यस्माद्भयाद्बिभेमि तद्वारये स्वाहा। वेदा वृतास्ते छन्दोभिर्वृता स्तैर्वृतैर्वत्रैर्यस्माद्भयाद्बिभेमि तद्वारये स्वाहा। सर्वं वृतं तद्ब्रह्मणा वृतन्तेन वृतेन वत्रेण यस्माद्भयाद्बिभेमि तद्वारये स्वाहा इति ॥ १ ॥

अ०—अमुक पुरुषापासूनच भय झालें असें ज्ञान न होतां सर्व दिशेपासून भय झालें तर तुपाच्या ८ आहुती 'पृथिवी०' या ८ मंत्रांनीं द्याव्या.

सू०–अथापराजितायां दिश्यवस्थाय स्वस्त्यात्रेयं जपति यत इन्द्र भयामहे इति च सूक्तशेषं ॥ २ ॥

अ०—पुढें ईशान्य दिशेस उभें राहून 'स्वस्तिनो० (४।३।७) हें सूक्त व 'यतइंद्र०' (६।४।३८) हें अवशिष्ट सूक्त ह्मणावें.

* (गृ. अ. ३ खंड १० सू. ९) पासून या सूत्रापावेतों सांगितलेलें कर्म, गुरूंनीं घरीं पाठविलेल्या शिष्याविषयीं समजावें.

———o———

## खण्ड १२.

सूत्र–संग्रामे समुपोल्हे राजानं सन्नाहयेत् ॥ १ ॥

अ०—युद्धप्रसंग उपस्थित झाला असतां पुरोहितानें पुढें सांगितल्या रीतीनें राजाला सज्ज करावें:—

सू०–आत्वाहार्षमन्तरेधीति पश्चाद्रथस्यावस्थाय ॥ २ ॥

अ०—(प्रथमत:) रथाच्या मागें उभें राहून 'आत्वा०' (८।८।३१) हें सूक्त जपावें.

सू०–जीमूतस्यैव भवति प्रतीकमिति कवचं प्रयच्छेत् ॥ ३ ॥ उत्तरया धनुः ॥ ४ ॥ उत्तरां वाचयेत् ॥ ५ ॥

अ०—(नंतर) 'जीमू०' (५।१।१९) या ऋचेनें राजाला कवच द्यावें, 'धन्वना०' (५।१।१९) या ऋचेनें धनुष्य द्यावें आणि मग 'वक्ष्यन्ती०' (५।१।१९) ही तिसरी ऋचा राजाकडून ह्मणवावी.

सू०–स्वयञ्चतुर्थीं जपेत् ॥ ६ ॥ पञ्चम्येषुधिं प्रयच्छेत् ॥ ७ ॥

अ०—(नंतर) स्वतां पुरोहितानें 'तेआचरं०' (५।१।१९) ही चौथी ऋचा जपून 'बह्वीनांपि०' (५।१।१९) या ऋचेनें (राजाला) भाता द्यावा.

सू०–अभिप्रवर्त्तमाने षष्ठीं ॥ ८ ॥

अ०—ज्या दिशेस जावयाचें त्या दिशेस रथ जात असतां 'रथेतिष्ठं०' (५।१।२०) ही सहावी ऋचा जपावी.

**सू०-सप्तम्याश्वान् ॥ ९ ॥**

अ०—'तीव्रान्घो०' (५।१।२०) या सातव्या ऋचेनें आश्वांनां अनुमंत्रण करावें.

**सू०-अष्टमीमिषूनवेक्षमाणं वाचयति ॥१०॥**

अ०—'रथवाहं०' (५।१।२०) ही आठवी ऋचा राजा बाणाकडे पाहत असतां त्याजकडून ह्मणवावी.

**सू०-अहिरिव भोगैः पर्येति बाहुमिति तलं नह्यमानं ॥ ११ ॥**

अ०—तळ बांधणाऱ्या राजाकडून 'अहि०' (५।१।२१) ही ऋचा ह्मणवावी.

**सू०-अथैनं सारयमाणमुपारुह्याभिवर्त्तं वाचयति प्रयोवां मित्रावरुणेति च द्वे ॥ १२ ॥**

अ०—सारथी रथांतून राजाला नेत असतां राजाजवळ पुरोहितानें रथांत बसून 'अभीवर्तं०' (८।८।३२) हें सूक्त व 'प्रयोवां०' या दोन ऋचा (६।७।६) अशीं राजाकडून ह्मणवावीं.

**सू०-अथैनमन्वीक्षेताप्रतिरथेशाससौपर्णैः ॥ १३ ॥**

अ०—नंतर 'आशु०' (८।५।२२) 'शास०' (८।८।१०) आणि 'सौपर्ण०' या तीन सूक्तांनीं राजाला अवलोकन करावें.

**सू०-प्रधारयन्तु मधुनो घृतस्येत्येतत् सौपर्णं ॥ १४ ॥**

अ०—'प्रधा०' हें सौपर्णसूक्त आहे.

* दुसरें सौपर्ण ह्मणूंनये.

सू०-सर्वादिशो नुपरीयायात् ॥ १५ ॥

अ०—(नंतर) क्रमानें सर्व दिशांकडून जावें.

सू०-आदित्यमौशनसं वावस्थाय प्रयोधयेत् ॥ १६ ॥

अ०—ज्या दिशेस सूर्य असेल त्या दिशेस अथवा ज्या दिशेस शुक्र असेल त्या दिशेस उभे राहून युद्ध करावें.

सू०-उपश्वासय पृथिवीमुत द्यामिति तृचेन दुन्दुभिमभिमृशेत् ॥ १७ ॥

अ०—'उपश्वासय' ० (६।७।३) या तीन ऋचांनीं राजानें दुंदुभीला स्पर्श करावा.

सू०-अवसृष्टा परापतेतीषून्विसर्जयेत् ॥ १८ ॥

अ०—'अवसृष्टा०' (५।१।२२) या ऋचेनें बाण टाकावे.

सू०-यत्रबाणाः सम्पतन्तीति युद्धमानेषु जपेत् ॥ १९ ॥

अ०—युद्ध करीत असतां 'यत्रबा०', (५।१।२) या ऋचेचा जपकरावा.

सू०-संशिष्याद्वा संशिष्याद्वा ॥ २० ॥

अ०—अथवा सर्व मंत्र राजाला ह्मणण्यास सांगावे.

इति त्रितीयोऽध्यायः

———o———

# अध्याय ४.

## खण्ड १.

**सूत्र-आहिताग्निश्चेदुपतपेत्प्राच्यामुदीच्याम-पराजितायां वा दिश्युदवस्येत् ॥ १ ॥**

अ०—अग्निहोत्री रोगांनीं पीडित झाला तर त्यानें अग्नीसह पूर्वेस किंवा उत्तरेस किंवा ईशान्य दिशेस गांवाबाहेर जाऊन रहावें.

**सू०-ग्रामकामा अग्नय इत्युदाहरन्ति ॥२॥ आशंसन्त एनं ग्राममाजिगमिषन्तो गदं कुर्यु-रितिह विज्ञायते ॥ ३ ॥**

अ०—अग्नीला गांवांत राहण्याची इच्छा आहे असें ब्रह्मवेत्ते ह्मणतात; त्या अर्थी ह्याप्रमाणें गांवाबाहेर अग्नि नेला असतां तो अग्निहोत्र्याला आशीर्वाद देऊन निरोग करील असें समजावें व हें अश्वलायनासही मान्य आहे.

**सू०-अगदः सोमेन पशुनेष्ट्येष्ट्वावस्येत् ॥ ४ ॥ अनिष्ट्वा वा ॥ ५ ॥**

अ०—निरोग झाला ह्मणजे सोमयज्ञ, पशुयज्ञ, इष्टी अथवा ह्या तिन्हींपैकीं कांहीं न करितां गांवांत येऊन रहावें.

**सू०-संस्थिते भूमिभागं खानयेद्दक्षिणपूर्व-स्यां दिशि दक्षिणापरस्यां वा ॥ ६ ॥**

अ०—मरण पावला तर भूमीचा भाग आग्नेय दिशेस किंवा नैर्ऋत्य दिशेस खणवावा.

**सू०-दक्षिणाप्रवणं प्राग्दक्षिणाप्रवणं वा प्रत्यग्दक्षिणाप्रवणमित्येके ॥ ७ ॥**

अ०—दक्षिणेस किंवा अग्नेय दिशेस उतरती खांच करावी. निर्ऋति दिशेसही उतरती खांच करावी असेंही कोणी ऋषी ह्मणतात.

**सू०-या वानुद्बाहुकः पुरुषस्तावदायामं ॥८॥ व्याममात्रं तिर्यक् ॥ ९ ॥ वितस्त्यर्वाक् ॥ १०॥**

अ०—वर हात करून उभा राहिलेल्या पुरुषा इतकी लांब, वांवभर रुंद व वीतभर खोल अशी खांच करावी.

**सू०-अभित आकाशं श्मशानं ॥ ११ ॥ बहुलौषधिकं ॥ १२ ॥**

अ०—सर्व बाजूंनीं आकाश आहे व पुष्कळ औषधें जेथें आहेत असें स्मशान असावें.

* मध्यें आकाश नसावें. अस्थी पुरण्याचें स्मशान व दहन करण्याचें स्मशान अशी दोन प्रकारचीं स्मशानें आहेत.

**सू०-कण्टकिक्षीरिणास्त्विति यथोक्तं पुरस्ता-त् ॥ १३ ॥**

अ०—वास्तुप्रकरणांत जे वृक्ष उपटून टाकण्यास सांगितले आहेत त्याप्रमाणें तसे वृक्ष वगैरे असल्यास उपटून टाकावे.

* हेंही लक्षण दोन्ही स्मशानांस लागू आहे.

**सू०-यत्र सर्वत आपः प्रस्यन्देरन्ने तदा दहनस्य लक्षणं श्मशानस्य ॥ १४ ॥**

अ०—ज्या प्रदेशावर सर्व बाजूंनीं उदक जातें तें दहन करण्याचें स्मशान असावें.

* सर्व बाजूंनीं उतरती व मध्यें उंच अशी भूमि असावी हें तात्पर्य.

सू०-केशश्मश्रुलोमनखानीत्युक्तं पुरस्तात् ॥ १५ ॥

अ०—(और्ध्वदेहिकाचे प्रारंभीं) श्रौत अध्याय ६ खंड १० यांत सांगितल्याप्रमाणें वपनादिक करावें.

सू०-द्विगुल्फं बर्हिराज्यञ्च ॥ १६ ॥

अ०—(पूर्वी) पुष्कळ तूप व पुष्कळ दर्भ आणून ठेवावे.

सू०-दधन्यत्र सर्पिरानयन्त्येतत्पित्र्यं पृषदाज्यं ॥ १७ ॥

अ०—दह्यांत तूप घालावें. याला पितरांस उपयोगी पृषदाज्य असें ह्मणतात; हेंही पुष्कळ आणून ठेवावें.

---

## खण्ड २.

सू०-अथैतां दिशमग्नीन्नयन्ति यज्ञपात्राणि च ॥ १ ॥

अ०—नंतर ज्या दिशेस भुई लगली असेल त्या दिशेस मृताच्या बांधवांनीं अग्नि व यज्ञपात्रें न्यावीं.

सू०-अन्वञ्च प्रेतमयुजोऽमिथुनाः प्रवयसः ॥ २ ॥

अ०—(आणि मग) यज्ञपात्रांचे मागून प्रेत न्यावें. प्रेत नेणारांची विषम संख्या असावी आणि नेणारे वृद्ध असून बायकापुरूष मिश्र नसावेत.

* ह्मणजे सर्व बायकाच असाव्या किंवा सर्व पुरुषच असावे हें तात्पर्य.

सू०-पीठचक्रेण गोयुक्तेनेत्येके ॥ ३ ॥

अ०—बैल जोडलेल्या गाडी वगैरेनेंहीं प्रेत न्यावें असें कोणी ऋषी ह्मणतात.

सू०-अनुस्तरणीं ॥ ४ ॥

अ०—ज्या स्त्रीपशूनें प्रेताचें आच्छादन करितात ती अनुस्तरणी करावी असेंही कोणी ऋषी ह्मणतात.

सू०-गां ॥ ५ ॥ अजां वैकवर्णाम् ॥ ६ ॥

अ०—गाय किंवा एक रंगी शेळीही अनुस्तरणी करावी.

सू०-कृष्णामेके ॥ ७ ॥

अ०—काळी शेळीही अनुस्तरणी करावी असेंही कोणी ऋषी ह्मणतात.

सू०-सव्ये बाहौ बध्वानुसंकालयन्ति ॥ ८ ॥

अ०—त्या पशूचा पुढील डावा पाय बांधून त्यास प्रेताचे मागें न्यावें.

सू०-अन्वञ्चोमात्या अधोनिवीताः प्रवृत्तशिखा ज्येष्ठप्रथमाः कनिष्ठजघन्याः ॥ ९ ॥

अ०-(आणि) त्या पशूचे मागून बांधवादिकांनीं, माळेसारखें जानवें करून व शेंड्या मोकळ्या करून वडील पुढें व धाकटे मागें अशा क्रमानें जावें.

सू०-प्राप्यैवं भूमिभागं कर्त्तोदकेन शमीशाखयात्रिः प्रसव्यमायतनं परिव्रजन् प्रोक्षत्य पेतवीतविचसर्पतान इति ॥ १० ॥

अ०—याप्रमाणें स्मशानांत गेल्यावर क्रियाकर्त्यानें त्या खांचे-

ला तीन वेळां उलट्या प्रदक्षिणा घालतांनां शमीच्या फांदीनें 'अपेत०' (७।६।१९) ही ऋचा ह्मणून प्रोक्षण करावें.

* दर प्रदक्षिणेस मंत्र ह्मणत जावा.

सू०-दक्षिणपूर्व उद्धतान्त आहवनीयं निदधाति॥ ११ ॥ उत्तर पश्चिमे गार्हपत्यं ॥ १२॥ दक्षिणपश्चिमे दक्षिणम् ॥ १३ ॥

अ०—त्या खांचेंत चराचे बाहेर आग्नेयकोणास आहवनीय अग्नि ठेवावा, वायव्यकोणास गार्हपत्य अग्नि ठेवावा आणि निर्ऋति कोणास दाक्षणाग्नि ठेवावा.

सू०-अथैनमन्तर्वेदि इध्मचितिं चिनोति यो जानाति ॥ १४ ॥

अ०—नंतर ज्याला चिता रचण्याची माहिती असेल त्यानें त्या खांचेमध्यें काष्ठांनीं चिता रचावी.

सू०-तस्मिन् बर्हिरास्तीर्य कृष्णाजिनं चोत्तरलोम तस्मिन् प्रेतं संवेशयन्त्युत्तरेण । गार्हपत्यं हृत्वा हवनीयमभिमुखशिरसं ॥ १५ ॥

अ०—( पुढें ) त्या चितेवर दर्भ अंथरून व त्यावर कृष्णाजिन ऊर्ध्व केश असें अंथरून त्यावर प्रेताला गार्हपत्याच्या उत्तर बाजूनें नेऊन आहवनीयाकडे त्याचें डोकें करून निजवावें.

* हें कर्म बांधवांनीं करावें.

सू०-उत्तरतः पत्नीं ॥ १६ ॥

अ०—प्रेताच्या उत्तरेस पत्नीला निजवावें.

सू०-धनुश्च क्षत्रियाय ॥ १७ ॥

अ०—क्षत्रियाचें प्रेत असेल तर त्याचे ... ठेवावें.

सू०-तामुत्थापयेद्देवरः पतिस्थानीयोन्तेवासी जरद्दासो वोदीर्ष्वनार्यभिजीवलोकमिति ॥ १८ ॥

अ०—नंतर मृताच्या पत्नीला पतिस्थानीय दीरांनीं किंवा शिष्यांनीं किंवा जुन्या व ह्मातान्या दासांनीं 'उदीर्ष्व०' (७।६।२७) ही ऋचा ह्मणून उठवावी.

सू०-कर्त्ता वृषले जपेत् ॥ १९ ॥

अ०—पत्नीला उठविणारा शूद्र असल्यास हा मंत्र कर्मकर्त्यानें ह्मणावा.

सू०-धनुर्हस्तादाददानो मृतस्येति धनुः ॥ २० ॥

अ०—(नंतर) 'धनुर्ह०' (७।६।२७) या ऋचेनें धनुष्य उचलावें.

* तें धनुष्य भाऊ वगैरेंनीं उचलावें.

सू०-उक्तं वृषले ॥ २१ ॥

अ०—हें धनुष्य उचलणारा शूद्र असल्यास तेंव्हांही सदरीं लिहिल्याप्रमाणें कर्त्यानेंच मंत्र ह्मणावा.

सू०-अधिज्यं कृत्वा संचितिमाचित्वा संशीर्यानुप्रहरेत् ॥ २२ ॥

अ०—(ही धनुष्यासंबंधी क्रिया) प्रेतावर काष्ठचिता रचण्याच्या पूर्वीं करावयाची; ह्मणजे धनुष्याची प्रत्यंचा लावून (दोरी ओढून) धनुष्य मोडून प्रेताचे उत्तरेस चितेवर टाकावें.

---

खण्ड ३.

सूत्र-अथैतानि पात्राणि योजयेत् ॥ १ ॥

अ०—नंतर पुढें सांगितल्याप्रमाणें प्रेतावर यज्ञपात्रें योजावीं.

सू०-दक्षिणे हस्ते जुहूं ॥ २ ॥ सव्य उपभृतं ॥ ३ ॥ दक्षिणे पार्श्वे स्फ्यं । सव्येऽग्निहोत्रहवणीं ॥४॥ उरसि ध्रुवां । शिरसि कपालानि । दत्सु ग्राव्णः ॥ ५ ॥

अ०—उजव्या बाजूस स्फ्यपात्र व डाव्या बाजूस अग्निहोत्र, हवनी पात्र,—

* ह्मणजे, उरावर ध्रुवापात्र, शिरावर कपालपात्र आणि दांतांवर ग्रावपात्र.

सू०-नासिकयोः स्रुवौ ॥ ६ ॥ भित्वा चैकम् ॥ ७ ॥

अ०—दोन्ही नाकपुड्यांवर दोन स्रुवापात्रें ठेवावीं. ही एक स्रुवा असेल तर ती फोडून दोनही नाकपुड्यांवर ठेवावी.

सू०-कर्णयो प्राशित्रहरणे ॥ ८ ॥ भित्वा चैकम् ॥ ९ ॥

अ०—त्याचप्रमाणें दोन्ही कानांवर दोन प्राशित्रहरणपात्रें ठेवावीं. हेंही प्राशित्रहरण एक असेल तर तें फोडून दोन्ही कानांवर ठेवावें;—

सू०-उदरे पात्रीं ॥ १० ॥ समवत्तधानं च चमसं ॥ ११ ॥ उपस्थे शम्यां ॥ १२ ॥ अरणीमूर्वोः, उलूखलमुसले जङ्घयोः ॥ १३ ॥ पादयोः शूर्पे ॥ १४ ॥ छित्वा चैकम् ॥१५॥

अ०—उदरावर पात्री हें पात्र व समवत्तधानचमसपात्र, उपस्थावर शम्यापात्र, दोन्ही मांड्यांवर दोन अरणी, उजव्या गुडघा·

षर उत्तल व डाव्यावर मुसळ आणि दोन्ही पायांवर दोन सुपें ठेवावीं. हें सूपही एक असेल तर तें फाडून दोन्ही पायांवर ठेवावें.

**सू० आसेचनवन्ति पृषदाज्यस्य पूरयन्ति ॥१६॥**

अ०—ज्या पात्रांवर पृषदाज्य राहील तीं पात्रें पृषदाज्यांनीं भरावीं.

**सू०-अमापुत्री दृषदुपले कुर्वीत ॥ १७ ॥**

अ०—दृषत व उपल हीं पुत्रांनीं घ्यावीं.

* ह्मणजे आपल्या उपयोगाकरितां घरींच ठेवावीं.

**सू०-लौहायसं च कौलालं ॥ १८ ॥**

अ०—लौहायस व कौलाल ह्मणजे यज्ञोपयोगीं वांकस कोयता वगैरे लोखंडी सामानही घ्यावें.

**सू०-अनुस्तरण्यावपामुत्खिद्य शिरोमुखं॥ प्रच्छादयेदग्नेर्वर्मपरिगोभिर्व्ययस्वेति ॥ १९ ॥**

अ०—अनुस्तरणीची वपा काढून त्या वपेनें प्रेताचें शिर मुखासुद्धां 'अग्ने०' (७।६।२१) या ऋचेनें झांकावें.

**सू०-वृक्का उद्धृत्य पाण्योरादध्यादति द्रवसारमेयौ श्वानाविति दक्षिणे दक्षिणं सव्ये सव्यं ॥ २० ॥**

अ०—वृक्क ह्मणजे कुक्षींतील विशेष मांसगोल काढून ते प्रेताचे उजव्या हातावर उजव्या बाजूचा वृक्क, व डाव्या हातावर डाव्या बाजूचा वृक्क असे 'अतिद्रव०' (७।६।१९) या ऋचेनें ठेवावे.

**सू०-हृदये हृदयं ॥ २१ ॥**

अ०—प्रेताचे ह्रुयावर अनुस्तरणीचें हृदय ठेवावें.

सू०-पिंडचौ नैके ॥ २२ ॥ वृक्कापचार इ-त्येके ॥ २३ ॥

अ०—कोणी ऋषी असेंही ह्मणतात कीं, वृक्काबद्दल अथवा वृक्काचे अभावीं पिठाचे पिंडच दोन्ही हातांवर ठेवावे.

* अनुस्तरणी केली नसेल तर वृक्काचा अभावच, व यावरून अनुस्तरणी केलीच पाहिजे असें नाहीं.

सू०-सर्वां यथाङ्गं विनिक्षिप्य चर्मणा प्रच्छा-द्येममग्ने चमसं माविजिह्वर इति प्रणीता प्रणयनम-नुन्त्रयते ॥ २४ ॥

अ०—अनुस्तरणीचा जो जो अवयव तो तो प्रेताच्या त्या त्या अवयवावर ठेवून तिच्या चर्मानें प्रेताला आच्छादन करून 'इममग्ने०' ( ७।६।२१ ) या ऋचेनें प्रेताच्या अंगावर ठेवलेल्या चमसाचें अनुमंत्रण करावें.

सू०-सव्यं जान्वाच्यदक्षिणाग्नावाज्याहुती-र्जुहुयादग्नये स्वाहा सोमाय स्वाहा लोकाय स्वाहानुमतये स्वाहेति ॥ २५ ॥

अ०—डावीमांडी भुईवर ठेवून दक्षिणाग्नीवर तुपाच्या ४ आहुती ( १ ) अग्नये स्वाहा, (२) कामाय स्वाहा, ( ३ ) लोकाय-स्वाहा आणि ( ४ ) अनुमतये स्वाहा या चार मंत्रांनीं द्याव्या.

सू०-पञ्चमीमुरसि प्रेतस्यास्माद्वै त्वमजा-यथा अयं त्वदधिजायतामसौ स्वर्गाय लोकाय स्वाहेति ॥ २६ ॥

अ०—पांचवी आहुती प्रेताच्या उरावर 'अस्मात्त्वं० स्वाहा' या मंत्रानें द्यावी.

* मंत्रांतील असौ या पदाचे ठिकाणीं प्रेताचें सम्बुध्यन्त नांव घ्यावें.

---

खण्ड ५.

सू०-प्रेष्यति युगपदग्नीन् प्रज्वालयतेति ॥ १ ॥

अ०—कर्त्यांनें एकदम ३ अग्नी पेटवा म्हणून हाताखालचे मंडळीस आज्ञा करावी.

* नंतर त्याप्रमाणें त्यांनीं अग्नी पेटवावे.

सू०-आहवनीयश्चेत्पूर्वं प्राप्नुयात्तत्स्वर्गलोक एनं प्रापदिति विद्याद्रात्स्यत्यसावमुत्रैवमयमस्मिन्निति पुत्रः ॥ २ ॥

अ०—आहवनीय अग्नि प्रेतास प्रथम स्पर्श करील तर तो अग्निहोत्र्यास स्वर्गलोकीं नेईल; आणि त्यास स्वर्गलोकींच संपत्ति प्राप्त होते व पुत्राला मनुष्यलोकीं प्राप्त होते असें समजावें.

सू०-गार्हपत्यश्चेत् पूर्वं प्राप्नुयादन्तरिक्षलोक एनं प्रापदिति विद्याद्रात्स्यत्यसावमुत्रैवमयमस्मिन्निति पुत्रः ॥ ३ ॥

अ०—गार्हपत्याग्नि जर प्रथम स्पर्श करील तर तो अग्निहोत्र्यास अंतरिक्षलोकीं नेईल व तेथेंच त्यास संपत्ति प्राप्त होईल आणि त्याचे पुत्राला मनुष्यलोकीं संपत्ति प्राप्त होईल असें समजावें.

**सू०–दक्षिणाग्निश्चेत् पूर्वं प्राप्नुयान् मनुष्यलोक एनं प्रापदिति विद्याद्रात्स्यत्यसावमुत्रैवमयमस्मिन्निति पुत्रः ॥ ४ ॥**

अ०—दक्षिणाग्नि जर प्रथम स्पर्श करील तर तो अग्निहोत्र्यास मनुष्यलोकीं ठेवील व त्यास मनुष्यलोकींच संपत्ति प्राप्त होऊन पुत्रालाही मनुष्यलोकींच संपत्ति प्राप्त होईल असें समजावें.

**सू०–युगपत्प्राप्तौ परामृद्धिं वदन्ति ॥ ५ ॥**

अ०—सर्व अग्नींनीं एकदम स्पर्श केला तर ते अग्निहोत्र्यास अत्युत्कृष्ट स्थानीं नेतील व त्यास उत्कृष्ट स्थानीं व पुत्रास मनुष्यलोकीं उत्कृष्ट संपत्ति मिळते असें वेदवेत्ते ह्मणतात.

**सू०–तं दह्यमानमनुमन्त्रयते प्रेहि प्रेहि पथिभिः पूर्व्येभिरिति समानं ॥ ६ ॥**

अ०—तें प्रेत दग्ध होत असतां 'प्रेहिप्रेहि'० या पांच ऋचांपैकीं तिसरी खेरीज करून चार ( ७ । ६ । १९ ) ऋचांनीं, 'मैनमग्ने०' ( ७ । ६ । २० ) या सहा ऋचांनीं, 'पूषात्वे०' ( ७ । ६ । २३ ) या चार ऋचांनीं, 'उपसर्प०' ( ७ । ६ । २७ ) या चार ऋचांनीं, 'सोमएके०' ( ८ । ८ । १२ ) या पांच ऋचांनीं व 'उरूणसा'० ( ७ । ६ । १६ ) या एक ऋचेनें अनुमंत्रण करावें.

**सू०–स एवं विदा दह्यमानः सहैव धूमेन स्वर्गं लोकमेतीति ह विज्ञायते ॥ ७ ॥**

अ०—हा प्रकार जाणून अग्निहोत्र्याचें प्रेत दग्ध करीत असतां अग्निहोत्री धूराबरोबर स्वर्गलोकास जातो असें ऐकतों.

* तात्पर्य, जाणून कर्म करावें.

**सू०–उत्तरपुरस्तादाहवनीयस्य जानुमात्रं गर्तंखात्वा वकांशीपालमित्यवधापयेत्ततो ह वा एष निष्क्रम्य सहैव धूमेन स्वर्गं लोकमेतीति ह विज्ञायते ॥ ८ ॥**

अ०—आहवनीयाचे ईशान्येस गुढघ्याइतकी खांच करून तींत नीळ व शेवाळें टाकून ठेवावें; अग्निहोत्री या खांचेंतून निघून धुराबरोबर स्वर्गलोकीं जातो असें जें ह्मणणें तें 'आश्वलायनास-ही मान्य आहे.

* अग्निहोत्री हा लिंगदेहानें या खांचेंत पार्थिवदेहाला संस्कार होईपर्यंत राहून, दहनसंस्कारानंतर या खांचेंतून निघून धुराबरोबर स्वर्गलोकीं जातो असें श्रुतीचें तात्पर्य आहे. ही खांच प्रथमच नीळ व शेवाळ घालून करून ठेवावी.

**सू०–इमे जीवा वि मृतैराववृत्रन्निति सव्यावृतो व्रजन्त्यनवेक्ष्यमाणाः ॥ ९ ॥**

अ०—(नंतर) कर्त्यांनें 'इमे०' (७।६।२६) ही ऋचा ह्मणून डाव्या बाजूनें सर्वांनीं वळून मागें न पहातां स्मशानांतून यावें:—

**सू०–यत्रोदकमवहद्भवति तत्प्राप्य सकृदुन्मज्यैकांऽजलिमुत्सृज्य तस्य गोत्रं नाम च गृहीत्वोत्तीर्यान्यानिवासांसि परिधाय सकृदेनान्यापीड्योदग्दशानि विसृज्यासत आनक्षत्रदर्शनात् ॥ १० ॥**

अ०—(व) जेथें अप्रवाहोदक असेल तेथें सर्वांनीं येऊन एक वेळ बुडी मारून त्या प्रेताचें नांव व गोत्राचा उच्चार करून

एक एक ओंजळ पाणी द्यावें, नंतर उदकांतून बाहेर येऊन दुसरीं वस्त्रें नेसून एकदां ओलीं वस्त्रें धुऊन तीं उत्तरेस दशा करून वाळत टाकावीं व तेथें नक्षत्रदर्शनपर्यंतों बसावें.

* हें कृत्य दिवसां झालें असतां नक्षत्रदर्शनानंतर घरीं जावें.

## सू०-आदित्यस्य वा दृश्यमाने प्रविशेयुः॥११॥

अ०—अथवा सूर्योदय होऊन सूर्यमंडळ दिसूं लागलें ह्मणजे घरांत प्रवेश करावा.

* हें कृत्य रात्रीं झालें असतां सूर्यदर्शनीं घरांत प्रवेश करावा.

## सू०-कनिष्ठप्रथमा ज्येष्ठजघन्याः ॥ १२ ॥

अ०—धाकटीं माणसें प्रथम आणि वडील माणसें मागाहून अशा क्रमानें घरांत प्रवेश करावा.

## सू०-प्राप्यागारमश्मानमग्निं गोमयमक्षतांस्तैलमप उपस्पृशान्ति ॥ १३ ॥

अ०—याप्रमाणें सर्वांनीं घरीं जाऊन अश्मा, अग्नि, गाईचें शेण, अक्षता, तिल व उदक या पदार्थांला स्पर्श करावा.

## सू०-नैतस्यां रात्र्यामन्नं पचेरन् ॥१४ ॥

अ०—मरणदिवशीं रात्रीं स्वयंपाक करूंनये.

## सू०-क्रीतोत्पन्नेन वा वर्त्तेरन् ॥ १५ ॥

अ०—खावयाचे पदार्थ विकत आणून अथवा कोणीं आणून दिले तर त्यांनीं निर्वाह करावा.

## सू०-त्रिरात्रमक्षारलवणाशिनः स्युः ॥१६॥

अ०—तीन दिवसपर्यंत क्षार पदार्थ व लवण खाऊंनये.

## सू०-द्वादशरात्रं वा महागुरुषु दानाध्ययने वर्जयेरन् ॥ १७ ॥

अ०—महागुरु ह्मणजे आईबाप किंवा वेद पढविणारा मृत झाला असतां १२ किंवा १० दिवसं दान व अध्ययन करूंनये.

* हा विकल्प आहे तो (गृ. ४ खं. ४ सू. १८) च्या अनुरोधानें लिहिला आहे.

**सू०-दशाहं सपिण्डेषु ॥ १८ ॥ गुरौ चासपिण्डे ॥ १९ ॥ अप्रत्तासु च स्त्रीषु ॥ २० ॥**

अ०—सपिंड किंवा असपिंड गुरु आणि अविवाहित कन्या मृत झाली असतां १० दिवसपर्यंत दान व अध्ययन सोडावें.

**सू०-त्रिरात्रमितरेष्वाचार्येषु ॥ २१ ॥ ज्ञातौ चासपिण्डे ॥ २२ ॥ प्रत्तासु च स्त्रीषु ॥ २३ ॥ अदन्तजाते ॥ २४ ॥ अपरिजाते च ॥ २५ ॥**

अ०—वेदाचा कांहीं भाग पढविणारे आचार्य, ज्ञातींतील असपिंड, विवाहित कन्या, दांत न आलेलें मूल किंवा पूर्ण गर्भ न होतां मृत झाला असतां तीन दिवसपर्यंत दान व अध्ययन करूंनये.

**सू०-एकाहं सब्रम्हचारिणि ॥ २६ ॥ समानग्रामीये च श्रोत्रिये ॥ २७ ॥**

अ०—सहाध्यायी मृत झाला असतां व आपल्या गांवांतील अग्निहोत्री मृत झाला असतां एक दिवस दान व अध्ययन करूंनये.

* या खंडांतील सोळाव्या व सत्राव्या सूत्राचा अर्थ कोणी असा करितात कीं, महागुरु मृत झाला असतां तीन रात्रपर्यंत अथवा बारा दिवसपर्यंत क्षार व लवण पदार्थ खाऊंनये असा विकल्प करून अठराव्या सूत्रापासून या शेवटच्या सूत्रापावेतों सांगितलेला हा अशौचसंक्षेप आहे ह्याचा विस्तार स्मृतीवरून समजावा. अग्निहोत्र्याचे प्रेताशिवाय इतरांचे प्रेतांचा विधि 'वृत्तिग्रंथांत' लिहिला आहे.

———०———

## खण्ड ५

**सू०-सञ्चयनमूर्ध्वं दशम्याः कृष्णपक्षस्यायुजास्वेकनक्षत्रे ॥ १ ॥**

अ०—कृष्णपक्षीं दशमीपुढील विषम तिथीला पूर्वा, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, उत्तरा, उत्तराषाढा, व उत्तराभाद्रपदा यांखेरीज नक्षत्रांवर अस्थिसंचयनकर्म करावें.

**सू०-अलक्षणे कुम्भे पुमांसमलक्षणायां स्त्रियमयुजोऽमिथुनाः प्रवयसः ॥ २ ॥**

अ०—अमंगल कुंभांत पुरुषाच्या अस्थी व अमंगल कुंभीमध्यें स्त्रियांच्या अस्थी अशा विषम संख्याक ह्मातार्‍यानें गोळा कराव्या. *यांत बायका व पुरुष मिश्र नसावे.

* स्तनरहित खापरी घागर ह्मणजे कुंभ व स्तनसहित ह्मणजे कुंभी असें समजावें. अस्थी गोळा करण्यास सर्व पुरुष किंवा सर्व बायकाच असाव्या.

**सू०-क्षीरोदकेनशमीशाखया त्रिः प्रसव्यमायतनं परिव्रजन् प्रोक्षति शीतिके शीतिकावतीति ॥ ३ ॥**

अ०—दुधानें मिश्र केलेलें पाणी शमीच्या डाहळ्यांनीं तीन वेळ त्या मृताच्या खांचेस उलट्या प्रदक्षिणा घालतांना 'शीतिके०' (७।६।२२) या ऋचेनें प्रोक्षण करावें.

* दर प्रदक्षिणेस मंत्र ह्मणत जावा.

**सू०-अङ्गुष्ठोपकनिष्ठिकाभ्यामेकैकमस्थ्यसंह्लादयन्तोऽवदध्युः पादौ पूर्वं शिर उत्तरं ॥ ४ ॥**

अ०—एकेक अस्थि अंगुष्ठ आणि अनामिकेनें घेऊन त्या न वाजवितां कुंभांत ठेवाव्या व त्या अस्थी पायांकडून डोक्यापर्यंत वेंचीत जावें.

सू०–सुसञ्चितं सञ्चित्य पवनेन सम्पूय यत्र सर्वत आपो नाभिः स्यन्देरन्नन्यावर्षाभ्यस्तत्र गर्ते ऽवदध्यु रुपसर्प मातरं भूमिमेतामिति ॥५॥

अ०—याप्रमाणें अस्थी नीट वेंचल्यावर त्या कुंभांत ठेवून जळलेलें चिताभस्म सुपानें पाखडावें व त्यांतील बारीक अस्थी त्या कुंभांत ठेविल्यांनंतर तो कुंभ, ज्या खांचेंत कोणतेही बाजूनें पर्जन्याचे उदकावांचून उदक येणार नाहीं अशा खांचेंत 'उपसर्प०' (७।६।१७) या ऋचेनें ठेवावा.

* हा मंत्र कर्त्यानेंच ह्मणावा आणि यापुढेंही कर्त्यानेंच मंत्र ह्मणावे.

सू०–उत्तरया पांसूनवकिरेत् ॥ ६ ॥ अवकीर्योत्तराम् ॥ ७ ॥

अ०—(आणि पुढें) 'उञ्छ्व०' (७।६।१८) या ऋचेनें त्या खांचेंत कुंभाचें तोंडापर्यंत माती टाकावी; आणि नंतर 'उञ्छ्वमा०' (७।६।१८) ही ऋचा ह्मणावी.

सू०–उत्तेस्तभ्नामीति कपालेनापिधायाथानवेक्षं प्रत्याव्रज्याप उपस्पृश्य श्राद्धमस्मै दद्युः ॥८॥

अ०—(नंतर) 'उत्ते०' (७।६।१८) या ऋचेनें तो कुंभ कपालांनीं ह्मणजे खापरीनें झांकून वर माती टाकून बुजवून मागें न पाहतां स्मशानांतून येऊन या प्रेताचे उद्देशानें श्राद्ध करावें.

—o—

खण्ड ६.

सूत्र-गुरुणाभिसृता अन्यतोवाऽपक्षीयमाणा अमावास्यायां शान्तिकर्म कुर्वीरन् ॥ १ ॥

अ०—ज्याचा गुरु मृत झाला असेल त्यानें किंवा ज्यांचा पुत्र, पशू किंवा हरिण्यादिकांचा नाश झाला असेल त्यानें अमावास्येला शांतिकर्म करावें.

सू०-पुरोदयादग्निं सहभस्मानं सहायतनं दक्षिणा हरेयुः क्रव्यादमग्निं प्रहिणोमि दूरमित्यर्धर्चेन ॥ २ ॥

अ०—सूर्योदयापूर्वी अग्नीला भस्मासुद्धां चुलीसह दक्षिण दिशेस 'क्रव्यादं'० ( ७।६।२१ ) या अर्ध्या ऋचेनें न्यावें.

* येथें अग्नि ह्मणजे लौकिकाग्नि घ्यावयाचा; गृह्याग्नि घेऊं नये.

सू०-तं चतुष्पथे न्युप्य यत्र वा त्रिः प्रसव्यं परियन्ति सव्यैः पाणिभिः सव्यानूरूनाघ्नानाः ॥ ३ ॥

अ०—तो अग्नि चौरस्त्यावर ( चवाठ्यावर ) अगर दुसरे स्थळीं टाकून त्याला उलट्या तीन प्रदक्षिणा घालाव्या व डाव्या हातांनीं डाव्या मांड्या थापटाव्या.

सू०-अथानवेक्षं प्रत्याव्रज्याप उपस्पृश्य केशश्मश्रुलोमनखानि वापयित्वोपकल्पयीरन्नवान्मणिकान् कुम्भानाचमनीयांश्च शमीसुमनोमालिनः शमीमयमिध्मं शमीमय्यावरणी

परिधींश्चानडुहं गोमयं चर्म च नवनीतमश्मानं च यावत्यो युवतयस्तावन्ति कुशपिञ्जूलानि ॥ ४ ॥

अ०—(नंतर) मागें न पाहतां परत येऊन स्नान करून क्षौर करवावें आणि पाणी ठेवण्याजोगें नवें मणिक ह्मणजे घागरीसारखें मडकें, तांब्या पंचपात्री वगैरे आचमन करण्याच्या उपयोगीं पात्रें, शमीकाष्ठाचा इध्म, शमीच्या दोन अरणी व त्या काष्ठांचेच परिधी, बैलाचें शेण, बैलाचें कांतडें, लोणी, अश्मा व आपल्या घरच्या जितक्या बायका असतील तितके कोंवळे दर्भ हे पदार्थ आणून ठेवावे. वरील भांडीं शमीच्या पुष्पमालांनीं युक्त असावीं.

सू०-अग्निवेलायामग्निं जनयेदिहैवायमितरो जातवेदा इत्यर्धर्चेन ॥ ५ ॥

अ०—अपराण्हकालीं मंथन करून 'इहैवा'० (७।६।२१) ही अर्धी ऋचा ह्मणून अग्नि उत्पन्न करावा.

* हाही अग्नि लौकिकाग्नीच समजावा.

सू०-तं दीपयमाना आसत आशान्तरात्रादायुष्मतां कथाः कीर्तयन्तो माङ्गल्यानीतिहासपुराणानीत्याख्यापयमानाः ॥ ६ ॥

अ०—कुलवृद्धांच्या गोष्टी बोलत व मंगलकारक इतिहास (पुराणें) वाचीत दोन प्रहर रात्रपर्यंत अग्नि प्रदीप्त करीत बसावें.

सू०-उपरतेषु शब्देषु सम्प्रविष्टेषु वा गृहं निवेशनं वा दक्षिणद्वारपक्षात्प्रक्रम्याविच्छिन्नामुदकधारां हरेत्तन्तुं तन्वन्रजसो भानुमन्विहीत्योत्तरस्मात् ॥ ७ ॥

अ०—सर्व लोक निद्रिस्त असतां त्यावेळीं अथवा तत्पूर्वी

पुत्रादिकांनीं घरांत किंवा निद्रेचे स्थानीं प्रवेश केला असतां कर्त्यानें दक्षिणेचे द्वारापासून उत्तरेचे द्वारापर्यंत 'तन्तुंतन्वन्' ० (८।१।१४) ही ऋचा ह्मणून सारखी उदकधार धरावी.

सू०—अथाग्निमुपसमाधाय पश्चादस्यानडुहं चर्मास्तीर्य प्राग्ग्रीवमुत्तरलोम तस्मिन्नमात्याना-रोहय दारोहतायुर्जरसं वृणाना इति ॥ ८ ॥

अ०— नंतर गृह्याग्नीचें उपसमाधान करून अग्नीचे पश्चिमेस बैलाचें कातडें, पूर्वेस गळा व ऊर्ध्व केश असें अंथरून त्यावर पुत्रा-दिकांस कर्त्यानें 'आरो०' (७।६।२७) ही ऋचा ह्मणून बसवावें.

सू०—इमं जीवेभ्यः परिधिं दधामीति परिधिं परि-दध्यात् ॥ ९ ॥

अ०—(नंतर) 'इमं०' (७।६।२६) ही ऋचा ह्मणून १ परिधी प्रथम अग्नीचे पश्चिमेस घालावा आणि मग दक्षिणेस १ व उत्तरेस १ असे दोन परिधी मंत्र न ह्मणतां घालावे.

सू०—अन्तर्मृत्युं दधतां पर्वतेनेत्युत्तरतोऽश्मानमित्यु-त्तरतोऽग्नेः कृत्वा परं मृत्यो अनुपरे हि पन्थामिति चत-सृभिः प्रत्यृचं हुत्वा यथाहान्यनुपूर्वं भवन्तीत्यमात्या-नीक्षेत ॥ १० ॥

अ०—अग्नीचे उत्तरेस 'अंत०' (७।६।२६) या ऋक्-पादानें अश्मा ठेवून 'परंमृत्यो०' (७।६।२६) या चार ऋचांनीं प्रतिऋचेस होम केल्यावर, 'यथाहा०' (७।६।२६) ही ऋचा ह्मणून पुत्रादिकांस अवलोकन करावें.

सू०—युवतयः पृथक् पाणिभ्यां दर्भतरुणकैः

नवनीतेनाङ्गुष्ठोपकनिष्ठिकाभ्यामक्षिणीआज्य-
पराच्योविसृजेयुः ॥ ११ ॥

अ०—स्त्रियांनीं वेगवेगळ्या एकेक कोंवळ्या दर्भानें लोणी घ्यावें व ते लोणी दोन्ही हातांच्या अंगुष्ठ अनामिकांनीं घेऊन दोन्ही डोळ्यांत घालावें आणि ते दर्भ न पाहतां पाठीमागें टाकून द्यावे.

सू० इमा नारीरविधवाः सुपत्नीरित्यंजाना ईक्षेत ॥ १२ ॥

अ०—( नंतर कर्त्यानें ) 'इमानारी' ० ( ७।६।२६ ) ही ऋचा ह्मणून डोळ्यांत लोणी घालणाऱ्या स्त्रियांनां अवलोकन करावें.

सू०--अश्मन्वतीरीयते संरभध्वमित्यश्मानं कर्त्ता प्रथमोऽभिमृशेत् ॥ १३ ॥

अ०—कर्त्यानें प्रथम अश्म्याला 'अश्मन्व' ० ( ८।१।१४ ) ही ऋचा ह्मणून स्पर्श करावा.

* आणि नंतर इतरांनीं अमंत्रक स्पर्श करावा.

सू०--अथापराजितायान्दिश्यवस्थायाग्निना-नडुहेन गोमयेन चाविच्छिन्नया चोदकधारयाऽ-पोहिष्ठामयोभुव इति तृचेन परीमेगामनेषतेति परिक्रा-मत्सुजपेत् ॥ १४ ॥

अ०—अग्नि व बैलाचें शेण घ्यावें, व 'आपोहिष्ठा०' (७।६।५) या ३ ऋचांनीं औपासनाग्नीस पुत्रादिक प्रदक्षिणा घालीत असतां कर्त्यानें ईशान्य दिशेस उभें राहून 'परीमे०' (८।८।१३) ही ऋचा जपावी.

सू०-पिङ्गलोऽनड्वान् परिणेयः स्यादित्युदाहरन्ति ॥ १५ ॥

अ०—पिंगट वर्णाच्या बैलाचा विवाह करावा असें ब्रह्मवेत्ते ह्मणतात.

सू०--अथोपविशन्ति यत्राभिरंस्यमाना भवन्त्यहतेन वाससा प्रच्छाद्य ॥१६॥ असतेऽस्वपन्त ओदयात् ॥ १७ ॥

अ०—नंतर ज्या जागेवर बसण्याची इच्छा असेल त्या जागेवर कोरें वस्त्र अंथरून त्यावर सर्वांनीं बसावें. ह्याप्रमाणें सूर्योदय होईपर्यंत न निजतां बसून राहावें.

सू०-उदित आदित्ये सौर्याणि स्वस्त्ययनानि च जपित्वाऽन्नं संस्कृत्याऽपनः शोशुचदघमिति प्रत्यृचं हुत्वा ब्राह्मणान् भोजयित्वा स्वस्त्ययनं वाचयीत गौः कंसोऽहतं वासश्च दक्षिणा ॥ १८ ॥

अ०—सूर्योदय झाला असतां (गृ. अ० २ खं० ३ सू० १२) याचे अर्थांत लिहिलेले सौर्य मंत्र व स्वस्त्ययनमंत्र जपून स्वयंपाक करावा, आणि 'अपनः' ( १।७।९ ) या सूक्तानें प्रतिऋचेस होम करून ब्राह्मणांस भोजन घालावें व स्वस्तिवाचन करून त्यांस गाय, पात्र व कोरें वस्त्र ही दक्षिणा द्यावी.

---

## खण्ड ७.

सू०-अथातः पार्वणे श्राद्धे काम्य आभ्युदयिक एकोद्दिष्टे वा ॥ १ ॥ ब्राह्मणान् श्रुत-

**शीलवृत्तसम्पन्नानेकेन वा काले ज्ञापितान् स्नातान् कृतपच्छौचानाचान्तानुदङ्मुखान् पितृवदुपवेश्यैकैकमेकैकस्य द्वौ द्वौ त्रींस्त्रीन्वा वृद्धौ फलभूयस्त्वं न त्वेवैकं सर्वेषां ॥ २ ॥**

अ०—पुढें पार्वण श्राद्धाचा, कामनिक श्राद्धाचा, नांदीश्राद्धाचा आणि एकोद्दिष्ट श्राद्धाचा विधि सांगतों. कारण, हीं श्राद्धें केलीं असतां कल्याण होतें. वेदाध्ययन, सुस्वभाव व शास्त्राप्रमाणें वागणें या तीन गुणांनीं युक्त अथवा यांपैकीं एका गुणानें युक्त, वेळेस आमंत्रण दिलेले, स्नान केलेले व पाय धुतलेले अशा ब्राह्मणांस, हे माझे पितर या बुद्धीनें एकेक पितृदेवतेस एकेक, दोन दोन किंवा तीन तीन अथवा यांपेक्षां जास्ती ब्राह्मण बसविले असतां जास्ती फल होईल; परंतु सर्व पितृदेवता मिळून एकच ब्राह्मण नसावा. ब्राह्मण उत्तरेस तोंड करून बसवावे.

**सू०-कामम्नाद्ये ॥ ३ ॥ पिण्डैर्व्याख्यातं ॥ ४ ॥ अपःप्रदाय ॥ ५ ॥दर्भान् द्विगुणभुग्नानासनंप्रदाय ॥ ६ ॥अपः प्रदाय ॥ ७ ॥**

अ०—पार्वण श्राद्धाखेरीज इतर श्राद्धांमध्यें इच्छेनुरूप ब्राह्मण बोलवावे व त्यांत पिंडपितृयज्ञांत सांगितल्याप्रमाणें पिंडदान करावें. ब्राह्मण बसविल्यानंतर उदक देऊन दोहोंपेक्षां अधिक दर्भ घेऊन ते अर्धे मोडून आसनस्थानीं द्यावे व नंतर पुन्हां उदक द्यावें.

* 'अनाद्य' शब्दाचा अर्थ 'पार्वण श्राद्धाखेरीज' असा वर केलाच आहे. परंतु त्या शब्दाचे अर्थ वृत्तिग्रंथांत अनेक केले आहेत: ह्मणजे,—'सपिंडश्राद्धाखेरीज,' किंवा 'सभोजन श्राद्धाखेरीज' ह्मणजे 'आमहिरण्यादि श्राद्धांमध्यें (सिधा किंवा द्रव्य देणें),' किंवा 'अन्न अथवा द्रव्य यांच्या अभावीं,' अथवा 'दुष्काळांत,' इ०.

सू०-तैजसाश्ममयमृन्मयेषु त्रिषु पात्रेष्वेकद्रव्येषु वा दर्भान्तर्हितेष्वप आसिच्य शन्नो देवीरभिष्टय इत्यनुमन्त्रितासु तिलानावपति, तिलोऽसि सोमदेवत्यो गोसवे देवनिर्मितः॥ प्रत्नवद्भिः प्रत्तः स्वधयापितॄनिमां ल्लोकान् प्रीणयाहि नः स्वधा नम इति ॥ ८ ॥

अ०—एक तैजस, एक दगडी व एक मृत्तिकेचें अशा तीन द्रव्यांचीं अथवा तिन्हींपैकीं एकाच द्रव्याचीं तीन पात्रें दर्भांनीं झांकलेलीं अशीं ठेवून त्यांत उदक घालून 'शन्नो०' (७।६।५) या ऋचेनें त्या उदकाचें अनुमंत्रण करावें; आणि नंतर त्या उदकांत 'तिलो०नमः' या मंत्रानें तीळ टाकावे.

सू०-प्रसव्येन ॥ ९ ॥

अ०—हें श्राद्धकर्म अप्रदक्षिण ह्मणजे अपसव्यानें करावें.

सू०-इतरपाण्यङ्गुष्ठान्तरेणोपवीतित्वाद्दक्षिणेन वा सव्योपगृहीतेन पितरिदं तेऽर्घ्यं पितामहेदं तेऽर्घ्यं प्रपितामहेदं तेऽर्घ्यमिति ॥१०॥ अपूर्वं ॥ ११ ॥

अ०—डाव्या हाताच्या अथवा डावा हात उजव्या हाताला लावून त्याच्या अंगुष्ठतर्जनींतील मध्यभागानें सव्य करून (१) 'पितरिदं ते ऽर्घ्यं०', (२) 'पितामहेदंतेऽर्घ्यं', आणि (३) 'प्रपितामहेदंतेऽर्घ्यं' या तीन मंत्रांनीं तीन अर्घ्यं द्यावे; व ते अर्घ्य देण्यापूर्वीं हातावर उदक द्यावें.

सू०-ताः प्रतिग्राहयिष्यन् सकृत् सकृत् स्वधा अर्घ्या इति ॥ १२ ॥

अ०—अर्घ्य देण्यापूर्वी एकेकवेळ 'स्वधाऽर्घ्याः' या मंत्रानें त्याचें निवेदन करावें.

* पितृस्थानीं तीन ब्राह्मण असले तरी तिघांनां मिळून एकवार मंत्र म्हणून हें निवेदन करावें.

**सू०–प्रसृष्टा अनुमन्त्रयेत–या दिव्या आपः पृथिवी संम्बभूवुर्या अन्तरिक्ष्या उत पार्थिवीर्याः ॥ हिरण्यवर्णा यज्ञियास्ता न आपः शंस्योना भवन्त्विति संस्रवान् समवनीयताभिरद्भिः पुत्रकामो मुखमनक्ति ॥ १३ ॥**

अ०—दिलेल्या अर्घ्याचें 'या दिव्या०भवन्तु' या मंत्रानें अनुमंत्रण करावें व नंतर अर्घ्यपात्रांतील शेष उदक एकत्र करून तें उदक पुत्रकामना असल्यास मुखाला लावावें.

**सू०–नोत्धरेत्प्रथमं पात्रं पितृणामर्घ्यपातितं ॥ आवृतास्तत्र तिष्ठन्ति पितरः शौनकोऽब्रवीत् ॥ १४ ॥**

अ०—(नंतर) ज्या प्रथम पात्रांत अर्घ्याचें शेषोदक एकत्र केलें असेल तें पात्र पालथें टाकावें अथवा पालथें न टाकितां तें तिसऱ्या अर्घ्यपात्रानें आच्छादावें व तें तेथून उचलूं नये. कारण त्या पात्राखालीं पितर झांकलेले राहतात असें शौनकऋषींनीं सांगितलें आहे.

---

## खण्ड ८.

**सूत्र–एतस्मिन् काले गन्धमाल्यधूपदीपाच्छादनानां प्रदानं ॥ १ ॥**

अ०—यावेळेस वर ह्मणजे अर्घ्य दिल्यानंतर गंध, पुष्प, धूप, दीप व वस्त्र हीं द्यावीं.

**सू०–उद्धृत्य घृताक्तमन्नमनुज्ञापयत्यग्नौ करिष्ये करवै करवाणीति वा ॥ २ ॥ प्रत्यभ्यनुज्ञा क्रियतां कुरुष्व कुर्विति ॥ ३ ॥**

अ०—(नंतर) भांड्यांतून अन्न उकरून त्याला तूप लावावें आणि 'अग्नौ करिष्ये' असें ह्मणून अथवा 'करिष्ये' या ठिकाणीं 'करवै' अथवा 'करवाणि' असें ह्मणून ब्राह्मणांपाशीं होम करण्याची आज्ञा मागावी; व ब्राह्मणांनीं 'क्रियतां' अथवा 'कुरुष्व' किंवा 'कुरु' असें ह्मणून आज्ञा द्यावी.

* 'करिष्ये' या पदानें आज्ञा मागितली असतां 'क्रियतां,' 'करवै' या पदानें मागितली असतां 'कुरुष्व' आणि 'करवाणि' या पदानें मागितली असतां 'कुरु' ह्मणून द्यावी.

**सू०–अथाग्नौ जुहोति यथोक्तं पुरस्तात् ॥ ४ ॥**

अ०—नंतर श्रौ. पू. २।६ यांत सांगितल्याप्रमाणें अग्नीमध्यें होम करावा.

**सू०–अभ्यनुज्ञायां पाणिष्वेव वा ॥ ५ ॥**

अ०—जर ब्राह्मणांची हातावर होम करण्याची इच्छा असेल तर ब्राह्मणांचे हातावरच होम करावा.

* 'इच्छा' ह्मणजे जेथें पिंडपितृयज्ञविधि नाहीं तेथें हातावरच होम करावा असें समजावें.

**सू०–अग्निमुखा वै देवाः पाणिमुखाः पितर इति हि ब्राह्मणं ॥ ६ ॥**

अ०—कारण, अग्नि हा देवाचें मुख, व हात हा पितरांचें मुख आहे असें ब्राह्मणांत सांगितलें आहे.

सू०–यदि पाणिष्वाचान्तेष्वन्यदन्न मनुदिशति ॥ ७ ॥

अ०—जर हातावर होम केला तर ब्राह्मणांनीं तें अन्न भोजनपात्रावर ठेवावें आणि नंतर आचमन करावें. किंवा तें अन्न भक्षण करावें. असे दोन अर्थ वृत्तिग्रंथांत केले आहेत. पैकीं कोणताही पक्ष आचरिल्या नंतर दुसरें अन्न वाढावें.

सू०–अन्नमन्ने ॥ ८ ॥

अ०—दुसरें अन्न वाढणें तें होम करून शेषान्न वाढल्यानंतर वाढावें.

सू०–सृष्टं दत्तम्बुभुक्तमिति ॥ ९ ॥

अ०—पुष्कळ अन्न वाढलें असतां संपत्ति प्राप्त होते.

सू०–तृप्तान् ज्ञात्वा मधुमतीः श्रावयेदक्षन्नमीमदन्तेतिच ॥ १० ॥

अ०—ब्राह्मण तृप्त झाले असें जाणून 'मधुवा०' (७।१।१७) तीन ऋचा व 'अक्षन्न ०' (१।६।४) ही एक ऋचा अशा ४ ऋचा ब्राह्मणांस ऐकवाव्या.

सू०–सम्पन्नमिति पृष्ट्वा यद्यदन्नमुपभुक्तं तत्तत्स्थालीपाकेनसह पिण्डार्थ मुत्धृत्य शेषं निवेदयेत् ॥ ११ ॥

अ०—ब्राह्मणांस 'संपन्नं' असा प्रश्न करावा व त्यावर ब्राह्मणांनीं 'संपन्नं' असें उत्तर द्यावें. नंतर जें जें अन्न ब्राह्मणांचे उपयोगीं पडलें तें तें स्थालीपाकाच्या अन्नासह पिंडांकरितां उकरून घेऊन बाकी अन्न ब्राह्मणांस निवेदन करावें.

* ज्या श्राद्धांत स्थालीपाकविधि करण्यास सांगितला आहे तेथें स्थालीपाकासह पिंडांकरितां अन्न घ्यावें, व जेथें स्थालीपाक नाहीं तेथें भुक्तशेषानेंच पिंड द्यावे.

**सू०-अभिमतेऽनुमते वा भुक्तवत्स्वनाचान्तेषु पिण्डान्निदध्यात् ॥ १२ ॥ आचान्तेष्वेके ॥ १३ ॥**

अ०—तें अन्न ब्राह्मण घेत असतां त्यांनां द्यावें, अथवा त्यांनीं आज्ञा दिली असतां इष्टबांधवांसह भोजन करावें. ब्राह्मण तृप्त होऊन आचमन केलें नसतां ह्मणजे आंचवले नसतांच पिंड द्यावे. किंवा ब्राह्मणांनीं आंचवून आचमन केल्यानंतर पिंड द्यावे असेंही कोणी ऋषी ह्मणतात.

**सू०-प्रकीर्यान्न मुपवीयों स्वधोच्यतामिति विसृजेत् ॥ १४ ॥ अस्तु स्वधेति वा ॥ १५ ॥**

अ०—उच्छिष्टासमोर विकिर द्यावा ( अन्न टाकावें ) आणि सव्य करून ब्राह्मणांचें विसर्जन '**ओं स्वधोच्यतां**' अथवा '**अस्तु स्वधा**' असें ह्मणून करावें आणि नंतर ब्राह्मणांनीं '**ओं स्वधा**' अथवा '**अस्तु स्वधा**' असें ह्मणावें.

* विसर्जन करते वेळेस प्रारंभीं पालथें टाकलेलें अर्घ्यपात्र उताणें करून नंतर दक्षिणा द्यावी. जेथें स्थालीपाकविधि आहे तेथेंच पिंडदान करावें व जेथें स्थालीपाक नाहीं तेथें श्राद्धांत पिंडदान करूं नये असेंही कोणी ह्मणतात.

---

## खण्ड ९.

**सूत्र-अथशूलगवः ॥ १ ॥ शरदि वसन्ते वार्द्रया ॥ २ ॥**

अ०—शूलगवकर्म पुढें सांगतों. तें कर्म शरदृतूमध्यें किंवा वसंतऋतूमध्यें आर्द्रा नक्षत्र असेल त्या दिवशीं करावें.

सू०-श्रेष्ठं स्वस्य यूथस्य ॥३॥ अकुष्ठिपृष-त् ॥४॥

अ०—आपल्या पशूंचे कळपामध्यें मुख्य पशूनीं शूलगवकर्म करावें; तो पशु कुष्ठ झालेला नसावा व त्याचा रंग काळा असून त्यावर पांढरे टिपके असावे.

सू०-कल्माषमित्येके ॥ ५ ॥

अ०—काळे टिपके असतात तो पशु घ्यावा, असेंही कोणी ऋषी ह्मणतात.

सू०-कामं कृष्णमालोहवांश्चेत् ॥ ६ ॥

अ०—आपत्काळीं जांभळ्या रंगाप्रमाणें काळा पशु घ्यावा.

सू०-व्रीहियवमतीभिरद्भिरभिषिच्य॥७॥ शिरस्तआभसत्तः ॥ ८ ॥ रुद्राय महादेवाय जुष्टो वर्धस्वेति ॥ ९ ॥

अ०—साळी व जव घालून त्या उदकानें पशूचे डोक्यापासून पुच्छापर्यंत अभिषेक करावा; आणि नंतर 'रुद्राय०स्व' हा मंत्र ह्मणून पशूचा उत्सर्ग करावा.

सू०-तं वर्धयेत् सम्पन्नदन्तमृषभं वा ॥१०॥

अ०—त्या पशूला दांत येईपर्यंत किंवा उमेदींत येईपर्यंत पोसावें.

सू०-याज्ञियायां दिशि ॥ ११ ॥ असन्दर्श-ने ग्रामात् ॥ १२ ॥

अ०—यज्ञाला गांवाबाहेर, कीं—जेथून गांव दिसत नाहीं व गांवांतील लोकांनां आपण 'दिसत नाहीं अशा स्थळीं—योग्य दिशेस जावें.

**सू०-ऊर्ध्वं मर्धरार्धदुदित इत्येके ॥१३॥**

अ०—हें कर्म दोन प्रहर रात्रीं अथवा सूर्योदयीं करावें.

**सू०-वैद्यं चरित्रवन्तं ब्रह्माण मुपवेश्य सपलाशा मार्द्रशाखां यूपं निखाय व्रतत्यौ कुशरज्जू वा रशने अन्यतरया यूपं परिवीयान्यतरयार्धशिरसि पशुं बध्वा यूपे रशनायां वा नियुनक्ति यस्मै नमस्तस्मै त्वा जुष्टं नियुनज्मीति ॥ १४ ॥**

अ०—शूलगव जाणणारा व शूलगव कर्म केलेला अशा ब्रम्ह्याला बसवून पानांसहित ओल्या पळसाच्या फांदीचा यूप (मेख) रोंवून दोन पलाशवल्लीच्या किंवा दर्भांच्या दोऱ्यांपैकीं एक यूपाला वेष्टन करून दुसरी पशूचे उजवे शृंगाला बांधून ती दोरी यूपाला किंवा यूपाला बांधलेले दोरीला बांधावी, त्यावेळेस **'यस्मै०ज्मि'** हा मंत्र ह्मणावा.

**सू०-प्रोक्षणादिसमानं पशुना विशेषान् वक्ष्यामः ॥ १५ ॥**

अ०—प्रोक्षणादिकर्म पशुकल्पांत (गृ० १ ।११त) सांगितल्याप्रमाणें आहे. त्यापैकीं विशेष आह्मी सांगतों.—

**सू०-पात्र्या पलाशेन वा वपां जुहुयादिति ह विज्ञायते ॥ १६ ॥ हराय मृडाय शर्वाय शिवाय भवाय महादेवायोग्राय भीमाय**

**पशुपतये रुद्राय शङ्करायेशानाय स्वाहेति ॥ १७ ॥ षड्भिर्वोत्तरैः ॥ १८ ॥ रुद्राय स्वाहेति वा ॥ १९ ॥**

अ०—काष्ठपात्रीनें किंवा पळसाच्या पानांनीं वपेचा होम करावा असें ऐकतों. व तो होम '**हराय०स्वाहा**' या मंत्रानें किंवा शेवटल्या ६ नांवांनीं ह्मणजे '**उग्राय०स्वाहा**' या मंत्रानें अथवा '**रुद्राय स्वाहा** या मंत्रानें करावा.

**सू०–चतसृषु चतसृषु कुशसूनासु चतसृषु दिक्षु बलिं हरेद्यास्ते रुद्रपूर्वस्यां दिशि सेनास्ताभ्य एनं नमस्ते अस्तु मा मा हिंसी रित्येवं प्रतिदिशं त्वादेशनं ॥ २० ॥**

अ०—प्रतिदिशेस चार चार कुशसूनांवर चारी दिशेस '**यास्तेरु० हिंसीः**' हा मंत्र ह्मणून बलि द्यावा व प्रत्येक बलि देतांनां हा मंत्र ह्मणावा. परंतु मंत्रांत '**पूर्वस्यां**' या ठिकाणीं ज्या दिशेस बलिदेणें असेल त्या दिशेचें नांव सप्तम्यंत ध्यावें.

* कुशसूना ह्मणजे दर्भ किंवा तृणांनीं विणून करितात त्या.

**सू०–चतुर्भिः सूक्तैश्चतस्रो दिश उपतिष्ठेत कद्रुद्रायेमा रुद्रायाते पितरि मा रुद्राय स्थिरधन्वन इति ॥ २१ ॥**

अ०—'**कद्रु**'(१।३।२६), '**इमारु०**' (१।८।५), '**आते**'० (२।७।१६) व '**इमारुद्रायस्थिर०**' (५।४।१३) या चार सूक्तांनीं क्रमानें चाऱ्ही दिशेस उपस्थान करावें.

**सू०–सर्वरुद्र यज्ञेषु दिशा मुपस्थानं ॥२२॥**

अ०—सर्व रुद्रयज्ञामध्यें हेंच दिशेचें उपस्थान समजावें.

सू०–तुषान् फलीकरणांश्च पुच्छं चर्म शिरः पादानित्यग्नावनु प्रहरेत् ॥ २३ ॥

अ०—स्थालीपाकसंबंधीं साळींचा कोंडा व पाखडण्यानें पडलेले सूक्ष्म कण, तसेंच त्या पशूची शेपटी, चर्म, शिर, पाय, हे अग्नींत टाकावे.

सू०–भोगं चर्मणा कुर्वीतेति शांवत्यः॥२४॥

अ०—त्या चर्माचा जोडा वगैरे करावा असें शांवत्यऋषि ह्मणतात.

सू०–उत्तरतोऽग्नेर्दर्भवीतासु कुशसूनासु वा शोणितं निनयेच्छ्वासिनीर्घोषिणीर्विचिन्वतीः समश्नुतीः सर्पा एतद्वोऽत्र तद्धरध्वमिति ॥२५॥

अ०—अग्नीचे उत्तरेस दर्भसमूहावर किंवा कुशसूनेवर 'श्वासि०ध्वं' ह्या मंत्रानें रक्त टाकावें.

* अंगाचें अवदान देते वेळेस एखादे पात्रांत रक्त धरावें.

सू०–अथोदङ्ङावृत्य श्वासिनीर्घोषिणीर्विचिन्वतीः समश्नुतीः सर्पा एतद्वोऽत्र तद्धरध्वमिति सर्पेभ्यो यत्तत्रासृगूवध्यं वावस्तुतं भवति तद्धरन्ति सर्पाः ॥ २६ ॥

अ०—नंतर उदङ्मुख करून सर्पदेवतेचे उद्देशानें जें मारण्याच्या ठिकाणीं रक्त ऊवध्यगोह अथवा भूमीवर गळलेलें असेल तें सर्पदेवतेचे उद्देशानें 'श्वा० ध्वं' हा मंत्र ह्मणून द्यावें; तेंव्हां तें रक्त देवतारूपांनीं सर्प हरण करतात.

* नंतर होमशेषादि करून हें कर्म संपवावें.

सू०–सर्वाणि ह वा अस्य नामधेयानि॥२७॥

**सर्वाः सेनाः ॥ २८ ॥ सर्वाण्युच्छ्रयणानि ॥ २९ ॥ इत्येवं विद्यजमानं प्रीणाति ॥ ३० ॥**

अ०—जगांतील सर्व शब्द हे रुद्रदेवतेचीं नांवें होत; सर्व पदार्थ रुद्रदेवतारूपच आहेत; सर्व सेना रुद्रदेवतेच्या आहेत; आणि जें जें उत्कृष्ट आहे तें तें सर्व रुद्रदेवतेचें आहे. असें रुद्रमाहात्म्य जाणून शूलगव करणाऱ्या यजमानाचा संतोष रुद्रदेव करितो.

**सू०-नास्य ब्रुवाणं च न हिनस्तीति विज्ञायते ॥ ३१ ॥**

अ०—हें कर्म सांगणाराचा व कर्मकर्त्याचा आणि अध्ययनकर्त्याचा रुद्रदेव नाश करीत नाहीं असें ऐकतों.

**सू०-नास्य प्राश्नीयात् ॥ ३२ ॥**

अ०—या पशूचें हुतशेष भक्षण करूंनये.

* हा निषेध केचिन्मतांनीं आहे. कारण, पुढें याविषयीं विधि सांगितला आहे.

**सू०-नास्य ग्राममाहरेयुरभिमारुको ह्येष देवः प्रजा भवतीति ॥ ३३ ॥**

अ०—या कर्मसंबंधी पदार्थ गांवांत आणूं नयेत; कारण, हा रुद्रदेव ते पदार्थ गांवांत आणणाऱ्या लोकांचा नाश करतो. हें मत आश्वलायनासही मान्य आहे.

**सू०-अमात्यानन्ततः प्रतिषेधयेत् ॥ ३४ ॥**

अ०—पुत्रादिकांस बरोबर येऊं नये असा निषेध करावा.

**सू०-नियोगात्तु प्राश्नीयात्स्वस्त्ययन इति ॥ ३५ ॥**

अ०—पशूचें हुतशेष नियमानें भक्षण करावें; कारण, भक्षणापासून कल्याण होतें.

**सू०—स एष शूलगवो धन्यो लोक्यः पुण्यः पुत्र्यः पशव्य आयुष्यो यशस्यः ॥ ३६ ॥**

अ०—हा शूलगव करणारा सधन होऊन त्यास स्वर्गादिक लोक, पुत्र, पुण्य, पशू, आयुष्य, यश हीं प्राप्त होतात.

**सू०—इष्ट्वाऽन्यमुत्सृजेत् ॥ ३७ ॥**

अ०—ह्याप्रमाणें शूलगव करून पुन्हां शूलगवकर्म करण्याकरितां दुसऱ्या पशूचा उत्सर्ग करावा.

**सू०—नानुत्सृष्टः स्यात् ॥ ३८ ॥ न ह्यपशुर्भवतीति विज्ञायते ॥ ३९ ॥**

अ०—पशूचा उत्सर्ग केल्यावांचून राहूं नये. ह्मणजे एकवेळ तरी शूलगवकर्म करावें. पशूवांचून शूलगवकर्म करूंनये असें एकतों, व हें आश्वलायनासही मान्य आहे.

**सू०—शन्तातीयं जपन् गृहानियात् ॥ ४० ॥**

अ०—शन्ताती (५।३।१८) हें सूक्त जपून घरीं यावें.

**सू०—पशूनामुपताप एतमेव देवं मध्ये गोष्ठस्य यजेत ॥ ४१ ॥ स्थालीपाकं सर्वहुतं ॥ ४२ ॥**

अ०—पशूंनां रोग झाला असतां या रुद्रदेवतेच्या उद्देशानें गोठ्यामध्यें यज्ञ करावा; व तेथें स्थालीपाकाचा निःशेष होम करावा.

**सू०—बर्हिराज्यञ्चानुप्रहृत्य धूमतो गा आनयेत् ॥ ४३ ॥**

अ०—बर्हि व तूप अग्नींत देऊन त्या धुरांत गाई आणाव्या.

* स्थालीपाकाचे साळींचा कोंडा व खिडण्यानें उडालेले बारीक कण तेही अग्नींत टाकावे.

**सू०-शन्तातीयं जपन् पशूनां मध्य भियान्मध्य मियात् ॥ ४४ ॥**

अ०—'शन्नइंद्राग्नी०' (५।३।२८) हें सूक्त जपून पशूंच्या मध्यें प्रवेश करावा.

**सू०-नमः शौनकाय नमः शौनकाय ॥ ४५ ॥**

अ०— शौनकऋषीला नमस्कार असो.

---

इतिचतुर्थोऽध्यायः

इति समाकृतार्थाश्वलायनगृह्यसूत्र.

समाप्तिः

॥ श्री ॥

# आश्वलायनगृह्यसूत्रांत आलेले वैदिक मंत्र.

## अध्याय १.

### खंड. १.

अग्ने॑ऽधाय॒गवि॑षे द्यु॒क्षाय॒दस्म्यं॒वचः॑ ॥ घृ॒तास्वादी॑यो॒मधु॑नश्च॒वोचत।२०।

अष्टक ६, अध्याय २, वर्ग १८.

आते॑ अग्न॒ऋचाह॒विर्हृदातष्टं॒भ॑रामसि॥तेते॑ भवंतू॒क्षणं॒ऋष॒भासो॑ व॒शाउत।

॥ ४७ ॥—४, ५, ३०.

यः स॒मिधा॒य आहु॑ती॒यो वेदे॑ न॒द॒दा॒श॒मर्तो॒ अग्नये॑ ॥यो न॑म॒सा॒स्वध्व॒रः ॥५॥६, १, २९.

### खंड ४.

अग्न॒आयूं॑षिपवस॒आसुवो॒र्जमिषं॑च नः ॥ आरे॒बाध॑स्व॒दुच्छुनां॑ ॥ १९ ॥—७, २, १०.

अग्निर्ऋषि॒ःपव॑मान॒ःपांच॑जन्यःपु॒रोहि॑तः ॥ तमी॑महेमहा॒ग॒यं ॥ २ ॥

अग्ने॒पव॑स्व॒स्वपा॒अस्मे॒वर्चः॑सु॒वीर्यं॑। दध॒द्र॒यिंमयि॒पोषं॑।२१।-७,२,११.

प्रजा॑पते॒नत्वदे॒तान्य॒न्यो॒विश्वा॑जा॒तानि॒परि॒ता॒बभूव ॥ यत्का॑मास्तेजुहु॒मस्त॑न्नो॑ अस्तुव॒यंस्या॑म॒पत॑यो॒रयी॒णां ॥ १० ॥—८, ७, ४.

त्वम॑र्य॒मा॑भव॒सि॒यत्क॒नी॑ना॒नांनाम॒स्वधा॒व॒न्गुह्यं॑ बिभर्षि ॥ अंजति॑ मि॒त्रंसु॒धि॒तं॒नगो॒भि॒र्यद्दं॑प॒तीसम॑नसाकृ॒णोषि॑ ॥२॥—३, ८, १६.

### खंड ७.

गृ॒भ्णामि॑ तेसौभग॒त्वायहस्तं॒मया॒पत्या॒जर॑दष्टि॒र्यथासः॑ ॥ भगो॑ अर्य॒मास॑वि॒तापुरं॑धि॒र्मह्यं॑ त्वादु॒र्गार्ह॑पत्याय॒देवाः ॥ ४६ ॥—८, ३, २७.

प्रत्वा मुंचामि वरुणस्य पाशाद्येन त्वाबध्नात्सविता सुशेवः ॥ ऋतस्य योनौ सुकृतस्य लोके रिष्टां त्वा सह पत्या ददामि ॥ २४ ॥–८, ३, २४.

प्रेतो मुंचामि नामुतः सुबद्धाममुतस्करं ॥ यथेयमिंद्र मीढ्वः सुपुत्रा सुभगासति ॥ २५ ॥–८, ३, २४.

## खंड ८.

पूषा त्वेतो नयतु हस्तगृह्याश्विना त्वा प्रवहतां रथेन ॥ गृहान्गच्छ गृहपत्नी यथासो वशिनी त्वं विदथमावदासि ॥ २६ ॥–८, ३, २५.

अश्मन्वती रीयते संरभध्वमुत्तिष्ठत प्रतरता सखायः ॥ अत्रा जहाम ये असन्नशेवाः शिवान्वयमुत्तरेमाभि वाजान् ॥ ८ ॥–८, १, १४.

जीवं रुदंति वि मयंते अध्वरे दीर्घामनु प्रसितिं दीधियुर्नरः ॥ वामं पितृभ्यो य इदं समेरिरे मयः पतिभ्यो जनयः परिष्वजे ॥ १० ॥–७, ८, १९.

मा वि दन्परिपंथिनो य आसीदंति दंपती ॥ सुगेभिर्दुर्गमतीतामप द्रांत्वरातयः ॥ ॥ ३२ ॥–८, ३, २६.

सुमंगलीरियं वधूरिमां समेत पश्यत ॥ सौभाग्यमस्यै दत्वायाथास्तं वि परेतन ॥ ॥ ३३ ॥–८, ३, २६.

इह प्रियं प्रजया ते समृध्यतामस्मिन्गृहे गार्हपत्याय जागृहि ॥ एना पत्या तन्वं संसृजस्वाधा जिव्री विदथमावदाथ ॥ २७ ॥–८, ३, २५.

आ नः प्रजां जनयतु प्रजापतिराजरसाय समनक्त्वर्यमा ॥ अदुर्मंगलीः पतिलोकमाविश शन्नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥ ४३ ॥ १–८, ३, २८.

अघोरचक्षुरपतिघ्न्येधि शिवा पशुभ्यः सुमनाः सुवर्चाः ॥ वीरसूर्देवकामा स्योना शन्नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥ ४४ ॥ २–८, ३, २८.

इमां त्वमिंद्र मीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु ॥ दशास्यां पुत्राना धेहि पतिमेकादशं कृधि ॥ ४५ ॥ ३–८, ३, २८.

सम्राज्ञीश्वशुरेभवसम्राज्ञीश्वश्र्वांभव ॥ ननांदरि सम्राज्ञीभवसम्राज्ञीअ-
धिदेवृषु ॥ ४६ ॥ ४-८, ३, २८.

समंजंतुविश्वेदेवाःसमापोहृदयानिनौ ॥ संमातरिश्वासंधातासमुदेष्ट्रीद-
धातुनौ ॥ ४७ ॥ ५-८, ३, २८.

सत्येनोत्तभिताभूमिःसूर्येणोत्तभिताद्यौः ॥ ऋतेनादित्यास्तिष्ठंतिदिविसो-
मोअधिश्रितः ॥ १ ॥-८, ३, २०.

खंड. ११.

अग्निंदूतंवृणीमहेहोतारंविश्ववेदसं ॥ अस्ययज्ञस्यसुक्रतुं ॥ १॥अग्निमग्निं
हवीमभिःसदाहवंतविश्पतिं ॥हव्यवाहंपुरुप्रियं॥ २॥ —१,१,२२.

खंड १२.

यत्रेत्थंवनस्पतेदेवानांगुह्यानामानि ॥ तत्रहव्यानिगामय ॥ १० ॥—
३, ८, २१.

खड १४.

राकामहंसुहवांसुष्टुतीहुवेशृणोतुनःसुभगाबोधतुत्मना ॥ सीव्यत्वपःसूच्या-
च्छिद्यमानयाददातुवीरंशतदायमुक्थ्यं ॥ ४ ॥ यास्तेराकेसुमतयःसु-
पेशसोयाभिर्ददासिदाशुषेवसूनि॥ताभिर्नोअद्यसुमनाउपागहिसहस्रपो-
षंसुभगेरराणा ॥ ५ ॥—२, ७, १९.

प्रजापतेनत्वदेतान्यन्यो विश्वा जातानि परि ताबभूव ॥ यत्कामास्ते-
जुहुमस्तन्नो अस्तु वयंस्यामपतयोरयीणां ॥१०॥—८, ७, ४.

खड १५.

इंद्रश्रेष्ठानिद्रविणानिधेहिचित्तिंदक्षस्यसुभगत्वमस्मे ॥ पोषंरयीणामरिष्टिं
तनूनांस्वाद्मानं वाचःसुदिनत्वमन्हां ॥ ६ ॥—२, ६, २७.

अस्मेप्रयंधिमघवन्नृजीषिन्निंद्ररायोविश्ववारस्यभूरेः ॥ अस्मेशतंशरदो
जीवसेधाअस्मेवीरान्छश्वतइंद्रशिप्रिन् ॥ १० ॥—३, २, २०.

## खंड २०.

तत्सवितुर्वृणीमहेवयंदेवस्यभोजनं ॥ श्रेष्ठंसर्वधातमंतुरंभगस्यधीमहि ॥ १ ॥—४, ४, २५.

युवासुवासाःपरिवीतआगात्सउश्रेयान्भवतिजायमानः ॥ तंधीरासःकवय उन्नयंतिस्वाध्यो३मनसादेवयंतः ॥ ४ ॥—३, १, ३.

## खंड २२.

सदसस्पतिमद्भुतंप्रियमिंद्रस्यकाम्यं ॥ सनिंमेधामयासिषं ॥ ६ ॥—१, १, ३५.

तत्सवितुर्वरेण्यंभर्गोदेवस्यधीमहि ॥ धियोयोनःप्रचोदयात् ॥ १० ॥—३, ४, १०.

तत्सवितुर्वृणीमहेवयं देवस्य भोजनं ॥ श्रेष्ठं सर्वधातमंतुरं भगस्यधीमहि ॥ १ ॥—४, ४, २५.

## खंड २३.

यमृत्विजो बहुधाकल्पयंतःसचेतसोयज्ञमिमंवहंति ॥ योअनूचानोब्राह्मणोयुक्तआसीत्कास्वित्तत्रयजमानास्यसंवित् ॥ १ ॥—६, ४, २९

एकएवाग्निर्बहुधासमिद्धएकःसूर्योविश्वमनुप्रभूतः ॥ एकैवोषाःसर्वमिदंविभात्येकंवाइदंविबभूवसर्वं ॥ २ ॥—६, ४, २९.

एतेनाग्नेब्रह्मणावावृधस्वशक्ती वायत्ते चकृमाविदावा ॥ उतप्रणेष्यभिवस्यो अस्मा ॥ १८ ॥—१, २, ३५.

इमामग्नेशरणिंमीमृषोनइममध्वानंयमगामदूरात् ॥ आपिः पिताप्रमतिः सोम्यानांभृमिरस्यृषिकृन्मर्त्यानां ॥१६॥—१, २, ३५.

## खंड २४.

मधुवाताऋतायतेमधुक्षरंतिसिंधवः॥ माध्वीर्नःसंत्वोषधीः॥६ ॥ मधुनक्त-

गुतोषसोमधुमत्पार्थिवंरजः॥मधुद्यौरस्तुनःपिता॥७॥ मधुमान्नोवनस्पतिर्मधुमांअस्तुसूर्यः॥ माध्वीर्गावोभवंतुनः॥८॥—१, ६, १८.

मातारुद्राणांदुहितावसूनांस्वसादित्यानाममृतस्यनाभिः॥ प्रनुवोचंचिकितुषेजनायमागामनागामदितिंवधिष्ट ॥१५॥—६, ७, ८.

इत्यश्वलायन गृह्यसूत्रे प्रथमोऽध्यायः.

---

## अध्याय २.

### खंड. १.

अग्नेनयसुपथारायेअस्मान्विश्वानिदेववयुनानिविद्वान् ॥ युयोध्यऽस्मज्जुहुराणमेनोभूयिष्ठांतेनमउक्तिंविधेम ॥१॥—२, ५, १०.

मानोअग्नेवसृजोअघायाविष्यवेरिपवेदुच्छुनायै ॥ मादत्वतेदशतेमादतेनोमारिषतेसहसावन्परादाः ॥५॥—२, ५, १०.

शन्नोभवंतुवाजिनोहवेषुदेवतातामितद्रवःस्वर्काः॥जंभयंतोऽहिंवृकंरक्षांसिसनेम्यस्मद्युयवन्नमीवाः॥७॥—५, ४, ५.

### खंड ३.

स्योनापृथिविभवानृक्षरानिवेशनी ॥ यच्छानः शर्म सप्रथः॥१५॥—१, २, ६.

अतोदेवाअवंतुनोयतोविष्णुर्विचक्रमे ॥ पृथिव्याः सप्तधामभिः ॥१॥—१, २, ७,

### सौर्यस्वस्त्ययनमंत्राः

सूर्योनोदिवस्पातुवातोअंतरिक्षात् ॥ अग्निर्नः पार्थिवेभ्यः ॥ १ ॥ (ऋचा ५)—८, ८, १६,

उदुत्यंजातवेदसंदेवंवहंतिकेतवः ॥ दृशेविश्वायसूर्यं ॥१॥ (ऋ. ९ किंवा १२)—१, ४, ७.

चित्रंदेवानामुदगादनीकंचक्षुर्मित्रस्यवरुणस्याग्नेः॥ आप्राद्यावापृथिवी अंतरिक्षंसूर्यआत्माजगतस्तस्थुषश्च ॥१॥ (ऋचा ६)–१, ८, ७.

नमोमित्रस्यवरुणस्यचक्षसेमहोदेवायतदृतंसपर्यत ॥ दूरदृशेदेवजाताय केतवेदिवस्पुत्रायसूर्यायशंसत॥१॥ (ऋ० १२)—७, ८, १२.

आनोभद्राःक्रतवोयंतुविश्वतोऽदब्धासोअपरीतासउद्भिदः ॥ देवानोयथासदमिद्वृधेअसन्नप्रायुवोरक्षितारोदिवेदिवे॥१॥—१, ६, १९.

स्वस्तिनोमिमीतामश्विनाभगःस्वस्तिदेव्यदितिरनर्वणः॥स्वस्तिपूषाअसुरो दधातुनःस्वस्तिद्यावापृथिवी सुचेतुनाः ॥ ( ऋ. ९ )—४, ३, ७.

परावतोदिधिषंतआप्यंमनुप्रीतासोजनिमाविवस्वतः ॥ ययातेर्येनहुष्यस्यबर्हिषिदेवाआसतेतेअधिब्रुवंतुनः ॥१॥–(ऋ. १७) ८, २, ३.

उदीरतामवरउत्परासउन्मध्यमाःपितरःसोम्यासः ॥ असुंयईयुरवृकाऋतज्ञास्तेनोऽवंतु पितरोहवेषु॥१॥(ऋ. ८ किंवा १४)–७, ६, १७.

अग्नेनयसुपथारायेअस्मा० ( ऋचा २ ) २, ५, १०.

प्रजापतेनत्वदेतान्यन्यो विश्वा जातानि परिता बभूव ॥ यत्कामास्तेजुहुमस्तन्नोअस्तुवयंस्यामपतयोरयीणां ॥ १० ॥—८, ७, ४.

## खंड ६.

वनस्पतेवीड्वंगोहिभूयाअस्मत्सखाप्रतरणःसुवीरः ॥गोभिःसन्नद्धोअसिवीळयस्वास्थातातेजयतुजेत्वानि ॥ २६ ॥–४, ७, ३९.

स्थिरौगावौभवतांवीळुरक्षोमेषाविवर्हिमायुगंविशारि॥इंद्रः पातल्येददतांशरीतोररिष्टनेमेअभिनःसचस्व ॥ १७ ॥—३, ३, २२.

सुत्रामाणंपृथिवींद्यामनेहसं सुशर्माणमदितिंसुप्रणीतिं॥ दैवींनावं स्वरित्रामनागसमस्रवंतीमारुहेमास्वस्तये ॥१०॥—८, २, ४.

अस्माकमुत्तमंकृधिश्रवो देवेषुतूर्य ॥ वर्षिष्ठंद्यामिवोपरि ॥ १९ ॥—३, ६, २६.

ऋषभंमासमानानां सपत्नानांविषासहिं ॥ हंतारंशत्रूणांकृधिविराजंगोपतिंगवां ॥ १ ॥— ८, ८, २४.

वयमद्येंद्रस्यप्रेष्ठावयंश्वोवो चेमहिसमर्ये ॥ वयंपुरामहि चनोअनुद्यून्तन्नऋभुक्षानरामनुष्यात् ॥ १० ॥—२, ४, ५.

तद्वो दिवोदुहितरोविभातीरुपब्रुवउषसोयज्ञकेतुः ॥ वयंस्यामयशसोजनेषुतद्यौश्चधत्तांपृथिवीचदेवी ॥ ११ ॥—३, ८, २.

खंड ८.

शन्नइंद्राग्नीभवतामवोभिःशन्नइंद्रावरुणारातहव्या ॥ शमिंद्रासोमासुवितायशंयोःशन्नइंद्रापूषणावाजसातौ ॥ १ ॥—५, ३, २८.

आपोहिष्ठामयोभुवस्तानऊर्जेदधातन ॥ महेरणायचक्षसे( ऋचा ३).—७, ६, ५.

खंड ९.

शंन्नइंद्राग्नीभवतामवोभिरितिसूक्त (ऋ. १५)—५, ३, २८.

आपोहिष्ठामयोभुवःस्थान० (ऋ. ३)—७, ६, ५.

वास्तोष्पतेप्रतिजानीह्यस्मान्त्स्वावेशोअनमीवोभवानः ॥ यत्त्वेमहेप्रतितन्नोजुषस्वशन्नोभवद्विपदेशंचतुष्पदे (ऋ. ४)—५, ४, २१.

खंड १०.

क्षेत्रस्यपतिनावयंहितेनेवजयामसि ॥ गामश्वंपोषइत्न्वासनोमृळातीदृशे इति सूक्त ( ऋ. ८ )—३, ८, ९.

मयोभूर्वातो अभिवातूस्रा ऊर्जस्वतीरोषधीरारिशंतां ॥ पीवस्वतीर्जीवधन्याः पिबंत्ववसायपद्वते रुद्रमृळ ( ऋ १ )–८, ८, २७.

यादेवेषुतन्व१ मैरयंतयासांसोमोविश्वारूपाणिवेद ॥ ताअस्मभ्यंपयसापिन्वमानाः प्रजावतीरिंद्रगोष्ठेरिरीहि ( ऋ. १ )–८, ८, २७

आगावो अग्मन्नुतभद्रमक्रन्त्सीदंतुगोष्ठेरणयंत्वस्मे॥प्रजावतीःपुरुरूपाइहस्युरिंद्रायपूर्वीरुषसोदुहानाः ( ऋ. ८ )–४, ६, २९.

इत्यश्वलायनगृह्यसूत्रे द्वितीयोऽध्यायः.

---

# अध्याय ३.

## खण्ड १.

अग्निमीळेपुरोहितंयज्ञस्यदेवमृत्विजं ॥ होतारंरत्नधातमं॥१॥–१,१,१.

कुपुंभकस्तदब्रवीद्गिरःप्रवर्तमानकः ॥ वृश्चिकस्यारसंविषमरसंवृश्चिकतेविषं ॥ १६ ॥ २, १, १६.

त्वमग्नेद्युभिस्त्वमाशुशुक्षणिस्त्वमद्भ्यस्त्वमश्मनस्परि ॥ त्वंवनेभ्यस्त्वमोषधीभ्यस्त्वंनृणांनृपतेजायसेशुचिः ॥ १ ॥–२, १, १७.

आवदंस्त्वंशकुनेभद्रमावदतूष्णीमासीनःसुमतिंचिकिद्धिनः ॥ यदुत्पतन्वदसिकर्करिर्यथाबृहद्वदेमविदथेसुवीराः ॥ ३ ॥–२, ८, १२.

सोमस्यमातवसंवक्ष्यग्नेवन्हिंचकर्थविदथेयजध्यै ॥ देवाँअच्छादीद्यद्युंजेअद्रिंशमायेअग्नेतन्वंजुषस्व ॥ २ ॥ २, ८, १३.

गृणानाजमदग्निनायोनावृतस्यसीदतं॥पातंसोममृतावृधा ।३।–२,४,११

त्वांह्यग्नेसदमित्समन्यवो देवासो देवमरतिंन्येरिरइतिक्रत्वान्येरिरे ॥ अमर्त्यंयजतमर्त्येष्वादेवमादेवंजनतप्रचेतसंविश्वमादेवंजनतप्रचेतसं ।

॥१॥–३,४,१२.

धामंतेविश्वंभुवनमधिश्रितमंतःसमुद्रेहृद्यंतरायुषि ॥ अपामनीकेसमिथेयआभृतस्तमश्यामम धुमंतंतऊर्मिम् ॥ १ ॥—३, ८, ११.

अबोध्यग्निःसमिधाजनानांप्रति धेनुमिवायतीमुषासं ॥ यव्हाइवप्रवयामुज्जिहानाः ॥ प्रभानवःसिस्रतेनाकमच्छ ॥ १ ॥—३, ८, १२.

गंतानोयज्ञंयज्ञियाःसुशमिश्रोताहवमरक्षएवयामरुत् ॥ ज्येष्ठासोनपर्वतासोव्योमनियूयंतस्यप्रचेतसःस्यातदुर्धर्तवोनिदः॥ ९ ॥—४, ४, ३४.

त्वंह्यग्नेप्रथमोमनोतास्याधियोअभवोदस्महोता ॥ त्वंसींवृषन्नकृणोर्दुष्टरीतुसहोविश्वस्मैसहसेसहध्यै ॥१॥—४, ४, ३५.

योनःस्वोअरणोयश्चनिष्ठचोजिघांसति ॥ देवास्तंसर्वेधूर्वंतुब्रह्मवर्ममामांतरं ॥ १९ ॥—५, १, २२.

अग्निंनरोदीधितिभिररण्योर्हस्तच्युतीजनयंतप्रशस्तं ॥ दूरेदृशं गृहपतिमथर्युं ॥ १ ॥—५, १, २३.

प्रतिचक्ष्वविचक्ष्वेंद्रश्चसोमजागृतं ॥ रक्षोभ्योवधमस्यतमशनिं यातुमद्भ्यः ॥ २५॥—५, ७, ९.

माचिदन्यद्विशंसतसखायोमारिषण्यत ॥इंद्रमित्स्तोता वृषणंसचासुतेमुहुरुक्थाचशंसत ॥ १ ॥—५, ७, १०.

अग्नेयाहीमरुत्सखारुद्रेभिःसोमपीतये ॥ सोभर्याउपसुष्टुतिंमादयस्वस्वर्णरे ॥ १४॥—६, ७, १५.

स्वादिष्ठयामदिष्ठयापवस्वसोमधारया ॥ इंद्रायपातवेसुतः ॥ १ ॥—६, ७, १६.

यत्तेराजंछृतंहविस्तेनसोमाभिरक्षनः ॥ अरातीवामानस्तारीन्मोचनःकिंचनाममदिंद्रायेंदोपरिस्रव ॥४॥—७, ५, २८.

अग्ने बृहन्नुषसामूर्ध्वो अस्थान्निर्जगन्वान्तमसो ज्योतिषागात् ॥ अग्निर्भानुना रुशता स्वंग आजातो विश्वा सद्मान्यप्राः ॥ १ ॥—७, ९, २९.

समानीव आकूतिः समाना हृदयानि वः ॥ समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥ ४ ॥—८, ८, ४९.

तच्छंयोरावृणीमहे गातुं यज्ञाय गातुं यज्ञपतये दैवी स्वस्तिरस्तु नः स्वस्तिर्मानुषेभ्यः। ऊर्ध्वं जिगातु भेषजं ॥ शन्नो अस्तु द्विपदे शं चतुष्पदे ॥

तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ॥ धियो यो नः प्रचोदयात् ॥ १० ॥—३, ९, १०.

## खंड ६.

मुंचामि त्वा हविषा जीवनाय कमज्ञातयक्ष्मादुत राजयक्ष्मात् ॥ ग्राहिर्जग्राह यदि वैतदेनं तस्या इंद्राग्नी प्रमुमुक्तमेनं ॥ १ ॥—८, ८, १९.

अद्या नो देव सवितः प्रजावत्सावीः सौभगं ॥ परा दुःष्वप्न्यं सुव ॥ ४ ॥—४, ४, २९.

यच्च गोषु दुःष्वप्न्यं यच्चास्मे दुहितर्दिवः ॥ त्रिताय तद्विभावर्याप्त्याय परावह नेहसो व ऊतयः सुऊतयो व ऊतयः ॥ १४ ॥—६, ४, ९.

यो मे राजन्युज्यो वा सखा वा स्वप्ने भयं भीरवे मह्यमाह ॥ स्तेनो वा यो दिप्सति नो वृको वा त्वं तस्माद्वरुण पाह्यस्मान् ॥ १० ॥—२, ७, १०.

येन सूर्य ज्योतिषा बाधसे तमो जगच्च विश्वमुदियर्षि भानुना ॥ तेनास्मद्विश्वामनिरामनाहुतिमपामीवामप दुःष्वप्न्यं सुव ॥ ४ ॥ (ऋ. ९)—७, ८, १२.

यस्येते विश्वा भुवनानि केतुना प्रचेरते नि च विशंते अक्तुभिः ॥ अनागास्त्वेन हरिकेश सूर्याह्नाह्ना नो वस्यसा वस्यसोदिहि ॥ ९ ॥ (ऋ. ४)—७, ८, १३.

देवाःकपोतइषितोयदिच्छन्दूतोनिर्ऋत्याइदमाजगाम ॥ तस्माअर्चामकृ-
णवामनिष्कृतिं शंन्नोअस्तुद्विपदेशंचतुष्पदे ॥१॥ सर्वसूक्त(ऋ. ९)—
८, ८, २३.

वयंमुत्वापथस्पतेरथंनवाजसातये ॥ धियेपूषन्नयुज्महि ॥ १ ॥ सर्व
सूक्त. (ऋ. १०)—४, ८, १७.

संपूषन्विदुषानययोअंजसानुशासति ॥ यएवेदमितिब्रवत् ॥ १ ॥ सर्व
सूक्त (ऋ. १०)—४, ८, १९.

संपूषन्नध्वनस्तिरव्यंहोविमुचोनपात् ॥ सक्ष्वादेवप्रणस्पुरः ॥ १ ॥ सर्व
सूक्त (ऋ. १०)—१, ३, २४.

## खंड ८.

युवंवस्त्राणिपीवसावसाथेयुवोराच्छिद्रामंतवोहसर्गाः ॥ अवातिरतमनृतानि
विश्वऋतेनमित्रावरुणासचेथे ॥ १ ॥—२, २, २२.

आयुष्यंवर्चस्यंरायस्पोषमौद्भिदं ॥ इदंहिरण्यंवर्चस्वज्जैत्रायाविशतादिमां ॥
परिशिष्ट—८, ७, १७.

## खंड ९.

ममाग्नेवर्चोविहवेष्वस्तुवयंत्वेंधानास्तन्वंपुषेम ॥ मह्यंनमतांप्रादिशश्चतस्त्र
स्त्वयाध्यक्षेणपृतनाजयेम ॥ १ ॥—सर्व सूक्त (ऋ. ९,)—
८, ७, १९.

## खंड १०.

आमंद्रैरिंद्रहरिभिर्याहिमयूररोमभिः ॥ मात्वाकेचिन्नियमन्विनपाशिनोति
धन्वेवतांइहि ॥ १ ॥—३, ३, ९.

महित्रीणामवोस्तुद्युक्षंमित्रस्यार्यम्णः ॥ दुराधर्षंवरुणस्य ॥ १ ॥ सर्व-
सूक्त (ऋ. ३)—८, ८, ४३.

कनिक्रदज्जनुषं प्रब्रुवाणइयर्तिवाचमरितेवनावं ॥ सुमंगलश्चशकुनेभवासिमात्वाकाचिदभिभाविश्व्याविदत् ॥ १ ॥ सर्वसूक्त ( ऋ. २ )— २, ८, ११.

देवींवाचमजनयंतदेवास्तांविश्वरूपाःपशवोवदंति ॥ सानोमंद्रेषमूर्जंदुहानाधेनुर्वागस्मानुपसुष्टुतैतु ॥ ११ ॥—६, ७, ९.

स्तुहिश्रुतंगर्तसदंयुवानंमृगंनभीममुपहत्नुमुग्रं ॥ मृळाजरित्रेरुद्रस्तवानोऽन्यंते अस्मन्निवपंतुसेनाः ॥ ११ ॥—२, ७. १८.

संसृष्टंधनमुभयंसमाकृतमस्मभ्यंदत्तांवरुणश्चमन्युः ॥ भियंदधानाहृदयेषुशत्रवःपराजितासोअपनिलयंतां ॥ ७ ॥—८, ३, १९.

## खंड ११.

स्वस्तिनोमिमीतामश्विनाभगःस्वस्तिदेव्यदितिरनर्वणः ॥ स्वस्तिपूषाअसुरोदधातुनःस्वस्तिद्यावापृथिवीसुचेतुना ॥ ११ ॥—४, ३, ७.

यतइंद्रभयामहेततोनोअभयंकृधि ॥ मघवञ्छग्धितवतन्नऊतिभिर्विद्विषोविमृधोजहि ॥ १३ ॥ ( ऋ. ६. )—६, ४, ३८.

## खंड १२.

आत्वाहार्षमंतरेधिध्रुवस्तिष्ठाविचाचलिः ॥ विशस्त्वासर्वावांछंतमात्वद्राष्ट्रमधिभ्रशत ॥ १ ॥ सर्वसूक्त( ऋ. ६ ). ८, ८, ३१.

जीमूतस्येवभवतिप्रतीकंयद्वर्मीयातिसमदामुपस्थे ॥ अनाविद्धयातन्वाजयत्वंसत्वावर्मणोमहिमापिपर्तु ॥ १ ॥ धन्वनागाधन्वनाजिंजयेमधन्वनातीव्राःसमदोजयेम॥ धनुःशत्रोरपकामंकृणोतिधन्वनासर्वाःप्रदिशोजयेम ॥ ( ऋ. ८ )—५, १, १९.

अहिरिवभोगैःपर्येतिबाहुंज्यायाहेतिंपरिबाधमानः॥ हस्तघ्नोविश्वावयुनानिविद्वान्पुमान्पुमांसंपरिपातुविश्वतः ॥ १४ ॥—५, १, २१.

अभीवर्तेनहविषायेनेंद्रोअभिवावृते ॥ तेनास्मान्ब्रह्मणस्पतेभिराष्ट्रायवर्तय ॥ १ ॥ सर्वसूक्त (ऋ. ९)—८, ८, ३२.

प्रयोवां मित्रावरुणाजिरोदूतोअद्रवत् ॥ अयः शीर्षामदे रघुः ॥ ३ ॥ (ऋ. २)—६, ७, ६.

आशुःशिशानोवृषभोनभीमोधनाघनःक्षोभणश्चर्षणीनां॥संक्रंदनोऽनिमिषएकवीरः शतंसेनाअजयत्साकमिंद्रः ॥१॥ सर्वसूक्त (ऋ. ३)—८, ९, २२.

शासइत्थामहाँअस्यामित्रखादोअद्भुतः ॥नयस्यहन्यतेसखानजीयतेकदाचन ॥ सर्वसूक्त(ऋ. ९)—८, ८, १०.

वृथारभंतुमधुनोघृतस्येतिसौपर्णसूक्तम्॥उपश्वासयपृथिवीमुतद्यांपुरुत्रातेमनुतांविष्ठितंजगत् ॥ सदुंदुभेसजूरिंद्रेणदेवैर्दूराद्दवीयोअपसेधशत्रून् ॥ २९ ॥—४, ७, ३९.

अवसृष्टापरापतशरव्येब्रह्मसंशिते ॥ गच्छामित्रान्प्रपद्यस्वमामीषांकंचनोच्छिषः ॥ १६ ॥—९, १, २२.

यत्रबाणाःसंपतंतिकुमाराविशिखाइव ॥ तत्रानोब्रह्मणस्पतिरदितिःशार्मयच्छतुविश्वाहाशर्मयच्छतु ॥ १७ ॥—९, १, १२.

इत्यश्वलायनगृह्यसूत्रे तृतीयोऽध्यायः.

---

# अध्याय ४.

## खण्ड २.

अपेतवीतविचसर्पतातोस्माएतंपितरोलोकमक्रन् ॥ अहोभिरद्भिरक्तुभिर्व्यक्तंयमोददात्यवसानमस्मै ॥ ९ ॥—७, ६, १९.

उदीर्ष्वनार्यभि जीवलोकंगतासुमेतमुपशेषएहि ॥ हस्तग्राभस्यदिधिषो-
स्तवेदंपत्युर्जनित्वमभिसंबभूथ ॥ ८ ॥—७, ६, २७.
धनुर्हस्तादाददानो मृतस्यास्मेक्षत्रायवर्चसेबलाय ॥ अत्रैवत्वमिहवयंसु-
वीराविश्वाःस्पृधो अभिमातीर्जयेम ॥ ९ ॥—७, ६, २७.

## खंड ३.

अग्नेर्वर्मपरिगोभिर्व्ययस्वसंप्रोर्णुष्वपीवसामेदसाच ॥ नेत्त्वाधृष्णुर्हरसाज-
र्हृषाणोदधृग्विधक्ष्यन्पर्यंखयाते ॥ ७ ॥——७, ६, २१.
अति द्रवसारमेयौश्वानौ चतुरक्षौशबलौ साधुना पथा ॥ अथापितॄन्त्सुवि-
दत्राँउपेहियमेनयेसधमादंमदंति ॥ १० ॥——७, ६, १९.
इममग्नेचमसंमाविजिह्वरःप्रियोदेवानामुतसोम्यानां ॥ एषयश्चमसोदेव-
पानस्तस्मिन्देवाअमृतामादयंते ॥ ८ ॥—७, ६, २१.

## खण्ड ४.

प्रेहिप्रेहिपथिभिःपूर्व्येभिर्यत्रानःपूर्वेपितरःपरेयुः ॥ उभाराजानास्वध-
यामदंतायमंपश्यासिवरुणंचदेवं ॥ ७ ॥ ( ऋचा. १,२, ४, ९ )—
७, ६, १९.
मैनमग्नेविदहोमाभिशोचोमास्यत्वचं चिक्षिपोमाशरीरं ॥यदाशृतंकृणवो-
जातवेदोऽथेमेनंप्रहिणुतात्पितृभ्यः ॥१॥ (ऋचा ६ )–७,६,२०.
पूषात्वेतश्च्यावयतुप्रविद्वाननष्टपशुर्भुवनस्यगोपाः ॥सत्वैतेभ्यःपरिददत्पि-
तृभ्योऽग्निर्देवेभ्यःसुविदत्रियेभ्यः ॥३॥ ( ऋचा ४ )—७,६,२३.
उपसर्पमातरंभूमिमेतामुरुव्यचसंपृथिवींसुशेवां ॥ ऊर्णम्रदायुवतिर्दक्षि-
णावतएषात्वापातुनिर्ऋतेरुपस्थात् ॥१०॥ (ऋचा ४)–७,६,२७.
सोमएकेभ्यःपवतेघृतमेकउपासते ॥ येभ्योमधुप्रधावतितांश्चिदेवापिगच्छ-
तात् ॥ १ ॥ (ऋ. ९)—८, ८, १२.

उरुणसावसुतृपाउदुंबलीयमस्यदूतौचरतोजनाँअनु ॥ तावस्मभ्यंदृशये सूर्यायपुनर्दातामसुमद्येहभद्रं ॥ १२ ॥—७, ६, १६.

इमेजीवाविमृतैरावर्वृत्रन्नभूद्भद्रादेवहूतिर्नोअद्य ॥ प्रांचोअगामनृतयेहसा यद्राघीयआयुःप्रतरंदधानाः ॥३॥—७, ६, २.

## खंड ५.

शीतिकेशीतिकावतिल्हादिकेल्हादिकावति ॥ मंडूक्या३सुसंगमइमं स्व१ग्निंहर्षय ॥ १४ ॥—७, ६, २२.

उपसर्पमातरंभूमिमेतामुरुव्यचसंपृथिवींसुशेवां ॥ ऊर्णम्रदायुवतिर्दक्षिणा-वतएषात्वापातुनिर्ऋतेरुपस्थात् ॥ १० ॥—७, ६, २७.

उच्छ्वंचस्वपृथिविमानिबाधथाः सूपायनास्मैभवसूपवंचना ॥ मातापुत्रं यथासिचाभ्ये नंभूमऊर्णुहि ॥ ११ ॥—७, ६, २८.

उच्छ्वंचमानापृथिवीसुतिष्ठतुसहस्रंमितउपहिश्रयंतां ॥ तेगृहासोघृतश्चु-तोभवंतुविश्वाहास्मैशरणाःसंत्वत्र ॥ १२ ॥—७, ६, २८.

उत्तेस्तभ्नामिपृथिवींत्वत्परीमंलोगंनिदधन्मोअहंरिषं ॥एतांस्थूणां पित-रोधारयंतुतेऽत्रायमःसादनातेमिनोतु ॥ १३ ॥—७, ६, २८.

## खंड ६.

क्रव्यादमग्निंप्रहिणोमिदूरंयमराज्ञोगच्छतुरिप्रवाहः ॥ इहैवायमितरोजात-वेदादेवेभ्योहव्यंवहतुप्रजानन् ॥ ९ ॥—७, ६, २१.

तंतुंतन्वन्रजसोभानुमन्विहिज्योतिष्मतःपथोरक्षधियाकृतान् ॥ अनुल्बणं-वयतजोगुवामपोमनुर्भवजनयादैव्यंजनं ॥ ६ ॥—८, १, १४.

आरोहतायुर्जरसंवृणानाअनुपूर्वंयतमानायतिष्ठ ॥ इहत्वष्टासुजनिमास-जोषादीर्घमायुःकरतिजीवसेवः ॥ ६ ॥—७, ६, २७.

इमंजीवेभ्यःपरिधिंदधामिमैषांनुगादपरोअर्थमेतं ॥ शतंजीवंतुशरदः पुरूचीरंतर्मृत्युंदधतांपर्वतेन ॥ ४ ॥—७, ६, २६.

परंमृत्योअनुपरेहिपंथांयस्तेस्वइतरोदेवयानात् ॥ चक्षुष्मतेशृण्वतेते- ब्रवीमिमानःप्रजांरीरिषोमोतवीरान् ॥ १॥(अ.४)—७, ६,२६.

यथाहान्यनुपूर्वंभवंतियथऋतवऋतुभिर्यंतिसाधु ॥ यथानपूर्वमपरोजहात्ये- वाधातरायूंषिकल्पयैषां ॥ ५ ॥—७, ६, २६.

इमानारीरविधवाःसुपत्नीरांजनेनसर्पिषासंविशंतु॥अनश्रवोऽनमीवाःसुर- त्नाआरोहंतुजनयोयोनिमग्रे ॥ ७ ॥—७, ६, २७.

अश्मन्वतीरीयतेसंरभध्वमुत्तिष्ठतप्रतरतासखायः ॥ अत्राजहामयेअसन्न- शेवाःशिवान्वयमुत्तरेमाभिवाजान् ॥ ८ ॥—८, १, १४.

आपोहिष्ठामयोभुवस्तानऊर्जेदधातन ॥ महेरणायचक्षसे ॥ १॥—७,६,५.

परीमेगामनेषतपर्यग्निमहृषत ॥ देवेष्वक्रतश्रवःकइमाँआदधर्षति ॥५॥— ८, ८, १३.

अपनःशोशुचदघमग्नेशुशुग्ध्यारयिं॥अपनःशोशुचदघं॥ सर्वसूक्त (अ.८) —१, ७, ५.

## खंड ७.

शन्नोदेवीरभिष्टयआपोभवंतुपीतये ॥ शंयोरभिस्रवंतुनः ॥ ४ ॥— ७, ६, ५.

## खंड ८.

मधुवाताऋतायतेमधुक्षरंतिसिंधवः ॥ माध्वीःनसंत्वोषधीः ॥ ६ ॥ (अ. ३.)—१, ६, १८.

अक्षन्नमीमदंतह्यवप्रियाअधूषत ॥ अस्तोषतस्वभानवोविप्रानविष्ठयामती योजान्विंद्रतेहरी ॥ २ ॥—१, ६, ३.

खंड ९.

कद्रुद्रायप्रचेतसेमीळ्हुष्टमायतव्यसे ॥ वोचेमशंतमंहृदे॥ सर्वसूक्त (ऋ. ९)—१, ३, २६.

इमारुद्रायतवसेकपर्दिनेक्षयद्वीरायप्रभरामहेमतीः ॥ यथाशमसद्द्विपदेचतुष्पदेविश्वंपुष्टंग्रामेअस्मिन्ननातुरं ॥ सर्वसूक्त (ऋचा ११)—१, ९, ५.

आतेपितर्मरुतांसुम्नमेतुमानःसूर्यस्यसंदृशोयुयोथाः ॥ अभिनोवीरोअर्वतिक्षमेतप्रजायेमहिरुद्रप्रजाभिः ॥ सर्वसूक्त (ऋ. १६)—२, ७, १६.

इमारुद्रायस्थिरधन्वनेगिरःक्षिप्रेषवेदेवायस्वधाव्ने ॥ अषाळ्हायसहमानायवेधसेतिग्मायुधायभरताशृणोतुनः ॥ सर्वसूक्त (ऋ. ४)—५, ४, १३.

शंनइंद्राग्नीभवतामवोभिःशंनइंद्रावरुणारातहव्या ॥ शमिंद्रासोमासुविताय शंयोःशंनइंद्रापूषणावाजसातौ ॥ सर्वसूक्त (ऋचा १५)—५, ३, २८.

शंनइंद्राग्नीभवतामवोभिः० ॥ १ ॥—५, ३, २८.

इत्याश्वलायनगृह्यसूत्रे चतुर्थोऽध्यायः

समाप्त.

# आश्वलायन गृह्यसूत्रांतील कठिण शब्दांचा कोश.

अनादेशाहुती—आ. गृ. सू. अध्या. १, खण्ड ३, सूत्र ८, यांत सांगितलेल्या ज्या आहुती त्या.

अनुमंत्रण—अर्थविधानपूर्वक मंत्रोच्चार करून देवतेचे ठिकाणीं एकाग्र चित्त ठेवणें.

अन्वष्टक्य—श्राद्धविशेष.

अन्वारब्ध—लागून असलेला.

अरणी—अग्निहोत्रांतील पात्रविशेष.

अवदान—आहुति.

अवभृथ—एखादें याज्ञिक कर्म झाल्यानंतर आणली पुरवणी रूपानें जें कर्म करतात तें.

अवभृथस्नान—यज्ञ झाल्यानंतर स्नान करतात तें.

अश्मा—दगड.

अष्टकाकर्म—कर्मविशेष.

अंगुष्ठपर्वमात्र—अंगोठ्याचे पेऱ्याइतकें.

आघार—आ. गृ. सू. अध्या. १ खं. १०, सूत्र १३, यांत सांगितलेल्या आहुती.

आज्य—तूप.

आलोडन—ढवळणें.

आश्वयुजी—कर्मविशेष.

आश्वलायन—या नांवाचे ऋषि किंवा त्यांचे संबंधी जें तें.

इध्मा—१५ समिधांचें जुडगें.

उत्तरसंस्थ, किंवा उदक्संस्थ— उत्तरेकडे समाप्त करावें याचें कर्म.

उत्पवन—लोटणें.

उत्सर्जन—कर्मविशेष.

उदकुम्भ—पाण्याची मातीची घागर.

उद्दालकव्रत—कर्मविशेष.

उपल—दगड.

उपस्तरण—अगोदर तूप लावणें.

उपस्थान—उभें राहून हात जोडून प्रार्थना.

उपाकर्म—कर्मविशेष.

ऊवध्यगोह—पशु मारण्याचे ठिकाणीं पडलेलें रक्त वगैरे पुरण्याची खांच.

एकोद्दिष्ट श्राद्ध—कर्मविशेष.

कर्षू—खांच.
कुशसूना—दर्भ कापणें.
कृताकृत—विकल्प.
कौलाल—खापराचें.
क्षार—तीळ व मूग यांशिवाय शें गांचें धान्य, गहूं, कोद्रू, कोथिंबीर, देवधान्य, शमीधान्य, फारवेळ भिजलेलें धान्य, पण्य, मूळ इ.
गृह्य—भार्येसह करावयाचें तें.
चक्षुती—आ.गृह्यसूत्र. अध्या. १, खण्ड १०, सूत्र १४, यांत सांगितलेलें.
चमस—या नांवाचें याज्ञिक पात्र.
चौल—कर्मविशेष.
तैजस—सोनें, रुपें किंवा तांबें या चकचकीत धातूंचें केलेलें.
दर्शपौर्णमास—कर्मविशेष.
दृषद्—दगड.
धन्वंतरी देव } नामविशेष.
धन्वन्तरी यज्ञ } नामविशेष.
नांदीश्राद्ध—कर्मविशेष.
निर्वाप—ओतणें.
पतित सावित्रिक—ज्याची मुंज झाली नाहीं तो.
पंचावृत्ति—तीन प्रवराहून अधिक प्रवर ज्यास आहेत तो.
परिकर्म—खटपटी मंडळी.
परिदान—फिरवून देणें.
परिधि—झाडाची साग्र व लांब फांदी.
परिसमूहन—हाताला पाणी लावून तो हात अग्नीसभोंवती जमिनीवर फिरविणें.
परिस्तरण—अग्नीभोंवती दर्भ पसरणें.
पर्युक्षण—अग्नीभोंवती पाणी शिंपडणें.
पशु—यज्ञास उपयुक्त प्राणी.
पात्री—अग्निहोत्रसंबंधी पात्रविशेष,
पार्वणश्राद्ध—कर्मविशेष.
पुरोहितदेव—नामविशेष.
पुंसवन—संस्कारविशेष; डोहोळे जेवण.
पूर्तश्राद्ध—कर्मविशेष.
पूर्वसंस्थ—पूर्वेस समाप्त करावयाचें कर्म.
पृषदाज्य—तुपाचे बिंदू.
प्रणीता—पात्रविशेष.
प्रणीताप्रणयन—प्रणीता नामक पात्राचा संस्कार.
प्रत्यभिघार—तूप शिंपडणें.
प्रदक्षिण—उजव्या बाजूनें मंडलाकार.
प्रहुत—अग्नींत आहुती न देतां भू-

मि वगैरे ठिकाणीं आहुती द्यावयाचे यज्ञ.

प्रादेश—टीचभर.

प्रादुष्करण—प्रगट करणें.

प्राशित्रहरण—पात्रविशेष.

प्रोक्षण—शिंपडणें.

बर्हि—दर्भमुष्टि.

ब्रह्मणीहुत—ब्राह्मणांस भोजन घालावयाचे यज्ञ.

मधुपर्क—दह्यांत मध टाकणें, कर्मविशेष.

माध्यावर्ष, मेधाजनन—कर्मविशेष.

मेखला—कडदोरा.

यूप—यज्ञपशु ज्यास बांधितात तो स्तंभ.

लवण—मीठ.

लोहायस—लोखंडी.

वपा—पापुद्र्यासारखी पशूची अंतस्त्वचा.

वपाश्रपणी—वपा शिजविण्याचीं साधनें.

विकिर—वेगळें अन्न.

व्याहृति—'भूर्भुवःस्वः' या मंत्राचें नांव.

वृक्क—कुक्षींतील विशेष मांसगोल.

व्रतादेशन—व्रतोपदेश.

शम्याप।—अग्निहोत्रसंबंधी पात्रविशेष.

शांतिकर्म, श्रवणाकर्म—कर्मविशेष.

सदस्य—या नांवाचा ऋत्विक्.

सप्तपदी—कर्मविशेष.

समवत्तधान—अग्निहोत्रसंबंधी पात्रविशेष.

सर्पबलि—कर्मविशेष.

सर्वप्रायश्चित्त—कर्मांत झालेल्या वैगुण्यनिरसनार्थ कर्म करितात तें.

सूना—यज्ञपशू मारण्याचें स्थान.

स्नातक—सोडमुंज झालेला.

स्थालीपाकहोम—कर्मविशेष.

स्थण्डिल—मृत्तिका वगैरेचें अग्निस्थापनार्थ ओट्यासारखें केलेलें स्थल.

स्रुचा—याज्ञिक पात्रविशेष.

स्रुवा—अग्निहोत्रांतील पात्रविशेष.

स्वस्तिवाचन—'कल्याण असो' असें ह्मणविणें.

स्विष्टकृत्—या नांवाचें, आ० गृ० सू० अध्या० १, खं० १०, सू० २० पासून २२ पर्यंत अवदान.

हृदयशूल—ज्या पात्रांत पशूचें हृदय तापवावयाचें तें पात्र.

ग्रंथोत्तेजक मंडळीकडून पसंत झालेलीं पुस्तकें खालीं सही करणारांकडे रोख किंमत पाठविली असतां मिळतील.

सन १८७८ सालचीं—

| नांवें. | किंमत. | | ट. हं. | |
|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | आ. | पै. |
| कृषिकर्म, (गुप्ते व राजेकृत). | ३ | ८ | ४ | ० |
| तारानाटक, (महाजनीकृत). | ० | १२ | १ | ० |

सन १८७९ सालचीं—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हिंदुस्थानाचा इतिहास, (लो. हि. वा. कृत) | २ | ० | २ | ० |
| शिवाजीचरित्र, (ग. शा. लेलेकृत). | १ | ० | १ | ० |
| सार्थ आश्वलायनगृह्यसूत्र, (लो.हि.वा.कृत) | १ | ४ | १ | ६ |
| स्वपराक्रम, (ग. भि. गुंजीकरकृत). | ० | ९ | १ | ० |

सन १८८० सालचीं—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स्वाध्याय, (लो. हि. वा. कृत). | २ | ० | २ | ० |
| कृषिकर्मांतर्गत रसायनशास्त्र व भूगर्भशास्त्र, (वा. आ. गुप्तेकृत). | २ | ० | २ | ० |
| ऐतिहासिक गोष्टी, भाग ३, (लो. हि. वा. कृत). | १ | ० | १ | ६ |

सन १८८१ सालाबद्दल—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आरोग्यरक्षक विद्या, (चिं.अ.लिमयेकृत). | १ | ० | १ | ६ |
| बापू गोखले यांचें चरित्र, तपासून शुद्ध केलेली आवृत्ति दुसरी, (शं.तु.शा.कृत). | १ | ० | १ | ६ |
| विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांचें चरित्र, | (तयार होत आहे) | | | |
| परशुराम भाऊ पटवर्धन यांचें चरित्र, | ( ,, ,, ) | | | |

**गोपाळराव हरि देशमुख.**

माधवबागेसमोर डा. मोरेश्वर गोपाळ देशमुख
यांचे घरीं, मुंबई येथें.